सत्यमेव जयते

# वसई-विरार शहर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2011-2012

सह संचालक,(मनपालेप) स्थानिक निधी लेखापरिक्षा,
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई.

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी 2011-2012 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफारीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# वसई विरार शहर महानगरपालिका या संस्थेचा सन 2011-2012 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.: स्था/१८ ब/वविशम/उविर/620

सहसंचालक, (म.न.पा.ले.प.),
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला, रायगड भवन,
सी.बी.डी. (बेलापूर),
नवी मुंबई.४००६१४
दिनांक :- 30 ऑक्टोबर,2013

प्रति,
आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका
विरार (पूर्व) ता. वसई जी. ठाणे - ४०१३०५

वसई विरार शहर महानगरपालिकेचे आर्थिक वर्ष 2011-2012 या वर्षाचे लेखा परीक्षण श्री.संदीप देसाई ,लेखापरीक्षा अधिकारी (म.न.पा.ले.प.) नवी मुंबई यांनी दिनांक12/02/2012 ते 31/07/2013 या कालावधीत पूर्ण केले. श्री. विलास गांगुर्डे उप संचालक (म.न.पा.ले.प.) यांनी दिनांक 22/10/2013 रोजी श्री.गोविंद राठोड,आयुक्त,वसई विरार शहर महानगरपालिका यांचे समवेत चर्चा करून अहवालाचे अंतिमीकरण केले. लेखा परीक्षण अहवालाच्या कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

| अ.क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | श्री. राजीवजी यशवंत पाटील | महापौर | 1-04-2011 ते 31-03-2012 |
| 2 | श्री. जितुभाई शहा | सभापती, स्थायी समिती | 1-04-2011 ते 31-03-2012 |
| 3 | श्री. किशोर हिराजी बोर्डे | आयुक्त | 1-04-2011 ते 31-03-2012 |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ..... 1

**I PART I : भाग १ ..... 3**

मागील लेखा परीक्षण अहवाल ..... 3

**कलम ९ अ खालील आक्षेप ..... 5**

1 उपार्जित द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे (ACCRUED BASED DOUBLE ENTRY SYSTEM) ..... 6

2 अंदाजपत्रक : अर्थसंकल्पीय अंदाज ..... 7

3 महानगरपालिका सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेची इतिवृत्त नोंदवही न ठेवणे. ..... 9

4 चिखल डोंगरी गावात व्यायाम शाळा बांधणे (आमदार निधी) ..... 10

5 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या दवाखाना, रुग्णालयासाठी डॉक्टर व परिचारीका यांची सेवा ठेक्याने घेण्यातील अनियमितता. ..... 13

6 महानगरपालिकेच्या विविध योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प राबविणेकामी सल्लागार नेमणे. ..... 17

7 महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता सन 2011-12 करीता स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचा ठेका. ..... 21

8 सन 2011-12 अग्निशमन दलाकरिता केलेल्या साहित्य खरेदीमधील अनियमितता. ..... 24

9 महानगरपालिकेच्या विविध बालोद्यानात सन 2011-12 मध्ये नविन खेळणी पुरवठा करणेचा ठेक्यातील त्रुटींबाबत. ..... 28

10 वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीसाठी जळावू लाकूड खरेदी करणेबाबत. ..... 29

**कलम ९ ब खालील आक्षेप ..... 31**

11 जनगणना 2011 या शासन योजनेवर झालेला खर्चाचे लेखा परिक्षण. ..... 32

12 प्रभाग समिती 'ड' मधील वॉर्ड क्र. 69 मध्ये DG नगरमध्ये लहान मुले व जेष्ठ नागरिकांसाठी पार्क तयार करणे. ..... 34

13 प्रभाग क्र. 4 मध्ये विरार (पू) शंकर विलास हिंदू हॉटेल समोर नाल्याचे बांधकाम ..... 36

14 वॉर्ड क्र. 61 मध्ये वाळीव मुख्यरस्ता ते धुमाळनगर पर्यंत रस्ता डांबरीकरण ..... 39

15 धुरी कॉम्लेक्स येथील उद्यान विकसित करणे....41
16 “ड” प्रभागातील वॉर्ड क्र. 75 मध्ये आनंदनगर उद्यान दुरुस्तीच्या नस्तीमधील त्रुटींबाबत. ....44
17 चुळणा ते गास पर्यंत रस्त्याची साईड पटटी करणे....47
18 एव्हर शाईन सिटी एव्हन्यू ते स्कायहाईटस पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे....50
19 नालासोपारा नगरपरिषद हददीतील स्मशानभूमि ते समेळ अपार्टमेंट पर्यंत नाला बांधणे (सा.क्र. 183 ते 286 मी) (नागरी दलित वस्ती सुधारणा योजना) ....54
20 गास चुळणे पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे (12 वा वित्त आयोग) ....56
21 नवघर-माणिकपूर विभागातील वसई रोड येथील रस्ता डांबरीकरण दुरस्ती करणे....59
22 नालासोपारा (प) येथे लक्ष्मीबेन छेडा मुख्य रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे....62
23 निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत भास्कर आळी सुरुच्या बागेकडील रस्त्या लगत 18 सिटसचे शौचालय बांधणे. निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत. ....65
24 निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत वसई नगरपरिषद रुग्णालयाच्या मागील जागेत 12 सिटसचे शौचालय बांधणे. ....68
25 नालासोपारा (पूर्व) येथे लक्ष्मीनगर येथील विरार मुख्य रस्ता ते साई रेसिडेंसी पर्यंत के.जी.एन कॉलनी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. ....71
26 चुळणा भाबोळपाडा येथे निर्मल महानगर अभियान अंतर्गत शौचालय बांधणे....74
27 निर्मल एम.एम.आर अभियान अंतर्गत उमेळमान घरत आळी येथे शौचालय बांधणे....77
28 निर्मल अभियान अंतर्गत संभाजी नगर येथे गावडे यांचे घराजवळ 18 सिटचे शौचालय बांधणे....80
29 नालासोपारा चक्रेश्वर तलाव येथील मंदीराच्या बाजूला रस्ता कॉंक्रिट, पाथवे बांधणे....83
30 राजीव गांधी शाळा ते ठाकुर विद्यामंदिर पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. ....86
31 उमेळे गावातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे....89
32 प्रभाग समिती ‘ई’ कार्यालय क्षेत्रातील सातमा देवी मंदिर ते पापडी नायगाव रस्ता डांबरीकरण करणे. 92
33 जुचंद्र पाझर तलाव येथे पाणी शुध्दीकरणासाठी प्रेशर फिल्टर पुरविणे व बसविणे. ....94
34 तामतलाव येथील शेट्टी जनरल स्टोर फलकाव क्रॅास सातमादेवी मंदीर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. 96
35 वसई-विरार (नागरी) पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती करणे (उसगाव). ....99

36 प्रभाग ‘क’, ‘ड’, ‘इ’ बांधकाम विभागातील रस्ते बांधकामाच्या विशिष्ट बाबींच्या चुकीच्या दरपृथःकरणामुळे (रेट ऍनॅलिसिस) ठेकेदारास झालेल्या अतिप्रदानाबाबत. ....101
37 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत विभागीय कार्यालय नवघर-माणिकपूर, नालासोपारा येथे ठेके पध्दतीने तारतंत्री पूरवठा करणे. ....102
38 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयाकरीता लागणारी विविध औषधे खरेदी ..104
39 रुग्णालयासाठी दूध, अंडी, भोजन पुरवठा करणे. ....108
40 प्रभाग समिती 'ड' व्हॅक्यूम क्लिनर ने सेप्टी टँक साफ करणेची नोंदवही अनियमितता. ....109
41 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या दवाखाना, रुग्णालयासाठी डॉक्टर व परिचारीका ठेक्याने पुरवणे. ....110
42 वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय रुग्णालयासाठी प्रशिक्षित दायी पुरविणे. 113
43 पल्स पोलीओ लसीकरण मोहीम नस्ती व प्रमाणके तपासणीमध्ये आढळुन आलेल्या त्रुटी. ....115
44 महानगरपालिका हददीतील मोकाट व जखमी श्वान पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबिज प्रतिबंधक लस देणे. ....117
45 जंतू नाशके, किटक नाशके खरेदी बाबत. ....121
46 नवघर-माणिकपुर, प्रभाग ‘ड’ यांचे वाहन दुरुस्तीवरील खर्च. ....124
47 महापालिकेसाठी वाहन भाडेतत्वावर घेणे. ....126
48 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या भागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- वसई विभाग. ....128
49 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नवघर- माणिकपुर (पुर्व) ....131
50 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार (पश्चिम) (अ) ....135

51 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नवघर- माणिकपुर (पश्चिम) ....138

52 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा पुर्व (ब)....142

53 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा (पश्चिम)....146

54 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका - नालासोपारा पुर्व (क)....149

55 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार पुर्व (अ) ....152

56 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा पुर्व (अ)....156

57 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार पुर्व (ब) ....160

58 सन 2010-11 च्या दराने खेळणी खरेदी करावी लागल्याने झालेल्या जादा खर्चाबाबत.....163

59 दिवाबत्ती साहित्य खरेदीमधील त्रुटींबाबत. ....165

60 सार्वजनिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम व महोत्सवासाठी चहापान, भोजन, खुर्च्या, मंडप यावरील खर्च ....167

61 प्रशासकीय कामासाठी सन 2011-12 करीता आवश्यकतेनुसार किरकोळ स्टेशनरी व आवश्यक साहित्य पुरविणेबाबत. ....169

62 वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागास पाईप प्लंबिंग फिटिंग इत्यादी साहित्य पुरवठा करणे. ....171
63 सुरक्षा रक्षक पुरविणेचा ठेका देण्याच्या प्रक्रियेत आढळुन आलेल्या त्रुटी. ....174
64 प्रभाग समिती "अ" मधील दावे व खटले नस्तीचे लेखा परिक्षणात आढळुन आलेल्या त्रुटी. ....178
65 प्रभाग समिती "ड" मधील दावे व खटले नस्तीचे लेखा परिक्षणात आढळुन आलेल्या त्रुटी. ....180
66 मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 नियम क्र. 260 व 267 नुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई न केल्याबाबत. ....182
67 महिला व बालकल्याण अंतर्गत अंगणवाडी व शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे 184
68 अग्निशमन विभागातील व्यवस्थापन ठेका (फायरमन) नवघर-माणिकपूर विभाग ....186
69 उद्यानातील खेळण्यांच्या दुरुस्तीबाबत. ....188
70 "ड" विभागातील कृष्णा टाऊनशिप येथील सुर्या उद्यान सुशोभिकरण करणे ....189
71 महानगरपालिकेने जतन केलेल्या भविष्य निर्वाह निधीमधील त्रुटी. ....192

**कलम ९ क खालील आक्षेप ....196**

**------------------- निरंक ------------------- ....197**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....199**

72 क्रिडांगणे, वृक्षारोपण आणि उद्यानाच्या कामांसाठी मजूर पुरविणेबाबत. ....200
73 श्रीमती रश्मी विजय घरत, लिपिक, यांचे सेवा पुस्तकातील त्रुटीबाबत. ....201
74 'अ' प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत. ....202
75 श्रीमती पद्मीनी मेहेर, लिपिक "क" प्रभाग यांच्या वेतन निश्चितीबाबत. ....203
76 'क' प्रभागातील श्री. शशिकांत रत्नाकर गायकवाड, शिपाई यांचे वेतन निश्चितीबाबत. ....204
77 'क' प्रभागातील सर्वश्री. अं.जि. सरवदे, लिपिक, दुष्यंत दा. ठाकुर, सहाय्यक फायरमन आणि ब.रा. फापे, वाहनचालक यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत. ....206
78 'क' प्रभागातील श्री. सु.ओं.चव्हाण, स,फायरमन आणि श्रीमती. सावित्री गायकवाड, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत ....208
79 'क' प्रभागातील सर्वश्री. रमेश राऊत, प्रकाश गोवारी, शशिकांत पाटील, विनयसिंग दात्रे यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत. ....209

80 ‘ड’ प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांतील त्रूटींबाबत....................................................210
81 श्री. अनिल दे. मोहिते, फायरमन यांचे वेतन निश्चिती बाबत....................................................211
82 कै. श्री. मनोज रत्नाकर जाधव, क्लिनर यांचे सेवानिवृत्ती प्रकरण. ..........................................214
83 ‘ड’ प्रभागातील कर्मचारी श्री. संजय वसंत मोहिते, लिपिक यांच्या वेतननिश्चितीतील त्रुटींबाबत. 215
84 ‘ड’ प्रभागातील कर्मचारी सौ. गीता राऊत, लिपिक यांच्या सेवा पुस्तकाबाबत.............................216
85 श्रीमती सुशिला सतिश तावडे (झाडू कामगार) यांच्या सेवापुस्तकाच्या तपासणीबाबत..............217
86 ‘क’ प्रभागातील श्रीमती संध्या व. पाटील व श्री. ल. पा. भोईर यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत...218
87 निवृत्ती वेतन प्रकरणे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 136 (8) नुसार सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर न केल्याबाबत....................................................220
88 श्री. प्रकाश बा. बाविस्कर, लिपिक (सेवानिवृत्त) यांचे सेवानिवृत्ती लाभ विषयक. ......................221
89 श्री. सुकदेव च. दरवेशी, स्वच्छता निरीक्षक यांचे सेवापुस्तकाबाबत. ............................................222
90 शहरांतर्गत वितरण व्यवस्था या शिर्षांतर्गत देण्यात आलेल्या मजुर ठेक्याच्या नस्ती व प्रमाणके लेखा परिक्षण पथकास उपलब्ध करून न देणेबाबत....................................................223
91 पाणीपुरवठा/बांधकाम विभागाने लेखा परिक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध करून न देणेबाबत.. 224
92 महानगरपालिका प्रभाग समिती ‘ड’ नवघर-माणिकपुर येथे उपविधी 2011 प्रमाणे पाणीपट्टी बिलाची सुधारीत दराने आकारणी न केल्याबाबत. ....................................................225
93 निवृत्ती वेतन अंशदान दरमहा अंशदान निधीत जमा न करणे. .....................................................226
94 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना. ....................................................228
95 भोगवटा प्रमाणपत्राची प्रत अनुपलब्ध असणे आणि जुन्या मालमत्ता करात प्रत्येक पाच वर्षानी दरवाढ करणेबाबत. ड प्रभाग नवघर-माणिकपूर क्षेत्र....................................................230
96 वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग ‘अ’ मधील मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत. ......231
97 रुग्णालयाकरीता दैनंदिन व किरकोळ कामकाज सेवा पुरविणे....................................................233
98 रुग्णालयासाठी ऑक्सिजन सिलिंडर रिफिंलींग करणे. ....................................................235
99 वसई-विरार शहर महानगरपालिका LPT-909-EX वाहनावर हायड्रोलिक लॅडर बसविणे.............236
100 निविदेमधील न्यूनतम व उच्चतम दर यामधील अवास्तव तफावतीबाबत. ................................238
101 प्रभाग समिती “ब”,”क” व “इ” मधील दावे व खटले नस्ती लेखा परिक्षणास सादर न करणे..........239

102 राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेकरीता प्राप्त अनुदान व खर्चाच्या नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत. ....239
103 “आग सुरक्षा निधी” तील प्रत्यक्ष जमा रक्कमांच्या तफावतीबाबत. ....240
104 अग्निशमन विभागाकडुन मागविण्यात आलेले व उपलब्ध न झालेले दस्तावेज ....241
105 उद्‍यान/वृक्षप्राधिकरण विभागाकडुन अभिलेखे उपलब्ध न होणे ....242
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....10

**विवरणपत्रे व जोडपत्रे** ....245

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| सामान्य प्रशासन | | 11 | | 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84, 85, 86, 87, 88, 89, 90 |
| नगर सचिव | 3 | | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 4 | 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36 | | 91 |
| शहर अभियंता - विद्युत विभाग | | 37 | | |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | | | | 92 |
| लेखा विभाग | 1, 2 | 71 | | 93, 94 |
| कर निर्धारण व संकलन | | | | 95, 96 |
| आरोग्य | 5 | 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45 | | 97, 98 |
| वाहन विभाग | | 46, 47 | | 99 |
| जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम | 6 | | | |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | | 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57 | | |
| भांडार | 7 | 58, 59, 60, 61, 62 | | 100 |
| सुरक्षा विभाग | | 63 | | |
| अनधिकृत | | 64, 65, 66 | | 101 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बांधकाम प्रतिबंध विभाग | | | | |
| महिला व बालकल्याण विभाग | | 67 | | 102 |
| अग्निशमन विभाग | 8 | 68 | | 103, 104 |
| उद्यान विभाग | 9 | 69, 70 | | 105 |
| जन्म-मृत्यु नोंदणी विभाग | 10 | | | |

# I Part I : भाग १

## *मागील लेखा परीक्षण अहवाल*

स्थानिक निधी लेखा विभागामार्फत महानगरपालिकेचे नियमित स्वरूपातील लेखा परीक्षण वित्त विभाग शासन निर्णय क्र. स्थानिले १०१० /प्र.क्र. २६ ब/ विमा प्रशा दि. ३१ मार्च २०११ अन्वये वित्तीय वर्ष 2011-12 पासून प्रथमच हाती घेत असल्याने मागील प्रलंबित परिच्छेद निरंक आहेत. तथापि यापूर्वी स्थानिक निधी लेखा विभागामार्फत महानगरपालिकेचे विशेष लेखा परीक्षण झाले असल्यास त्या परिच्छेदांवर स्वतंत्रपणे कार्यवाही अबाधित राहील.

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

## *1 उपार्जित द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे (Accrued based Double Entry System)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावली मधील (National Municipal Accounts Manual) प्रकरण क्र. 2 ते 5 मधील तरतुदीनुसार सन 2005-06 पासुन महानगरपालिकांनी उपार्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे क्रमप्राप्त आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना माहे जुलै 2009 मध्ये झालेली असल्याने आर्थिक वर्ष 2010-11 पासुन या पध्दतीने लेखे ठेवणे अपेक्षित होते तथापि अद्याप तसे लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.*** |

शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र. क्र.5/04/नवि-31 दि. 6-07-2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावली मधील (National Municipal Accounts Manual) प्रकरण क्र. 2 ते 5 मधील तरतुदीनुसार सन 2005-06 पासुन महानगरपालिकांनी उपार्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे क्रमप्राप्त आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना माहे जुलै 2009 मध्ये झालेली असल्याने आर्थिक वर्ष 2010-11 पासुन या पध्दतीने लेखे ठेवणे अपेक्षित होते तथापि अद्याप तसे लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.

याबाबत अर्धसमास पत्र क्र. 8 दि. 22/02/2013 अन्वये द्विनोंद पध्दतीने ठेवण्यात आलेले लेखे व ताळेबंदाची मागणी केली असता याकरीता सनदी लेखापालांची नेमणुक करण्यात आली असुन सप्टेंबर 2013 अखेर लेखे तयार होतील असे अनुपालन सादर केले आहे.

ताळमेळाची प्रक्रिया अपुर्ण असल्याने मुख्यालय व 5 प्रभाग समिती (अ,ब,क,ड,ई) यांचेकडील एकुण 405 बँक खाती आहेत. त्यापैकी 39 खाती अकार्यरत आहेत उर्वरीत 366 खात्यांपैकी 321 खात्यांमध्ये रोकडवहीमधील शिल्लकपेक्षा बँक खात्यातील शिल्लक रु. 3,28,13,496.32 ने कमी आहे.

45 बँक खात्यांमधील शिलकेपेक्षा रोकडवहीतील शिल्लक रु. 7,37,87,658.59 ने कमी आहे.

DATSCDM6901 (Ref No : 1)

## *2 अंदाजपत्रक : अर्थसंकल्पीय अंदाज*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9अ*

***अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानंतर त्यानुसार जमेच्या रकमा दर्शविण्यात येतात. अर्थसंकल्प तयार करताना मागील तीन वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रकमा, दर व करात करण्यात आलेली वाढ, महानगरपालिकेच्या मालमत्तेत झालेली वाढ अथवा घट, पालिका हद्दीत जमीन व इमारतीत झालेली वाढ अथवा घट या अनुषंगाने अर्थसंकल्पीय आर्थिक वर्षातील अंदाज वर्तविणे अपेक्षित आहे.***

सन 2011-12 च्या अर्थसंकल्पात महसुली जमेचे अंदाज वर्तविताना 1. महानगरपालिका कर व दर, 2.अनुदाने व अंशदाने, 3. एकत्रित पाणीपुरवठा व मलनि:सारण इ. जमा बाबींवर सरासरीपेक्षा 50 ते 95% वाढ दर्शविण्यात आली व त्यानुसार खर्चाच्या बाबींवरही अतिरिक्त वाढ दर्शविण्यात आली.

रक्कम रु. कोटीत

| लेखा शिर्ष | जमा | | लेखा शिर्ष | खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| | अंदाज | प्रत्यक्ष | | अंदाज | प्रत्यक्ष |
| नगरपालिका दर व कर | 262.91 | 175.82 | सामान्य प्रशासन व वसुलीचा खर्च | 30.57 | 19.60 |
| विशेष अधिनियमाखालील वसुली | 66.98 | 71.66 | सार्वजनिक सुरक्षितता | 12.12 | 8.31 |
| मालमत्ता व सेवांपासुन उत्पन्न | 8.10 | 7.89 | आरोग्य व सोयी | 126.15 | 88.31 |
| | | | लोकशिक्षण व सामाजिक कार्यक्रम | 7.61 | 2.73 |
| अनुदाने व अंशदाने | 137.29 | 78.65 | अनुदाने व अंशदाने | 105.81 | 42.02 |
| संकिर्ण | 16.29 | 17.78 | संकिर्ण | 18.91 | 4.90 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भांडवली जमा | 77.86 | 64.71 | भांडवली खर्च | 265.69 | 90.20 |
| असाधारण व ऋण निलंबन | 189.98 | 105.10 | असाधारण व ऋण निलंबन | 75.27 | 43.00 |
| एकुण | 759.41 | 521.61 | | 642.13 | 299.07 |

अर्थसंकल्पात महसुली व भांडवली जमेचा अंदाज एकुण रु. 759.41 कोटी इतका वर्तविण्यात आला होता. प्रत्यक्षात रु.521.61 कोटी महसुल जमा झाला. तसेच खर्च बाजुस रु. 642.13 कोटी महसुली व भांडवली खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला. प्रत्यक्षात महसुली व भांडवली खर्च रु. 299.07 कोटी करण्यात आला. प्रत्यक्ष जमा महसुलापैकी रु. 222.54 कोटी इतका महसुल वर्षअखेरीस शिल्लक राहिला. आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या कामांची देयके वर्षअखेरीस प्रदानीत न केल्याने व प्रस्तावित कामे वर्षभरात हाती न घेतल्याने सदर रक्कम शिल्लक राहिल्याचे दिसते. करीता नागरीकांकरीता सोयी-सुविधा पुरविण्यास महानगरपालिकेची उदासिनता दिसते.

तपासणीअंती असे दिसते की, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानंतर त्यानुसार जमेच्या अवास्तव रकमा दर्शविण्यात येतात. वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अंदाजपत्रकीय जमा अंदाजाच्या 69% प्रत्यक्ष महसुल जमा झाला व खर्च अंदाजाच्या 47% प्रत्यक्ष खर्च वर्षअखेरीस करण्यात आला.

अर्थसंकल्प तयार करताना मागील तीन वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रकमा, दर व करात करण्यात आलेली वाढ, महानगर पालिकेच्या मालमत्तेत झालेली वाढ वा घट, पालिका हद्दीत जमीन व इमारतीत झालेली वाढ वा घट या अनुषंगाने जमेशी निगडीत खर्चाचे अंदाज वर्तविणे अपेक्षित आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज सादर करतांना त्यात दर्शविण्यात आलेल्या रकमा वास्तववादी असाव्यात.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.13 दि. 25.2.2013 देण्यात आले होते. त्यास देण्यात आलेल्या खुलाशात नमुद करण्यात आले आहे की, जुलै 2009 मध्ये महानगरपालिका स्थापनेवेळी समाविष्ट गावे पुनः वगळणेचा निर्णय व स्थगिती या कारणांमुळे उद्दीष्टे साध्य होऊ न शकल्याने अर्थसंकल्प व प्रत्यक्ष जमा-खर्चात तफावत आहे. भविष्यात अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना उपरोल्लेखित सुचना विचारात घ्याव्यात.

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, पाणीपुरवठा, अतिक्रमण विषयक वसुलीची टक्केवारी वार्षिक अंदाजापेक्षा कमी प्रमाणात झाल्याचे दिसते. सन 2011-12 अखेरीस स्थानिक संस्था करांतर्गत 19000 संस्थांची नोंदणी झाली आहे. महानगरपालिका हद्दीत सुमारे 50000 पेक्षा अधिक संस्था असल्याने उर्वरीत संस्थांना स्थानिक संस्था करांतर्गत नोंदणीकृत करणे आवश्यक आहे. सन 2011-12 मध्ये रु. 165.15 कोटी अंदाजित उद्दीष्ट असताना कमी संस्थांची नोंदणी झाल्यामुळे प्रत्यक्षात रु. 93.08 कोटी स्थानिक संस्था कर जमा झाला. महानगरपालिका हद्दित समाविष्ट होण्यास 29 गावातील ग्रामस्थांचा विरोध असल्याने या गावांमधुन कोणतेही कररुपी उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होत नाही

तथापि महानगरपालिकेस सदर गावांकरीता सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागत आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर त्यात सामील झालेल्या नगरपरीषदा व ग्रामपंचायती यांचेकडे असलेल्या मंजुर पदांपैकी भरलेल्या अनुक्रमे 807 व 408 अशा एकुण 1215 पदांना शासनाची मंजुरी घेण्यात आली. तद्नंतर नवनिर्मित 40 अधिका-यांच्या पदाना शासन मंजुरी घेण्यात आली. ही पदे व 6 अभियंत्यांची अशी एकुण 46 पदे अद्याप रिक्त असल्याने, महानगरपालिकेस, आवश्यक उद्दीष्टे गाठताना अडचणी निर्माण होत आहेत, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

आर्थिक वर्ष 2011-12 च्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजित महसुली व भांडवली जमा (प्रारंभिक शिल्लक रु. 231.47 कोटी सह) रु. 990.86 कोटी असुन वर्षातील प्रत्यक्ष जमा रु. 521.61 कोटी आहे. म्हणजेच रु. 237.80 कोटी इतकी रक्कम कमी जमा झाली आहे. तसेच सदर आर्थिक वर्षातील मुळ अर्थसंकल्पीय अंदाजित महसुली व भांडवली खर्च रु. 642.13 कोटी आहे तर प्रत्यक्षात केलेला खर्च रु. 299.07 कोटी आहे. सबब महानगरपालिकेने रु. 454 कोटी इतकी रक्कम अखर्चित ठेवली आहे, जी नागरीकांच्या सोयीसुविधांकरीता खर्ची पडणे अपेक्षित होते.

महानगरपालिका निधीतील सन 2011-12 मधील शिल्लक रक्कम रु. 454 कोटी विविध बँकांमध्ये गुंतवणुक केल्याचे दिसते. तथापि महापलिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अशी गुंतवणूक अशा रकमांची गुंतवणुक करताना विविध राष्ट्रीकृत बँकाकडुन स्पर्धात्मक व्याजदर मागविणे व त्यानुसार अधिक व्याज देणा-या बँकेकडे रक्कम गुंतविणे क्रमप्राप्त आहे तथापि महानगरपालिकेने स्पर्धात्मक दर न मागविता बँक खाती असलेल्या बँकेतच त्या खात्यातील शिल्लक रकमा गुंतविल्या आहेत. त्यामुळे स्पर्धात्मक व्याजदराचा लाभ न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

अर्थसंकल्पात “पी” बजेट अंतर्गत महसुली खर्चाच्या दोन बाबींकरीता रु. 1.91 कोटी व भांडवली खर्चाच्या 6 बाबींकरीत रु. 23.69 कोटीची तरतुद करण्यात आली होती. तथापि या बाबींवर संपुर्ण वर्षात निरंक खर्च करण्यात आला आहे. “पी” बजेट अंतर्गत दारिद्र्यरेषेखालील व गरीब गरजूंसाठीच्या योजना असल्याने ही बाब महानगरपालिकेकरीता भुषणावह नाही.

सबब महानगरपालिका महसुल वाढीबाबत तसेच उपलब्ध तरतुद पुर्णतः खर्च करणेबाबत पुरेशा गांभिर्याने आवश्यक कार्यवाही/उपाययोजना राबवीत नाही असे नमुद करणेत येत आहे. यामुळे भांडवली खर्चामध्ये आवश्यक उद्दिष्टे गाठता आलेली नाहीत, प्रकल्प रखडले आहेत व किंमतीमध्ये वाढ होऊन अंतिमतः महानगरपालिकेचे नुकसान होत आहे.

DATSCDM6901 (Ref No : 2)

## *3 महानगरपालिका सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेची इतिवृत्त नोंदवही न ठेवणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची "ड" प्रकरण दोन मधील नियम (1)(ढ) व 3(त्र) अन्वये महानगरपालिका सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेच्या इतिवृत्त नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची "ड' प्रकरण दोन मधील नियम (1)(ढ) नुसार सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर या साठी तरतूद करण्यात आलेल्या इतिवृत्त नोंदवहीत तयार करणे तसेच सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या व्यक्तीने त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. सचिव विभागाने याबाबत एकत्रित इतिवृत्त नोंदवही न ठेवता प्रत्येक सभेसाठी स्वतंत्र इतिवृत्त व त्यातील ठराव एकत्रित करुन ठेवले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनुसूची "ड" प्रकरण दोन नियम 3(त्र) नुसार नगरपालिका सचिवाने स्थायी समितीच्या प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज या संबंधीचे एक इतिवृत्त या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या नोंदवहीत नमूद करुन ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत अध्यक्षस्थानी असलेल्या व्यक्तीने स्वाक्षरी केली पाहिजे. सचिव विभागाने याबाबत एकत्रित इतिवृत्त नोंदवही न ठेवता ठराव एकत्रित करुन ठेवले आहेत.

सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभा यांच्या स्वतंत्र इतिवृत्त नोंदवहया ठेवण्यात याव्यात.

याबाबत देण्यात आलेल्या अ.स.ज्ञापन क्र. 4 दि. 20/2/13 ला दि. निरंकनुसार अनुपालन सादर केले असुन ते संयुक्तीक नसल्याने अभिप्राय कायम ठेवण्यात येत आहेत.

DPSKGGM6001 (Ref No : 3)

## *4 चिखल डोंगरी गावात व्यायाम शाळा बांधणे (आमदार निधी)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*आमदार निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 877107.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 390266.00/-

***कार्यकारी अभियंता यांनी प्राधिकार नसताना नियमबाह्य मुदतवाढ दिली आहे. तसेच विलंबाबाबत ठेकेदाराकडुन दंड आकारणी करण्यात आलेली नाही. वाढीव खर्चास तांत्रिक अथवा प्रशासनिक मान्यता घेण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | चिखल डोंगरी गावात व्यायाम शाळा बांधणे |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | संजय कन्सट्रक्शन |
| तांत्रिक मंजुरी | बुक.1 दिनांक- 24-07/2009 |
| प्रशासकीय मंजुरी | प्रशासकीय ठराव 4 दि. 27/07/2009 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 9-10 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 5.75 लक्ष |
| बजेट तरतुद | आमदार निधी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | बुलंद टाईम्स दि. 10/08/2009 ते 17/8/2009 |
| इसारा रक्कम | 5800 |
| निविदा रक्कम | 6.33 लक्ष |
| सुरक्षा अनामत | 87710 |
| कामाचा कालावधी | 180 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | वविशम/बांध/16/2009 दि. 29/08/2009 |
| काम सुरु दिनांक: | |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | 877102 |
| प्रमाणक क्र.--- 3682 दि. 20/8/11 | मोजमाप पुस्तक क्र. 108 पान क्र. 46 ते 77 |

चिखल डोंगरी गावात व्यायाम शाळा बांधणे या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

मे. संजय कन्स्ट्रक्शन यांचे पत्र क्र. निरंक दि. 1/12/2010नुसार त्यांनी कामास मुदत वाढ मागीतली आहे. व त्या पत्राच्या अनुषंगाने उपअभियंता यांनी मुदत वाढीसाठी टिपणी 15/12/10 रोजी सादर केली असून कार्यकारी अभियंता यांनी मुदतवाढ मंजूर केली आहे. सदर टिपणी नुसार पत्र क्र. वविशम/बांध/532/11 दि. 15/4/2011 रोजी ठेकेदार यांना 30 जुन 11 पर्यंत मुदत वाढ देण्यात आली

आहे. दिनांक. 15/12/10 रोजी मुदत वाढ टिपणी मंजूर असताना चार महिने उशिरा मुदत वाढीचे पत्र ठेकेदार यांना देण्याचे प्रयोजन लेखा परिक्षणास समजू शकले नाही. तसेच कामास मुदत वाढ देण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना आयुक्तांनी हस्तांतरीत केल्याचे कार्यालयीन आदेश लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

ठेकेदार मे. संजय कन्सट्रक्शन यांनी दि. 1/12/10 रोजी पत्र देऊन मुदत वाढ मागीतली होती. ठेकेदार यांनी मुदत वाढ मागीतली असताना त्याबाबत कार्यवाही न करता ठेकेदार यांना कार्यालयीन आदेश क्र. वविशम/बांध/721/10 दि. 24/12/10 नुसार नोटीस देऊन काम चालू न करण्याची कारणे विचारण्यात आली आहेत. म्हणजेच ठेकेदार यांची मूदत वाढ मागणी कार्यकारी अभियंता यांना मान्य नाही. मुदत वाढ कार्यकारी अभियंता यांनी नाकारल्याने निविदा अटी नुसार ठेकेदार यांचे विरुध्द कारवाई प्रस्तावित करणे आवश्यक असताना ती करण्यात आलेली नाही.

मे. संजय कन्सट्रक्शन याना कार्यालयीन आदेश वविशम/16/09 दि. 28/8/2009 नुसार व्यायाम शाळा बांधण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु ठेकेदार यांना सदर आदेशानुसार काम सुरु केले नाही म्हणून कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्र. वविशम/721/10 दि. 24/12/10 नुसार मे. संजय कन्स्ट्रक्शन यांना काम चालु करण्यासंबंधी नोटीस देण्यात आली. 16 महिन्यानंतर एवढया उशिरा काम पुर्णत्वाची मुदत संपल्यानंतरही काम सुरु केले नसताना ते रदद करुन त्यांची सुरक्षा अनामत जप्त करणे व द्वितीय न्युनतम निविदाकारास कार्यादेश देणे आवश्यक असताना त्याच ठेकेदारास नोटीस देण्यात आली आहे. कार्यादेशानुसार सदर व्यायाम शाळेचे काम माहे 22 फेब्रुवारी 2010 पर्यंत पूर्ण करणे ठेकेदार यांना बंधनकारक होते. परंतु सदर काम दि. 27/4/11 रोजी पूर्ण झाले आहे म्हणून दि. 23/2/10 ते 27/4/11 एकूण 435 दिवस विलंब झाला आहे. निविदा व करार पत्र दि. 29/8/09 मधील अट क्र. 4 नुसार ठेकेदार यांचे कडून विलंबासाठी प्रतिदिन प्रति रु. 1.00 लाखास रु. 100/- किमान प्रमाणे दंडवसुली करणे आवश्यक हाते. ही कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे महानगरपालिकेचे रु.3,81,495/- नुकसान झाले आहे. सदर रक्कम रु. 3,81,495/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु**. 381495/-**

चिखल डोंगरी गावात व्यायाम शाळा बांधण्यासाठी अंदाज पत्रक रु. 5,75,521/- तयार करण्यात आले व त्याला तांत्रिक मंजूरी दि. 24/7/2009 कार्यकारी अभियंता यांनी दिली. सदर काम दि. 27/4/2011 रोजी पूर्ण झाले. मूळ अंदाजामध्ये कामाची वाढ झाल्यामुळे सदर व्यायाम शाळेचे सुधारीत अंदाज पत्रक रु. 7,97,442/- एवढे तयार करण्यात आले व त्याला तांत्रिक मंजूरी दि. 29/7/11 रोजी देण्यात आली. म्हणजे काम पूर्ण झाल्यानंतर 3 महिन्यानंतर सुधारीत अंदाज पत्रक मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका अनुक्रमांक 133 व 134 नुसार मुळ अंदाजात 10% पेक्षा अधिक वाढ झाल्यास हे अंदाजपत्रक नवीन असल्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने सदर खर्च आक्षेपाधिन ठरतो. करीता सुधारीत अंदाज रु. 7,97,442/- अधिक अंदाज रु. 9.99% रु. 79,665/- एकूण रु. 8,77,107/- रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात

येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 877107/-

निविदा अट क्र.1 व महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका नियम क्र. 213 व 214 व टिप 1 नुसार सुरक्षा अनामत ठेकेदार यांचे कडून घेण्यात आलेली नाही.

जिल्हा अधिकारी यांचे पत्र क्र. नियो/आस्थाविका/प्रमा/टे-1/919 दि 7/8/2009 मधील अट क्र. 12 नुसार जिल्हा अधिकारी यांचे कडून वाढीव कामास व खर्चास मान्यता घेतली असल्याबाबतचे जिल्हा अधिकारी यांचे आदेश लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाहीत.

शा.नि.क्र. बी.सी.ए/2009/प्र/क्र/108/कामगार/7 अ दि. 17/6/2010 नुसार मे. संजय कन्सट्रक्शन यांच्या देयकाच्या 1% कामगार कल्याण निधी कपात करण्यात आली नाही. देयकाची रक्कम रु. 877102.00 वर 1% म्हणजे रु. 8771.00 ठेकेदार यांचे कडून वसुल करून सदरची रक्कम महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडे जमा करण्यात यावेत. तो पर्यंत सदरची रक्कम रु. 8771/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 8771/-

DPSKGGM6001 (Ref No : 4)

## *5 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या दवाखाना, रुग्णालयासाठी डॉक्टर व परिचारीका यांची सेवा ठेक्याने घेण्यातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :वैद्यकीय अधिकारी/ वै , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6730483.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 43200.00/-

***शा.नि. 2 जानेवारी 1992 व शा.नि. क्रमांक भाखस 1094/2679 उद्योग 6 मंत्रालय दि. 30 मार्च 1994 व मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 नियम क्र. 73 (क) नुसार डॉक्टर व परिचारिका पुरवठ्याबाबतची निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या दवाखाना, रुग्णालयासाठी डॉक्टर व परिचारीका ठेक्याने पुरवणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. डॉ. आरती सुनिल वाडकर |

| | |
|---|---|
| तांत्रिक मंजुरी | ---- |
| प्रशासकीय मंजुरी | प्रशासकीय ठराव क्र. 256, दि. 20/03/2010 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ---- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | ---- |
| बजेट तरतुद | ---- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै.वार्ताहर, दि. 24/03/2010 ते दि. 31/03/2010 |
| इसारा रक्कम | 5,000/- |
| निविदा रक्कम | ---- |
| सुरक्षा अनामत | ---- |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 100 |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | वविशम/आस्था/25/2010, दि. 05/04/2010 |
| काम सुरु दिनांक: | काम पुर्ण दिनांक: ----- |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. |

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेले रुग्णालय व दवाखान्यामध्ये लागणारे डॉक्टर व परिचारीका ठेके पध्दतीने पुरवठा करण्याबाबतची नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

निविदा प्रसिध्दी नोटीस दि. 24/03/2010 दै.वार्ताहर मध्ये ठेके पध्दतीने विविध विभागासाठी तांत्रिक व अनुभवी कामे करण्यासाठी अभिकर्ता नेमणे असे नमूद केले आहे. परंतु डॉक्टर व परिचारिकासाठी ठेकेदार नेमणे असे नमूद केलेले नाही. तसेच निविदा फॉर्म मध्ये ठेकेदार यांचेकडे उपलब्ध असलेले डॉक्टर व परिचारिका यांची नावानिशी यादी त्यांचा अनुभव तसेच त्यांची शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती निविदेसोबत सादर करणेबाबत नमुद करण्यात आलेले नाही.

निविदा प्रसिध्दी दि. 24/03/2010 दैनिक वार्ताहर निविदा अटी व शर्ती क्र. 8 मध्ये निविदा भरताना त्या त्या व्यवसायाशी संबंधित असलेल्या निविदा काराने निविदा भरणे असे नमूद केलेले आहे. निविदा नस्ती तपासली असता आकाश एंटर प्रायझेस, आकाश लेबर कॉन्ट्रक्टर, दिव्या एंटर प्रासझेस हे डॉक्टर व परिचारिका पुरवठा करण्याच्या व्यवसायाशी संबंधित नसल्याचे लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आले आहे. आकाश एंटर प्रायझेस व आकाश लेबर कॉन्ट्रक्टर हे मजुर पुरवठा करणारे ठेकेदार आहेत तर दिव्या एंटर प्रायझेस हे बांधकाम व्यवसायीक आहेत. सदर ठेकदार यांच्या निविदा ग्राहय धरण्यात आल्या .

प्रशासकीय सभेचा प्रस्ताव व प्रशासकीय ठराव क्र 345, दि. 03/04/2010 मध्ये वसई विभाग अनु. क्र.

3 मध्ये खाजगी परिचारिका मासिक दर रु. 5,000/- डॉक्टर आरती सुनिल वाडकर यांचे आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी ठराव मंजूर केलेला आहे. परंतु प्रत्यक्ष खाजगी परिचारिका यांना रु. 5,300/- प्रमाणे विरार विभाग व नवघर-माणिकपूर विभाग, ठेकेदार यांना देयके अदा करत आहेत. तसेच वसई विभागाने काढलेल्या मुळ निविदा नस्ती लेखा परिक्षणाने अर्ध समास क्र. 35, दि. 25/03/2013 नुसार मागणी करुन सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे उपरोक्त दरांबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आलेली नाही.

विरार विभागासाठी खाजगी परिचारिका 3 व नवघर-माणिकपूरसाठी 9 परिचारिका मंजूर आहेत व त्याप्रमाणे यांना आदेश देण्यात आले आहेत. एकुण परिचारिका-12 एका परिचारिकेचा मासिक दर प्रशासकिय ठरावानुसार रु. 5,000/- म्हणून 12 परिचारिकांचा वार्षिक वेतन वरील खर्च रु. 7,20,000/- होतो. परंतु 12 परिचारिकांकरीता रु. 7,63,200/- प्रत्यक्ष खर्च करण्यात आला आहे. करीता जादा केलेला खर्च रु. 43,200/- वसुल पात्र आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिका ही जुलै 2009 मध्ये स्थापन झालेली आहे. दि. 26/06/2010 रोजी मा. महापौर यांची निवड करण्यात आली असुन पहिली सभा दि. 01/07/2010 रोजी संपन्न झाली व तदनंतर स्थायी समितीची स्थापना झालेली आहे. स्थायी समिती स्थापन झालेली असताना सन 2011-12 या आर्थिक वर्षासाठी नविन ठेकेदार नेमण्याविषयी नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना ती राबविण्यात आलेली नाही. तसेच सन 2010-11 या वर्षातील मंजूर ठेकेदार यांनाच मुदत वाढ देण्यात आली आहे. शासनाचे दि. 10/10/2008 च्या मार्गदर्शक तत्वानुसार विना निविदाप्रक्रिया मंजुर निविदेस मुदतवाढ देण्याची तरतुद नाही.

मे. आकाश एंटर प्रायझेस व आकाश लेबर कॉन्ट्रक्टर यांचा कार्यालयीन पत्ता गाळा नं. 46, चव्हाण निवास मनवेल पाडा, विरार असा आहे. त्यामुळे एकाच निविदाकाराने दोन निविदा भरल्या आहेत.

आकाश एंटर प्रायझेस व आकाश लेबर कॉन्ट्रक्टर हे अधिकृत कुशल मनुष्यबळ पुरवठा करणारे ठेकेदार असल्याचे व तसे प्रमाणपत्र शासनाकडुन त्यांनी प्राप्त करुन घेतले असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

मे. दिव्या एंटरप्रायझेस हे बांधकाम व्यावसायिक आहेत तशी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे नोंद केलेली आहे. तरी मे. दिव्या एंटरप्रायझेस हे डॉक्टर व परिचारिका महानगरपालिकेला पुरवठा करण्यासंबंधी शासनाकडुन नोंदणी प्रमाणपत्र घेतले असल्यास ते लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

आकाश एंटरप्रायझेस याची निविदा कोणत्या तारखेला व वेळेला उघडण्यात आला याची नोंद निविदेमध्ये नाही. त्यामुळे सदर निविदा कधी उघडण्यात आली याची लेखा परिक्षणाला खात्री करता आलेली नाही.

वविशम/आस्था/03/2010, दि. 03/04/2010 व वविशम/आस्था/04/2010 दिनांक 03/04/2010 नुसार अनुक्रमे मे. आकाश एंटरप्रायझेस व दिव्या एंटरप्रायझेस यांना वाटाघाटी पत्र देण्यात आले आहे. परंतु

वाटाघाटी केल्या नंतरचे दर निविदा नस्त्यामध्ये लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत किंवा तशा आशयाचे पत्र संबंधीत ठेकेदार यांनी महानगरपालिकेला दिलेले नाही.

वसई विभागासाठी डॉक्टर व परिचारिका ठेकेपध्दतीने पुरवठा करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. तुलनात्मक तक्ता पाहता फक्त दोनच ठेकेदार यांनी निविदा भरलेले आहे. 1) डॉ. आरती सुनिल वाडकर 2) डॉ. सुनिल वाडकर हे निविदाकार आहेत. डॉ. आरती सुनिल वाडकर यांचे डॉक्टर व परिचारिकासाठी दर न्युनतम आहेत म्हणून स्विकारण्यात आले. मुळात दोन निविदा प्राप्त असताना शासन निर्णय 2 जानेवारी 1992 च्या व मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 नियम क्र. 73 क नुसार सदरच्या निविदा रदद करुन पुनश्चः मुदत वाढ देणे क्रम प्राप्त होते. परंतु तसे न करता मे. डॉ. आरती सुनिल वाडकर यांची निविदा मंजुर करण्यात आली आहे. त्यामुळे प्राप्त दर वाजवी असल्याची लेखा परिक्षणास खात्री करता आलेली नाही. मे. डॉ. आरती सुनिल वाडकर व डॉ. सुनिल वाडकर हे स्वतः वैद्यकीय व्यावसायिक असल्याने त्यानी महाराष्ट्र कौन्सील ऑफ इंडियन मेडीसीन व मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया यांचेकडून सदर ठेका घेण्याबाबत मंजूरी घेणे आवश्यक असल्याचे लेखा परिक्षणाचे मत आहे. तसेच महानगरपालिकेने डॉ. आरती सुनिल वाडकर यांनी डॉक्टर व परिचारिका पुरवठा करण्याचा ठेका घेतल्याचे पत्र महाराष्ट्र कौन्सील ऑफ इंडियन मेडिसीन यांना देणे आवश्यक आहे. तसे केल्याचे निविदा नस्तीवरुन निदर्शनास येत नाही.

निविदा अटी शर्ती क्र. 19 नुसार सदर डॉक्टर व परिचारिका यांनी खाजगी शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये किमान तीन वर्ष काम केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र निविदा नस्ती मध्ये लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही.

निविदा अटी शर्ती अनुक्रमांक 39 व 41 मध्ये तांत्रिक लिफाफे उघडण्याबाबत अट घालण्यात आली आहे. परंतु निविदा प्रसिध्दी मध्ये सदर निविदा दोन लिफाफे पध्दतीने करावयाची आहे असे नमुद केलेले नाही. तांत्रिक लिफाफ्यामध्ये कोणती कागदपत्रे सादर करावीत याबाबत उल्लेख नाही.

सन 2011-12 मध्ये ठेकेदार यांनी नेमणूक केलेल्या डॉक्टर व परिचारिका यांची नेमणूक केलेली आहे. सदर डॉक्टर व परिचारिका यांची शैक्षणिक पात्रता बाबतची प्रमाणपत्र अर्ध समास 35 दिनांक 25/03/2013 नुसार मागणी केली होती परंतु सदर प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत त्यामुळे डॉक्टर व परिचारिका यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत तसेच स्विकृत डॉक्टरांची अर्हता देयकांसोबत प्रमाणित केलेली नसल्याने योग्य व्यक्तीस प्रदान झाल्याची लेखा परिक्षणाला खात्री करता आली नाही.

शा.नि. 2 जानेवारी 1992 व शा.नि. क्रमांक भाखस 1094/2679 उद्योग 6 मंत्रालय दि. 30 मार्च 1994 व मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 नियम क्र. 73 (क) डॉक्टर व परिचारिका पुरवठा निविदा नस्ती नसल्याने डॉक्टर व परिचारिका ठेक्यावर सन 2011-12 मध्ये झालेला एकुण खर्च रु. 67,30,483/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.6730483/-

DPSKGGM6001 (Ref No : 5)

***6 महानगरपालिकेच्या विविध योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प राबविणेकामी सल्लागार नेमणे.***

**सॅटेलाईट सिटी (UIDSST) अंतर्गत भुयारी मलनिःसारण योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापन , केंद्र व राज्य शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 17209486.00/-

***मे. टंडन सोल्युशन्स यांनी तयार केलेल्या प्रकल्प अहवालात 7 मलप्रक्रिया केंद्र असुन प्रत्येक प्रकल्पास स्वतंत्रपणे मंजुरी प्राप्त करुन घेतल्यास प्रत्येक भागास रु.49 लक्ष स्वतंत्रपणे फी अदा करावी लागणार आहे. त्यामुळे रु. 17209486/- ची अखेरपर्यंत वसुली शक्य होणार नाही. म्हणजेच प्रकल्प अहवाल तयार करणे या बाबीवर केलेला रु. 17209486/- एवढा वाढीव खर्च राहणार आहे. महानगरपलिकेने मान्य केलेल्या दरानुसार केंद्र शासनाच्या विविध संस्थांकडुन प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त करुन घेणे व या संस्थांकडुन अनुदान उपलब्ध करुन घेणे याकरीता अनुक्रमे 0.75% व 1.00% असे दर मान्य केले आहेत. वस्तुतः शासनाकडुन प्रकल्प अहवालातील अंदाजीत रकमेस मंजुरी प्राप्त होणे म्हणजेच पर्यायाने अनुदान मंजुर होणे हे गृहितक असल्याने विवरण 3 करीता मान्य केलेल्या 1.00% दराने महानगरपालिकेचा निधी अधिक खर्च होणार आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | महानगरपालिकेच्या विविध योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प राबविणेकामी सल्लागार नेमणे |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई |
| प्रशासकीय मंजुरी | महासभा ठराव क्र.15 दि. 20.12.2010 |
| तात्रिक मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.9 दि. 9.3.2011 |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | एकुण मलनिःसारण प्रकल्प रु. 600 कोटी |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै. सामना, सकाळ, पुढारी व लोकराजा दि. 16.1.11, 15 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 10 लाख एफ डी आर |
| निविदा रक्कम | पाय-यानुसार(Stage wise) टक्केवारी |

| | |
|---|---|
| सुरक्षा अनामत | 5% प्रत्येक देयकामधुन |
| कामाचा कालावधी | --- |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- दि. 17.6.11 |
| दोषदायित्व कालावधी | प्रकल्प पुर्ण झालेवर 1 वर्षापर्यंत |
| कार्यारंभ आदेश | वविशम/सॅसे/11अ/2011-12 दि. 17.6.11 |
| काम सुरु दिनांकः | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | रु. 4963500/-<br><br>रु. 5478572/- |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र.514 प्र.अधिकारी व नगर अभियंता |

केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणेची योजना (UIDSST), तसेच केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या व भविष्यात जाहीर होणा-या योजनेकामी वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये अनुषंगिक कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, त्यास संबंधित प्राधिकरणांची मंजुरी प्राप्त करुन घेणे व प्रकल्प राबविणे या कामी प्रकल्प सल्लागार नेमणे याबाबतची नस्ती तपासण्यात आली. सल्लागार नियुक्तीस महासभेने ठराव क्र. 15 दि. 20.12.2010 अन्वये मंजुरी दिली. सदर मंजुरीनुसार दैनिक सामना, सकाळ, पुढारी व लोकराजा या वृत्तपत्रात दि. 16.1.2011 रोजी निविदा सुचना जाहीर करण्यात आली. त्यास 1) शाह टेक्नीकल कन्सल्टंट, मुंबई 2) युनिटी कन्सल्टंट, पुणे व 3) टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई या तीन निविदाकारांचा प्रतिसाद लाभला. या निविदाकारांपैकी मे. टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई यांची प्रकल्प खर्चाच्या 5.85% दराची निविदा न्युनतम होती. त्यांचेशी वाटाघाटी अंती 5.40% दर निश्चित करण्यात आले. त्यास स्थायी समितीची ठराव क्र. 9 दि. 9.3.2011 अन्वये मान्यता घेण्यात आली. निश्चित करण्यात आलेले दर पुढीलप्रमाणेः-

| Sr.No. | Description of Item | Fee(As per percentage of project cost approved by VVCMC from time to time) |
|---|---|---|
| 1 | **Schedule-1** Prepare the detailed project reports of the project identified in city development plan prepared by the Corporation | 1.40% (Minimum of Rs.45 lacs for underground sewerage project only if the approved project is less than Rs. 150 crores) |
| 2 | **Schedule-2** Assisting Corporation for getting requisite approvals from Mission Directorate and their Project Appraisal Agencies | 0.75% |
| 3 | **Schedule-3** Assisting Corporation for getting requisite project finance for the infrastructure | 1.00% |

| | | |
|---|---|---|
| | projects identified & providing services for preparation of tender documents & bid process | |
| 4 | **Schedule-4** Functioning as project management consultant & technical auditor of Corporation during execution period and initial operation of one year. | 2.25% |
| | **Total Contract Charges (Excluding Service Taxes or any other tax replacing service tax)** | **5.40%** |

सदर प्रकरण नस्ती तपासली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

मे. टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई यांचेसोबत दि. 17.6.2011 रोजी रु.100/-च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला व त्याच दिनांकास त्यांना कार्यादेश देण्यात आले. मे. टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई यांची केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणेची योजना (UIDSST), तसेच केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या व भविष्यात जाहीर होणा-या योजनेकामी वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये अनुषंगिक कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, त्यास संबंधित प्राधिकरणांची मंजुरी प्राप्त करुन घेणे व प्रकल्प राबविणे या एकत्रीत कामांकरीता सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. या कामी खर्ची पडणारी रक्कम व त्यावर सल्लागारास कित्येक कोटी रुपये सेवा शुल्क अदा करावे लागणार आहे.

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि. 1.5.2006 नुसार निविदा रकमेच्या प्रथम रु. 10 लक्षापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक रु. 1 लक्षाकरीता रु. 100/- प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे.

प्रस्तुत प्रकरणी निविदेची अंदाजित रक्कम निश्चित नसली तरी सिडकोकरीता मे. किर्लोस्कर कन्सल्टंट्स यांनी भुयारी गटार योजनेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला होता.( मे. टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई याची नियुक्ती झाल्यावर सदर अहवाल त्यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आला.) या अहवालानुसार प्रकल्पाची अंदाजीत रक्कम रु. 600 कोटी ठरविण्यात आली होती. ही रक्कम पायाभुत ठरवुन त्यांचेकडुन मुद्रांक शुल्क वसुल करणे शक्य होते. तसेच संबंधितांना उपरोक्त विवरण1 प्रमाणे रु.4963500/- व विवरण 2 प्रमाणे रु. 5478572/- प्रदान करण्यात आलेले आहे.

मे. टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई यांचेशी वाटाघाटी दरम्यान मे. किर्लोस्कर कन्सल्टंट्स यानी तयार

केलेला सविस्तर प्रकल्प अहवाल मे. टंडन अर्बन सोल्युशन्स, मुंबई यांना हस्तांतरीत करणे व त्याकरीता खर्ची पडलेली रक्कम रु. 17209486/- त्यांना देय होणा-या रकमेतुन कमी करण्यात येईल या अटी घालण्यात आल्या. या अटी मान्य करतानाच संबंधितांनी ते नव्याने तयार करीत असलेल्या प्रकल्प अहवालाची अंदाजीत रक्कम रु. 150 कॉटी पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. 45 लक्ष अदा करण्यात यावेत अशी अट घातली व ती मान्य करण्यात आली. त्यानुसार सल्लागारास प्रकल्प अहवाल तयार करणे कामी रु. 4963500/- चे (10.30% सेवा करासह) प्रदान करण्यात आले आहे. ही अट मान्य करताना तसेच प्रदानादरम्यान पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक होते.

मे. किर्लोस्कर कन्सल्टंट्स यांनी वसई - विरार महनगरपालिका हद्दीतील 4 नगरपरिषदा व 43 गावांकरीता भुयारी गटार योजनेचा रु. 600 कोटी रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला होता व त्याकरीता त्यांना रु. 17209486/- या रकमेचे प्रदान करण्यात आले होते. मे. टंडन सोल्युशन्स यांनी फक्त 4 नगरपरिषद हद्दीकरीता रु. 490 कोटीचा अहवाल तयार केला आहे. या रकमेनुसार त्यांना देय होणारी रक्कम परीगणीत करता मे. किर्लोस्कर कन्सल्टंट याना अदा केलेली रक्कम वसुल करणे शक्य होते. त्याऐवजी फक्त विरार प्रभागातील मलप्रक्रिया 2 या पुर्ण प्रकल्पातील एकाच भागाची रक्कम विचारात घेऊन उपरोक्त विवरण 1 मधील अटीनुसार रु. 49 लक्षाचे प्रदान करण्यात आले आहे.

मे. टंडन सोल्युशन्स यांनी तयार केलेल्या प्रकल्प अहवालात 7 मलप्रक्रिया केंद्र असुन वरीलप्रमाणे प्रदान केल्यास प्रत्येक भागास रु.49 लक्ष स्वतंत्रपणे खर्च करावे लागणार आहेत. त्यामुळे रु. 17209486/- ची अखेरपर्यंत वसुली शक्य होणार नाही. म्हणजेच प्रकल्प अहवाल तयार करणे या बाबीवर रु. 17209486/- एवढा वाढीव खर्च होणार आहे.

महानगरपलिकेने मान्य केलेल्या दरानुसार केंद्र शासनाच्या विविध संस्थांकडुन प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त करुन घेणे व या संस्थांकडुन अनुदान उपलब्ध करुन घेणे याकरीता अनुक्रमे 0.75% व 1.00% असे दर मान्य केले आहेत. वस्तुतः शासनाकडुन प्रकल्प अहवालातील अंदाजीत रकमेस मंजुरी प्राप्त होणे म्हणजेच पर्यायाने अनुदान मंजुर होणे हे गृहितक असल्याने विवरण 3 करीता मान्य केलेल्या 1.00% दराने महानगरपालिकेचा निधी अधिक खर्च होणार आहे.

याबाबत देण्यात आलेल्या अर्धसमास ज्ञापन क्र. 34 दि. 21/3/2013 ला दि. 30/5/2013 रोजी अनुपालन प्राप्त झाले आहे तथापि अर्धसमासात उपस्थित केलेल्या मुद्यांपैकी मुद्दा क्र. 2 मधील अ. क्र. 4 वगळता अन्य मुद्यांचे परिपुर्ण व संयुक्तिक उत्तर प्राप्त न झाल्याने उर्वरीत आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATSCDM6901 (Ref No : 6)

***7 महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता सन 2011-12 करीता स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचा ठेका.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :साफ सफाई व सोयी अंतर , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1669850.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72969.00/-

***आर्थिक वर्ष 2011-12 करीता आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष साहित्य खरेदी खाली रु. 47 लक्ष इतकी मंजुर तरतुद असताना रु. 64 लक्ष अंदाजखर्चाची निविदा सुचना जाहीर केली.निविदा सुचनेत ½% इसारा रक्कम व 1% सुरक्षा अनामत भरण्याबाबत नमुद केले आहे.महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम 144(1) नुसार निरनिराळ्या प्रकारच्या/वर्णनाच्या वस्तुंसाठी निराळी पाने वाटुन नोंदी घेणे आवश्यक आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | साफसफाई व सोयी- आरोग्य विभागासाठी स्वच्छता साहित्य पुरवठा करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | 1.एम.के.शाह एंटरप्राईझेस, 2.ओरिएंट्ल सर्व्हिसेस, 3. श्रीनाथ एंटरप्राईझेस |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.14 दि. 27.4.2010 |
| तात्रिक मंजुरी | |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 64 लाख |
| अर्थसंकल्प तरतुद | 47 लाख |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.पुढारी, महाराष्ट्र बुलंद टाईम्स दि.7.5.11 14 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 32,000/- |
| निविदा रक्कम | 64 लक्ष |
| सुरक्षा अनामत | रु. 64,000/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 500/- श्रीनाथ एंटरप्राईझेस |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | --- |

| | |
|---|---|
| काम सुरु दिनांकः | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष साहित्य खरेदी अंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता निविदा प्रक्रिया राबवुन विविध ठेकेदारांशी दरकरार करण्यात येतात. या दरकरारानुसार सर्व प्रभागांमार्फत आवश्यकतेनुसार मागणी करुन खरेदी करण्यात येते.

सन 2011-12 मधील साहित्य खरेदीकरीता स्थायी समिती ठराव क्र. 14 दि.27.4.2011 अन्वये मान्यता घेण्यात आली. सदर मान्यतेनुसार दि.7.5.11 रोजी एकुण 96 बाबींकरीता दर निश्चित करणेकरीता निविदा सुचना जाहिर करण्यात आली. त्यास 1. मे. एम.के. शाह एंटरप्राईझेस, 2. ओरिएंटल सर्व्हिसेस, 3. श्रीनाथ एंटरप्राईझेस्व 4. मे. जिवदानी एंटरप्राईझेस या 4 निविदकारांचा प्रतिसाद लाभला. न्युनतम दरांनुसार बाबींची विभागणी करुन निविदा मंजुर करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सन 2011-12 च्या अंदाजपत्रकानुसार साफसफाई व सोयी या शिर्षांतर्गत स्वच्छता साहित्य खरेदी या उपशिर्षाखाली रु. 47 लाख इतके अनुदान मंजुर असताना रु. 64 लाख इतक्या अंदाज खर्चाची निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली व प्रत्यक्षात संपुर्ण आर्थिक वर्षात रु.17.63 लाख इतका खर्च करण्यात आला. अनुदान उपलब्ध नसताना वाढीव खर्चाची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

मे. जिवदानी एंटरप्राईझेस यांची निविदा अपात्र ठरविण्याची कारणमिमांसा नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम 144(1) अन्वये नमुना क्र. 114 मध्ये जंगम मालमत्ता नोंदवही ठेवण्यात आली आहे. तथापि निरनिराळ्या प्रकारच्या/वर्णनाच्या वस्तुंसाठी, जसे संगणक, विद्युत, आरोग्य साहित्य, उद्यानाकरीता खेळणी इ., जरुरीप्रमाणे निराळ्या पृष्ठांची वाटणी करुन नोंदी करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे वस्तु कधी खरेदी करण्यात आल्या, त्यांचे आयुष्यमान/वापर कालावधी किती?, त्यांच्यात दर्शविण्यात येणारी वार्षिक घट (depreciation) योग्य आहे अथवा नाही, आयुष्यमान कालावधी संपल्यानंतर अशा वस्तुंबाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची तपासणी लेखा परीक्षणास करता आली नाही. महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम 144(1) नुसार निरनिराळ्या प्रकारच्या/वर्णनाच्या वस्तुंसाठी निराळी पाने वाटुन नोंदी घेणे आवश्यक आहे.

नस्ती मध्ये उपलब्ध देयक क्र. 503 दि. 12.10.2011 रु. 155000/- छायाप्रत तपासली असता पत्र क्र. वविशम/भां/180/11 दि. 10.6.11 अन्वये 150 गेज 30 फुट*36 फुट या मापाची प्लॅस्टीक ताडपत्री पुरविण्याकरीता मे. एम.के.शाह एंटरप्राईझेस यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार त्यांनी चलन क्र. 985 दिनांक निरंक अन्वये दि. 12.6.11 रोजी मालाचा पुरवठा केला आहे. (सदर दिनांक लिपिक, भांडार विभाग, विरार याच्या, माल सुस्थितीत मिळाल्याच्या प्रमाणपत्रावरुन घेण्यात आला आहे.) व उपप्रमाणक क्र. 985 दिनांक निरंक अन्वये 50 नग ताडपत्रीचे रु. 3100/- प्रती नग या दराने रु. 155000/- चे देयक सादर केले

आहे. रु. 3100/- हा दर सन 2010-11 मध्ये निविदा प्राप्त दर होता. सन 2011-12 साठीची निविदा प्रक्रिया दि.6.5.11 रोजी सुरु करण्यात आली होती व दि. 20.5.11 रोजी प्राप्त निविदा उघडण्यात् आल्या होत्या. तसेच या बाबीकरीता मे. श्रीनाथ एंटरप्राईझेस यांचेकडुन रु. 2437/- असे न्युनतम दर प्राप्त झाले होते. असे असताना पुर्वीच्याच पुरवठादाराकडुन रु. 663/- या वाढीव दराने मागणी नोंदविण्यात आली. त्यामूळे महानगरपालिकेस रु. 33150/- जादा रक्कम अदा करावी लागली. ही रक्कम रु**. 33150/-** आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे**.**

याच प्रकारे स्प्रे पंप 14 लिटर (ॲस्पी) पितळी 20 नग, धुरफवारणी मशिन व्हेनाज व्हेन फॉग 6 नग यांची मागणी दि. 29.8.11 रोजी व स्प्रे पंप 12 लिटर (ॲस्पी) पितळी 5 नग ची मागणी दि. 5.7.11 रोजी सन 2010-11 च्या दर करारानुसार नोंदविण्यात आली आहे. सन 2010-11 मध्ये या वस्तुंचे दर अनुक्रमे रु. 7550/-,रु. 36500/- व रु. 7540/- होते तर सन 2011-12 मध्ये अनुकमे रु. 6300/-, रु. 28500/- व रु. 6000/- होते. त्यामुळे महानगरपालिकेस या बाबींवर अनुक्रमे रु. 25000/-, रु.48000/- व रु.7700/- असे एकुण रु. 80700/- जादा खर्च करावा लागला. ही रक्कम रु. 80700/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सन 2011-12 च्या निविदेतील बाब क्र. 61- महानगरपलिकेच्या हद्दीतील इमारतींच्या व्हेंट पाईपकरीता डास प्रतिबंधक नायलॉन जाळी पुरवुन ती इमारतीच्या व्हेंट पाईपला बसविणे या कामी विरार पुर्व व पश्चिम या भागातील इमारतींच्या 50000 व्हेंट पाईपना जाळी बसविण्यास मे. एम.के. शाह यांस क्र. वविशम/भां/617/11 दि. 9.9.2011 अन्वये आदेशित करण्यात आले. त्यांनी चलन क्र. 1011 व 1012 दि. 25.9.2011 प्रत्येकी 25000 जाळ्यांचा पुरवठा केला व तसे स्वच्छता निरीक्षक, विरार यांनी माल सुस्थितीत मिळाल्याचे प्रमाणित केले आहे. संबंधित बाब ही फक्त पुरवठा करणेसंबंधी नसुन व्हेंट पाईपला ती बसवीणेही करारनाम्यानुसार बंधनकारक आहे. सर्व इमारतींमध्ये जाळ्या सुस्थितीत बसविण्यात आल्याचा उल्लेख/प्रमाणपत्र नसताना प्रती नग रु.13/- या दराने संपुर्ण रक्कम रु. 650000/- चे प्रदान करण्यात आल्याचे नस्तीमधील देयकाच्या छायाप्रतीवरुन निदर्शनास येते. करीता रु. 650000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

याच बाबीकरीता नालासोपारा विभागाने त्या विभागातील इमारतींच्या व्हेंट पाईपची मोजणी करुन 21387 जाळ्यांची मागणी केली होती. प्रत्यक्षात मे. एम.के. शाह यांना 27000 जाळ्याकरीता पुरवठा आदेश देण्यात आले. 5613 जादा मागविण्यात आलेल्या जाळ्या कोठे वापरण्यात आल्या याचा नस्तीत उल्लेख नाही. त्यामुळे महानगरपालिकेस रु. 72969/- अतिरिक्त खर्च करावा लागला. तसेच वरील 9 प्रमाणेच सर्व इमारतींमध्ये जाळ्या सुस्थितीत बसविण्यात आल्याचा उल्लेख/प्रमाणपत्र नसताना संपुर्ण रक्कम रु. 351000/- चे प्रदान करण्यात आल्याचे देयकाच्या छायाप्रती अन्वये निदर्शानास येते. रु.351000/- आक्षेपाधिन व रु**. 72969/-** वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत.

सन 2011-12 च्या निविदेतील बाब क्र. 75(4)- सार्वजनिक शौचालयास लोखंडी दरवाजे बसविणे या बाबीकरीत नवघर-माणिकपुर प्रभागाने दि. 21.9.11 रोजी 150 दरवाजांची मागणी केली. त्यानुसार दि.

19.11.11 रोजी मे. एम के. शाह यांना पुरवठा आदेश देण्यात आले. संबंधित ठेकेदाराने दि. 2.12.11 रोजी संपुर्ण मालाचा पुरवठा केला व त्याच दिवशी आरोग्य निरीक्षकांनी माल सुस्थितीत प्राप्त झाल्याचे प्रमाणित केले. व त्यानुसार नस्तीमधील उपलब्ध देयकच्या छायाप्रती अन्वये प्रती नग रु. 3700/- या दराने संपुर्ण रक्कम रु. 555000/- चे प्रदान करण्यात आले आहे. वस्तुतः एकाच दिवशी 150 लोखंडी दरवाजे बसविणे शक्य नसल्याने देयकासोबत संबंधित अधिका-याने दरवाजे सुस्थितीत बसविण्यात आल्याचे प्रमाणपत्र जोडल्याशिवाय देयक प्रदान करणे हि बाब नियमसंगत नाही. रक्कम रु. 555000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आरोग्य निरीक्षक, वसई विभाग यांनी निरंक दिनांकीत टिप्पणीन्वये एकुण 16 बाबींची मागणी केली. त्यातील अ.क्र. 14 नुसार झाडांच्या फांद्या कापण्यासाठी ट्री कटर मशीनची मागणी करण्यात आली. त्यानुसार क्र. वविशम/भां/558/11 दि. 29.8.11 अन्वये मे. एम.के शाह यांस पुरवठा आदेश देण्यात आले. हे आदेश बाब क्र. 91 शार्पेक्स वुड कटर मशीन मॉ. क्र. ई-350 दर रु. 168000/- प्रमाणे देण्यात आले. सन 2011-12 च्य दरपत्रकानुसार बाब क्र. 91 वर पॉवर प्रुनर इंजीन 25.4 सी.सी. शार्पेक्स असे नमुद असुन त्याची किंमत रु.56000/- दर्शविण्यात आली आहे. सन 2010-11 च्या आरोग्य साहित्य खरेदीची दर सुची तपासली असता त्यात फक्त 75 बाबींची दर सुची निश्चित केल्याचे दिसते. पुरवठा आदेशात नमुद बाब मंजुर दरसुचीत समावेष्टीत नसताना पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. चुकीची मागणी नोंदविली गेल्याने रक्कम रु. 168000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATSCDM6901 (Ref No : 7)

## *8 सन 2011-12 अग्निशमन दलाकरिता केलेल्या साहित्य खरेदीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :विकास निधीअंतर्गत अग , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2581959.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72000.00/-

***संपुर्ण निविदा प्रक्रिया नियमबाहय पध्दतीने राबविण्यात आली आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | अग्निशमन दलाकरीता साहीत्य खरेदी 2011-12 |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | एम.के.शहा इन्टरप्रायझेस, ओरियंटल सर्विसेस, के.के. ब्रदर्स |

| | |
|---|---|
| तांत्रिक मंजुरी | 16/8/2011 |
| प्रशासकीय मंजुरी | 22/12/2010 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | बाजारभाव प्रमाणे |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 50 लक्ष |
| बजेट तरतुद | 17 लक्ष |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 10 दिवस, केसरी, नरवीर चिमाजी, लोकमत |
| इसारा रक्कम | रु.25,000/- |
| निविदा रक्कम | रु.1500/- |
| सुरक्षा अनामत | रु.50,000/- |
| कामाचा कालावधी | वर्षभर 2011-12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु.100/- प्रत्येकी |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | - |
| काम सुरु दिनांक: 16/08/2011 | काम पुर्ण दिनांक: ----- |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | - |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र.- |

वसई-विरार शहर महानगरपालिकेची अग्निशमन विभागाकरीता आवश्यक असलेल्या साहित्यांचा वार्षिक दरांच्या निविदा मागविण्याकरिता स्थायी समितीने ठराव क्र 3 दि. 22/12/2010 अन्वये निविदा मागविण्यास मंजूरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाकरीता रु.50/-लक्ष अंदाजित खर्चाचा दि.5/5/2012 रोजी दै.केसरी, नरवीर चिमाजी, लोकमत हया वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक16/5/2011 पर्यंत सिलबंद निविदा मागविण्यात आल्या त्यानुसार एकून 5 ठेकेदारांनी निविदा सादर केल्या सदरच्या निविदा दिनांक 20/5/2011 रोजी उघडण्यात आल्या व त्या नुसार तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समिती ठराव क्र.16 दि.16/8/2011 रोजी मान्यता देण्यात आली.

सदर निविदेचे अवलोकन केले असता सन 2011-12 हया वर्षाकरीता निविदा मागविण्यास ठराव क्र. 3 दि.22/12/10 रोजी स्थायी समितीने मंजूरी दिलेली असताना निविदा सुचना दि. 6/5/2011 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन निविदा सादर करण्याची मुदत दि. 16/5/2011 पर्यंत देण्यांत आली व तुलनात्मक तक्ता दि.20/5/2011 रोजी तयार करण्यात आला मात्र त्यास मंजूरी दि.16/8/2011 रोजी देण्यात आलेली आहे. दि.16/8/2011 पर्यंत सन 2010-11 चे मंजूर दराने खरेदी करण्यात आलेली असून खरेदी करताना मुदतवाढ दिल्याचे आदेश नस्ती मध्ये तपासणीस आढळुन आले नाहीत. सदरची खरेदी नियमबाहय असुन आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 2581959/-

अग्निशमन दलाकरिता साहित्य पुरविणेकरीता सन 2011-12 मध्ये अंदाजपत्रकीय तरतुद रु.17 लक्ष असताना सदर कामाची निविदा रु.50 लक्ष रक्कमेची काढण्यात आलेली आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि. 2/1/92 अन्वये रु. 50 लक्ष खर्चाच्या निविदेचा कालावधी कमीत कमी 21 दिवसाचा असणे आवश्यक असताना सदर निविदेचा कालावधी 10 दिवस ठेवण्यात आल्याने अनियमितता झाल्याचे व त्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याचे निदर्शनास येते.

निविदाकाराची पूर्व अर्हता

मे. एम.के. शहा यांचे वॅट नोंदणी प्रमाणपत्र नसल्यामुळे व्यवसायाचे स्वरुप निश्चित होत नाही. दुकाने अधिनियमांतर्गत ते कमिशन एजंट आहेत. सदर ठेकेदार 04/02/2009 ला विक्री करासाठी नोंदणीकृत असून अनोंदणीकृत कालावधीसाठी रु. 5,185/- चे कराचे प्रदान चलनाव्दारे केले आहे. तथापि, त्यापुढील कालावधीचे कराच्या प्रदानाचे चलन अथवा ना थकबाकी प्रमाणपत्र जोडले नाही.

सन 2009-10 च्या आयकर परिगणना प्रमाणपत्रात त्यांचा व्यवसाय सोने, चांदी व हार्डवेअर प्रोडक्ट आहे. व वार्षिक उलाढाल रु. 11,52,520/- दर्शविली आहे.

सन 2010-11 मध्ये एम.के. शहा यांना दि. 19/08/2011 रोजी रु. 16,52,180/- चा पुरवठा करण्यासाठी कार्यादेश दिलेले आहे. दि. 10/02/2011 रोजी रु. 4,49,779/- चा पुरवठा करण्यासाठी कार्यादेश दिलेले आहे. एकूण रु. 21,01,959/- सन 2009-10 मध्ये वार्षिक उलाढाल कमी असतांना त्यांच्या वैयक्तिक व्यवसायाच्या उलाढालीपेक्षा अधिक रक्कमेचे रु. 21,01,959/- कार्यादेश देण्यात आले आहे.

एम.के.शहा यांनी 2010-11 चे आयकर विवरणपत्र/आर्थिक विवरणपत्र, वॅट चलन इ. जोडण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे व्यवसाय संबंधीचा पुरावा जोडलेला नसतांना त्याच ठेकेदारास पात्र ठरविण्यात आलेले आहे.

इसारा रक्कम निविदा कामाच्या 1% व सुरक्षा अनामत रक्कम 5%घेणे अपेक्षित आसताना इसारा रक्कम 0.5% घेण्यात आल्याचे दिसुन येते. सुरक्षा अनामत रक्कम संबंधितांकडुन घेण्यात आल्याचे नस्ती तपासणीत आढळुन आले नाही. सदरची रक्कम संबंधितांकडून निविदा कामाच्या 5%प्रमाणे वसुल करण्यात यावी.

भांडार विभागामार्फत अग्निशमन विभागाकरिता आवश्यक असणाऱ्या साधन सामुग्रीची खरेदी करण्यात येते. खरेदी करताना जड संग्रह नोंद वहीतील उपलब्ध असलेला साठा व खरेदी करणे आवश्यक असलेल्या साधन सामुग्री याबाबत ताळमेळ घेण्यात येऊन त्या नुसार कार्यालयीन टिपणीत उल्लेख करणे आवश्यक असताना कार्यालयीन टिपणीत कोठेही उल्लेख करण्यात आल्याचे तपासणीत आढळून आले नाही.

भांडार विभागात जंगममालमत्ता नोंदवही ठेवण्यात आलेली असून सदरची नोंदवही वार्षिक ठेवण्यात आलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 144 (1) (2) अन्वये

नोंदवही अद्यावत करण्यात आलेली नसल्याने करण्यात आलेली खरेदी आवश्यक होती किंवा कसे याची सत्यता पडताळणी करता आली नाही.

महापालिकेने मे. एम. के. शहा एंटरप्रायझेस विरार हयाना आदेश क्र. भा/558/11 दि.25/8/2011 अन्वये घटक क्र.91 शारपेक्स वुड कटर मशिन मॉ.क्र.ई 350 बजत 10.2 किलो (पेट्रोल) रु. 1,68,000/- पुरवठा करण्यास आदेशित केलेले आहे. त्या नुसार सदरचा पुरवठा चलन क्र.976 दि.3/9/2011 रोजी पुरवठा करण्यात आलेला आहे. सदरचा घटक पूरविण्याचे दर ओरियंटल सर्व्हिसेस हयांचे सन 2011-12 करिता चे दर रु.1,68,000/- कमी असल्याने मुंजूर करण्यात आलेले असताना तसेच एम के. शहा इंटरप्रायजेस हयांचे दर रु.1,70,000/- असताना रु. 1,68,000/- या दराने एम.के.शहा यांना खरेदी आदेश कसे देण्यात आले? याबाबत खुलासा झाला नाही.

आदेश क्र.भा/1305/2011 दि.17/1/12 अन्वये मे. ओरियेटल सर्व्हिस हयांना अग्निशमन साहित्य पूरविण्यास आदेशित करण्यात आलेले असून त्या आदेशानुसार घटक क्र. 115 पोर्टेबल जनरेटर 2 के व्हि (पेट्रोल/डिझेल) होंडा 2 नग रक्कम रु. 2,40,000/- खरेदी करण्यात आलेले असून सदरच्या खरेदीची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आल्याचे तपासणीला आढळुन आले नाही.

आदेश क्र.1388/12 दि.24/1/12 अन्वये मे. के.के. ब्रदर्स हयांचेकडून घटक क्र.155 सिकंदर टाईप हेलमेट कॉकार्डमेक प्रत्येकी 4500/-प्रमाणे 16 नग रक्कम रु.72,000/- खरेदी करण्यात आलेले असून त्यांची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे सन 2010-11 मध्ये घटक क्र. 155 सिकंदर टाईप हेलमेट कॉनकार्डमेकची ओरिएंटल सर्व्हिस हयांच्या कडून आदेश क्र. 349/10 दि.25/8/10 अन्वये प्रतिनग रु.440 प्रमाणे 125 नग रु.60000/- ची खरेदी करण्यात आलेला आहे. या बाबीकरीता दरामध्ये 11 पट वाढ झाली आहे. ही वाढ बाजार भावाप्रमाणे योग्य असल्याचे खरेदी समितीने प्रमाणित केलेले नाही. तसेच वस्तुचा दर्जाही तपासणीअंती प्रमाणित केलेला नाही. सन 2010-11 व सन 2011-12 मधील दरांमधील तफावतीबाबत नस्तीमध्ये भाष्य करण्यात आलेले नाही. तसेच पुरवठा आदेश दि. 24/1/12 अन्वये खरेदी केलेल्या हेल्मेटची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आलेली नसल्याने रक्कम रु. **72000/-** वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

सन 2010-11 मधील तुलनात्मक तक्यातील न्युनतम दर पहाता त्याच बाबीकरीता इतर निविदाधारकांकडून प्राप्त् दर हे 5 ते 12 पट अधिक असल्याचे दिसते. याबाबत खेरदी समितीचे भाष्य नस्तीत उपलब्ध नाही तसेच निविदा प्रसिध्दीत खरेदी करावयाच्या वस्तूंचा दर्जा/ मोजमाप इ. (Specification) देण्यांत आलेला नाही. त्यामुळे खरेदी करण्यांत आलेल्या वस्तूंचा दर्जा, त्याबाबत निविदाकाराकडून प्राप्त होणारी खरेदी नंतरची सेवा (Guaranty/ warranty) इ. बाबी महानगरपालिकेस प्राप्त होत नाही.

DATASDM5602 (Ref No : 8)

## ***9 महानगरपालिकेच्या विविध बालोद्यानात सन 2011-12 मध्ये नविन खेळणी पुरवठा करणेचा ठेक्यातील त्रुटींबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :उद्यानासाठी खेळणी खर , महानगरपालिका निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***अनुदान उपलब्ध नसताना वाढीव अंदाजित खर्चाची निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली.इसारा व सुरक्षा अनामत कमी स्विकारण्यात आली.न्युनतम 1 निविदाकारास डावलुन न्युनतम 2 निविदाकाराचे दर मान्य करण्यात आले.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | महानगरपालिकेच्या विविध बालोद्यानात सन 2011-12 मध्ये नविन खेळणी पुरवठा करणेचा ठेका. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | 1) अरिहंत इंडस्ट्रियल कार्पो.लि. 2) डायमंड फायर अँड फेब्रिकेशन 3) हनीफन एन.थ्रीलिंग कं. 4) फन प्ले सिस्टम 5) बाबा प्ले वर्ल्ड 6) प्ले मेट सिस्टीम्स. |
| तांत्रिक मंजुरी | ---- |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र. 27 दि. 20/11/11 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ---- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 1 कोटी |
| बजेट तरतुद | 58,50,000 |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै.नरविर चिमाजी, दै.लोकमत, व दै. मुंबई केसरी टाईम्स |
| इसारा रक्कम | 50,000/- |
| निविदा रक्कम | 1 कोटी |
| सुरक्षा अनामत | 1 लाख |
| कामाचा कालावधी | 45 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 1) डायमंड फायर 2) हनीफन एन.थ्रीलिंग कं 3) फन प्ले सिस्टम 4) बाबा प्ले वर्ल्ड. 500/- प्रत्येकी |
| दोषदायित्व कालावधी | ---- |
| कार्यारंभ आदेश | ---- |

| | |
|---|---|
| काम सुरु दिनांक: 07/05/11 | काम पुर्ण दिनांक: ----- 18/05/11 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. |

महानगरपालिकेच्या भांडार विभागांतर्गत उद्यान व क्रिडांगणे या लेखाखालील उद्यानात नविन खेळणी पुरविणे या उपशिर्षाखाली खरेदी अंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षांत निविदा प्रक्रिया राबवून विविध ठेकेदारांशी दर करार करण्यात येतात. या दर करारानुसार सर्व प्रभागांमधील उद्यानांमध्ये नवीन खेळणी पुरविली जातात.

सन 2011-12 मध्ये नवीन खेळणी खरेदी करीता स्थायी समितीचा ठराव क्र. 27 दि. 20/11/2011 अन्वये मान्यता घेवून 1. अरिहंत इंडस्ट्रियल कार्पो.लि. 2. डायमंड फायर अँड फेब्रिकेशन 3). हनीफन एन.थ्रीलिंग कं. 4. फन प्ले सिस्टम 5. बाबा प्ले वर्ल्ड 6. प्ले मेट सिस्टीम्स. या निविदाकारांना एकुण 52 बाबींकरीता निविदादर मंजूर करण्यांत आले.

प्रस्तुत प्रकरणी पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

सन 2011-12 च्या अंदाजपत्रकानुसार उद्याने व क्रिडांगणे या लेखाशिर्षातंर्गत विविध उद्यानात नविन खेळणी पुरविण्याच्या बाबींवर रु. 58,50,000/- एवढी प्रत्यक्ष तरतूद केली असता रु. 1 कोटी इतक्या अंदाजित खर्चाची निविदा सूचना प्रसिध्द करण्यांत आली व सन 2011-12 मध्ये प्रत्यक्ष खर्च रु. 46,80,000/- इतका करण्यांत आला आहे. अनुदान उपलब्ध नसताना वाढीव अंदाजित खर्चाची निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली.

मे. हनी फन एन थ्रिलिंग कं. मे. बाबा प्ले वर्ल्ड आणि मे. प्ले मेट सिस्टिम्स या ठेकेदारांनी त्यांची नोंदणी प्रमाणपत्रे (Certificate of Registration) आणि मे. फन प्ले सिस्टिम्स आणि मे. हनी फन थ्रिलिंग आणि कं. या ठेकेदारांनी त्यांची मागील 3 वर्षांची आयकर प्रमाणपत्रे सादर केली नसल्याचे नस्तीत उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

DATRADM5901 (Ref No : 9)

## *10 वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीसाठी जळावू लाकूड खरेदी करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :प्रेत दहन लाकडे खरेद , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***निविदा प्रसिध्दी अट क्र. 4 अन्वये व्यवसायाशी संबंधित ठेकेदार यानी दर भरणे अपेक्षित होते. परंतू नस्ती तपासली असता ठेकेदार मे. कोनार, मे. संखे व मे. कवळी हे व्यवसायाशी संबंधित असल्याचे पुरावा निवेदे सोबत जोडलेला नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपी 1093/प्र.क्र. 1516 भाग दि. 27/04/2000 नुसार कामाचे भाग पाडण्यात येऊ नयेत, अशा सूचना असताना कामाचे भाग पाडून ठेकेदार याना कार्यादेश देण्यात आले आहेत.***

वसई - विरार शहर महापालिका हददी मधील विविध ठिकाणच्या स्मशान भूमीसाठी लागणारे जळावू लाकूड पूरवठा करण्याच्या नस्त्यांचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देत आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिकेअंतर्गत 5 प्रभाग समिती आहेत. प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीसाठी लागणारे जळावू लाकूड पुरवठा करण्यासंबंधी जाहिर निविदा प्रसिध्दी दैनिक वृत्तपत्र सामना दि. 05/05/11 रोजी देण्यात आली होती. सदर जाहीर निविदा सूचनेमध्ये खालील दर्शविलेल्या बाबी नमूद केलेल्या आहेत.

निविदा प्रसिध्दी मध्ये फक्त अंदाजित रक्कम, इसारा रक्कम सुरक्षा ठेव नमूद केली आहे परंतू एकुण मागणी किती हे नमूद केलेले नाही.

तांत्रिक लिफाफा मध्ये कोणकोणती कागदपत्र ठेकेदार यांनी सादर करावीत हे शा.नि.व-भाखरु/1094/(2679)उद्योग-6 दि. 30/03/94 मधील अनुक्रमांक 1.4.1-3 अ/ब/, 1.4.2.1, 1.4.2.2, 1.4.1.2 व 1.4.2.3 नुसार ठेकेदार यांनी कागद पत्र तांत्रिक लिफाफा सोबत जोडणे क्रमप्राप्त होते. व त्या प्रमाणे निविदा प्रसिध्दी मध्ये नमूद करणे आवश्यक होते. उदा. अनामत रक्कम भरल्याची पावती, आयकर प्रमाणपत्र, विक्रीकर प्रमाणपत्र इत्यादी.

निविदा प्रसिध्दी अट क्र. 4 अन्वये व्यवसायाशी संबंधित ठेकेदार यानी दर भरणे अपेक्षित होते. परंतू नस्ती तपासली असता ठेकेदार मे. कोनार, मे. संखे व मे. कवळी हे व्यवसायाशी संबंधित असल्याचे पुरावा निविदेसोबत जोडलेला नाही.

मे. कोनार व महानगरपालिका यांचे मध्ये रु. 500 मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करण्यात आलेला आहे. करारनामा तपासला असता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 अनुक्रमांक 2 नूसार महानगरपालिकेची सामान्य मुद्रा नगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असली पाहिजे व ती करारनाम्यावर डकविली पाहिजे परंतू तसे झाल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेले नाही.

मे. संखे, मे. कोनार, मे. कवळी यांचेशी दराबाबत वाटाघाटी करण्यात आलेल्या आहेत. वाटाघाटी नंतरचा दर रु. 4300/- प्रत्येक टनासाठी मान्य करण्यात आला आहे. परंतू सदरचा भाव हा बाजार भावाशी सुसंगत असल्याचे प्रमाणपत्र खरेदी समितीने नस्ती मध्ये ठेवलेले नाही.

# कलम ९ ब खालील आक्षेप

## *11 जनगणना 2011 या शासन योजनेवर झालेला खर्चाचे लेखा परिक्षण.*

**जनगणना 2011**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :जनगणना खर्च , केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 25181802.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 145950.00/-

***जनगणना 2011 या केंद्र शासनाच्या योजनेकरीता नियुक्त केलेले पर्यवेक्षक व प्रगणक यांना केलेल्या मानधन वाटपाच्या तक्त्यावर मानधन स्विकारणा-याच्या स्वाक्ष-या नाहीत.***

जनगणना 2011 या केंद्र शासन योजनेसाठी केंद्रशासनाकडून वसई-विरार शहर महानगरपालिकेला पहिला हप्ता रु.1,27,40,293/-व दुसरा हप्ता रु.1,24,41,589/- एकुण रु.2,51,81,802/- एवढे अनुदान प्राप्त झाले होते. सदर अनुदान वाटपाच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

वार्ड क्र. 6 वार्ड प्रमुख रमेश मानकर यानी पर्यवेक्षक रमेश मानकर यांचे नाव सर्कल क्र. 38,39 मध्ये दर्शविले आहे. व त्या प्रमाणे त्यांना प्रशिक्षण भत्ता दोन वेळ अदा केलेला आहे. श्री. मानकर यांना रु. 750/- प्रशिक्षण भत्ता जादा अदा केलेला आहे. सदर रु**. 750/-** वसुलपात्र आहेत**.**

प्रभाग क्र. 12 मधील वार्ड प्रमुख श्री. प्रकाश बावीस्कर (दुसरा टप्पा) यांनी अनुक्रमांक 13 ते 20 प्रगणकांना मानधन वाटप केलेले आहे. सदर प्रगणकांचे मानधन अदा करतेवेळी एकाच प्रगणकाने स्वाक्षरी करुन 8 प्रगणकांची रक्कम स्विकारलेली आहे. त्यामुळे सदरचे मानधन संबंधीत प्रगणकांना मिळाले किंवा कसे याची लेखा परिक्षणास खात्री करता आलेली नाही. तसेच मानधनाची किती रक्कम वाटप करण्यासाठी देण्यात आली होती व किती वाटप केले हयाबाबत वार्ड प्रमुख बावीस्कर यानी प्रमाणित करुन स्वाक्षरी केलेली नाही. एका प्रगणकाला रु**. 3300/-** प्रमाणे **7** प्रगणकांची रु**. 23,100/-** वसुलपात्र ठेवण्यात येत आहे**.**

| अ.क्र. | वार्ड क्र. | गट क्र. | प्रगणक/पर्यवेक्षक | मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 15 | 383/1 | अेस.के.लिलका | 3300 |
| 2. | 25 | 111 | सुखदेव दरवेशी | 3300 |
| 3. | 25 | 127 | राजेंद्र पारधी | 3300 |
| 4. | 25 | 130 | अरुण पवार | 3300 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | 25 | 131 | विटकर चंद्रकांत नामेदव | 3300 |
| 6. | 15 | 389 | गणेश शंकर राणे | 3300 |
| 7. | 8 | मास्टर ट्रेनर | राजेंद्र महादेव जाधव | 3300 |
| 8. | 10 | मास्टर ट्रेनर | भालचंद्र दगडू पाटील | 3300 |
| 9. | 11 | मास्टर ट्रेनर | गणेशकुमार प्रकाश अग्रवाल | 3300 |
| 10. | 12 | मास्टर ट्रेनर | संदिप नानाभास पाटील | 3300 |
| 11. | 717 | 790 | स्नेहल ठाकरकर | 3300 |
| 12. | 3 | 3 | शिलावती वर्मा | 3300 |
| 13. | 22 | 22 | अरुणा ए. कोणजि | 3300 |
| 14. | - | 27 | प्रेमा भगवान मोरे | 3300 |
| 15. | 41 | 41 | अंकोला सीमा रोहिदास | 3300 |
| 16. | 63 | 63 | सुभाश्री करवरकर | 3300 |
| 17. | 123 | 123 | संजय शाह वळवी | 3300 |
| 18. | 124 | 124 | इंदू यशवंत म्हात्रे | 3300 |
| 19. | 136 | 136 | निलाक्षी पाटील | 3300 |
| 20. | 137 | 137 | विजय पाटील | 3300 |
| 21. | 140 | 140 | मिलिंद मल्हाराव सरदेशमुख | 3300 |
| 22. | 4 | मास्टर ट्रेनर | कुनाल रमेश हिंदळेकर | 3300 |
| 23. | 5 | मास्टर ट्रेनर | सचिन पाटील | 3300 |
| 24. | 6 | मास्टर ट्रेनर | संतोष हरले | 3300 |
| 25. | 19 | मास्टर ट्रेनर | प्रिया सिंह | 3300 |
| 26. | 36 | 36 | सुमन दि. यादव | 3300 |
| 27. | 123 | 123 | रुक्मीनी सुरेंद्र शेडगे | 3300 |
| 28. | 183 | 183 | निशा चंद्रावरकर | 3300 |
| 29. | 206 | 238 | रेणुका पवाले | 3300 |
| 30. | 208 | 240 | निकीता निलेश कापसे | 3300 |
| 31. | 344 | 390 | अंजली जाधव | 3300 |
| 32. | 566 | 615 | विजय समसमूय सिंह | 3300 |
| 33. | 568 | 617 | आरती दधीय | 3300 |
| 34. | 647 | 712 | निलेश सिंह | 3300 |
| 35. | 717 | 790 | स्नेहल ठाकरकर | 3300 |
| 36. | 769 | 845 | निलेश मा. म्हात्रे | 3300 |
| एकुण | | | | रु.1,**18,800/-** |

वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या पर्यवेक्षक व प्रगणक यांच्या मानधन वाटप तक्त्यावर

स्वाक्षरी घेतलेल्या नसल्याने संबंधीत पर्यवेक्षक व प्रगणक याना मानधन मिळाल्याची लेखा परिक्षणास खात्री करता आलेली नाही. म्हणून रु.**1,18,800/-** वसुलपात्र ठेवण्यात येत आहे**.**

विभागीय कार्यालय नालासोपारा अ.क्र. 718 गट क्र. 790 स्नेहल ठाकरकर याचे नाव दोनदा यादी मध्ये नमूद केलेले आहे व त्याना प्रगणकाचे मानधन रु. 3300/- दोन वेळा अदा केलेले आहे. करीता प्रस्तुत प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येते म्हणून रु**. 3300/-** वसुलपात्र आहेत**.**

शासन निर्णय क्र. जनगणना 2011/1762/प्र.क्र.12/5, दि. 05/10/11 अ.क्र. 7 नुसार जनगणना खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवण्यांबाबत आदेशीत केले होते. प्रत्यक्ष लेखा परिक्षण केले असता जनगणना खर्चाचे लेखे स्वतंत्र ठेवलेले नाहीत. 1) उपयोगिता प्रमाणपत्र ज.ग. 55/11, दि. 27/07/11 रु.1,27,40,293/- 2) वविशम/ज.ग./336/13, दि. 24/01/13, रु.1,24,41,589/- अन्वये एकुण रु.2,51,81,802/- खर्च झाल्याचे निदर्शनास येते तथापि स्वतंत्र लेखे न ठेवल्याने त्याची तपासणी करता आली नाही. जनगणना खर्चाची आकस्मिक खर्च, मानधनवाटप, प्रवासखर्च व इतर खर्च इत्यादी प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

उपरोक्त मुद्दा क्र. 2 व 3 मधील अनियमितता पाहता व मुद्दा क्र. 6 मध्ये उल्लेखिलेले अनुपलब्ध अभिलेखे पहाता खर्च अनुदान रु. 2,51,81,802/- मधील पर्यवेक्षक/प्रगणक यांना अदा केलेल्या मानधनाची परिपुर्ण तपासणी होणे आवश्यक आहे जेणेकरुन गैरव्यवहाराची व्याप्ती निदर्शनास येईल. तरी महानगरपालिका स्तरावर सखोल तपासणी करण्यात यावी व अतिप्रदानित रक्कम असल्यास ती वसुल करण्यात यावी व गैरव्यवहाराबाबत संबंधितांवर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी. तोपर्यंत रक्कम रु. 25181802/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 25181802/-

DPSKGGM6001 (Ref No : 11)

## *12 प्रभाग समिती 'ड' मधील वॉर्ड क्र. 69 मध्ये DG नगरमध्ये लहान मुले व जेष्ठ नागरिकांसाठी पार्क तयार करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :विकास निधी अंतर्गत उ , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1918502.00/-

***संपुर्ण निविदा प्रक्रिया व केलेले काम आक्षेपार्ह आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वॉर्ड क्र. 69 मध्ये DG नगरमध्ये लहान मुले व जेष्ठ नागरिकांसाठी पार्क तयार करणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. आर.व्ही. धोत्रे कंस्ट्रक्शन, नवघर (पूर्व) |
| तांत्रिक मंजुरी | 08/02/2012 सुधारीत मंजुरी 24/8/2012 |
| प्रशासकीय मंजुरी | 29/01/2012 सुधारीत मंजुरी 24/8/2012 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2011-12 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | मुळ रक्कम रु. 11,74,296/- / सुधारीत रक्कम रु. 18,28,500/- |
| बजेट तरतुद | रु. 75.00.000/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 15 दिवस, दै. नवशक्ती, दै. वसई समता |
| इसारा रक्कम | रु. 11,700/- |
| निविदा रक्कम | रु. 18,28,502/-, 4.99% जादा |
| सुरक्षा अनामत | ----- |
| कामाचा कालावधी | 60 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 400/- |
| दोषदायित्व कालावधी | ----- |
| कार्यारंभ आदेश | दि. 30/05/2012 |
| काम सुरु दिनांक: 30/5/2012 | काम पूर्ण दिनांक: 28/07/12. मुदतवाढीची तारीख: 30/09/12 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | --- |
| प्रमाणक क्र. ---- 2239/20-10-12 | मोजमाप पुस्तक क्र. 202 |

सन 2011-12 मध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' च्या वॉर्ड क्र. 69 मध्ये डी. जी. नगर येथे लहान मुलांसाठी तसेच जेष्ठ नागरिकांसाठी पार्क तयार करण्याचे काम ठेकेदार मे. आर. व्ही. धोत्रे कंस्ट्रक्शन यांना मंजूर करण्यात आले होते. सदर कामाच्या नस्तीचे लेखा परिक्षणाने पडताळणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख 7/3/12 असून जाहीराती मध्ये त्याच दिवशी निविदा उघडण्यात येतील असे नमुद केले आहे. परंतू प्रत्यक्षात दि. 21/3/12 रोजी निविदा उघडल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते.

नस्तीमध्ये खालील प्रकारची कागदपत्रे आढळली नाहीत.

ठेकेदारास मंजूर केलेल्या कामाची सुधारीत रक्कमेच्या 4.99% जादा दरानुसार येणा-या रु. 19,18,502/- च्या 5% दराने रु. 95,925/- ची सुरक्षा अनामत जमा केल्याची कागदपत्रे.

ठेकेदाराबरोबर केलेल्या करारनाम्यातील अट क्र. 3 अन्वये मंजूर कामाचा विमा संरक्षण घेतल्या बाबतचे कागदपत्र.

करारनाम्यातील अट क्र. 17 नुसार सदर काम सुरू करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारे व काम

पूर्ण झाल्यानंतरची छायाचित्रे ठेकेदाराने सादर करणे बंधनकारक आहे. परंतू अशा प्रकारची छायाचित्रे नस्ती मध्ये आढळली नाहीत.

करारनाम्यातील अट क्र. 22 अन्वये सदर कामासाठी वापरण्यात येणाऱ्या कामगारांच्या जीविताचा विमा उतरविण्या बाबतची कागदपत्रे / प्रमाणपत्रे नस्ती मध्ये नाहीत.

करारनाम्यातील अट क्र. 25 अन्वये ठेकेदाराने काम सुरू केल्यानंतर एक महिन्याच्या आंत स्थानिक संस्था कर (LBT) नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाकस/1094(2679)/उद्योग-6, दि. 30/3/94 अन्वये निविदा सुचना जाहिर करताना लिफाफा क्रमांक 1 मध्ये खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

इसारा रक्कम (धनादेश / धनाकर्ष वगैरे).

ठेकेदाराचा सदर कामाचा मागील अनुभव.

मागील 3 वर्षापैकी कुठल्याही 1 वर्षाचा वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र.

कामगार कायदा 1970 अंतर्गत नोंदणी केलेले प्रमाणपत्र.

मंजूर कामासाठी जर कामगारांचा पुरवठा करावयाचा असेल तर कामगार आयुक्तांचे प्रमाणपत्र (अनुज्ञप्ती).

भविष्य निर्वाह निधी कायदा 1950 अंतर्गत ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र.

किमान रक्कम रु. 10 लाखाची बँक गॅरेंटी (Bank Solvancy).

E.S.I.S. ची नोंदणी प्रमाणपत्रे.

व्यवसाय कर (Profession Tax) कायदयाखालील नोंदणीचे प्रमाणपत्र

महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या निविदा सुचनेत लिफाफा क्र. 1 मध्ये फक्त निविदाकाराची परवाना नोंदणी व इसारा रक्कम भरल्याबाबतची कागदपत्रे मागविलेली आहेत. ही बाब नियमबाहय आहे. करीता या कामाची संपुर्ण रक्कम रु. 19,18,502/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 1918502/-

DATRADM5901 (Ref No : 12)

## *13 प्रभाग क्र. 4 मध्ये विरार (पू) शंकर विलास हिंदू हॉटेल समोर नाल्याचे बांधकाम*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :विकास निधी अंतर्गत इ , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 25610.00/-

| |
|---|
| ***मोजमाप नोंदवहीमध्ये जादा मोजमापे नोंदविल्यामुळे अतिरिक्त प्रदान झाले आहे.*** |

| | |
|---|---|
| कामाचे नाव | प्रभाग क्र. 4 मध्ये विरार (पू) शंकर विलास हिंदू हॉटेल समोर नाल्याचे बांधकाम |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | ए.जी. पाटील 4.98% जादा दराने |
| तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता ठराव क्र. 403/8-3-11 |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 6 दि. 2-2-11 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2010-11 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 37,79,318 |
| बजेट तरतुद | |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. नवभारत टाइम्स व दै. जागल्या दि. 30/3/11 |
| इसारा रक्कम | रु. 33900/- |
| निविदा रक्कम | रु. 33,82,502/- |
| सुरक्षा अनामत | रु. 1,35,300/- |
| कामाचा कालावधी | रु. 180 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- दि. 29/4/11 |
| दोषदायित्व कालावधी | -- |
| कार्यारंभ आदेश | क्र. 548 दि. 5/5/2011 |
| काम सुरु दिनांक: 28/10/11 | काम पूर्ण दिनांक: 18/1/2012 |
| धावते/अंतिम देयक<br><br>एकुण खर्च रक्कम | पहिले धावते देयक रु. 22,14,966/- दुसरे व अंतिम देयक रु. 17,04,335/-<br>रु.39,19,301/- |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र.118 पान क्र.12 ते 19 व 126 पान क्र. 69 ते 89 |

प्रस्तुत नालाबांधकामासाठी दै.नवभारत टाईम्स व दै. जागल्या या वृत्तपत्रात दि. 30/3/11 रोजी जाहिरात प्रसिध्दी देणेत आली असून एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी सर्वात कमी दराची मे.ए.जी.पाटील यांची 4.98 % जादा दराची निविदा स्विकारण्यात आली असून त्यांना दि. 5/5/11 रोजी कार्यादेश दिले असून काम विहीत मुदतीत पूर्ण झालेआहे. एकूण कामावर झालेल्या खर्चाबाबत खालील प्रमाणे लेखा परिक्षणात अभिप्राय देण्यात येत आहे.

अ)सदर कामाची मोजमाप नोंदवहीतील मोजमाप तपासली असता भाग 1 नुसार नाला बांधकामासाठी बाब क्र.1 नुसार जून्या सिमेंट लाईन मशिनरी मध्ये 107.60 मीटर लांबीमध्ये 3.93 मीटर रूंदी व 2.65 मीटर उंची मध्ये खोदाई केली असून बाब क्र. 2 नुसार 107.60 मीटर लांबी मध्ये व 4.23 मीटर रूंदीमध्ये तसेच .23 सें.मी जाडीचे रबल सोलिंग केले आहे. वास्तविकत: जेवढया रूंदीमध्ये म्हणजेच 3.93 मीटर मध्ये खोदाई केली आहे तेवढयाच भागामध्ये रबल सोलिंग करणे आवश्यक होते त्यामुळे

(4.23-3.93) .30 सें.मी. एवढया भागात जादा रबाल सोलिंग झाल्याचे दिसून आले त्यामुळे ठेकेदारस खालील प्रमाणे जादा प्रदान झालेले आहे. मोजमाप नोंदवही प्रमाणे नोंदविलेली मापे

= 107.60 x 4.23 x .23 = 104.68 घनमीटर

प्रत्यक्षात नोंद घ्यावयाची मोजमापे

= 104.60 x 3.93 x .23 = 94.54 घनमीटर

जादा नोंदविलेली मोजमापे = 104.68 - 94.54

= 10.05 घनमीटर

जादा झाले प्रदान = 10.05 घ.मी. x 584.50 दर

= रु. **5874/-** वसुल पात्र रक्कम

ब) सदर मोजमाप नोंदवही बाब क्र. 3 नुसार एम-15 चे कॉंक्रिटने पी.सी.सी. रबल सोलिंगवर करणे या कामासाठी खालीलप्रमाणे जादा मोजमाप नोंदविल्यामुळे ठेकेदारास खालीलप्रमाणे अतिप्रदान झाले आहे. मोजमाप नोंदवही प्रमाणे नोंदविलेली मापे.

107.60लांबी x 4.23 रुंदी x .10 लांबी = 45.50 घ.मी.

प्रत्यक्षात नोंद घ्यावयाची मोजमापे

104.60 लांबी x 3.93 रुंदी x .10 रुंदी = 41.10 घ.मी.

जादा नोंदविलेली मोजमापे = 45.50 - 41.10 = 4.45 घ.मी.

एकूण जादा झालेले प्रदान = 4.40 घ.मी. x 3940.10 दर

= रु. **17336/-** वसुल पात्र रक्कम

क) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरुस्ती / सुधारणा क्र. 12 दि. 1/5/2006 नुसार करारनामा करताना करार रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखाकरीता रु. 100/- प्रमाणे मुद्रांक युल्क कमान रु. 5 लाखाच्या मर्यादेपर्यंत भरणे आवश्यक आहे. नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या या प्रकरणी रु. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे दिसते. करारनाम्याची रक्कम रु. 33,82,502/- असल्याने 10 लाखावरील रक्कमेस रु. 2400/- मुद्रांक शुल्क पेपर घेणे आवश्यक होते परंतु अशा प्रकारे मुद्रांक शुल्क न घेतल्याने रु. 2400/- चे शासनाचे नुकसान झाले आहे ते वसुल करून शासन खाती जमा करावी.

वसुलपात्र रक्कम रु. **2400/-**

एकूण एकंदर वसुल पात्र रक्कम

**(** अ **+** ब **+** क )

रु. **5874 + 17336 + 2400**

**=** रु. 25610**/-**

DATNDMM5801 (Ref No : 13)

## *14 वॉर्ड क्र. 61 मध्ये वाळीव मुख्यरस्ता ते धुमाळनगर पर्यंत रस्ता डांबरीकरण*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रस्ता बांधकामे , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 108064.00/-

***निविदा सुचनेस विस्तृत प्रसिध्दी न दिल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नाहीत. निविदा प्रक्रिया अयोग्य वेळेस राबविण्यात आल्यामुळे आक्षेपार्ह ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी आवश्यक त्या तांत्रिक निकषानुसार काम करण्यात आलेले नाही. वापरलेल्या गौण खनिजाकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही. मुद्रांक शुल्क कमी स्विकारण्यात आले आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वॉर्ड क्र. 61 मध्ये वालीव मुख्यरस्ता ते धुमाळनगर पर्यंत रस्ता डांबरीकरण |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. ज्योती कंस्ट्रक्शन 4.90% जादा दराने |
| तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता 29/293 दि. 15/2/11 |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र. 5 दि. 15/2/11 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2010 - 2011 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 21,25,755/- |
| बजेट तरतुद | 2 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. जागल्या दि. 30/3/2011 |
| इसारा रक्कम | --- |
| निविदा रक्कम | रु. 21,25,755/- |
| सुरक्षा अनामत | रु. 101007/- |
| कामाचा कालावधी | 180 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- दि. 5/5/11 |
| दोषदायित्व कालावधी | -- |
| कार्यारंभ आदेश | 402 दि. 16/5/2011 |
| काम सुरु दिनांक: 16/5/11 | काम पूर्ण दिनांक: 19/11/2011 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | पहीले व अंतिम रु. 23,17,761/- |
| प्रमाणक क्र. | 170 पान क्र. 174 ते 181 |

प्रस्तुत रस्ता बांधकामासाठी दै. जागल्या या दि. 30/11/11 च्या स्थानिक वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी करून एकूण प्राप्त तीन निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा म. ज्योती कंस्ट्रक्शन यांची 4.90% जादा दराची निविदा स्विकारणेत आली असून त्यांना दिनांक. 13/5/11 रोजी कार्यादेश देणेत आले आहेत. तसेच सदरचे काम विहीत मुदतीत पूर्ण झाले असून एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परिक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

महाराष्ट्र शासन सा. प्र. विभाग. शा. नि.क्र. जाहिरात/2009/प्र. क. 137/का/34 दि. 31.8.2009 अन्वये जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य 20 लाखाचे वर आहे अशी जाहिरात 'ब' वर्ग दैनिक व साप्ताहिक देणे बंधनकारक आहे. असे असताना स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर नियमबाहयतेमुळे निविदेस विस्तृत प्रसिध्दी न मिळाल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नाहीत.

सदर कामाची नस्ती व मोजमाप नोंदवही तपासली असता हे रस्ता बांधकाम नुसार 0|0 ते 0|425 मीटर साखळी मध्ये प्रस्तापित असून रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण अंतर्भूत आहे.मोजमाप नोंदवहीतील बाब क्र. 1 व बाब क्र. 6 मधील मोजमापानुसार साखळी क्र. 0|0 ते 0|439 मीटर मध्ये 80 मी.मी., 40 मी.मी. व्यासाची खडी पुरवठा करून पसरविली असून खडीसाठी मुरूम व - वापरून खडीदबाई केलेली आहे. एकूण 2627.85 चौ.मी. एवछया क्षेत्रामध्ये खडीकरणाचे काम झालेले आहे. मसेच बाब क्र. 12 नुसार एकुण 2685.63 चौ.मी. क्षेत्रात खडीकरणावर 50/75 मी.मी. जाडीचा बीटूमिनियस बाऊंड मॅकडम (बी.बी.एम) चा डांबराचा थर पसरविणेत आलेला आहे व बीबीएम डांबराच्या पृष्ठ भागावर पातळ उांबरराचा टॅक कोट करून तेवछयाच पृष्ठ भागावर हॉटमिक्स हॉटलेड डांबराचा थर व बीटूतिनियस कॉंक्रिटचा डांबर थर दिला आहे. याबाबत लेखा परिक्षणात आक्षेप घेण्यात येत आहे की, प्रत्यक्षात खडीकरण एकूण 2627.85 चौ.मी. क्षेत्रावर झालेले आताना तेवछयाच क्षत्रामध्ये बीबीएम, टॅककोट, हॉटमिक्स हॉट लेड व बीटूमिनियस कॉक्रिट हया डांबरांचे थर देणे आवश्यक होते परंतु प्रत्यक्षात मोजमाप नोंदवहीतील मोजमाप तपासली असता एकूण 2685.63चौ.मी. क्षत्रामध्ये वरीलप्रमाणे डांबर पसरविणेत आल्याचे निदर्शनास आले त्यामुळे खालील बाबींवर एकूण (2685.63-2627.85)= 57.77 चौ.मी. क्षेत्रावर जादा डांबरीकरणाचे काम झाले असून सदर क्षेत्रावर यापूर्वी खडीकरण झाले असलेबाबत कोणतीही टिप्पणी अथवा नोंद नोंदवहीत घेतल्याचे दिसून आले नाही अथवा या रस्त्याबाबतचा रोड बार चार्ट नस्ती सोबत जोडलेला नाही. त्यामुळे एकूण 57.77 चौ.मी. जादा झालेले डांबरीकरणाचे काम व झालेला खालील प्रमाणे खर्च वसुलपात्र होतो.

बाब क्र. 12 नुसार टॅक कोट :-

= 57.77 चौ.मी. x 21.30 दर = रु. 1231/-

बाब क्र. 11 - बी.बी.एम. (बाऊंठ मॅकडम)

= 57.70 x 198.30 दर = रु. 11456/-

बाब क्र. 13 - हॉटमिक्स हॉटलेड मॅकडम

= 57.77 x .050

= 2.88 घन.मी.

= 2.88 घ.मी x 4146.50 दर = रु. 11977/-

बाब क्र. 14 - बीटूमिनियस काँक्रिट

= 57.77 x 0.025 = 1.44 घ.मी.

= 1.44 घ.मी. x 6306.70 = रु. 9082/-

(1+2+3+4) = रु. 1231 + 11456 + 11977 + 9082

= रु. 33746 /- वसुलपात्र रक्कम

महाराष्ट्र शासन महसूल व नवविभाग शासन निर्णय क्र. गौख/10/1001/प्र.क्र. 309/ख/दि. 11.2.2010 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेले खडी, वाळू, मुरूम इत्यादीची गौणखनिजांची स्वामित्व धनाची (रॉयल्टी) रक्कम शासनसदरी भरणा करणे बंधनकारक आहे. परंतु अशी गौणखनिजांची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासनसदरी भरणा न केल्याने शासनाचे खालील प्रमाणे नुकसान झालेले आहे. ते वसूलपात्र ठरते.

दर प्रति घनमीटर रु. 70.67

मोजमाप वही प्रमाणे पुरवठा झालेले साहित्य

बाब क्र. 1 - 80 मी.मी. ट्रॅप खडी पुरवठा

= 394.31 घमी x 70.67 दर = रु. 27,866/-

बाब क्र. 2 - कठीम मुरुम पुरवठा

= 131.50 घमी x 70.67 = रु. 9,293/-

बाब क्र. 6 - 40 मी.मी खडी पुरवठा

= 131.50 x 70.67 = रु. 27,866/-

बाब क्र. 7 - 6 मी.मी. क्रश मेटल

= 131.50 x 70.67 = रु. 9,293/-

वसूलपात्र रक्कम रु. 74,318/-

एकूण वसूलपात्र रक्कम :- **रु. 33746 + 74318**

**= रु 1,08,064/-**

DATNDMM5801 (Ref No : 14)

## *15 धुरी कॉम्लेक्स येथील उद्यान विकसित करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :विकास निधी अंतर्गत ३ , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 155377.00/-

***कामातील मोजमापांमध्ये विसंगती असल्याने ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे. मुद्रांक शुल्क कमी वसुल करण्यात आले आहे तसेच गौण खनिजांकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही. नियमबाह्य मुदतवाढ देण्यात आली आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | धुरी कॉम्लेक्स येथील उद्यान विकसित करणे |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. होम एंटरप्रायजेस, वसई रोड (प) |
| तांत्रिक मंजुरी | 5/4/11 |
| प्रशासकीय मंजुरी | 10/5/11 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2011-12 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 30,41,957/- |
| बजेट तरतुद | 75,00,000/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. नवाकाळ, दै. वसई समता |
| इसारा रक्कम | रु. 30,500/- |
| निविदा रक्कम | 30,41,957/- |
| सुरक्षा अनामत | 4% DD ने. 1,21,678 + 5% बिलातून 1,52,098 = 2,73,776/- |
| कामाचा कालावधी | 120 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | -- |
| कार्यारंभ आदेश | 24/5/2011 |
| काम सुरु दिनांक: 24/05/11 | काम पूर्ण दिनांक: 20/09/2011 सुधारीत 30/04/12 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | 30,15,064/- |
| प्रमाणक क्र. 1789 दि. 12/09/12 | मोजमाप पुस्तक क्र. 180, 184 |

सन 2011-12 मध्ये वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती “ड” मधील धुरी कॉम्लेक्स येथील उद्यान विकसित करण्याच्या कामाचा ठेका मे. होम एंटरप्रायजेस, वसई रोड (प) यांस देण्यांत आला होता. सदर कामाच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता बाबी / त्रुटी निदर्शनास आल्या. सदर कामाच्या मोजमाप पुस्तिका क्र. 184 मधील बाब क्र. 2 रबल सोलिंग 80 मी.मी. मध्ये एकूण 301.02 इतके प्रमाण नमूद आहे. परंतु मोजमाप पुस्तिका 180 आणि 184 मधील त्याची एकूण परिगणना केली असता त्याचे प्रमाण 252.42 इतके असल्याचे दिसून येते. त्यामुळे दर्शविलेले (301.02 - 252.42) 48.6 प्रमाणची रु. 712.30 या दराने रु. 34617/- चे अतिप्रदान झालेले असल्याने ते वसुलीस पात्र ठरते.

वसुलपात्र रक्कम रु. 34617/-

मोजमाप पुस्तिका 180 मध्ये बाब क्र. 7 मध्ये प्रोव्हायडिंग अँड कास्ट इन सिटू सिमेंट कॉंक्रिट एम:20 फॉर आरसीसी परडी साठी 6.01 घन मीटरचे प्रमाण जास्त दर्शविलेले आहे. परंतु त्याची परिगणना केली असता सदर प्रमाण 5.14 घन मीटर असल्याचे दिसून येते त्यामुळे 6.01 - 5.14 = 0.87 घनमीटर इतके प्रमाण जास्त दर्शविल्याने दर रु. 6016/- प्रमाणे रु. 5233.92 चे अतिप्रदान झालेले आहे. सबब सदर रक्कम वसूलीस पात्र ठरते.

वसुलपात्र रक्कम रु. 5233/-

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि. 01/05/2006 नुसार निविदा रकमेच्या प्रथम रु. 10 लक्षापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लक्षा करीता किंवा त्याच्या प्रत्येक भागाकरीता रु. 100/- प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. त्यानुसार निविदेची रक्कम रु. 30,41,957/- असल्याने ठेकेदार मे. होम एंटरप्रायजेस यांनी रु. 2200/- चे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असताना केवळ रु.100/- चे मुद्रांक शुल्क भरलेले आहे त्यामुळे रु. 2100/- चे मुद्रांक शुल्क ठेकेदाराकडून वसूल करून शासनाच्या तिजोरीत जमा करणेत यावेत.

वसुलपात्र रक्कम रु. 2100/-

उपरोक्त कामाच्या गौण खनिजासाठी माती,रेती आणि दगड/खडी वापरल्याचे नस्तीमधील कागदपत्रांवरून दिसून येते व त्याकरीता अनुक्रमे रु. 31,980/-, रु. 19,640/- आणि रु. 37,880/- असे एकूण रु. 89500/- स्वामित्व धनापोटी शासन जमा केल्याचे विवरणपत्र नस्तीमध्ये आढळते. परंतु सदर प्रमाणपत्र कार्यकारी अभियंती यांनी प्रमाणित केलेल नाही. तसेच सदर रक्कम शासन खाती जमा केल्याच्या चलनाची प्रतही नस्ती मध्ये आढळली नाही. याबाबतचे प्रमाणक क्र. 1789 दि. 12/09/12 ची तपासणी केली असता स्वामित्व धनाची रक्कम रु. 89,500/- ची वजाती अंतिम देयकातून केली नसल्याचे दिसून येते. सबब, रक्कम रु. 89,500/- ही वसुलपात्र ठरते.

वसुलपात्र रक्कम रु. 89500/-

सदर कामाच्या ठेकेदाराबरोबर केलेल्या करार पत्रातील अट क्र. 22 अन्वये सदर काम करण्यासाठी कामावर लावण्यात येणाऱ्या कामगारांच्या जीविताचा 1.1224% दराने रक्कम रु. 23,927/- ची वसूली प्रमाणक क्र. 1789 दि. 12/09/20112 मध्ये दिसून येत नाही. सबब रक्कम रु. 23,927/- ही वसूलपात्र ठरते.

वसुलपात्र रक्कम रु. 23927/-

सदर कामाचा कार्यादेश दि. 24/05/11 रोजी निर्गमित केलेला असल्याने तसेच कामाची मुदत 120 दिवसांची असल्याने ते काम दि. 20/09/11 रोजी पूर्ण होणे क्रमप्राप्त होते. परंतू उद्यानालगतच्या उंच जलकुंभातून इनलेट-आऊटलेटची जोडणी करावयाची असल्याने सदर कामाच्या मुदतवाढी बाबत कार्यकारी अभियंता यांनी दि. 20/09/2011 रोजी टिप्प्णी सादर करून त्यानुसार त्यांनी त्यांचे पत्र क्र. निरंक दि.निरंक नुसार 223 दिवसांची म्हणजे 30/04/2012 पर्यंतची मुदतवाढ ठेकेदारास मंजूर केली. सदर काम 120 दिवसांत पूर्ण होण्याची खात्री असतानाही त्यास 223 दिवसांची मुदतवाढ म्हणजेच मूळ मुदतीपेक्षा 103 दिवस अधिकची मुदत देण्यांत आली.

ठेकेदाराने सादर केलेले नोंदणी प्रमाणपत्र तसेच पॅनकार्ड साक्षांकित करणे आवश्यक होते, ते केलेले नाही.

ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्यातील अट क्र. 3 अन्वये ठेकेदाराने कामाचा विमा उतरविण्याबाबतचे कागदपत्र नस्तीमध्ये आढळून आलेले नाहीत.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाकस/1094(2679)/उद्योग-6, दि. 30/3/94 अन्वये निविदा सुचना जाहिर करताना लिफाफा क्रमांक 1 मध्ये खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

इसारा रक्कम (धनादेश / धनाकर्ष वगैरे).

ठेकेदाराचा सदर कामाचा मागील अनुभव.

मागील 3 वर्षापैकी कुठल्याही 1 वर्षाचा वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र.

कामगार कायदा 1970 अंतर्गत नोंदणी केलेले प्रमाणपत्र.

मंजूर कामासाठी जर कामगारांचा पुरवठा करावयाचा असेल तर कामगार आयुक्तांचे प्रमाणपत्र (अनुज्ञप्ती).

भविष्य निर्वाह निधी कायदा 1950 अंतर्गत ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र.

किमान रक्कम रु. 10 लाखांची बँक गॅरेंटी (Bank Solvancy).

E.S.I.S. ची नोंदणी प्रमाणपत्रे.

व्यवसाय कर (Profession Tax) कायदयाखालील नोंदणीचे प्रमाणपत्र

महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या निविदा सुचनेत लिफाफा क्र. 1 मध्ये फक्त निविदाकाराची परवाना नोंदणी व इसारा रक्कम भरल्याबाबतची कागदपत्रे मागविलेली आहेत व अन्य कागदपत्रे सादर केलेली नाहीत. ही बाब नियमबाहय आहे.

याबाबत देण्यात आलेल्या अर्धसमास पत्रास दि. 21/06/2013 रोजी अनुपालन प्राप्त झाले असुन मुद्दा क्र. 4 व 5 बाबत अनुक्रमे स्वामित्वधनाच्या पावत्या व कामगार विमा कागदपत्रांच्या छायाप्रती अनुपालनासह सादर न केल्याने अमान्य करण्यात येत आहे. अन्य मुद्दे क्र. 1 ते 3 व 6 ते 10 वगळण्यात येत आहेत.

DATRADM5901 (Ref No : 15)

## *16 "ड" प्रभागातील वॉर्ड क्र. 75 मध्ये आनंदनगर उद्यान दुरुस्तीच्या नस्तीमधील त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :विकास निधी अंतर्गत उ , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 24400.00/-

***कामातील मोजमापांमध्ये विसंगती असल्याने ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे. सुरक्षा अनामत व निविदा दर अंदाजपत्रकाच्या 10% पेक्षा कमी अधिक असल्यास भरावयाची अतिरिक्त सुरक्षा अनामत***

***स्विकारण्यात आलेली नाही. नियमबाह्य मुदतवाढ देण्यात आली आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | “ड” प्रभागातील वॉर्ड क्र. 75 मध्ये आनंदनगर उद्यान दुरुस्तीबाबत. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. राज एंटरप्रायजेस (10.30% कमी दराने) |
| तांत्रिक मंजुरी | दि. 10/2/11 |
| प्रशासकीय मंजुरी | दि. 05/2/11 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2010-11 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 9,96,037 |
| बजेट तरतुद | रु. 75 लाख |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 16 दिवस, दि. 18/2/11 ते 4/3/11<br>दै. नवाकाळ / दै. आपलं महानगर |
| इसारा रक्कम | रु. 10,000/- |
| निविदा रक्कम | रु. 8,93,445/- |
| सुरक्षा अनामत | 4% = रु. 43,946/-<br>5% = बिलातून रु. 49,802/-<br>एकूण रु. 93,748/- |
| कामाचा कालावधी | 120 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | ---- |
| कार्यारंभ आदेश | दि. 11/5/2011 |
| काम सुरु दिनांक: 11/5/11 | काम पूर्ण दिनांक. 7/9/11,<br>मुदतीनंतर दि. 30/11/11 |
| धावते देयक<br>एकुण खर्च रक्कम | रु. 8,78,915/- |
| प्रमाणक क्र. 1801 दि. 12/9/12 | मोजमाप पुस्तक क्र.177 पान क्र.32 ते 36 |

सन 2011-12 मध्ये वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रभाग समिती “ड” मधील वॉर्ड क्र. 15 मध्ये आनंदनगर उद्यान दुरुस्तीच्या रु. 9,96,037/- रक्कमेच्या कामासाठी दि. 18/2/11 रोजीच्या दै. नवाकाळ व दै. आपलं महानगर मध्ये जाहिरात प्रसिध्द केली. त्यास अनुसरून 1) मे. एथनिक इंटिरियर्स - 5% कमी दराने, 2) मे. राज एंटरप्रायजेस - 10.30% कमी दराने आणि 3) मे. कपील एस. ठाकूर 7.21% जादा दराने दि. 4/3/11 रोजी पर्यंत निविदा सादर केल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात येवून त्यातील कागदपत्रांची छाननी करून मे. राज एंटरप्रायजेस यांची सर्वात कमी दराची निविदा मंजूर करण्यांत आली. सदर कामास दि. 5/2/11 रोजी प्रशासकीय तसेच दि. 10/2/11 रोजी

तांत्रिक मंजूरी देऊन दि. 11/5/11 रोजी 120 दिवसांसाठी कार्यादेश निर्गमित करण्यांत आला. दि. 8/8/2011 रोजी ठेकेदाराने पावसाळयाच्या कारणास्तव सदर कामाच्या मुदतवाढीची विनंती केल्याने महानगरपालिकेने पत्र क्र. निरंक दि. 12/9/2011 अन्वये दि. 30/11/2011 पर्यंत कामास मुदतवाढ मंजूर केली. सदर कामास झालेला खर्च सर्व वजातींसह रु. 7,79,844/- प्रमाणक क्र. 1801 दि. 12/9/12 अन्वये ठेकेदारास अदा करण्यांत आला. सदर कामाच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील बाबी / त्रुटी निदर्शनास आल्या.

सदर कामाची मोजमाप पुस्तिका क्र. 177 मधील पृष्ठ क्र. 35 वर बाब क्र. 13 मधील "डिस्पोजिंग ऑफ द एक्सकॅव्हेटेड अनयुजफूल मटेरियल कंम्प्लिट" या बाबींतर्गत, लांबी 38.00 x रुंदी 1.5 x खोली 1.5 x1 = 85.5 क्युबिक मीटर एवढे काम प्रत्यक्षात होत असून त्याची परिगणना करतानां ती 192.57 क्यु.मी. एवढी दर्शविण्यात आली आहे. म्हणजेच 192.57 (-) 85.5 = 107.07 क्यु.मी.एवढे जादा काम दर्शविण्यांत आले आहे. त्याची रु. 104.60 च्या दराने रु**. 11200/-** ची वसूली होणे आवश्यक असल्याने सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

नस्ती मधील महानगरपालिकेने मंजुर केलेल्या शेडयुल बी च्या तपशिलामध्ये बाब क्र. 2 अन्वये जमिनीतून सर्व प्रकारची माती, मुरुम यांचे 184.80 क्यु.मि. एवढे खोद काम केल्याचे व सदर खोद काम 147.84 क्यु.मि. एवढया प्रमाणात नष्ट केल्याचे बाब क्र. 13 मध्ये दर्शविण्यांत आले आहे. मात्र सदर कामाच्या मोजमाप नोंदवही क्रमांक 177 मधिल पृष्ठ क्रमांक 35 वरील गोषवाऱ्यामध्ये सदर खोद कामातील नष्ट केलेल्या माती-मुरुमाचे प्रमाण 192.57 क्यु.मि. एवढे दर्शविण्यांत आलेले आहे.

यावरुन प्रस्तुत प्रकरणी 44.73 क्यु.मि. (192.47-147.84) एवढे नष्ट केल्याचे प्रमाण अतिरिक्त असल्याचे दिसुन येते. सबब सदर अतिरिक्त प्रमाणाची रू. 104.60/- च्या दराने एकुण रु**. 4,679/-** ची वसुली होणे आवश्यक ठरते.

मोजमाप पुस्तिका क्र. 177 मधील बाब क्र. 1 "फिलिंग इन प्लींथ अँड फ्लोअर्स विथ कॉन्ट्रॅक्टर्स मुरूम कम्प्लिट" आणि बाब क्र. 2 "एक्सकॅवेशन फॉर फौंडेशन इन अर्थ सॉईल ऑफ ऑल टाईप्स कंपलिट" करीता अनुक्रमे 13.50 क्यु.मी. आणि 107.07 क्यु.मी. अशा एकूण 120.57 क्यु.मी. च्या प्रमाणाकरीता, शासनाच्या महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्र. गौख/10/1001/प्र.क्र. 309/ख, दि. 11/2/2010 नुसार शासन दर रु. 70.67 च्या परिगणनेनुसार रु. 8521/- (120.57 x 70.67) ची स्वामित्व धनापोटीची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. सबब रु. **8521/-** ही रक्कम वसूलपात्र ठरते.

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 9,96,037/- च्या कामासाठी ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.43,946/- तसेच इसारा रक्कम रु.10,000/- चा भरणा महानगरपालिकेकडे करणे आवश्यक आहे. सदर भरणा केल्याबाबतचा पुरावा नस्ती मध्ये आढळला नाही.

ठेकेदाराबरोबर केलेल्या मंजूर निविदा नमुना बी 1 मधील अट क्र. 7.1 "प्रोग्राम ऑफ वर्क" मध्ये नमूद केल्यानुसार ठेकेदाराने पावसाळयाच्या कालावधीसह काम पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतू संबंधित ठेकेदारास पावसाळयाच्या कारणास्तव कामाची मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. सदरची महानगरपालिकेची कार्यवाही नियमबाहय आहे.

निविदा धारकानी सादर केलेल्या निविदा लिफाफा क्र. 1 च्या छाननी पत्रकावर निविदा समिती सदस्यांच्या स्वाक्षऱ्या नसल्यामुळे सदर निविदा, समिती समक्ष उघडण्यांत आल्याचे सिध्द होत नाही.

त्यामुळे निविदा प्रक्रियेमधील पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होते.

वसूलपात्र रक्कम

परिच्छेद क्र. 1 - रु. 11,200/-

परिच्छेद क्र. 2 - रु. 4,679/-

परिच्छेद क्र. 3 - रु. 8,521/-

एकूण रक्कम - रु. 24,400/-

DATRADM5901 (Ref No : 16)

## *17 चुळणा ते गास पर्यंत रस्त्याची साईड पटटी करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रस्ता बांधकामे , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 7651277.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2779860.00/-

***निविदा प्रक्रिया चुकीच्या वेळेस राबविण्यात आल्यामुळे आक्षेपार्ह ठेवण्यात येत आहे. वापरलेल्या गौण खनिजाकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही. मुद्रांक शुल्क कमी स्विकारण्यात आले आहे. वाढीव कामाकरीता तांत्रिक तसेच प्रशासनिक मंजुरी घेण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | चुळणा ते गास पर्यंत रस्त्याची साईडपटटी करणे. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | श्री. गणेश इंटर प्राईझेस **6%** कमी दराने |
| तांत्रिक मंजुरी | शाखा अभियंता |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र. **11/1** दि. **25.05.2011** |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन **2010-2011** |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. **73,77,630/-** |
| बजेट तरतुद | **2** कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. पुण्यनगरी, दै. खबरे दि. **04.05.2011** |
| इसारा रक्कम | **----** |
| निविदा रक्कम | रु. **64,34,972/-** |
| सुरक्षा अनामत | रु. **1,19,422/-** |
| कामाचा कालावधी | **180** दिवस |

| | |
|---|---|
| करारनामा मुद्रांक शुल्क | **26.05.2011 रु. 100/-** |
| दोषदायित्व कालावधी | **1** वर्ष |
| कार्यारंभ आदेश | क्र**. 489/** दि**. 07.06.2011** |
| काम सुरु दिनांक: 15.06.2011 | काम पुर्ण दिनांक **: 24.01.2012** |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | दुसरे व अंतिम रु**. 76,51,277/-** |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र**. 19** पान क्र**. 51** ते **58** |

प्रस्तुत रस्ता खडीकरण करणे कामासाठी दिनांक 4.5.2011 च्या दै. पुण्यनगरी, दै. खबरे या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असुन या कामासाठी एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन सर्वात जादा दराची मे. गणेश इंटरप्राइझेस यांची निविदा रकमेच्या 6% कमी दराची निविदा स्विकारणेत येऊन काम पूर्ण करण्यात आले आहे. या कामासाठी एकुण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सदरचे काम रस्ता खडीकरणाचे असल्याने व खडीकरणानंतर सदर रस्तेवर डांबरीकरण होणार असल्यामुळे रस्त्याच्या खडीकरणाच्या मजबुती करणासाठी खडीकरण पावसाळयापूर्वी होणे आवश्यक होते व यासाठी निविदा प्रक्रिया अगोदर करुन पावसाळा सुरु होणेपूर्वी ठेकेदाराला कार्यादेश देणे जरुरी होते परंतू ठेकेदाराला भर पावसात कार्यादेश देणेत आले असून (दि.7.6.2011) ठेकेदाराने प्रत्यक्षात 10.10.2011 रोजी कामास सुरुवात केल्याचे दिसून येते तसेच कार्यादेश दिल्यानंतर मध्येच पावसाळा आल्याने ठेकेदाराने कामास मुदतवाढ मागितली असून त्यांना दिनांक 31.3.2012 पर्यंत मुदतवाढही देण्यात आली आहे त्यामुळे पावसाळयानंतर झालेले खडीकरणाचे काम तांत्रिकदृष्टया मजबूत झाले असल्याबाबत लेखा परीक्षणाची खात्री पटवावी. तोपर्यंत झालेला एकुण खर्च लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन खर्च रु**. 76,51,277/-**

प्रस्तुत खडीकरणाचे काम दोन भागामध्ये म्हणजे 1) तुळजा भवानी मंदिर ते गास रोड व 2) संचीती ते तुळजाभवानी मंदिर असे घेणेत आले असून मोजमाप नोंदवहीमधील अंतिम देयकातील मोजमापे तपासली असता भाग-1 साठी बाब क्र. 2 नुसार खडीकरणासाठी एकुण 1327.97 घनमीटर एवढा 82 मी.मी. खडीचा पुरवठा केला असून भाग क्र. 2 साठी 1200 घनमीटर एवढा 82 मी.मी. खडीचा पुरवठा केला आहे. सदरच्या एकुण कामासाठी 1327.97+1200=2527.97 घनमीटर 80 मी.मी. खडीचा पुरवठा केला आहे व सदर खडीपुरवठा कामी ठेकेदारास प्रति घनमीटर रु. 542.80 या दराने रक्कम अदा केली आहे. या दिलेल्या दराचे दर पृथःकरण (रेट ॲनॉलिसेस) तपासले असता खालीलप्रमाणे तफावत असल्याचे निदर्शनास आले. (दगडी खाणीचे अंतर बांधकामापासून 9 कि.मी.) 80 मी.मी. खडीचा मुळदर जिल्हा दर सुची प्रमाणे. रु. 358/- प्रति घनमीटर + 5% महानगरपालिका रु. 17.90 + वाहतूक दर रु.

157.31 - रु. 65.25 इनिशियल ½ किमी + 70.67 स्वामीत्व धन आकार एकुण एकंदर पूर्ण दर = रु. 538.63 याप्रमाणे ठेकेदारास प्रति घनमीटर प्रमाणे ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक होते. परंतु ठेकेदारास रु. 542.80 प्रति घनमीटरने अदायगी केल्याने खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे. दिलेला दर 542.80 - द्यावयाचा दर रु. 538.63 = रु. 4.17 एकुण तफावत

बाब क्र. 2 नुसार वापरलेली खडी 80 मी.मी.

= 2527.97 x 4.17

= रु. **10,833/-** वसुलपात्र रक्कम.

प्रस्तुत खडीकरणाचे दोन भागाचे कामासाठी बाब क्र. 7 नुसार एकुण 1263.98 घनमीटर एवढा 40 मी.मी. आकाराची ट्रॅप मेटल पुरवठा केला असून ठेकेदारास प्रति घ.मी. रु. 618.40 या दराने प्रदान केल्याचे मोजमाप नोंदवहीवरुन दिसून आले. परंतू खालील प्रमाणे प्रदान करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौ.ख/10/1001/प्र.क्र. 309/ख, दिनांक 11.02.2010 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली खडी, वाळू, मुरुम इत्यादी साहित्यांची गौण खनिजांची स्वामित्व धन रक्कम शासनाकडे जमा करणे बंधनकारक आहे. परंतु अशी गौणखनिजांची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसुल करुन मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे खालीलप्रमाणे नुकसान झालेले आहे ते खालीलप्रमाणे वसूल पात्र ठरते.

वसूल करावयाचा दर प्रति घ.मी. रु. 70.67

रस्ता खडीकरण भाग-1 व भाग-2

बाब क्र. 1 माती भराव (अर्थवर्क)

6600 + 10531.01 = 17131 घ.मी. x 70.67 दर = रु. 12,10,647/-

बाब क्र. 2 80 मी.मी. खडी पुरवठा

1200 + 1327.97 = 2527.97 घ.मी. x 70.67 दर = रु. 1,78,651/-

बाब क्र. 3 कठीण मुरुम पुरवठा

300 + 331.99 = 631.99 घ.मी. x 70.67 दर = रु. 44,423/-

बाब क्र. 7 40 मी.मी. खडी पुरवठा

600 + 663.98 = 1263.98 घ.मी. x 70.67 दर = रु. 89,325/-

बाब क्र. 8 - 6 मी.मी. क्रश मेटल

198 + 219.11 = 417.11 घ.मी. x 70.67 दर = रु. 29,476/-

एकुण बेरीज (1+2+3+4+5)

रु. 12,10,647 + 1,78,651 + 44,623 + 89,325 + 29,476 = रु. 15,52,722/- वसुलपात्र रक्कम.

प्रस्तुत प्रकरणी नस्तीची छाननी केली असता सदर कामासाठी एकूण रक्कम रु. 76,51,277/- एवढा खर्च झाला. एकूण निविदा रक्कम रु. 64,34,972/- च्या 11.73% जादा खर्च झाला आहे. महाराष्ट्र

नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 167 (2) नुसार जेव्हा मुळ अंदाजामध्ये 10 टक्क्यापेक्षा अधिक वाढ होण्याचा संभव असेल तर सुधारित अंदाज तयार झाले पाहिजेत व ते जणू मूळ अंदाज असल्याप्रमाणे मान्यतेसाठी सादर केले पाहिजेत परंतू अशी कार्यवाही झालेली नाही त्यामुळे 11.73% झालेला खर्च रु. 12,16,305/- सक्षम प्राधिकरणाची मंजुरी प्राप्त होईपर्यंत वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 1216305/-

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु**. 76,51,277/-**

एकुण वसूलपात्र रक्कम

रु**. 10,833 + 15,52,722 + 1216305/-**

**= रु. 2779860/-**

DATNDMM5801 (Ref No : 17)

## *18 एव्हर शाईन सिटी एव्हन्यू ते स्कायहाईटस पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रस्ता बांधकामे , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1799732.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 241030.00/-

***काम पुर्ण झाले असतानाही मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रस्तावित मोजमापांपेक्षा जास्तीच्या क्षेत्रावर डांबरीकरण करण्यात आले आहे. मुद्रांक शुल्क कमी घेण्यात आले असुन गौण खनिजांकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | एव्हर शाईन सिटी एव्हन्यू ते स्कायहाईटस पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | ज्योती कंस्ट्रक्शन 4.90% जादा दराने |
| तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता सन 2010-11 |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 6 दि. 2/2/2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2010-2011 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 16,45,003/- |

| | |
|---|---|
| बजेट तरतुद | 6 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै.सामना, दै.कराळे समाचार दि. 29/3/2011 |
| इसारा रक्कम | रु. 16500/- |
| निविदा रक्कम | रु. 17,25,608/- |
| सुरक्षा अनामत | रु. 65,800/- |
| कामाचा कालावधी | 120 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | दि. 29.04.2011 रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | क्र. 404/ दि. 16.05.2011 |
| काम सुरु दिनांक: 16.05.2011 | काम पुर्ण दिनांक : 28.10.2011 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | दुसरे व अंतिम रु. 17,99,732/- |
| प्रमाणक क्र. | |

प्रस्तुत रस्ता बांधकामासाठी दि. 29/3/11 च्या दै. सापमना व दै. कराळे समाचार या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून निविदा आळया असून सदर कामासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी सर्वात कमी दराची मे. ज्योती कंस्ट्रक्शन यांची 4.90% जादा दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना 16/5/11 रोजी कार्यादेश देऊन तसेच दि. 31/12/11 पर्यंत मुदतवाढ देणेत आली असून 28/10/11 रोजी काम पूर्ण झाले आहे. या कामावर झालेल्या एकूण खर्चाबाबत लेखा परिक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

अ) सदर कामाची नस्ती व मोजमाप नोंदवही यांची छाननी केली असता ठेकेदारास दि. 16/5/11 रोजी कार्यादेश देणेत आले.परंतु पावसाळा जवळ आल्याने डांबरीकरणाचे काम पूर्ण होऊ शकणार नसल्याने त्यांनी मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज केला असून ठेकेदारास दि. 31/12/11 पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. मुदत टिपणी मध्ये खडीकरणाचे काम पूर्ण करण्याचे नमूद केले आहे व त्यानुसार त्यास मुदतवाढ दिल्याचे दिसून आले. परंतु प्रत्यक्षात नोंदवहीतील मोजमापे व तारखांचा ताळमेळ घेतला असता दि. 23/9/11 रोजी 80 मी.मी चा खडीचा पुरवठा झाला असून 27/9/11 रोजी मुरूम पुरवठा करून दि. 7/10/11 रोजी खडीची दबाई दिसते व तदनंतर 28/10/11 पर्यंत डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे ठेकेदारास सदर कामास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्विकारणेचा प्रश्नच उदभवत नसताना मुदतवाढ देणेत आली आहे. मुदतवाढीबाबत विसंगती निदर्शनास येते.

ब) प्रस्तुत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणेचा प्रस्तावित असल्याने पावसाळया पूर्वी खडीकरण होणे अत्यावश्यक होते जेणेकरून खडीकरणास मजबूती प्राप्त होऊन तदनंतर डांबरीकरणाचा दर्जा राखणे योग्य होईल.परंतु ऐन पावसाळा सुरू होण्या पूर्वी ठेकेदारास कार्यादेश (दि. 16/5/11) देणेत

आल्यामुळे तसेच खडीकरणाचे काम दिनांक 23/9/11 ते 7/10/11 या कालावधीत व डांबरीकरणाचे काम दि. 17/10/11 ते 28/10/11 या मुदतीत केल्याने कामाचा दर्जा राखला गेला नसल्याचे दिसते.

क) प्रस्तुत रस्ता खडीकरणानंतर डांबरीकरण करावयाचा असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग रोड स्पेसीफिकेशन नुसार रस्त्याचे डांबरीकरण होणे पूर्वी खडीकरणाची दबाईची जाडी (क्रशथिकनेस) 25 ते 30 से.मी. असणे आवशयक असून अशी जाडी प्राप्त झालेनंतरच डांबरीकरणाचे काम हाती घेणेत यावे याबाबत सदर कामाची मोजमाप नोंदवहीतील नोंदी तपासता सदर कामासाठी 80 मी.मी खडीचा 15 सें.मी जाडीचा खडीचा थर पसरविणेत आला असून त्यावर 50/75 मी.मी जाडीचे बी.बी.एम(वीटूमिनियस बाऊंड मॅकडम) पसरविणेत आले आहे व त्यामुळे खडीकरणाची दबाई जाडी 10 से.मी. व बी.बी.एम ची जाडी 7.5 से.मी. अशी एकूण जाडी 17.5 प्राप्त झाली असताना त्यावर डांबरीकरण करण्यात आले असल्याचे दिसून आले. प्रत्यक्षात खडीकरणाची जाडी (बी.बी.एम सहीत) 25 ते 30 से.मी. प्राप्त झाल्यानंतर डांबरीकरण होणे तांत्रिक दृष्टया आवश्यक होते परंतु अशी जाडी प्राप्त न करताच डांबरीकरण केले आहे. त्यामुळे डांबरीकरणाचा दर्जा न राखता एकूण झालेले काम योग्य झालेबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटविण्यात यावी.

वरील अ,ब,क नुसार एकूण झालेला खर्च रू 17,99,732/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रू. **17,99,732/-**

ड) प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवहीतील नोंदी तपासल्या असता बाब क्र.9 नुसार व बाब क्र. 4 नुसार खडीकरणासाठी एकूण 80 मी.मी खडीचा 330.60 घनमीटर पुरवठा करुन ही खडी 2200 चौरस मीटर क्षेत्रावर पसरवून मुरुमाने दबाई केलेली आहे. तसेच बाब क्र. 5 ते 9 नुसार एकूण 2542.06 चौरस मीटर क्षेत्रावर बी.बी.एम (50 ते 55 मीमी जाडी) चा एक थर, ब तेवढयाच क्षेत्रावर टॅककोट (पातळ डांबर), बी.एम (बिटूमिनियस मॅकडम), 25 मी.मी जाडीचे प्रिमीक्स कारपेट, व सिलकोट डांबराने केल्याचे दिसून आले. वस्तुत एकूण खडीकरण 2200 चौरस मीटर क्षेत्रावर झाले असताना 2542.06 चौरस मीटर क्षेत्रावर अनावश्यक वरील बाबींची मोजमापे नोंदविलेली आहेत तसेच याबाबत प्राक्कलनातही अशा बाबी प्रस्तावित केलेल्या नाहीत. प्राक्कलनामध्ये जेवढे खडीकरण अपेक्षित आहे तेवढयाच क्षेत्रामध्ये डांबरीकरण करणेचे गृहित आहे. जादा क्षेत्रामध्ये केलेले डांबरीकरण जर पूर्वीचा रस्ता खडीकरणाचा होता का? याबाबत रस्ताची पूर्वीची स्थिती याबाबत रोड बार चार्ट नस्तीसोबत जोडलेला नाही त्यामूळे खालील प्रमाणे जादा घेतलेली मोजमापे व झालेला खर्च खालील प्रमाणे लेखा परीक्षणात वसुल पात्र ठरतो.

एकूण जादा झालेले डांबरीकरणाचे काम:-

2542.06 चौ.मी- 2200 चौमी = 342.06 चौ.मी.

1) बाब क्र. 5 - बीटूमिनियस बाऊंड मॅकडम

= 342.06 चौ.मी x 198.34 दर

= रु. 67,844/-

2) बाब क्र. 6 - टॅक कोट (पातळ डांबर)

= 342.06 चौ.मी. x 10.50 दर

= रु. 3592/-

3) बाब क्र. 7 - बी. एम (बिटूमिनियस मॅकडम)

= 342.06 चौ.मी x 0.5 = 17.10 घ.मी.

= 17.10 घ.मी. x 4146.50 दर

= रु. 70905/-

4) बाब क्र. 8 - 25 मी.मी प्रिमीक्स कारपेट

= 342.06 चौ.मी. x 138.70 दर

= रु. 16727/-

5) बाब क्र. 9 - लिक्वीड सीए.कोर

= 342.06 चौ.मी. x 48.90 दर

= रु. 16727/-

एकुण एकंदर (1+2+3+4+5)

67844 + 3592 + 70905 + 47444 + 16727

= रु**. 2,06,512/-** वसुल पात्र रक्कम

इ) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौरव/10/1001/प्र.क्र.309/ख/ दि. 11.02.2010 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली खडी, वाळू, मुरुम इत्यादींची गौण खनिजांची (रॉयलिटी) रक्कम शासन सदरी भरणे बंधनकारक आहे. परंतु अशी गौण खनिजाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करुन मनपाने शासन पदरी भरणा न केल्याने शासनाचे खालीलप्रमाणे नुकसान झालेले आहे. ते खालीलप्रमाणे वसूलपात्र ठरते.

दर प्रति घनमीटर रू. 70.67 मोजमाप नोंदवहीप्रमाणे पुरवठा झालेले साहित्य

बाब क्र. 1 - 80 मी.मी. ट्रॅप खडी पुरवठा

= 330.06 घ.मी. x 70.60 दर = रु. 23,325/-

बाब क्र. 2 - कठीम मुरुम पुरवठा

= 102.06 घ.मी. x 70.67 दर = रु. 7,213/-

एकुण (1 + 2)

= 23,325 + 7,213

= रु**. 30,538/-** वसुल पात्र रक्कम

एकुण आक्षेपाधिन रक्कम **(अ,ब,क)** प्रमाणे रु**. 17,99,732/-**

एकुण वसुल पात्र रक्कम **(ड,इ,)**

रु. **2,06,512 + 30,538 + 3980**

**=** रु. **2,41,030/-** वसुल पात्र

फ) अंदाज खर्चाच्या निविदा रक्कम 4.90% ने जास्त म्हणजे रु. 17,25,608/- असल्याने सुरक्षा अनामत रु. 86,280/- घेणे आवश्यक होते. इसारा रक्कम व घेण्यात आलेली सुरक्षा अनामत विचारात घेता रु. **3980/-** एवढी रक्कम वसुल पात्र ठरते.

DATNDMM5801 (Ref No : 18)

## *19 नालासोपारा नगरपरिषद हददीतील स्मशानभूमि ते समेळ अपार्टमेंट पर्यंत नाला बांधणे (सा.क्र. 183 ते 286 मी) (नागरी दलित वस्ती सुधारणा योजना)*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :दलित वस्ती योजना काम , राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1878603.00/-

***मोजमाप पुस्तिकेत प्राक्कलनात नमुद बाब क्र. 16,19,20,21,22 ची कामे करण्यांत आलेली नाहीत असे नमूद करण्यांत आलेले असताना सहाय्यक अभियंता नालासोपारा विभाग हयांनी सदरचे काम 100% तपासले बाबत नमूद करण्यांत आलेले आहे. काम पूर्ण झालेले नसताना अंतिम देयक ठेकेदारास अदा करण्यांत आले आहे. वाढीव कामाबाबत प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नालासोपारा नगरपरिषद हददीतील स्मशानभूमि ते समेळ अपार्टमेंट पर्यंत नाला बांधणे ( सा.क्र. 183 ते 286 मी) |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. सुहास एंटरप्रायजेस |
| तांत्रिक मंजुरी | आदेश क्र. 293 दि. 29/8/2007 |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 103 दि. 4/1/2008 जिल्हाधिकारी कार्यालय आदेश क्र. सामान्य/कक्ष-3/हे-2/नपा.कवि/7.3.2009 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 74,37,206/- |
| बजेट तरतुद | रु. 74,37,206/- |

| | |
|---|---|
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 17 दिवस. दि. 4/2/2008 ते 20/2/2008 दै. वृत्तमानस |
| इसारा रक्कम | रु. 20,000/- |
| निविदा रक्कम | रु. 74,37,206/- + 37% = 1,01,88,972/- |
| सुरक्षा अनामत | रु. 4,88,568/- |
| कामाचा कालावधी | 120 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- दि. 4/4/2008 |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | साबावि/25/08.09, दि. 4/4/2008 |
| काम सुरु दिनांक: | 4/4/2008 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | दुसरे व अंतिम देयक 31/3/11 |
| प्रमाणक क्र. | 6875/5/12/2011 |

उपरोक्त कामाची नस्ती तपासली असता सदरचे काम शासनाचे नगरविकास विभागाकडील आदेश क्र. विनियो/1008/प्र.क्र. 34नवि-4, दि. 2/6/2008 मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णय नुसार नागरी दलीत वस्ती सुधारणा योजनेसाठी विस्तारित केलेल्या जिल्हाधिकारी ठाणे यांचे आदेश क्र. सामान्य/कक्ष.3/टे-2/नपा/कावि/7.3.2009 अन्वये मंजूर केलेल्या अनुदानातून करण्यात आलेले आहे. सदरचे अनुदान वित्तीय वर्ष 2008-2009 मध्ये खर्च करणे अपेक्षित असून त्याचे विनियोग लेखे दि. 31/3/2009 पर्यंत सादर करणे आवश्यक असताना तसे केल्याचे आढळून आलेले नाही. हयाबाबत जिल्हाधिकारी ठाणे हयांची विलंबाच्या खर्चास मान्यता घेण्यात आलेली नाही.

सदरचे कामाची निविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आली होती. निविदा कालावधी 17 दिवस अल्प मुदतीचा ठेवण्यात आला होता. त्यामुळे माफक प्रमाणात प्रसिध्दी नसल्याने फक्त तीन निविदा प्राप्त झाल्या व त्यानुसार मे. सुहास एंटरप्रायजेस हयानां दि. 4/4/2008 रोजी कार्यादेश देण्यात येऊन काम सुरु करण्यात आले. कामाचा कालावधी 120 दिवसाचा असताना मुदतीत काम पूर्ण करण्यात आलेले नाही व मुदत वाढी बाबत प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांनी दि. 19/10/10 रोजी नोटिस दिल्यावर सादर करण्यात आलेला आहे. सदरच्या ठेकेदाराकडून 3/8/2008 ते 21/10/2010 हया कालावधी करीता प्रतिदिन रु. 100/- प्रमाणे रु. 81000/- करारनाम्यातील अट क्र. 5 प्रमाणे वसुली अंतिम देयक अदा करताना करणे आवश्यक असताना तसे केल्याचे आढळून आले नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 81,000/-

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि. 01/05/2006 नुसार निविदा रक्कमेच्या प्रथम 10 लक्षापर्यंत 100/- रु. व त्यापुढील प्रत्येक 1 लक्षा करीता किंवा त्याच्या प्रत्येक भागाकरीता रु. 100/- प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणी निविदा रक्कम नुसार ठेकेदार यांचे कढुन रु. 9,300/- एवढया मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे क्रम प्राप्त् होते. तथापि रु. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यांत आला आहे. तरी ठेकेदार यांचेकडून एकुण रु. 9,200/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन दप्तरी जमा

करावे. तो पर्यंत रक्कम रु. **9,200/-** वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

मोजमाप पुस्तिकेची बाबनिहाय तपासणी केली असता प्रपत्र 'ब' नुसार खालीलप्रमाणे जादा काम झालेले आढळून आले.

| अ.क्र. | बाब क्रमांक | मोजमाप पुस्तिके प्रमाणे | मंजूर निविदे प्रमाणे | जादा काम | मंजूर दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 500.58 | 427.24 | 73.34 | 78.00 | 5720.52 |
| 2 | 6 | 112.52 | 91.64 | 20.80 | 2187.19 | 45668.52 |
| 3 | 9 | 61.685 | 32.35 | 29.345 | 3335.00 | 97865.57 |
| 4 | 14 | 61.685 | 32.35 | 29.345 | 35772.00 | 1049729.34 |
| | | | | | | 1198983.95 |
| जादा 38.45% | | | | | | 461009.32 |
| एकूण | | | | | | 16,59,993.27 |

सदरच्या जादा झालेल्या कामाकरीता प्राधिकृत प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आलेली नाही. करीता या वाढीव कामावर करण्यात आलेला खर्च नियमबाह्य व त्यामुळे वसुलपात्र ठरतो.

वसूलपात्र रक्कम रु.**16,59,993/-**

मोजमाप पुस्तिकेत बाब क्र.16,19,20,21,22 ची कामे करण्यांत आलेली नाहीत असे नमूद करण्यांत आलेले असताना सहाय्यक अभियंता नालासोपारा विभाग हयांनी सदरचे काम 100% तपासले बाबत नमूद करण्यांत आलेले आहे. काम पूर्ण झालेले नसताना अंतिम देयक ठेकेदारास अदा करण्यांत आले आहे.

अंतिम देयक अदा करताना एकूण देयकाच्या 1% रक्कम कामगार कल्याण निधी वसूल करण्याबाबतचे शासनाचे आदेश असताना, तसे केल्याचे आढळून आले नाही. सदरची रक्कम रु. 99,103/-वसूल करून शासनसदरी जमा करण्यांत यावी.

वसूल पात्र रक्कम रु. **99,103/-**

विमा निधी वसूल करतांना प्रथम धावते देयकाच्या रक्कमेचा विचार केलेला नसल्याने फरकाची रक्कम रु. 29,307/- वसूल करण्यांत यावी.

वसुलपात्र रक्कम रु.29,307/-

एकूण वसूलपात्र रक्कम रू. **18,78,603/-**

DATASDM5602 (Ref No : 19)

## *20 गास चुळणे पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे (12 वा वित्त आयोग)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रस्ता बांधकामे , केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6293828.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 500963.00/-

***खडी, मुरुम यांची रोलरने दबाई न करताच डांबरीकरण झाल्याने काम निकृष्ट झाले आहे. वाढीव कामाचा सुधारीत अंदाज तयार करुन त्यास मंजुरी घेण्यात आलेली नाही. मुद्रांक शुल्क कमी घेण्यात आले असुन गौण खनिजांकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | गास चुळणे पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे<br>(12 वा वित्त आयोग) |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. साईदत्त इंटरप्राईझेस 9.90% जादा दराने |
| तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता एम.जी.पी. 91/ दि. 04.11.10 |
| प्रशासकीय मंजुरी | आयुक्त, बांध/681/2011, दि. 25.11.10 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2009-2010 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 55,72,556/- |
| बजेट तरतुद | रु. 34,55,345/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. महाराष्ट्र बुलंद टाइम्स , नवाकाळ दि. 01.12.10 |
| इसारा रक्कम | रु. 55,800/- |
| निविदा रक्कम | रु. 55,72,556/- (+)9.90% जादा |
| सुरक्षा अनामत | रु. 2,22,902/- |
| कामाचा कालावधी | 180 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | पत्र क्र. 135/ दि. 20.01.2011 |
| काम सुरु दिनांक: | दि. 23/02/11 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | पहिले व अंतिम (मोजमाप नोंदवही क्र. 174 पान 33ते 40 रु. 62,93,828/- |
| प्रमाणक क्र. | |

प्रस्तुत रस्ता बांधकामासाठी दिनांक 01.12.10 च्या दै. बुलंद टाइम्स व नवाकाळ या वृत्त पत्रात जाहिरात प्रसिध्दी करुन निविदा मागविणेत आल्या असुन एकुण चार निविदा प्राप्त झाल्याआहेत. या निविदांपैकी सर्वात कमी दराची मे. साईदत्त इंटरप्राईझेस यांची 9.90% जादा दराची

निविदा स्विकारणेत येऊन त्यांना दि. 20.01.2011 रोजी कार्यादेश देऊन विहीत मुदतीत काम पूर्ण करणेंत आले आहे. सदर कामावर एकुण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सदर कामाची मोजमाप नोंदवही व नस्ती तपासली असता प्राकलनात 80 मी.मी., 40 मी.मी. खडी पुरवठा तसेच दबाई, हॉट मिक्स हॉट लेड प्रिमीक्स कारपेट व सीलकोट अशा बाबी प्रस्तावित असून या कामाची मोजमाप नोंदवही मधील बाब क्र. 2 नुसार खडीकरणापूर्वी रस्तेवरील 1050 चौरस मीटर क्षेत्रावरील खडडे बुजविणेसाठी एकुण 210 घ.मी., 80 घ.मी. खडी व 70 घ.मी. कठीण मुरुमाचा पुरवठा करुन रस्तेवर पसरविणेत आला आहे. परंतू अशा खडी मुरुमावर रोलरने दबाई न करता पुढील खडीकरणाचे दोन थर देऊन डांबरीकरण करणेंत आले असल्याचे मोजमाप वहीवरुन निदर्शनास आले. खडडे बुजविणेसाठी पसरविणेत आलेली खडी मुरुम दबाई न करता झालेले पुढील खडीकरण व डांबरीकरणाचे काम त्यामुळे मजबुत व टिकाऊ अथवा तांत्रिक दृष्टया अयोग्य झाल्याचे दिसते. करीता या रस्ता बांधकामासाठी झालेला एकुण खर्च रक्कम रु. 62,93,828/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु**. 62,93,828/-**

महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौ.ख/10/1001/प्र.क्र.309/ख/दि. 11.02.2010 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली खडी, वाळू, मुरुम इत्यादी साहित्यांची गौण खनिजांच्या स्वामित्व धनाची (रॉयल्टी) रक्कम शासनाकडे भरणा करणे बंधनकारक आहे. परंतू अशी गौण खनिजांची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करुन शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे खालीलप्रमाणे नुकसान झालेले आहे ते खालीलप्रमाणे वसूलपात्र ठरते.

वसूल करावयाचा दर प्रति घ.मी. रु. 70.67/-

बाब क्र. 1 = माती भराव (अर्थवर्क)

= 1680 घ.मी. x 70.67 दर = रु. 1,18,726/-

बाब क्र. 2 = 80 मी.मी. खडी पुरवठा

= 210 घ.मी. x 70.67 दर = रु. 14,841/-

बाब क्र. 3 = कठीण मुरुम पुरवठा

= 70 घ.मी. x 70..67 दर = रु. 4,947/-

बाब क्र. 4 = 40 घ.मी. खडी पुरवठा

= 2100 घ.मी. x 70.67 दर = रु. 1,48,407/-

बाब क्र. 5 = 6 मी.मी खडी पुरवठा

= 700 घ.मी. x 70.67 दर = रु. 49,469/-

एकुण (अ ते उ)

= 1,18,726+14,841+4,947+1,48,407+49,469

= रु**. 3,36,390/-** वसुलपात्र रक्कम

प्रस्तुत कामाची मुळ निविदा रक्कम रु. 55,72,556/- एवढी असल्याने तसेच सदर निविदा 9.90% जादा दराची असल्याने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 167(2) नुसार जेव्हा

मुळ अंदाजामध्ये 10 टक्क्यापेक्षा अधिक वाढ होण्याचा संभव असेल अथवा संकल्पचित्रात वा योजनेत फेरबदल प्रस्तावित केला असेल अथवा अंशत: काम केल्यावर सोडून देण्यात आलेल्या बांधकामाचे नुतनीकरण करावयाचे असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार व्हायला पाहिजेत व ते जणू मुळ अंदाजपत्रक असल्या प्रमाणे मान्यतेसाठी सादर केले पाहिजेत. सदर कामासाठी एकुण रु. 62,93,828/- एवढा खर्च झाला असून निविदा रकमेच्या रक्कम रु.7,21,272/- एवढा जादा झाला आहे. उक्त नियमानूसार (9.99%) च्या मर्यादेत रक्कम रु.61,29,254/- खर्च होणे आवश्यक असताना प्रत्यक्षात (62,93,828 - 61,29,254) = रु.1,64,573/- एवढा जादा खर्च झाला आहे. वरील नियमानुसार कामाचे सुधारित अंदाज न केल्यामुळे जादा झालेला खर्च वसूलपात्र ठरतो.

वसूलपात्र रक्कम रु. **1,64,573/-**

प्रस्तुत कामासाठी लागणारा निधी हा केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेला असल्याने निधी वापराचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास देणे आवश्यक होते. तथापि त्याची प्रत लेखापरीक्षणास नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु. **62,93,828/-**

वसूलपात्र रक्कम

**= 3,36,390 + 1,64,573**

**= रु. 5,00,963/- (एकुण वसूलपात्र)**

DATNDMM5801 (Ref No : 20)

## *21 नवघर-माणिकपूर विभागातील वसई रोड येथील रस्ता डांबरीकरण दुरस्ती करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रस्ता बांधकामे , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1347010.00/-

***आवश्यक तांत्रिक निकषानुसार काम करण्यात आलेले नाही. रस्ता सिलकोट करणेबाबत प्राक्कलनात तरतूद प्रस्तावित असताना अशी बाब टाळणेत आलेली आहे. प्रस्तुत कामाचे प्राक्कलन हे सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून प्रत्यक्ष दर पृथ्थकरण तपासले असता ठेकेदारास सन 2010-11 च्या दरसुचीपेक्षा जादा दराने रक्कम रु. 1,46,312/- अदा करण्यात आली आहे. गौण खनिजांकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नवघर-माणिकपूर विभागातील वसई रोड येथील रस्ता डांबरीकरण दुरुस्ती |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | जय भवानी कंस्ट्रक्शन 7.80% जादा दराने |
| तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता दि. 16.11.2010 |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 8, दि. 22.12.2010 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2010-2011 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 24,99,084/- |
| बजेट तरतुद | 1.5 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. सकाळ व दै. लोकमत दि. 21.02.11 |
| इसारा रक्कम | रु. 25,000/- |
| निविदा रक्कम | रु. 24,99,084/- प्राप्त निविदा 3 |
| सुरक्षा अनामत | रु. 99,963/- |
| कामाचा कालावधी | 12 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | पत्र क्र. 171/ दि. 25.04.11 |
| काम सुरु दिनांक: 27/04/11 | दि. 10/05/12 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | पहिले व अंतिम देयक रु. 27,30,849/- |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. 178 पान क्र. 1 ते 71 |

प्रस्तुत रस्ता डांबरीकरणासाठी दि. 21.02.11 च्या दै. सकाळ व दै. लोकमत या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या आहेत. जाहिरात प्रसिध्दीनुसार या कामासाठी एकुण 3 निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दराची मे. जय भवानी कंस्ट्रक्शन यांची 7.80% जादा दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना दि. 25.04.11 रोजी कार्यादेश देणेत आले असून काम विहीत मुदतीत पूर्ण केले आहे. या रस्ता बांधकामासाठी एकुण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सदर रस्ता खडीकरण व डांबरीकरण याबाबत या कामाचे तांत्रिक अधिकारी यांनी मंजूर केलेले प्राक्क्लन तपासले असता यामध्ये 80 मी.मी., 40 मी.मी. ट्रॅप मेटल खडीकरण तसेच खडीकरणावर फुल ग्राऊट बिटुमिनियस रोड सरफेस, टॅककोट, हॉट मिक्स, हॉट लेड बिटुमिनियस मॅकडम व सीलकोट करणे अशाबाबी प्रस्तावित केलेल्या आहेत. प्रत्यक्ष कामाची मोजमाप नोंदवहीतील मोजमापे पडताळणी केली असता बाब क्र. 11 नुसार एकुण 2768 चौरस मीटर क्षेत्रावर खडीकरण व दबाई झालेली आहे. त्यामुळे तेवढयाच क्षेत्रावर टॅक कोट करुन हॉट मिक्स हॉटलेड ने डांबरीकरण करणे आवश्यक होते परंतू बाब क्र. 14 व 15 नुसार मोजमापे तपासली असता एकुण 7468.48 एवढया चौरस मीटर क्षेत्रावर टॅक कोट व डांबरीकरण केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे खालीलप्रमाणे जादा मोजमापे

नोंदविल्याचे दिसून येते.

एकुण डांबरीकरणाचे क्षेत्र = 7468.48 चौ.मी.

वजा खडीकरणाचे क्षेत्र = 2768.00 चौ.मी.

एकुण जादा क्षेत्र = 4700.48 चौ.मी.

एकुण जादा क्षेत्रावर झालेला खर्च खालीलप्रमाणे

टॅक कोट करणे = 4700.48 x 21.30 = रु. 100120/-

बिटुमिनियस मॅकडम = 4700.48 x .05 = 235 घ.मी. = 235 घ.मी. x 4371.45 दर = रु. 10,27,290/-

एकुण झालेला खर्च (1 + 2) = रु. 100120 + 10,27,290 = रु. 11,27,410/-

उपरोक्त जादा कामाबाबत मोजमाप नोंदवहीमध्ये टिपणी अथवा नोंद घेऊन वरिष्ठांची मंजूरी घेतलेली नाही तसेच सदर जादा क्षेत्रावर झालेले डांबरीकरण करणे पूर्वी सदरचे क्षेत्रावर यापूर्वी खडीकरण झाले होते किंवा याबाबतची मोजमाप नोंदवहीत नोंद घेतल्याचे दिसून आले नाही. असे क्षेत्र डांबरीकरण करणे आवश्यक होते तर अशावेळी मुळ खडीकरणावर साफसफाई (पिकींग रोड सरफेस) करुन अशी मोजमापे नोंदवहीत नोंदवून तदनंतर टॅक कोट व डांबरीकरण करणे अत्यावश्यक होते परंतु अशी मोजमापे नोंदविलेली नाहीत. आवश्यक तांत्रिक निकषानुसार काम करण्यात आलेले नसल्याने सदर खर्च सक्षम प्राधिकरणाची मान्यता मिळेपर्यंत एकुण खर्च रु. 11,27,410/- वसुलपात्र ठेवणेंत येत आहे.

वसुलपात्र खर्च रु**. 11,27,410/-**

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौ.ख/10/1001/प्र.क्र.309/ख/ दिनांक 11.02.2010 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली खडी वाळु, मुरुम इत्यादींची गाैण खनिजांची (रॉयल्टी) रक्कम शासन सदरी भरणे बंधनकारक आहे. परंतू अशी गौण खनिजांची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करुन मनपाने वसुल करुन शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे खालीलप्रमाणे नुकसान झाले आहे ते वसुलपात्र ठरते.

दर प्रति घनमीटर रु. 70.67

मोजमाप नोंदवही प्रमाणे पुरवठा झालेले साहित्य

बाब क्र. 2 - 80 मी.मी. खडी पुरवठा

= 415.00 घ.मी. x 70.67 दर = रु. 29,328/-

बाब क्र. 5 - कठीण मुरुम पुरवठा

= 103 घ.मी. x 70.67 दर = रु. 7,279/-

बाब क्र. 7 = 40 मी.मी. खडी पुरवठा

= 415.52 घ.मी. x 70.67 दर = रु. 29,365/-

बाब क्र. 10 = 6 मी.मी. क्रश मेटल पुरवठा

= 103.52 x 70.67 दर = रु. 7,316/-

एकुण (1+2+3+4) = 29328+7279+29365+7316

= रु. **73,288/-** वसुलपात्र रक्कम

प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवही बाब क्र. 14 नुसार खडीकरणाच्या दबाईनंतर एकुण 7468.48 एवढया क्षेत्रावर पातळ डांबराचा टॅककोट देऊन बाब क्र. 15 नुसार हॉट मिक्स बिटुमिनियस मॅकडमचा एक थर देण्यात आला आहे. परंतु डांबरीकरण नंतर सदरचा रस्ता सिलकोट करणे बाबत मोजमापे नोंदवहीत नोंदविलेली नाहीत. तसेच रस्ता सिलकोट करणेबाबत प्राक्कलनात तरतूद प्रस्तावित असताना अशी बाब टाळणेत आलेली आहे.

प्रस्तुत कामाचे प्राक्कलन हे सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून प्रत्यक्ष दर पृथःकरण (रेट ॲनालिसेस) तपासले असता सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार ठेकेदारास सन 2010-11 च्या दरसुचीपेक्षा जादा दराने अदायगी केलेली रक्कम रु.1,46,312/- लेखा परीक्षणात वसुलपात्र ठेवणेत येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 1,46,312/-

एकुण वसुलपात्र रक्कम

**11,27,410+73,288+1,46,312**

**= रु. 1347010/-**

DATNDMM5801 (Ref No : 21)

## *22 नालासोपारा (प) येथे लक्ष्मीबेन छेडा मुख्य रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रस्ता बांधकामे , महनगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 7620441.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 342227.00/-

***कामाच्या प्राक्कलनात प्रस्तावित असतानाही जमिनीत खोदाई झालेली नाही तसेच रबल सोलिंगही न केल्याने रस्त्याचे काम पृष्ठभागाखाली झाले असल्याने निकृष्ट झाले आहे. मुद्रांक शुल्क कमी घेण्यात आले असुन गौण खनिजांकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नालासोपारा (प) येथे लक्ष्मीबेन छेडा मुख्य रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. नेवाळकर एंटरप्रायजेस 5% जादा दराने |
| तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जिवब प्राधिकरण क्र. |

| | |
|---|---|
| | 936, दि. 27/5/2011 |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र. 21, दि. 27/4/2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2010-11 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 69,28,026/- |
| बजेट तरतुद | रु. 12 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. सामना, मुंबई केसरी टाईम्स, दि. 15/6/2011 |
| इसारा रक्कम | रु. 70,000/- |
| निविदा रक्कम | रु. 69,28,026/- |
| सुरक्षा अनामत | रु. 2,77,121/- |
| कामाचा कालावधी | 180 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 1,000/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | क्र. 1206, दि. 5/11/2011 |
| काम सुरु दिनांक: | दि. 5/11/2011 काम पूर्ण 25/4/12 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | दुसरे व अंतिम -मोजमाप नोंदवही 132 पा.क्र. 19 ते 21 रु. 76,20,441/- |
| प्रमाणक क्र. | |

प्रस्तुत रस्ता खडीकरण व डांबरीकरण ह्या कामासाठी दि. 15/6/11 च्या दै. सामना व मुंबई केसरी टाईम्स या दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असून सदरकामी एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या आहेत. सर्वात कमी दराची निविदा रक्कमेच्या 5% जादा दराची मे. नेवाळकर एंटरप्रायजेस यांची निविदा स्विकृत करून त्यांना दि. 5/11/11 रोजी कार्यादेश देणेत आले असून सदरचे काम विहीत मुदतीत पूर्ण झाले आहे. सदर कामासाठी एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परिक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सदर कामाचे प्राक्कलन तपासले असता या कामासाठी माती, कठिण मुरूमात खोदाई, रबल सोलिंग, 80 मी.मी.; 40मी.मी.खडी पुरवठा, बी.बी.एम. (बिटूमिनिस बाऊंड मॅकडम) टॅक कोट, हॉट मिक्स हॉट लेड चे डांबरीकरण, तसेच 25 मी.मी.जाडीचे प्रिमिक्स कार्पेट व त्यावर सिल कोट अशा बाबी प्रस्तावित केलेल्या असून प्रत्यक्ष मोजमाप नोंदवहीतील मोजमापे तपासली असता सदर रस्ता खडीकरण व डांबरीकरण एकूण 602.50 मीटर लांबीमध्ये तसेच 7697.62 चौरस मीटर क्षेत्रामध्ये केल्याचे मोजमाप नोंदवहीवरून दिसून आले. मोजमाप नोंदवहीवरील बाब क्र. 1 व 2 नुसार रस्ता खडीकरणासाठी एकूण 40 सेंटी मीटर खोलीमध्ये मातीमध्ये खोदाई केली असून 80 मी.मी. खडीचा 20 सें.मी. जाडीचा 1 थर व 40 मी.मी. खडीचा 20 सें.मी. जाडीचा 1 थर खडीकरण केल्याच्या नोंदी मोजमाप नोंदवहीत घेण्यात आल्या असून त्याचेवर 50/75 मी.मी. जाडीचा 1 बी.बी.एम. चा थर घेणेत आला आहे व त्यावरती डांबरीकरण करणेत आले आहे. याबाबत तांत्रिक गोष्टी विचारात घेता रस्ता डांबरीकरण करणेपूर्वी खडीकरणाची दबाईसकट जाडी (क्रश थिकनेस) 25 ते 30 सें.मी. असणे अत्यंत आवश्यक आहे

तद्नंतरच त्यावरती डांबरीकरण करणे तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरते याबाबत सदर कामाची बाब क्र. 1 व 2 ची मोजमापे तपासली असता मातीमध्ये पृष्ठभागाच्या खाली 40 से.मी. खोदाई केली असून या खोदाईमध्ये 30 सें.मी. जाडीचे (कॉम्पॅक्टेड थिकनेस) खडीकरण झाल्याचे निदर्शनास येते व त्यावरती बी.बी.एम. व डांबरीकरण झाले आहे म्हणजेच जमीनीच्या पृष्ठभागा खाली डांबरीकरण झाल्याचे एकूण मोजमाप नोंदवही वरून दिसून येते.

याबाबत प्रस्तुत कामाच्या प्राक्कलनात बाब क्र. 3 नुसार मातीमधील खोदाई नंतर 15 ते 23 सें.मी. जाडीचे रबल सोलिंग ही बाब प्रस्तावित करूनही मोजमाप नोंदवहीमध्ये रबल सोलिंगची मोजमापे न घेता थेट 80 मी.मी. व 40 मी.मी. चे खडीकरण घेणेत आले आहे. सबब एकूण झालेले डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट, सदोष तसेच अटिकाऊ झाल्याचे दिसते. त्यामुळे या कामावर एकूण झालेला खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. **76,20,441/-**

प्रस्तुत कामाच्या मोजमाप नोंदवहीतील बाब क्र. 11 ची मोजमापे तपासली असता एकूण 7697.62 चौरस मीटर एवढा क्षेत्रावर 80 मी.मी.खडी दबाई केल्याचे मोजमाप नोंदवहीवरून दिसून आले व या दबाईसाठी ठेकेदाराला रु. 14.70 प्रति चौरस मीटर प्रमाणे एकूण रक्कम रु. 1,13,155/- चे प्रदान केले आहे. प्रत्यक्ष सन् 2010-11 जिल्हा दरसूची पान क्र. 120 चा बाब क्र. 22/1 ची पाहणी केली असता मुळ दर रु. 10+5% मनपा हद्द कर रु.0.50 = रु. 10.50 प्रति चौरस मीटर प्रमाणे प्रदान करावयाचे असताना रु. 14.70 प्रति चौ.मी. प्रमाणे प्रदान झालेमुळे खालील प्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

= 14.70 - 10.50 = रु. 4.20 जादा दर. = दबाईचे एकूण क्षेत्र 7697.62 x 4.20 फरक

= रु. 32,330/- (अतिप्रदान रक्कम)

वसूलपात्र रक्कम **= रु. 32,330/-**

प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवही बाब क्र. 14 नुसार 40 मी.मी. खडी (साईझ मेटल) दबाईसाठी रु. 12.60 प्रति चौ.मी. प्रमाणे एकूण 7697.62 एवढ्या क्षेत्रासाठी रु. 96,990/- ठेकेदारास प्रदान केले आहेत.

प्रत्यक्ष सन् 2010-11 जिल्हा दरसूची पान क्र. 120 चा बाब क्र. 24/1 चे मूळ दर रु. 10+5% मनपा हद्द रु. 0.50 = रु. 10.50 प्रति चौ.मी. प्रमाणे प्रदान करणे आवश्यक असताना रु. 12.60 प्रति चौ.मी. प्रमाणे प्रदान झालेमुळे खालीलप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

= 12.60 - 10.50 = रु. 2.10 जादा दर = दबाईचे एकूण क्षेत्र 7697.62 x 2.10 फरक

= रु. 16,165/- (अतिप्रदान रक्कम)

वसूलपात्र रक्कम रु. **16,165/-**

प्रस्तुत कामाचे खडीकरणाचे व डांबराचे चाचणी अहवाल (टेस्टींग रिपोर्ट) गुणनियंत्रण व दक्षता विभाग यांचे कडून घेणेत आलेले नाहीत. खडीकरणाच्या दर्जाहिन कामाबाबत कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र. 2110, दि. 4/2/2012 तसेच पत्र क्र. 319, दि. 13/1/12 अन्वये ठेकेदारास नोटीसही बजावण्यात आली असून चाचणी अहवाल न घेतल्यामुळे सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन बुक (Vol.I,II) व भारतीय मानक (आय.एस.आय.कोड) मध्ये दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे झाले असल्याचे मत लेखा परिक्षणात देता येत नाही.

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौ.ख./10/1001/प्र.क्र.309/ख, दि. 11/2/2010 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली खडी, वाळू, मुरूम, इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) रक्कम शासन सदरी भरण बंधनकारक आहे. परंतू अशी गौण खनिजांचे स्वामित्व धन ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झाले आहे. ते खालीलप्रमाणे वसूलपात्र ठरते. दर प्रति घनमीटर रु. 70.67. मोजमाप नोंदवही प्रमाणे पुरवठा झालेले साहित्य.

बाब क्र. 5 - 80 मी.मी. खडी पुरवठा = 1530 घ.मी. x 70.67 दर = रु. 1,08,125/-

बाब क्र. 6 - कठिण मुरुम पुरवठा = 510 घ.मी. x 70.67 दर = रु. 36,041/-

बाब क्र. 7 - 40 मी.मी. खडी = 1530 x 70.67 दर = रु.1,08,125/-

बाब क्र. 8 - 6 मी.मी. क्रश मेटल = 510 घ.मी. x 70.67 दर = रु. 36,041/-

एकूण रक्कम(i,ii,iii,iv)=1,08,125+36,041+1,08,125+36,041=रु**. 2,88,332/- (**वसूलपात्र रक्कम**)**

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरुस्ती / सुधारणा क्र. 12, दि. 1/5/2006 नुसार करारनामा करताना कराराच्या रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखकरीता रु.100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल रु. 5.00 लाखाच्या मर्यादेपर्यंत भरणे बंधनकारक आहे. करारनाम्याची रक्कम रु.72,74,427/- असल्याने निविदाधारकाने रु.6,400/- मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते. नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या या प्रकरणी रु. 1,000/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे शासनाचे रु. 5,400/- चे नुकसान झाले आहे. ही रक्कम निविदाधारकाकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम रु**. 5,400/-**

एकूण आक्षेपाधिन रक्कम रु**. 76,20,441/-**

एकूण वसूलपात्र रक्कम **= 32,330 + 16,165 + 2,88,332 + 5,400 =** रु**. 3,42,227/-**

DATNDMM5801 (Ref No : 22)

## *23 निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत भास्कर आळी सुरुच्या बागेकडील रस्त्या लगत 18 सिटसचे शौचालय बांधणे. निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत.*

**निर्मल एम.एम.आर. योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :निर्मल अभियान योजना , राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 327267.00/-

***काम पूर्ण झालेले नसताना अंतिम देयक ठेकेदारास अदा करण्यांत आले आहे. वाढीव कामाबाबत प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आलेली नाही. मुद्रांक शुल्क कमी वसुल करण्यात आले आहे तसेच गौण***

***खनिजांकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही. नियमबाह्य मुदतवाढ देण्यात आली आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | भास्कर आळी सुरुच्या बागेकडील रस्त्या लगत 18 सिटसचे शौचालय बांधणे, निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. सिंधुदुर्ग मित्र मंडळ |
| तांत्रिक मंजुरी | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाचे पत्र क्र. मुमप्रविप्रा/निपुपपंअ/09/296, दि. 29/7/2009 |
| प्रशासकीय मंजुरी | भूतपूर्व वसई नगर परिषद स्थायी समिती ठराव क्र. 125/, दि. 30/12/08 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2008-2009 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 33,44,537/- |
| बजेट तरतुद | रु. 33,44,537/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 8 दिवस. दै. नरवीर चिमाजी व दै. लोकमत 6/1/09 ते 13/1/09 |
| इसारा रक्कम | - |
| निविदा रक्कम | - |
| सुरक्षा अनामत | रु. 50,000/- |
| कामाचा कालावधी | 6 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- 2/9/2009 |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | वविशम/बांध/63/09 दि. 25/8/2009 |
| काम सुरु दिनांक: | 25/8/2009 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | 14/3/2011<br>रु. 26,23,845/- |
| प्रमाणक क्र. 6215/5.11.11 | मोजमाप पु. क्र. 13/ 1 ते 65 |

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि. 01/05/2006 नुसार निविदा रक्कमेच्या प्रथम 10 लक्षापर्यंत 100/- रु. व त्यापुढील प्रत्येक 1 लक्षा करीता किंवा त्याच्या प्रत्येक भागाकरीता रु. 100/- प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणी निविदा रक्कम नुसार ठेकेदार यांचे कडून रु. 2,500/- एवढया मुद्रांकशुल्कावर करारनामा करणे क्रम प्राप्त होते. तथापि रु. 100/- च्या मुद्रांक पेपरवरकरारनामा आला आहे. तरी ठेकेदार यांचेकडून एकुण रु. 2,400/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन दप्तरी जमा करावेत. तो पर्यंत रक्कम रु**. 2,400/-** वसुलपात्र ठेवण्यात येत आहे**.**

सदर कामा करीता लागणारे बांधकाम साहित्य उदा. रेती, खडी, दगड, माती इ. गौण खनिजावरील स्वामीत्वधन भरणा केल्याबाबतच्या पावत्या सादर करण्यात आलेल्या नस्तीमध्ये तपासणी करता

उपलब्ध स्वामीत्व धना पोटी होणारी रक्कम करारनामातील अट क्र. 23 नुसार अंतिम देयकातून वजाती करणे आवश्यक होते. बाब क्र.3 करीता 120 घ.मी. x 70.67 = 8,480.40 व बाब क्र. 5 करीता 26.58 घ.मी. x 70.67 = 1878.40. एकूण रु.10,359 वसूल करणे आवश्यक होते.

वसूलपात्र रक्कम रु. **10,359/-**

मे. सिंधुदुर्ग मित्रमंडळ या संस्थेस दिलेल्या आदेशाप्रमाणे सदरचे काम मुदतीत दि. 25/8/2009 पासून सहा महिन्याच्या कालावधीत दि. फेब्रुवारी-2010 पर्यंत पूर्ण करावयाचे होते. ते त्यांनी मुदतीत पूर्ण केले नाही व मुदत वाढीबाबत प्रस्ताव मुदत संपल्यावर दि. 28/4/2010 रोजी सादर करण्यात आलेला आहे.सदरच्या ठेकेदाराकडून दि. 1/3/10 ते 14/3/11 ह्या कालावधी करीता प्रतिदिन रु. 100/- प्रमाणे रु. 37,900/- करारनाम्यातील अट क्र. 2 प्रमाणे अंतिम देयक अदा करताना वसुली करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे आढळून आले नाही.

वसूलपात्र रक्कम रु. **37,900/-**

अंतिम देयक अदा करतांना एकूण देयकाच्या 1% रक्कम कामगार कल्याण निधी वसूल करण्याबाबतचे शासनाचे आदेश असताना संबंधित ठेकेदारास एकूण तीन चालू देयके रु. 19,81,270/- अदा करण्यात आलेले असून त्या रक्कमेवर कामगार कल्याण निधी वसूल करण्यांत आलेला नाही. सदरच्या रक्कमेवर 1% रक्कम रु. 19,812/- वसूल करण्यांत यावे.

वसूलपात्र रक्कम रु. **19,812/-.**

मोजमाप पुस्तिकेची बाबनिहाय तपासणी केली असता मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे प्रत्यक्षात जादा काम करण्यांत आल्याचे खालीलप्रमाणे आढळून आले आहे.

| अ.क्र | बाब क्र. | मोजमाप पुस्तिकेप्रमाणे | अंदाजपत्रका प्रमाणे | जादा काम | मंजूर दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 a | 146.97 | 142.43 | 4.54 | 86.10 | 390.89 |
| 2 | 3 | 166.72 | 136.79 | 29.93 | 165.16 | 4943.23 |
| 3 | 5 | 47.48 | 22.74 | 24.74 | 556.50 | 13767.81 |
| 4 | 7 | 21.09 | 8.65 | 12.44 | 3965.85 | 49335.17 |
| 5 | 8 | 11.11 | 8.94 | 2.17 | 4992.75 | 10834.26 |
| 6 | 9 | 23.93 | 22.85 | 1.08 | 5101.95 | 5510.10 |
| 7 | 13 | 3.70 | 1 | 2.70 | 5289.90 | 14282.73 |
| 8 | 14 | 1.12 | 1 | 0.12 | 4299.75 | 515.97 |
| 9 | 18 | 461.16 | 390.66 | 70.50 | 242.55 | 17099.77 |
| 10 | 19 | 610.94 | 571.72 | 39.22 | 127.05 | 4982.90 |
| 11 | 20 | 363.03 | 338.87 | 24.16 | 22.05 | 532.72 |
| 12 | 21 | 121.45 | 90.29 | 31.16 | 22.05 | 687.07 |
| 13 | 22 | 173.20 | 156.32 | 16.88 | 161.70 | 2729.49 |
| 14 | 26 | 2-- | 1-- | 1 | 2854.95 | 2854.95 |
| 15 | 29 | 3.58 | 3.38 | 0.20 | 3419.88 | 683.97 |
| 16 | 30 | 49.69 | 36.05 | 13.64 | 209- | 2850.76 |
| 17 | 31 | 287.60 | 232.85 | 54.75 | 758.10 | 41505.97 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 18 | 32 | 94.37 | 33.75 | 60.62 | 726.60 | 44046.49 |
| 19 | 36c | 28.341 | 17.64 | 10.70 | 1959.30 | 20966.46 |
| 20 | 37 | 35.75 | 31.19 | 4.56 | 1767.15 | 8058.20 |
| 21 | 38 2)_ | 0.1128 | 0.1100 | 0.0028 | 87053.40 | 243.74 |
| 22 | 46 25mmdia | 28.78 | 0.00 | 28.78 | 214.20 | 6164.67 |
| 23 | 47 (B) (a) | 7.60 | 7.00 | 0.60 | 219.30 | 129.78 |
| 24 | 58 | 811.59 | 729.53 | 82.06 | 13.65 | 1120.11 |
| 25 | 60 | 446.19 | 390.66 | 55.53 | 29.40 | 1632.58 |
| 26 | 62 | 7.93 | 7.14 | 0.79 | 58.80 | 46.45 |
| 27 | 63 | 2.52 | 2.31 | 0.21 | 1698.90 | 356.76 |
| 28 | 67 | 36.16 | 36.00 | 0.16 | 3266- | 522.56 |
| एकूण | | | | | | **256795.56** |

सदरच्या जादा झालेल्या कामास प्राधिकरणाची मंजुरी घेतली नसल्याने जादा प्रदानाची वसूली करण्यांत यावी.

वसूल पात्र रक्कम रु. **256795.56/-**

प्राधिकरणास सादर करण्यांत आलेल्या उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत नस्तीमध्ये तपासणीकरीता उपलब्ध झाली नसल्याने उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यांत आले किंवा कसे हयाबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

एकूण वसूलपात्र रक्कम रु. **3,27,267/-**

DATASDM5602 (Ref No : 23)

## *24 निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत वसई नगरपरिषद रुग्णालयाच्या मागील जागेत 12 सिटसचे शौचालय बांधणे.*

**निर्मल एम.एम.आर. योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :निर्मल अभियान योजना , राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 290053.00/-

***वाढीव कामाबाबत प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आलेली नाही. मुद्रांक शुल्क कमी वसुल करण्यात आले आहे तसेच गौण खनिजांकरीताचे स्वामित्व धन वसुल करण्यात आलेले नाही. नियमबाहय मुदतवाढ देण्यात आली आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नगरपरिषद रुग्णालयाच्या मागील जागेत 12 सिटचे शौचालय बांधणे, निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. सिंधुदुर्ग मित्र मंडळ |
| तांत्रिक मंजुरी | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाचे पत्र क्र. मुमप्रविप्रा/निपुपपंअ/09/296, दि. 29/7/2009 |
| प्रशासकीय मंजुरी | भूतपूर्व वसई नगर परिषद स्थायी समिती ठराव क्र. 125/, दि. 30/12/08 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2008-2009 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 27,07,401/- |
| बजेट तरतुद | रु. 27,07,401/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. नरवीर चिमाजी |
| इसारा रक्कम | - |
| निविदा रक्कम | - |
| सुरक्षा अनामत | रु. 5% |
| कामाचा कालावधी | 6 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | 25/8/2009 |
| काम सुरु दिनांक: | 25/8/2009 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | 5/11/11 रु. 21,53,975/- |
| प्रमाणक क्र. 6214/5.11.11 | मोजमाप पु. क्र. 12/ 1 ते 82 |

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र.12 दि. 01/05/2006 नुसार निविदा रक्कमेच्या प्रथम 10 लक्षापर्यंत रु.100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लक्षा करीता किंवा त्याच्या प्रत्येक भागाकरीता रु. 100/- प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणी निविदा रक्कम नुसार ठेकेदार यांचे कडून रु. 1,800/- एवढया मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे क्रम प्राप्त होते. तथापि रु. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यांत आला आहे. तरी ठेकेदार यांचेकडून एकुण रु. 1,700/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन दप्तरी जमा करावेत. तो पर्यंत रक्कम रु. 2,400/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

सदर कामाकरीता लागणारे बांधकाम साहित्य उदा. रेती, खडी, दगड, माती. इ. गौण खनिजावरील स्वामीत्वधन भरणा केल्याबाबतच्या पावत्या सादर करण्यात आलेल्या नस्तीमध्ये तपासणी करता उपलब्ध झाल्या नाहीत. स्वामीत्व धना पोटी होणारी रक्कम करारनामातील अट क्र. 23 नुसार अंतिम देयकातून वजाती करणे आवश्यक होते. बाब क्र. 3 करीता 166.72 घ.मी. x 70.67 = 11782.10 व बाब क्र. 5 करीता 47.78 घ.मी. x 70.67 = 3376.61. एकूण रु. 15,159/- वसूल करणे आवश्यक होते.

एकूण रक्कम रु. **15,159/-** वसूलपात्र ठेवण्यांत येत आहे.

मे.सिंधुदुर्ग मित्रमंडळ या संस्थेस दिलेल्या आदेशाप्रमाणे सदरचे काम मुदतीत दि. 25/8/2009 पासून सहा महिन्याच्या कालावधीत दि. फेब्रुवारी-2010 पर्यंत पूर्ण करावयाचे होते. ते त्यांनी मुदतीत पूर्ण केले नाही व मुदत वाढीबाबत प्रस्ताव मुदत संपल्यावर दि.27/4/2010 रोजी सादर करण्यात आलेला आहे.सदरच्या ठेकेदाराकडून दि. 1/3/10 ते 24/1/11 ह्या कालावधी करीता प्रतिदिन रु. 100/- प्रमाणे रु. 33,000/- करारनाम्यातील अट क्र. 2 प्रमाणे अंतिम देयक अदा करताना वसुली करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे आढळून आले नाही.

सदर रक्कम रु. **33,000/-** वसूलपात्र ठेवण्यांत येत आहे.

अंतिम देयक अदा करतांना एकूण देयकाच्या 1% रक्कम कामगार कल्याण निधी वसूल करण्याबाबतचे शासनाचे आदेश असताना संबंधित ठेकेदारास एकूण तीन चालू देयके रु. 11,37,733/- अदा करण्यात आलेले असून त्या रक्कमेवर कामगार कल्याण निधी वसूल करण्यांत आलेला नाही.सदरच्या रक्कमेवर 1% रक्कम रु. 11,377/- वसूल करण्यांत येऊन अनुपालन सादर यावे. वसूलपात्र रक्कम रु. **11,377/-**

मोजमाप पुस्तिकेची बाबनिहाय तपासणी केली असता मजूर अंदाज पत्रकाप्रमाणे प्रत्यक्षात जादा काम करण्यांत आल्याचे खालीलप्रमाणे आढळून आले आहे.

| अ.क्र | बाब क्र. | मोजमाप पुस्तिकेप्रमाणे | अंदाजपत्रका प्रमाणे | जादा काम | मंजूर दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 b | 59.28 | - | 59.28 | 99.75 | 5913.18 |
| 2 | 3 | 120_ | 89.40 | 30.60 | 165.16 | 5067.36 |
| 3 | 4 | 14.91 | 10.70 | 4.21 | 3463.95 | 14583.22 |
| 4 | 5 | 26.58 | 14.91 | 11.67 | 556.50 | 6494.35 |
| 5 | 7 | 14.45 | 9.01 | 5.44 | 3965.85 | 21574.22 |
| 6 | 8 | 10.051 | 8.62 | 1.431 | 4992.75 | 7144.62 |
| 7 | 11 | 1.500 | 1.00 | 0.50 | 5459_ | 2729.50 |
| 8 | 13 | 3.306 | 1.00 | 2.306 | 5289.90 | 12198.50 |
| 9 | 14 | 0.802 | 0.55 | 0.252 | 4299.75 | 1083.53 |
| 10 | 16 | 35.097 | 29.48 | 5.617 | 2932.65 | 16472.69 |
| 11 | 21 | 112.284 | 57.06 | 55.224 | 22.05 | 1217.68 |
| 12 | 26 | 2_ | 1_ | 1 | 2854.95 | 2854.95 |
| 13 | 30 | 29.788 | 15.53 | 14.258 | 209_ | 2979.92 |
| 14 | 31 | 187-342 | 163.93 | 23.412 | 758.10 | 17748.63 |
| 15 | 32 | 48.848 | 34.36 | 14.488 | 726.60 | 10526.98 |
| 16 | 36 a | 12.630 | 11.36 | 1.27 | 472.50 | 600.07 |
| 17 | 37 | 22.512 | 17.82 | 4.692 | 1767.15 | 8291.46 |
| 18 | 38 | 0.294 | 0.11 | 0-184 | 87053.40 | 16017.82 |
| 19 | 42 | 16.02 | 15.30 | 0.72 | 429.45 | 309.20 |
| 20 | 60 | 559.397 | 336-15 | 223.24 | 29.40 | 6563.46 |
| 21 | 63 | 3.20 | 2.31 | 0.89 | 1698.90 | 1512.02 |
| 22 | 66 | 0.375 | 0.1 | 0.275 | 57193.50 | 15728.21 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 23 | 67 | 52.75 | 25 | 27.75 | 1633- | 45315.75 |
| 24 | 72 | 10- | 7- | 3- | 1750- | 5250- |
| | | | | | एकूण | **228117.32** |

सदरच्या जादा झालेल्या कामास प्राधिकरणाची मंजुरी घेतली नसल्याने जादा प्रदानाची वसूली करण्यांत यावी.

वसूलपात्र रक्कम रु**. 2,28,117/-**

प्राधिकरणास सादर करण्यांत आलेल्या उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत नस्तीमध्ये तपासणीकरीता उपलब्ध झाली नसल्याने उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यांत आले किंवा कसे ह्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

एकूण वसूलपात्र रक्कम रु**. 2,90,053/-**

DATASDM5602 (Ref No : 24)

## *25 नालासोपारा (पूर्व) येथे लक्ष्मीनगर येथील विरार मुख्य रस्ता ते साई रेसिडेंसी पर्यंत के.जी.एन कॉलनी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रस्ते बांधकाम , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2068281.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 93161.00/-

***आवश्यक तांत्रिक निकषानुसार काम करण्यात आलेले नाही. रस्ता एकदा सिलकोट केलेनंतर प्रिमिक्स कार्पेट करणे हे स्पेसिफिकेशन प्रमाणे नियमबाह्य असलेने त्यामुळे झालेले एकूण डांबरीकरणाचे काम निकृष्ट सदोष व निष्फळ झाले आहे. तसेच काम पूर्ण झालेनंतर एकाच दिवशी सर्व नोंदी मोजमाप नोंदवहीत घेणेत येत असलेने प्रत्यक्ष कामाची सुरुवात व बाबनिहाय काम पूर्ण झालेबाबतची माहिति तपासणीत उपलब्ध होऊ शकली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नालासोपारा (पूर्व) येथे लक्ष्मीनगर येथील विरार मुख्य रस्ता ते साई रेसिडेंसी पर्यंत के.जी.एन कॉलनी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. मेघना एंटरप्रायजेस, 4.90% जादा दराने |
| तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता क्र. 66 / सन् 10.11 |

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | मा. स्थायी समिती ठराव क्र. 6, दि. 2/2/2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2010-11 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 19,80,260/- |
| बजेट तरतुद | रु. 7,74,0000/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. सामना वदै. कराळे समाचार दि. 25/2/2011 |
| इसारा रक्कम | रु. 19800/- |
| निविदा रक्कम | रु. 19,80,260/- |
| सुरक्षा अनामत | रु. 79,210/- |
| कामाचा कालावधी | 120 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | क्र. 488, दि. 7/6/2011 |
| काम सुरु दिनांक: | मोजमाप पुस्तकात नोंद नाही |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | पहिले व अंतिम मोजमाप पुस्तक 53 पान. 71 ते77. रु. 20,68,281/- |
| प्रमाणक क्र. | |

प्रस्तुत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे यासाठी दि. 25/2/11 रोजीच्या दै. सामना व दै. कराळे समाचार या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन स्पर्धात्मक निविदा मागविल्या असून सदर कामासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. या प्राप्त निविदांमध्ये सर्वात कमी दराची मे. मेघना एंटरप्रायजेस यांची 4.90% जादा दराची निविदा स्विकाणेत येऊन त्यांना दि. 7/6/2011 रोजी कामाचे कर्यादेश देणेत आले असून विहित मुदतीत काम पूर्ण झाले असून या कामावरती एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परिक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रस्तुत कामाचे प्राक्कलनात रस्ता खडीकरण व डांबरीकरणासाठी 15 ते 23 सें.मी. जाडीचे रबल सोलिंग, 80 मी.मी. तसेच 40 मी.मी. आकाराचे खडीकरण, बी.बी.एम. (बिटूमिनियस बाऊंड मॅकडम) टॅक कोट, हॉट मिक्स हॉटलेड चे डांबरीकरण, प्रिमिक्स कार्पेट व सिलकोट इत्यादि बाबी प्रस्तावित केलेल्या आहेत. याबाबत कामाची मोजमाप नोंदवही पुस्तिकामधील मोजमापे तपासली असता एकूण 1913 चौ.मी. क्षेत्रामध्ये खडीकरण व डांबरीकरणाचे काम करणेत आले असून बाब क्र. 3 नुसार वरील क्षेत्रामध्ये 15 ते 23 सें.मी. जाडीचे रबल सोलिंग करणेत आले असून त्यावरती 80 मी.मी. व 40 मी.मी. जाडीचे खडीकरण करणेत आले आहे. परंतू सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रेड बुक स्पेसिफिकेशन आर. डी. 28 पान क्र. 204 मधील स्पेसिफिकेशन नुसार सोलिंग मधील पोकळा (voids) भरणेसाठी त्यावर ग्रॅव्हल पसरवून दबाई करणे आवश्यक होते. परंतू ग्रॅव्हल न टाकता सोलिंगवर 80 मी.मी. व 40 मी.मी. खडी, मुरूम पसरवून दबाई केलेली आहे. त्यामुळे उपरोक्त स्पेसिफिकेशन नुसार काम न झाल्यामुळे प्रत्यक्ष झालेले काम तांत्रिकदृष्टया सदोष झाल्याचे दिसत आहे.

प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवही बाब क्र. 17 नुसार एकूण 1913 चौ.मी. क्षेत्रावर हॉट मिक्स हॉटलेड

च्या डांबरीकरणाचा थर देणेत आला असून बाब क्र. 18 नुसार सदर क्षेत्रावरील रस्ता सिलकोट केला असल्याचे मोजमाप नोंदवहीवरील नोंदीवरून निदर्शनास आले. तद्नंतर बाब क्र. 19 नुसार वरील 1913 चौ.मी. क्षेत्रावर 25 मी.मी. जाडीचे प्रिमिक्स कार्पेट टाकणेत आल्याच्या नोंदी घेणेत आल्या आहेत. रस्ता एकदा सिलकोट केलेनंतर प्रिमिक्स कार्पेट करणे हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्टँडर्ड स्पेसिफिकेशन खंड 1 (रस्ते) आर.डी. 63 व 66 पान क्र. 233 नुसार नियमबाह्य असलेने, त्यामुळे झालेले एकूण डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जा, सदोष व निष्फळ झाले असलेबाबतचा ठपका लेखा परिक्षणात ठेवणेत येत आहे. एकूण कामांच्या मोजमाप नोंदवहीतील नोंदी तपासता ज्या दिवशी एखादी बाब सुरू करणेत येते, उदा. माती मधील खोदाई, खडी पुरविणे अथवा पसरविणे, बी.बी.एम डांबरीकरण करणे, टॅककोट करणे, हॉट मिक्स डांबरीकरण, प्रिमिक्स कार्पेट, सिलकोट इत्यादी बाबींच्या दैनंदिन कामाच्या प्रगतीनुसार तारखांच्या नोंदी मोजमाप नोंदवहीत नोंदविण्यात येत नाहीत. तसेच काम पूर्ण झालेनंतर एकाच दिवशी सर्व नोंदी मोजमाप नोंदवहीत घेणेत येत असलेने प्रत्यक्ष कामाची सुरुवात व बाबनिहाय काम पूर्ण झालेबाबतची माहिती तपासणीत उपलब्ध होऊ शकली नाही. तसेच मोजमापांचे कच्चे टिपण (तारखांसहित) लेखा परिक्षणात सादर केले नाहीत. खालील रक्कम तपासणीत आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. **20,68,281/-**

प्रस्तुत कामाच्या मोजमाप नोंदवहीतील बाब क्र. 11 ची मोजमापे तपासली असता एकूण 1913.10 चौ.मी. एवढ्या क्षेत्रावर 80 मी.मी खडी दबाई केल्याचे मोजमाप नोंदवहीवरून दिसून आले व या दबाईसाठी ठेकेदाराला रु. 14.70 प्रति चौ.मी. प्रमाणे एकूण रक्कम रु. 28,123/- चे प्रदान केले आहे. प्रत्यक्ष सन् 2010-11 जिल्हा दरसूची पान. क्र. 120 ची बाब क्र. 22/1 ची तपासणी केली असता मूळ दर रु. 10/- + 5 म.न.पा क्षेत्र रु. 0.50=10.50 प्रमाणे प्रदान करावयाचे असताना रु. 14.70 प्रति चौ.मी. प्रमाणे प्रदान झाल्यामुळे खालीलप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

=14.70 - 10.50 = रु. 4.20 जादा दर

= दबाईचे एकूण क्षेत्र 1913.10 x 4.20 फरक

= रु. 8034/- (अतिप्रदान रक्कम)

वसूलपात्र रक्कम रु. **8034/-**

प्रस्तुत कामाचा मोजमाप नोंदवही बाब क्र. 14 नुसार 40 मी.मी. खडी दबाईसाठी रु. 12.60 प्रति चौ.मी. प्रमाणे एकूण रु. 24,105/- ठेकेदारास प्रदान केले आहेत. प्रत्यक्ष सन् 2010-11 जिल्हा दरसूची पान क्र. 120 ची बाब क्र. 24/1 चे मूळ दर रु. 10 + 5 मनपा हद्द रु. 0.50 = रु. 10.50 प्रति चौ.मी. प्रमाणे प्रदान करणे आवश्यक असताना रु. 12.60 प्रति चौ.मी. प्रदान झालेमुळे खालील प्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

= 12.60 - 10.50 = रु. 2.10 जादा दर

= दबाईचे एकूण क्षेत्र 1913.10 x 2.10 फरक

= रु. 4018/- (अतिप्रदान रक्कम)

वसूलपात्र रक्कम रु. **4018/-**

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौ.ख./10/1001/प्र.क्र.309/ख, दि. 11/2/2010

नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली खडी, वाळू, मुरूम, इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) रक्कम शासन सदरी भरण बंधनकारक आहे. परंतू अशी गौण खनिजांचे स्वामित्व धन ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झाले आहे. ते खालीलप्रमाणे वसूलपात्र ठरते. दर प्रति घनमीटर रु. 70.67. मोजमाप नोंदवही प्रमाणे पुरवठा झालेले साहित्य.

बाब क्र. 3 - रबल सोलिंग

= 375 घ.मी. x 70.67 दर = रु. 26,501/-

बाब क्र. 5 - 80 मी.मी. खडी पुरवठा

= 285 घ.मी. x 70.67 दर = रु. 20,141/-

बाब क्र. 6 - कठिण मुरूम पुरवठा

= 95 x 70.67 दर = रु. 6,713/-

बाब क्र. 7 - 40 मी.मी. खडी पुरवठा

= 285 घ.मी. x 70.67 दर = रु. 20,141/-

बाब क्र. 8 - 6 मी.मी. क्रश मेटल

= 95 x 70.67 दर = रु. 6,713/-

= एकूण रक्कम (1+2+3+4+5)

= 26501+20141+6713+20141+6713

= वसूलपात्र रक्कम रु. **80209/-**

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरुस्ती / सुधारणा क्र. 12, दि. 1/5/2006 नुसार करारनामा करताना कराराच्या रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखकरीता रु.100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल रु. 5.00 लाखाच्या मर्यादेपर्यंत भरणे बंधनकारक आहे. करारनाम्याची रक्कम रु. 19,80,260/- असल्याने निविदाधारकाने रु. 1,000/- मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते. नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या या प्रकरणी रु. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे शासनाचे रु. 900/- चे नुकसान झाले आहे. ही रक्कम निविदाधारकाकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम रु. **900/-**

प्रस्तुत कामाच्या खडीचे व डांबराचे चाचणी अहवाल (टेस्टींग रिपोर्ट) गुणनियंत्रण व दक्षता विभाग यांचेकडून घेणेत आले नाहीत. त्यामुळे कामाची गुणवत्ता व दर्जा बाबतची खात्री लेखा परिक्षणात झाली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम रु. **93,161/-**

एकूण आक्षेपाधिन रक्कम रु. **20,68,281/-**

DATNDMM5801 (Ref No : 25)

## *26 चुळणा भाबोळपाडा येथे निर्मल महानगर अभियान अंतर्गत शौचालय बांधणे.*

**निर्मल एम.एम.आर. योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :निर्मल अभियान योजना , राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 244748.00/-

***वाढीव कामाबाबत प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आलेली नाही. मुद्रांक शुल्क कमी वसुल करण्यात आले आहे तसेच देयकातुन 1% कामगार कल्याण निधी वसुल करण्यात आलेला नाही.***

| कामाचे नाव | चुळणा भाबोळपाडा येथे निर्मल महानगर अभियान अंतर्गत 18 सिटचे शौचालय बांधणे |
|---|---|
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. लोकसेवा विकास संस्था |
| तांत्रिक मंजुरी | - |
| प्रशासकीय मंजुरी | - |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2007-2008 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 18,49,763/- |
| बजेट तरतुद | रु. 18,49,763/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | - |
| इसारा रक्कम | रु. 50,000/- |
| निविदा रक्कम | रु. 18,49,763/- |
| सुरक्षा अनामत | 5% देयकातून |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | 12 वे अंतिम (मोजमाप नोंदवही क्र. 41 पान क्र. 23 ते 28.) रु. 63,35,328/- |
| प्रमाणक क्र. | |

प्रस्तुत वसई विरार (नागरी) पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्ती करणे सन 2011-12 या वर्षाचा ठेका मागविणेबाबत दि. 22/02/2008 च्या दै. पूण्यनगरी व समता एक्सप्रेस या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर कामासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दराची मे. स्टार इंजिनियर्स यांची निविदा स्विकारणेत आली असून त्यांना दि. 11/4/2011 (मुदतवाढ ठेका) रोजी कार्यादेश देणेत आला आहे. या योजनेच्या कामावर एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परिक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रस्तुत कामाचे नस्तीमधील दस्तऐवज यांची छाननी केली असता सदर कामाचा ठेका मे. स्टार इंजिनियरिंग वर्क्स यांना मंजूर केला असून त्यांचे कमी दराचे दरपत्रक यामध्ये 175,170,125,100,30,25,20 इत्यादी अश्वशक्तीच्या मोटार कॉपर रिवाइंडिंग करणे, वरील मोटारीचे रोटर शाफ्ट बदली करणे, ड्राइव्ह एन्ड, नॉनड्राइव्ह एन्ड कव्हर बदली करणे, ट्रान्सफॉर्मर बदली करणे, दुरुस्ती करणे इत्यादी महत्वाच्या व मौल्यवान वस्तु पुरविणे व बसविणे इत्यादी बाबी अंतर्भूत आहेत. परंतू अशा बाबी पुरविणे व बसविणे कामीचे दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील जिल्हा दरसूची यामध्ये उपलब्ध नसलेने अशावेळी सदर साहित्यांची बाजारभावाप्रमाणे दरपत्रके मागवून, कमी दर असलेले दर पत्रक मंजूर करून अशा साहित्यांचे दर पृथ:करण (साहित्यासह) करून व त्याप्रमाणे प्रत्येक साहित्याचे दर निश्चित करूनच त्या दरानुसार निविदा मागविणे बंधनकारक होते. परंतू अशा कोणत्याही बाबी विचारात न घेता थेट निविदा मागविण्यात आल्या असून कमी दराची निविदा स्विकारणेत आली आहे. सदरची कार्यपध्दती पूर्णतः अयोग्य असून या योजने अंतर्गत ठेकेदाराला अदा केलेले साहित्याचे दर हे अवाजवी व मोठ्या प्रमाणात जादा दिले असल्याचे स्पष्ट मत लेखा

परिक्षणात नोंदविण्यात येत आहे तसेच महानगरपालिकेने अशी निविदा मंजूर करण्यापूर्वी अशा दराबाबत महाराष्ट्र जिवन प्राधिकरण अथवा महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग यांचेशी पत्रव्यवहार करून त्यांचेकडील मंजूर दरानुसारच साहित्याची अदायगी ठेकेदारास करणे आवश्यक होते. याबाबत तांत्रिक स्पष्टीकरण प्राप्त नस्तीमध्ये उपलब्ध न झाल्याने या योजनेवर एकूण झालेला खर्च आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधिन खर्च रु**. 63,35,328/-**

प्रस्तुत योजनेच्या कामात जूने रोटर शाफ्ट बदली करून नविन बसविणे, कॅपेसिटर बदली करणे, ऑईल फिल्टर बदली करणे, नविन बेअरिंग बसविणे इत्यादी अनेक बाबी पुरविणेत आल्या आहेत. परंतू जून्या काढणेत आलेल्या किंमती साहित्यांचा साठा नोंदवहीला नोंदी घेऊन त्यांचा काय विनियोग करणेत आला याबाबतच्या साठा नोंदवहया दप्तरी ठेवण्यात आलेल्या नाहीत व अशा वस्तु लिलावाने अथवा प्रत्यक्ष विकून त्यायोगे महानगरपालिकेस मिळणाऱ्या आर्थिक स्तोत्रास मुकावे लागले आहे.
प्रस्तुत पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्तीचा ठेका विरार नगरपारिषद अस्तित्वात असताना सर्वसाधारण सभा ठराव क्र. 350, दि. 28/3/2008 अन्वये मे. स्टार इंजिनियरिंग वर्क्स यांना सन 2008-09, 2009-10 व सन 2010-11 या कालावधीसाठी वाटप करणेत आला होता. तसेच स्थायी समिती सभा ठराव क्र. 25, दि. 6/4/11 अन्वये वरील ठेकेदारास सन 2011-12 या वर्षाच्या ठेक्यास मुदतवाढ देण्यांत आल्याचे नस्तीमधील दस्तऐवजावरून दिसून आले. याबाबत एकाच ठेकेदाराला वारंवार मुदतवाढ देण्याचे प्रयोजन लेखा परिक्षणास समजू शकले नाही.

एकूण आक्षेपाधिन रक्कम रु**. 63,25,328/-**

DATNDMM5801 (Ref No : 35)

## *36 प्रभाग 'क', 'ड', 'इ' बांधकाम विभागातील रस्ते बांधकामाच्या विशिष्ट बाबींच्या चुकीच्या दरपृथःकरणामुळे (रेट ऍनॅलिसिस) ठेकेदारास झालेल्या अतिप्रदानाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 534567.00/-

***मुळ मंजुर अंदाजपत्रकातील प्राक्कलनात दर्शविलेली बाब विचारात न घेता दरपृथःकरण करुन प्रदान केल्याने ठेकेदारास अतिरिक्त प्रदान करण्यात आले आहे.***

प्रभाग क,ड,ई च्या बांधकाम विभागातील सन 2011-12 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण करणेत आले. उपरोक्त प्रभागातील डांबरीकरणाच्या नस्तीचे दस्तऐवज तपासले असता प्राक्कलनामधील 25 मी मी जाडीचे प्रिमिक्स कार्पेट पुरविणे व पसरविणे या बाबीचे दरपृथ:करणामध्ये सन 2010-2011 च्या जिल्हा दर सूची मधील पान क्र. 123 वरील बाब क्र. 42/1 दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे दरपृथ:करण करून ठेकेदारास त्याप्रमाणे प्रति चौरस मीटर प्रमाणे प्रदान करणे आवश्यक होते.

प्रिमिक्स कार्पेट (25 मी.मी.जाडी) पुरविणे व पसरविणे

जिल्हा दर सूची बाब क्र. 42/1 नुसार मुळ दर रु. 114/- प्रति चौ.मी.

+ 5% महानगरपालिका हद्द रु. 5.70/-

+ वाहतुक दर रु. 2.79/-

+ स्वामित्व धन रु. 2.58/-

दरपृथ:करणानुसार एकूण दर = रु. 125.07/-

परंतु प्रत्यक्षात प्रदान करताना मात्र वरील दर विचारात न घेता सन 2010-11 च्या जिल्हा दर सूची पान क्र. 124 वरील बाब क्र. 45 वरील मुळ दर रु. 127 प्रति चौ.मी. प्रमाणे दरपृथ:करण करून प्राक्कलनात एकूण दर रु. 138.70 प्रति. चौ.मी. निश्चित करून त्याप्रमाणे ठेकेदारास प्रत्येक देयकात या बाबतचे अतिप्रदान झाल्याचे सोबतचे परिशिष्ट क्र. 2 नुसार तपासणीत निदर्शनास आले. याबाबत प्राक्कलनास तांत्रिक मंजूरी देताना संबंधित तांत्रिक अधिकारी यांनी दरपृथ:करण करताना जिल्हा दरसूची मधील मुळ बाब व त्यांचे दर विचारात घेतल्याचे दिसून येत नाही. सबब, अशा बाबीची खातरजमा न केल्यामुळे अतिरिक्त जादा प्रदान झालेली रक्कम रु. 5,34,567/- वसूलपात्र ठरते.

DATNDMM5801 (Ref No : 36)

## *37 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत विभागीय कार्यालय नवघर-माणिकपूर, नालासोपारा येथे ठेके पध्दतीने तारतंत्री पूरवठा करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :दिवाबत्ती व्यवस्थापन , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2158800.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 119440.00/-

***मासिक देयकासोबत हजेरीचा तक्ता नसताना विभाग प्रमुखांनी देयक प्रमाणित केले आहे. सन 2010-11 करीता निविदा प्रक्रिया राबविली असताना अद्यापर्यंत मुदतवाढ देऊन ठेका सुरु ठेवण्यात आला आहे. महनगरपलिका हद्दीत सर्व प्रभागांसाठी पुरवठ्याचे एकच दर असणे आवश्यक असताना नवघर-***

***माणिकपुर व नालासोपारा प्रभागांच्या दरात तफावत आढळते. इसारा रक्कम कमी घेण्यात आली असुन सुरक्षा अनामत स्विकारण्यात आलेली नाही.***

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत नवघर-माणिकपूर व नालासोपारा प्रभाग समिती यांनी ठेके पध्दतीने तारतंत्री पुरवठा करण्या संबंधी सन् 2010-11 साठी निविदा काढण्यात आल्या आहेत. सदर निविदा प्रसिध्दी दै. वार्ताहार मध्ये दि. 24/3/2010 रोजी देण्यात आली आहे. दोन्ही विभागामध्ये प्रत्येक तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. नवघर-माणिकपूर प्रभागामध्ये न्यूनतम दर ओम. साई एंटरप्रायजेस यांचे आहेत व नालासोपारा प्रभागामध्ये सुबोध महादेव देवरुखकर यांचे दर न्यूनतम आहेत. वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी ओम साई एंटरप्रायजेस आणि सुबोध देवरुखकर यांना सन् 2011-12 साठी सहा. तारतंत्री व तारतंत्री पुरवठा करण्यासाठी महापालिका ठराव क्र. 12, दि. 3/3/2011 नुसार मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. शासन निर्णय 2 जानेवारी 1992 नुसार फक्त सहा महिनेच मुदत वाढ देय असते. उपरोक्त दोन्ही नस्तींचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

निविदा प्रसिध्दी मध्ये कामाचे अंदाजित वार्षिक खर्च किती हे नमूद केलेला नाही. निविदा सोबत इसारा रक्कम रु. 5000/- अंदाजित घेण्यांत आलेली आहे. शा.नि. 2 जानेवारी 1992 नुसार सुरक्षा अनामत व इसारा रक्कम खालील तक्ता दर्शविल्याप्रमाणे संबंधी ठेकेदार यांचे कडून वसूल करण्यांत यावी. तो पर्यंत रु.**1,19,440/-** वसूलपात्र ठेवण्यांत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग | वार्षिक खर्च | इसारा रक्कम देय 1% प्रमाणे | इसासा रक्कम घेतली | फरक | सुरक्षा अनामत 5% देय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नवघर-माणिकपूर | 8,98,800 | 8,900 | 5,000 | 3,900 | 44,940 |
| 2 | नालससोपारा | 12,60,000 | 12,600 | 5,000 | 7,600 | 63,000 |
| | | | | | 11,500 | 1,07,940 |
| एकूण | | | | | **1,19,440/-** | |

वसूलपात्र रक्कम रु. **1,19,440/-**

नवघर-माणिकपूर विभागामध्ये सहा. तारतंत्री यांचा मासिक दर रु. 5,300/- आहे. नवघर-माणिकपूर प्रभागामध्ये सन् 2010-11 व सन् 2011-12 मध्ये प्रति महीना 5 सहा. तारतंत्री काम करत आहेत. नालासोपारा विभागामध्ये सहा. तारतंत्री यांचा मासिक दर रु. 5,000/- आहे. नालासोपारा प्रभागामध्ये सहा. तारतंत्री रु. 5000/- प्रतिमास काम करत असताना नवघर-माणिकपूर यांचेकडुन सहा. तारतंत्री यांस रु. 5300/- प्रतिमास प्रदान करण्यात येत आहे. खाली दर्शविल्याप्रमाणे ठेकेदार ओम साई एंटरप्रायजेस यांना जादा अदा करण्यांत आलेली रक्कम रु. 36,000/- वसूलपात्र ठरते.

सहा. तारतंत्री नवघर माणिकपूर दरानुसार खर्च

महीने x सहा. तारतंत्री x मासिक रक्कम

12 x 5 x 5300 = रु. 3,18,000/-

सहा. तारतंत्री नालासेपारा दरानुसार खर्च

महीने x सहा. तारतंत्री x मासिक रक्कम

12 x 5 x 5000 = रु. 3,00,000/-

फरक = सन् 2010-11 - 18000/-

= सन् 2011-12 - 18000/-

आक्षेपाधिन रक्कम रु. **36000/-**

नालासोपारा प्रभागामध्ये तारतंत्री प्रति महीना रु. 5500/- घेण्यांत येत आहे. नवघर माणिकपूर मध्ये तारतंत्री रु. 5300/- घेण्यांत येतो. तारतंत्री यांचा नवघर-माणिकपूर येथील दर कमी आताना नालासोपारा विभागाने सदर तारतंत्री जादा मासिक दराने घेण्यात येत आहेत. महापालिका क्षेत्रात जे तारतंत्री काम करतात त्यांचा मासिक दर एकच असणे आवश्यक आहे. खालील परीगणना करून दर्शविल्याप्रमाणे ठेकेदार सुबोध देवरुखकर यांना रु. 48,000/- जादा अदा करण्यांत आले आहेत. सदरची रक्कम वसूलपात्र आहे.

तारतंत्री नवघर माणिकपूर दरानुसार खर्च

महीने x तारतंत्री x मासिक रक्कम

12 x 10 x 5300 = रु. 6,36,000/-

तारतंत्री नालासेपारा दरानुसार खर्च

महीने x तारतंत्री x मासिक रक्कम

12 x 10 x 5500 = रु. 6,60,000/-

फरक = सन् 2010-11 - 24,000/-

= सन् 2011-12 - 24,000/-

आक्षेपाधिन रक्कम रु. **48,000/-**

मे. ओम साई एंटरप्रायजेस व सुबोध देवरुखकर यांची मासिक देयक तपासली असता देयका सोबत हजेरीचा तक्ता जोडलेला नाही. हजेरीचा तक्ता नसताना विभाग प्रमुखांनी प्रमाणित केले आहे. मे. ओम साई एंटरप्रायजेस व सुबोध देवरुखकर यांना सन् 2011-12 मध्ये अदा केलेली रक्कम रु. **20,74,800/-** आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे**.**

DPSKGGM6001 (Ref No : 37)

## *38 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयाकरीता लागणारी विविध औषधे खरेदी*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रुग्णालय औषध खरेदी , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 260000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7500.00/-

***दोन निविदाकारांनी सह. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे प्रमाणपत्र जोडलेले असतानाही याच करणास्तव त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली. 2) परवाना कालावधी संपुष्टात आला असताना निविदा ग्राह्य ठरविण्यात आली. 3) उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि. 30/3/94 नुसार तांत्रिक लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्र मागविण्यात तपासण्यात येत नाहीत. 4) निविदा प्रक्रिया राबविताना बाजारभावाशी सुसंगत दर प्राप्त होतील याची निविदा समितीने दक्षता घेणे व दरातील तफावत प्रमाणित करणे आवश्यक आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयाबाबत लागणारी विविध औषधे |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | शहाब्रदर्स, श्रीमरा मेडिकोज, न्युरेज केमिस्ट, डॉ.सिदधी |
| तांत्रिक मंजुरी | |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 12 दि. 09/03/12 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | - |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 1.25 कोटी |
| बजेट तरतुद | 1.38 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 19/03/11 ते 31/03/11 दै.वार्ताहर व नरविर चिमाजी |
| इसारा रक्कम | 62,500 |
| निविदा रक्कम | 1.25 कोटी |
| सुरक्षा अनामत | 1.25 लाख |
| कामाचा कालावधी | वार्षिक |
| करारनामा मुद्रांक शुल्क | प्रत्येकी 500 |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | वविशम/भां/166/11 दि. 02/06/11 |
| काम सुरु दिनांक: | काम पुर्ण दिनांक: |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | |

| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. |
|---|---|

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेले रुग्णालय व इतर दवाखाने यांच्यासाठी लागणारी विविध प्रकारची औषधे वार्षिक खरेदी दर पत्रक नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

मे. गजानन मेडिकल व गेटवेल केमिस्ट यांची निविदा अधिकृत विक्रेते प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अपात्र ठरविण्यात आली आहे. परंतु नस्ती तपासली असता वरील दोनही ठेकेदार यानी सहा.आयुक्त अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडलेले असल्याचे निदर्शनास आले आहे.

रजत फार्माकेमी यानी सिदधी लॅबोरेटरीज याना अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र दिनांक 20.03.11 रोजी दिले आहे. परंतू सदर पत्रावर फार्माकेमी यांचा रबरी शिक्का नाही. रबरी शिक्का नसताना सदर प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात आले आहे.

मे. न्युरेज केमिस्ट यांचा परवाना क्र. 0146807 दि. 28/08/03 नुसार परवाना कालावधी हा 25/08/2003 ते 28/08/08 हया कालावधी साठीच असताना सन 2011-12 च्या निविदेसाठी ग्राहय धरण्यात आला आहे.

तांत्रिक लिफाफ्यामध्ये कोणती कागदपत्रे ठेकेदार यानी सादर करावीत याबाबत निविदा सुचनेमध्ये प्रसिध्द केलेले नाही. शा.नि./भाकस/1094(2679)उद्योग-6 दि. 30/03/94 मधील अनुक्रमांक 1.4.1.3 अ/ब/1.4.2.1, 1.4.1.2 व 1.4.2.3 मध्ये निर्देशिलेली कागदपत्रे तांत्रिक लिफाफा सोबत जोडणे क्रम प्राप्त होते व त्या प्रमाणे निविदा प्रसिध्दी मध्ये नमूद करणे आवश्यक होते. उदा., अनामत रक्कम, आयकर प्रमाणपत्र, निविदा कर प्रमाणपत्र इत्यादी. या कागदपत्रांची तपासणी न करताच निविदाप्रक्रिया राबविण्यात आली आहे.

मे. शहा ब्रदर्स, श्रीयश मेडीकेज, न्युरेज केमिस्ट, डॉ. सिध्दी लॅबोरेटीज यानी प्रत्येकी रु. 500 मुद्रांक शुल्क पेपर वर करारनामा केलेला आहे. करारनामा तपासला असता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण अनुक्रमांक 2 नुसार नगरपालिकेच्या सचिवाच्या अभिरंक्षेत असलेली सामान्य मुद्रा प्रत्येक संविदेवर, स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य व उपायुक्त दर्जा पेक्षा कमी असलेला कोणताही अधिकारी यांच्या उपस्थितीत करार पत्रावर लावण्यात आली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणी तसे झाल्याचे लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आलेले नाही.

रुग्णालयाला लागणारी विविध औषधे सन 2011-12 साठी वार्षिक दर करार करण्यात आले आहेत. सन 2011-12 निविदा नस्ती मधील तुलनात्मक तक्त्या मधील अनुक्रमांक 327 टायफाईड लस, सिंगल डोस 0.5 ML चा दर रु. 75 मे. सिध्दी लॅबोरेटीज आहे. तसेच सन 2010-11 निविदा नस्ती मधील तुलनात्मक तक्ता अनुक्रमांक 299 टायफाईड वॅकसिन सिंगल डोस 0.5 ML चा दर रु. 400 मे. न्युरेज केमिस्ट वरील दोन्ही दरातील तफावत रु. 325 आहे. सन 2010-11 मध्ये दिनांक 10/08/10 रोजी 500 नग व दिनांक 14/02/11 रोजी 300 नग टायफाईड लस खरेदी करण्यात आलेल्या आहेत. एकुण खरेदी 800 नग झालेली आहे. मे. न्युरेज यानी सन 2010-11 मध्ये रु. 325 जादा दर प्रत्येक इंजेक्शन टायफाईड वॅकसिनला लावलेला आहे. 325 x 800 = 2,60,000/- एवढी जादाची रक्कम मे. न्युरेज केमिस्ट याना अदा झालेली आहे. निविदा प्रक्रिया राबविताना बाजारभावाशी सुसंगत दर प्राप्त होतील याची निविदा समितीने दक्षता घेणे व तसे प्रमाणित करणे आवश्यक आहे. सदर निविदा प्रक्रियेत

याबाबीकडे दुर्लक्ष झाल्याने महानगरपालिकेचे रु. 2,60,000/- चे नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कम रु. 2,60,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. तसेच मे. न्युरेज केमिस्ट यांचे कडून जादा दर आकारणीबाबत त्यांचेविरुध्द नियमानूसार प्रशासकीय कार्यवाही प्रस्तुत करावी.

आक्षेपाधिन रक्कम रु. **2,60,000/-**

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयांना लागणारी औषध खरेदी नस्ती तपासली असता ठेकेदार यांनी सुरक्षा अनामत भरल्याच्या पावत्या लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत डी.एम.पेटीट रुग्णालय वसई येथील साठा नोंदवही व विनियोग नोंदवही तपासली असता खालील त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

चलन क्र. 018 दि. 18/04/11 सिध्दी लॅबोरेटरीज यानी ई.सी.जी.मशीन 1 नगाचा पुरवठा केला आहे. परंतू साठा रजिस्टर 2010-11 मध्ये तीन मशीन नोंदविल्याचे निदर्शनास आले आहे. सदर मशीन 2011-12 मध्ये प्राप्त झाल्याने सदर मशीन सन 2011-12 हया आर्थिक वर्षाच्या साठा नोंदवहीत नोंदविणे क्रम प्राप्त होते.

चलन क्र. 524 न्युरेज केमिस्ट यानी टाईफाईड इंजिक्शन 200 नगाचा पुरवठा केलेला आहे. परंतू साठा नोंदवही 109 तपासली असता 300 नग प्राप्त अशी नोंद घेतलेली आहे. 100 नग जादा नोंदविण्यात आले आहेत. त्यामूळे तेवढ्या नगांकरीता जादा प्रदान झाले आहे. करीता जादा प्रदानाची रक्कम रु. 7500/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे

चलन क्र. 248 दिनांक 23/03/12 श्रेयश मेडीको यानी 340 नग Pitocin Inj. पुरवठा केलेली आहेत. प्रत्यक्ष साठा नोंदवही तपासली असता 320 नगाची नोंद घेतलेली आहे म्हणजेच 20 नगाची कमी नोंद करण्यात आली आहे.

विनीयोग नोंदवही 106 तपासली असता वस्तू घेणाऱ्याची व वस्तू देणाऱ्याची स्वाक्षरी नाही. विनियोग नोंदवही मध्ये बहुतांश खाडा खोड तसेच खाडाखोडीकरीता सफेद शाईचा वापर करण्यात आलेला आहे.

डी.एम.पेटीट रुग्णालयामध्ये प्राप्त होणारी औषधाची वर्षाअखेर इनव्हेण्टरी केलेली नाही. त्यामुळे औषधे वर्षामध्ये किती प्राप्त झाली व किती रुग्णाना दिली याचा ताळमेळ लेखा परिक्षणास घेता आला नाही.

नागरी आरोग्य सुविधा केंद्र नवघर वसई रोड विनियोग नोंदवही तपासली असता सदर नोंदवहीवर वस्तू घेणारा व देणारा यांची स्वाक्षरी नाही. तसेच साठा नोंदवही वर स्वाक्षरी नाही. रुग्णाना रॅबीज लस दिली जाते व रुग्णांकडून रु. 50/- घेऊन त्याना पावती दिली जाते. काही पावत्या तपासल्या असता पावतीवर रक्कम वसुल करणाऱ्याची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आले. तसेच रोखपालाची भरणा नोंदवही मध्ये स्वाक्षरी नसल्याचे लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आले आहे. तसेच सुविधा केंद्रामध्ये किती औषधे, गोळया, लस वर्षभरामध्ये प्राप्त झाली व वर्षा अखेर किती शिल्लक राहिली याचा ताळमेळ घेतलेला नाही. विनियोगानूसार ताळमेळ न घेणे तसेच वर निर्देशिलेल्या बाबी या गंभीर स्वरुपाच्या असुन नियमबाहय आहेत.

नागरी आरोग्य सुविधा केंद्र, नवघर वसई रोड याना दि. 07/03/2013 रोजी माहे मार्च 12 महिन्याची सर्व पावती पुस्तके, भरणा रजिस्टर, विनियोग रजिस्टर लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. परंतू आज पर्यंत सन 2011-12 चे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही.

## ***39 रुग्णालयासाठी दूध, अंडी, भोजन पुरवठा करणे.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :रुग्णसेवा,भोजन,चहापा , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 224069.00/-

***संपुर्ण निविदाप्रक्रिया नियमबाह्य झालेली आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | रुग्णालयासाठी दूध, अंडी, भोजन पुरवठा करणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. महेंद्र किसन लाड |
| तांत्रिक मंजुरी | ---- |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 3 दि. 22/12/10 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ---- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 4 लाख |
| बजेट तरतुद | 14.18 लाख |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 25/05/11 ते 04/06/11 बुलंद टाईम्स, वार्ताहर |
| इसारा रक्कम | 2,500 |
| निविदा रक्कम | 4 लक्ष |
| सुरक्षा अनामत | 5,000 |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | ---- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | वविशम/भां/574/11 दि. 29/08/11 |
| काम सुरु दिनांक: 29/08/11 | काम पुर्ण दिनांक: ----- |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. |

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत वसई येथील रुग्णालयासाठी लागणारे भोजन, दूध, बिस्किट खरेदी नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

मे. महेंद्र किसन लाड यानी महानगरपालिकेतील निविदा अटी व शर्ती क्र. 10 नुसार करारनामा केलेला नाही. करारनामा न करता महेंद्र लाड याना कार्यादेश देण्यात आले आहेत.

रुग्णालयासाठी भोजन, दूध इत्यादी पुरवठा करण्यासाठी एकुण तीन ठेकेदार यानी निविदा सादर केल्या आहेत. सदरच्या निविदा महापालिकेच्या आवक विभागामध्ये आवक करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे निविदा कधी प्राप्त झाल्या याची लेखा परिक्षणास खात्री करता आलेली नाही.

निविदा प्रसिध्दी शा.नि. भाकस/1094/(2639) उद्योग-6, दि. 30/03/94 मधील अनुक्रमांक 1-4-1-3 अ ब/1.4.2.1/1.4.2.2/1.4.1.2 व 1.4.2.3 नुसार ठेकेदार यानी कागदपत्र तांत्रिक लिफाफा सोबत जोडणे क्रमप्राप्त होते. व त्याप्रमाणे निविदा प्रसिध्दी मध्ये नमूद करणे आवश्यक होते. उदा., अनामत रक्कम, आयकर प्रमाणपत्र, विक्रीकर प्रमाणपत्र इत्यादी.

तसेच संपुर्ण निविदाप्रक्रिया नियमबाह्य पध्दतीने राबविली असल्याने सन 2011-12 मध्ये करण्यात आलेला या बाबींवरील खर्च रु. 2,24,069/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 39)

## *40 प्रभाग समिती 'ड' व्हॅक्यूम क्लिनर ने सेप्टी टँक साफ करणेची नोंदवही अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :मैला सफाई फी , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 247500.00/-

***सेप्टी टँक साफ केलेल्या गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिका-याची व मुकादम यांची स्वाक्षरी असलेले विवरण पत्र लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे नोंदवही मध्ये नमूद केलेल्या फेऱ्या योग्य असल्याची व वाहनाची धाव याबाबत लेखा परिक्षणास पडताळणी करता आलेली नाही.***

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत व्हॅक्यूमच्या सहाय्याने सेप्टी टँकची सफाई केली जाते. महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी नवघर-माणिकपूर नगरपरिषद यानी ठराव क्र. 1209 दि. 25/11/99 व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नियम क्र. 131 (1 ते 3) नुसार सेप्टी टँक सफाईसाठी प्रति फेरा रु. 500/- दर ठरविण्यात आलेला आहे व त्या प्रमाणे संबंधितांकडून रक्कम वसुल केली जाते. दिनांक 9 जुलै 2009 रोजी महानगरपालिकेची स्थापना झालेली आहे. महानगरपालिकेने सेप्टी टँक साफ करण्यासाठी आकारावयाच्या दरासंबंधी नव्याने ठराव केलेला नाही. विरार प्रभाग समितीमध्ये मालमत्ता कर देयकामध्येच सेप्टी टँक साफ करण्याचा कर आकारण्यात येतो. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये सेप्टी टँक साफ करण्यासाठी वेगवेगळे दर आकारण्यात येत आहेत. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत सर्व प्रभाग समिती करीता एकच दर व वसुलीची एकच

पध्दत असणे आवश्यक आहे.

प्रभाग समिती 'ड' मधील सेप्टी टँक सफाई नोंदवही तपासली असता गाडी कुठून कोठे गेली एवढीच नोंद आहे. गाडी किती किलोमीटर चालली यांची नोंद नाही. तसेच एक सेप्टी टँक साफ करण्यासाठी किती फेऱ्या करण्यात आल्या याची नोंद नाही. ज्या गृहनिर्माण संस्थेची सेप्टी टँक साफ केली त्यांची स्वाक्षरी व मुकादम यांची स्वाक्षरी असलेले विवरण पत्र लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही त्यामुळे नोंदवही मध्ये नमूद केलेल्या फेऱ्या योग्य असल्याची लेखा परिक्षणास पडताळणी करता आलेली नाही. सन 2011-12 हया आर्थिक वर्षामध्ये पावती पुस्तक क्र. 228, 208, 1730 नुसार सेप्टी टँक साफ केल्याची एकुण वसुली रु. 1, 48,000/- एवढी आहे. वर्षभरात प्राप्त रक्कम व आकारणीचा दर विचारात घेता संपूर्ण वर्षात वाहनाने फक्त 296 फेऱ्या केल्याचे दिसते. अहवालवाचन व अंतिमीकरण प्रसंगी सादर केलेल्या नोंदवहीनुसार एकुण 791 फे-या झाल्याचे निदर्शनास आले त्यानुसार रु. 3,95,500/- इतकी रक्कम जमा होणे आवश्यक होते. करीता रु. 2,47,500/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत.

वसुलपात्र रक्कम रु. **2475**00/-

DPSKGGM6001 (Ref No : 40)

## *41 वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या दवाखाना, रुग्णालयासाठी डॉक्टर व परिचारीका ठेक्याने पुरवणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :वैद्यकीय अधिकारी/ वै , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 198806.00/-

***ठेकेदाराने वसई विभागात कमी पुरवठा केलेल्या तसेच गैरहजर असलेल्या डॉक्टर व परिचारीकांकरीता रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच नवघर-माणिकपुर विभागात आदेशित केलेल्या संख्येपेक्षा अधिक पुरवठा केलेल्या डॉक्टर व परिचारीकांकरीता रक्कम अदा करण्यात आली आहे.***

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेले वसई विभागातील रुग्णालयामधील डॉक्टर व परिचारिका यांचे हजेरी पुस्तक व ठेकेदार यानी सादर केलेली देयके यांची तपासणी केली असता खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या गैरहजर डॉक्टर व परिचारिका तसेच कमी पुरवठा केलेल्या

डॉक्टर यांच्या वेतनावर झालेला जादा खर्च वसुल पात्र आहे.

1. तक्ता अ) कमी पुरवठा केलेला डॉक्टर तक्ता.

| अ.क्र. | प्रमाणक | दिनांक | देयकाची रक्कम | महिना | एम.बी.बी.एस महिना रु. 24,500/- | बी.ए.एम.एस. महिना रु. 17,000/- | एकुण वसुल पात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 1493 | 31/5/11 | 1,49,500 | एप्रिल 11 | 24,500 | --- | 24,500 |
| 2. | 1830 | 08/6/11 | 1,34,000 | मे 11 | 24,500 | --- | 24,500 |
| 3. | 3752 | 24/8/11 | 1,17,000 | जुलै 11 | 24,500 | 17,000 | 41,500 |
| 4. | 4783 | 23/9/11 | 1,27,968 | ऑगस्ट 11 | --- | 17,000 | 17,000 |
| 5. | 6144 | 07/12/11 | 1,56,177 | ऑक्टो. 11 | --- | 17,000 | 17,000 |
| 6. | 7350 | 16/12/11 | 1,34,000 | नोव्हें 11 | --- | 17,000 | 17,000 |
| 7. | 8644 | 01/2/12 | 1,17,000 | डिसें 11 | 24,500 | --- | 24,500 |
| 8. | 33 | 12/4/12 | 1,23,581 | जाने. 12 | 24,500 | --- | 24,500 |
| 9. | 33 | 12/4/12 | 1,26,966 | फेब्रु. 12 | 24,500 | --- | 24,500 |
| | | | | | 1,47,000 | 68,000 | 2,15,000 |

रुग्णालयात ठेवण्यात आलेले डॉक्टरांचे हजेरी पुस्तक तपासले असता डॉक्टर त्या त्या महीन्यात पुरविले नसल्याचे लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आलेले आहे. डॉक्टर पुरविले नसताना त्या त्या महिन्यात ठेकेदार मे. आरती सुनिल वाडकर यांनी डॉक्टरच्या दराची जादा मागणी करुन देयक सादर केलेले आहे व त्यानुसार ठेकेदार यांना देयक मंजूर करण्यात आलेले आहे. म्हणून वरील तक्त्यामध्ये दर्शविलेली एकुण वसुल पात्र रक्कम रु. 2,15,000/- ठेकेदार यांचेकडून वसुल करण्यात यावी. अहवाल वाचन व अंतिमीकरण प्रसंगी सादर केलेला, डॉ. वाडकर हे वैद्यकीय विभाग प्रमुख असल्याने त्यांच्या हजेरीपटावर स्वाक्ष-या नाहीत, हा खुलासा मान्य करुन त्यांना अदा केलेली रक्कम रु. 147000/- आक्षेपातुन वगळण्यात येत आहे. आक्षेपाधिन रक्कम रु. **68000/-**

तक्ता ब) गैरहजेरी तक्ता डॉक्टर

| | | | | | गैरहजर दिवस हजेरी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रमाणक | दिनांक | देयकाची रक्कम | महिना | एम.बी.बी.एस 24,500 प्रति माह | बी.ए.एम.एस. 17,000 प्रति माह | अदा केलेली जादा रक्कम एम.बी.बी.एस | अदा केलेली जादा रक्कम बी.ए.एम.एस. | एकुण |
| 1. | 4783 | 23/9/11 | 1,27,968 | ऑगस्ट 11 | 27 | --- | 21,339/- | --- | 21,339/- |
| 2. | 7350 | 16/12/11 | 1,34,000 | नोव्हें 11 | 12 | 18 | 9,800/- | 10,200/- | 20,000/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3. | 6145 | 7/12/11 | 1,34,000 | ऑक्टो.11 | 5 | 19 | 3,952/- | 10,419/- | 14,371/- |
| 4. | 8644 | 1/2/12 | 1,17,000 | डिसें 11 | --- | 3 | --- | 1645/- | 1,645/- |
| | | | | | | | 35,091/- | 22,264/- | 57,355/- |

सदरची रक्कम ही रुग्णालयात ठेवण्यात आलेल्या हजेरी पुस्तकावरुन डॉक्टरांचे गैरहजर दिवसानुसार परिगणीत करण्यात आली आहे. प्रमाणक तपासले असता गैरहजर दिवसाचे जादा वेतन ठेकेदार मे. आरती सुनिल वाडकर यांना अदा केलेले आहे. म्हणून सदरची रक्कम रु. 57,355/- आक्षेपाधिन आहे.

तक्ता क) गैरहजेरी तक्ता परिचारिका

| | | | परिचरीका | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रमाणक | दिनांक | महिना | देयकानुसार अदा केलेले प्रत्यक्ष दिवस | हजेरी पुस्तकानूसार हजर दिवस | गैरहजर | जादा अदा केलेली रक्कम | शेरा |
| 1. | 3751 | 24/8/11 | जुलै 11 | 374 | 369 | 5 | 1,855/- | दर महा 11,500/- ठेका एका दिवसाचे दर 370.96 |
| 2. | 4784 | 23/9/11 | ऑगस्ट 11 | 403 | 347 | 56 | 20,774/- | एक दिवस दर 370.96 |
| 3. | 6144 | 7/12/11 | ऑक्टो. 11 | 421 | 339 | 82 | 30,419/- | एक दिवस दर 370.96 |
| 4. | 8645 | 1/2/12 | डिसें. 11 | 331 | 276 | 55 | 20,403/- | एक दिवस दर 370.96 |
| | | | | | | | 73,451/- | |

वरील तक्त्यातील गैरहजर दिवस हे परिचारिका यांचे रुग्णालयामध्ये ठेवण्यात आलेल्या हजेरी पुस्तकावरुन घेण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष हजर दिवस हे त्या त्या महीन्याची मंजूर टिपणी व प्रमाणकानूसार घेण्यात आलेले आहेत. दोघांची तुलना करुन प्रत्यक्ष गैरहजर दिवस काढण्यात आले असुन गैरहजेरीची जादा अदा झालेली रक्कम मे. आरती सुनिल वाडकर यांचे कडून रु. 73,451/- आक्षेपाधिन आहे.

एकुण आक्षेपाधिन रक्कम अ,ब,क मिळुन रु. **198806/-**

2. नवघर-माणिकपूर विभागातील प्रमाणकासोबत डॉक्टर व परिचारिका यांची हजेरीची छायांकित प्रत जोडलेली आहे. सदर छायांकित प्रतीवर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नसताना देयक कसे मंजूर केले तसेच प्रमाणकासोबत जोडलेली हजेरीची छायांकित प्रत व लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले हजेरी पुस्तकामध्ये डॉक्टर व परिचारिका यांच्या नावामध्ये तफावत असल्याचे लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आलेले आहे.

3. मे. दिव्या इंटर प्रायझेस यांनी तीन बी.ए.एम.एस. डॉक्टर व तीन परिचारिका (खाजगी) पुरवठा करण्यासाठी आदेश क्र. वविश/24/2010, दि. 05/04/2010 देण्यात आले होते. प्रमाणके तपासली असता प्रमाणकासोबत हजेरीची छायांकित प्रत जोडलेली नाही. देयकावर स्वच्छता निरीक्षक यानी डॉक्टर व

कामाचे नाव वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई

परिचारिका बाबत प्रमाणित केलेले आहे. स्वच्छता निरीक्षकाना प्रमाणित करण्याबाबत दिलेल्या प्राधिकाराची प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 41)

## *42 वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय रुग्णालयासाठी प्रशिक्षित दायी पुरविणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :वैद्यकीय अधिकारी/ वै , महानगरपालिका निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 57693.00/-

***निविदा अटी व शर्तीनुसार कामकाज झालेले नाही. गैरहजर दायींकरीताही प्रदान करण्यात आले आहे.***

| | |
|---|---|
| | विभागीय रुग्णालयासाठी प्रशिक्षित दायी पुरविणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. चिराग लेबर कॉन्ट्रक्टर |
| तांत्रिक मंजुरी | --- |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 17 दि. 28/05/2009 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 15 लाख |
| बजेट तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 08/04/2009 ते 15/04/2009 दै. नरवीर चिमाजी 07 एप्रिल 2009 |
| इसारा रक्कम | 20,000/- |
| निविदा रक्कम | 1,500/- |
| सुरक्षा अनामत | 6,400/- |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | वनप/दवा/589/09, दि. 03/06/2009 |
| काम सुरु दिनांक | 03/06/2009 |
| धावते/अंतिम देयक एकुण खर्च रक्कम | --- |
| प्रमाणक क्र. ---- | --- |

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत रुग्णालय येथे दैनंदिन व प्रशिक्षित दायी सेवा पुरविण्याबाबतची नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

निविदा प्रसिध्दी दिनांक 07/04/2009 दैनिक नरवीर चिमाजी मध्ये निविदा उघडण्याची तारीख 16/04/09 नमूद आहे. प्रत्यक्ष निविदा नस्ती तपासली असता निविदा 12/05/2009 रोजी उघडण्यात आल्या आहेत. एवढया उशिरा निविदा उघडण्याचे प्रयोजन लेखा परीक्षणास नस्तीमध्ये उपलब्ध झाले नाही.

फार्मासिस्ट वसई रुग्णालय यांची दिनांक 03/02/2012 ची टिपणी मध्ये प्रशिक्षित दायी दररोज 15 पुरविण्याबाबत करारपत्रामध्ये अट घालण्यासाठी मा. आयुक्त साहेब यांची मान्यता घेतलेली आहे. प्रत्यक्ष करारपत्र दिनांक 14/02/2012 चे तपासले असता ठेकेदार चिराग लेबर कॉन्टॅक्टर यानी फक्त प्रति दिनी 9 प्रशिक्षित दायी पुरवण्याचे नमूद केले आहे.

सन 2011-12 प्रमाणके तपासली असता निविदा अटी शर्ती ब (3) व करारनामा अट क्र. 17 नुसार ठेकेदार याच्या देयकातून 7% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

मे. चिराग लेबर कॉन्ट्रक्टर यांचा लेबर पुरवठा परवाना नुतनीकरण डिसेंबर 2008 पर्यंतच आहे. असे असताना सदरची निविदा ग्राहय कशी धरण्यात आली याचा खुलासा लेखापरीक्षणास झाला नाही.

ठेक्याची वार्षिक रक्कम रु. 10,56,000/- असताना(रु.88,000/- x 12 म.) निविदा अटी व शर्ती ब (3) व करारनामा अट क्र. 17 नुसार रु. 31,680/- सुरक्षा अनामत ठेकेदाराकडून घेणे क्रमप्राप्त असताना रु. 6,400/- वसुल करण्यांत आली आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 25,280/-

सन 2011-12 प्रमाणके तपासली असता निविदा अटी शर्ती ब (3) व करारनामा अट क्र. 16 नुसार ठेकेदार याच्या देयकातून 7% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

करारपत्र अट क्र. 4 नुसार ठेकेदार चिराग लेबर कॉन्ट्रक्टर यानी कर्मचारी विमा उतरविल्याची प्रत तसेच कर्मचाऱ्यांकडून वसुल केलेला व्यवसाय कर शासनास तिजोरीत जमा केल्या बाबतचे चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

निविदा फॉर्ममध्ये नगर परिषद रुग्णालया करीता प्रशिक्षित दायींची किती आवश्यकता आहे हे नमूद करण्यात आलेले नाही.

खालील नमूद केलेल्या तक्त्या प्रमाणे प्रशिक्षित दायी त्या त्या महिन्यामध्ये गैरहजर होत्या तरीही ठेकेदार चिराग लेबर कॉन्ट्रक्टर याना पूर्ण ठेक्याची रक्कम अदा केलेली आहे. म्हणून गैरहजर दिवसांकरीता अदा केलेली रक्कम रु. 32,413/- वसुल पात्र आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | महिना | हजेरी वही नुसार गैरहजर दायी | वसुल पात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | 5458 | 20/10/11 | 88,000/- | सप्टेंबर 11 | 45 | 8,800/- |
| 2) | 7110 | 09/12/11 | 88,000/- | ऑक्टो. 11 | 57 | 10,788/- |
| 3) | 34 | 12/04/12 | 88,000/- | जाने. 12 | 44 | 8,327/- |
| 4) | 7416 | 19/12/11 | 88,000/- | नोव्हें. | 23 | 4,498/- |
| वसुल पात्र रक्कम | | | | | | **32,413/-** |
| | एका व्यक्तीचा एका दिवसाचा दर काढणे 88,000/15 = 5867/-<br>5867/30 = दर प्रत्येक दिवस | | | | | |

वरील चार महिन्याची प्रमाणके वगळता उर्वरीत एप्रिल 11 ते ऑगस्ट 11 व डिसें. 11 व फेब्रुवारी 12 ते मार्च 12 ची प्रमाणके तपासून गैरहजर दिवसाचे वेतन मे. चिराग लेबर कॉन्ट्रक्टर यांचेकडून वसुल करण्यात यावी.

DPSKGGM6001 (Ref No : 42)

## *43 पल्स पोलीओ लसीकरण मोहीम नस्ती व प्रमाणके तपासणीमध्ये आढळुन आलेल्या त्रुटी.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :पल्स पोलियो मानधन , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1789764.00/-

***पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेतील पर्यवेक्षक व स्वयंसेवक यांच्या संख्येपेक्षा व दरापेक्षा अधिकचे प्रदान करण्यात आले आहे.***

पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची प्रमाणके पर्यवेक्षक व स्वयंसेवक याच्या हजेरी पटावरुन तपासली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

खाली नमुद केलेल्या तक्त्याप्रमाणे पल्स पालिओ मोहिम साठी संबंधित वैद्यकीय अधिकारी यांचेकडे स्वयंसेवकांना मानधन वाटप करण्यासाठी महापालिकेमार्फत रक्कम देण्यांत आली होती. सदरची प्रमाणके तपासली असता स्वयंसेवक-पर्यवेक्षक यांची हजेरी सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेली नाही. म्हणून तक्त्यामध्ये दर्शविण्यांत आलेली एकूण रक्कम रु. 13,38,100/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | ग्रामिण विरार | 8410 | 21-1-12 | 1,81,500/- |
| 2 | मनुभाई निदान केंद्र | 8472 | 21-1-12 | 1,87,600/- |
| 3 | नागरी आरोग्य केंद्र नालासोपारा | 8397 | 21-1-12 | 2,75,900/- |
| 4 | मनुभाई शहा आरोग्य केंद्र | 8398 | 21-1-12 | 1,86,300/- |
| 5 | नागरी आरोग्य केंद्र नालासोपारा | 8407 | 21-1-12 | 2,90,800/- |
| 6 | नागरी आरोग्य केंद्र वालीव | 8409 | 21-1-12 | 1,11,000/- |
| 7 | नागरी आरोग्य केंद्र वालीव | 8408 | 21-1-12 | 1,05,000/- |
| आक्षेपाधीन रक्कम | | | | **13,38,100/-** |

वसई-विरार शहर महानगरपालिका 31-3-112 अखेरचा जमा खर्चाचा वार्षिक लेखा तपासला असता पल्स पोलिओ मोहीमेसाठी एकूणे खर्च रु. 53,96,036 दर्शविण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकारी आरोग्य यांनी सन 2011-12 पल्स पोलिओ मोहीमेसाठी प्राप्त झालेले अनुदान खर्च तक्ता लेखा परिक्षणास सादर केला आहे त्या रक्कमेची पोच त्यांनी रु. 58,47,700/- एवढी दर्शविलेली आहे. वैद्यकीय अधिकारी यांना पोच झालेली रक्कम व प्रत्यक्ष खर्ची पडलेली रक्कम यामधील तफावत रु. 4,51,664/- ही संबंधितांकडुन आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. **4,51,664/-**

आक्षेपाधिन रक्कम रु. **1789764/-**

DPSKGGM6001 (Ref No : 43)

## ***44 महानगरपालिका हददीतील मोकाट व जखमी श्वान पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबिज प्रतिबंधक लस देणे.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :मोकाट व पिसाळलेल्या , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 738095.00/-

***प्रथम निविदा प्रसिध्दीनुसार प्राप्त न्युनतम दरधारकाने काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने न्युनतम 2 निविदाधारकास विचारणा करुन निविदा प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक असताना फेरनिविदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदा प्रक्रियेत दुप्पट दर प्राप्त झाल्याने महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे.***

महानगरपालिका हददीतील मोकाट व जखमी श्वान पकडून त्यांचेवा निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबिज प्रतिबंधक लस देणे कामी महासभा ठराव क्र. 15 दि. 01/04/2011 ने मंजूरी मिळाले वरून दै. आपलं महानगर, पुढारी, शाषितांचे समर्थन व नवभारत हया वृत्तपत्रात जाहीर निविदा सूचना दि. 21/4/2011 रोजी प्रसिध्द करून दि. 03/05/2011 दु. 1.00 वाजेपर्यंत निविदा दुपारी 4.50 वाजता उप आयुक्त हयांच्या दालनात निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी | | द रॉयल व्हेटरनरी सोसायटी ऑफ इंडिया, मुलुंड | | सेंट पीटर ॲनिमल फाऊंडेशन, भाईंदर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति नर श्वानाचा दर | प्रति मादी श्वानाचा दर | प्रति नर श्वानाचा दर | प्रति मादी श्वानाचा दर | प्रति नर श्वानाचा दर | प्रति मादी श्वानाचा दर |
| 1 | स्वत:चे प्रशिक्षित कर्मचारी, डॉग व्हॅन, वापरून हददीतील मोकाट श्वान पकडणे | रु. 500 | रु. 585 | रु. 400 | रु. 480 | रु. 750 | रु. 850 |
| 2 | पकडलेल्या श्वानांना नवघर पूर्व तसेच महापलिका सुचवेल त्या | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ठिकाणी शस्त्रक्रिया करण्यासाठी नेण | | | | | | |
| 3 | त्यांच्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे व श्वानदंश लस देणे. | | | | | | |
| 4 | शस्त्रक्रिया केलेल्या श्वानांवर बरे हाईपर्यंत औषध उपचार व खानपान व्यवस्था करणे | | | | | | |
| 5 | श्वानांच्या कानावर “V” आकाराचे निशान करणे.शस्त्रक्रिया झाल्यावर ज्या जागेवरून श्वान पकडले तेथे नेऊन सोडणे | | | | | | |
| अ.क्र. | कामाचे स्वरुप | इन डिफेन्स ऑफ ॲनिमल, दादर | | ॲनिमल, फ्रेडस वेल्फेअर पब्लिक सोसायटी, ठाणे | | जय माता दी, सोशल अँड एज्युकेश्नल सो., मीरारोड | |
| | | प्रति नर श्वानाचा दर | प्रति मादी श्वानाचा दर | प्रति नर श्वानाचा दर | प्रति मादी श्वानाचा दर | प्रति नर श्वानाचा दर | प्रति मादी श्वानाचा दर |
| 1 | 1 | रु. 500 | रु. 750 | रु. 550 | रु. 599 | रु. 600 | रु. 650 |
| 2 | 2 | | | | | | |
| 3 | 3 | | | | | | |
| 4 | 4 | | | | | | |
| 5 | 5 | | | | | | |

प्राप्त झालेल्या निविदा व त्यामधील दरांची पडताळणी केली असता मोकाट नर व मादी श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणेकामी द रॉयल व्हेटरनरी सोसायटी ऑफ इंडिया, मुलुंड हयांची कमी दराची निविदा स्थायी समिती सभा  दि. 05/05/2011 ने मंजूरी मिळालेवरून मंजूर निविदाधारकास करारनामा करण्यासाठी कार्यालयात हजर राहणेबाबत दुरध्वनीवरून कळविण्यात आले. परंतू दि. 10/06/2011 रोजी द रॉयल व्हेटरनरी सोसायटी ऑफ इंडिया, मुलुंड हयांनी महानगरपालिकेस पत्र देऊन काम करण्यास असमर्थता दाखविली.

हददीतील मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांचेवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज

प्रतिबंधक लस देणे हे काम लवकरांत लवकर सुरू करणे आवश्यक असल्याने मंजूर निविदाधारकाची इसारा रक्कम जप्त
करण्याची मंजूरी मिळालेनंतर फेर निविदा दि. 12/07/2011 रोजी दै. महाराष्ट्र बुलंद टाईम्स व दै. पुण्यनगरी हया वृत्तपत्रात प्रसिध्द करून दि. 26/07/2011 पर्यंत निविदा मागविण्यात आल्या. मुदतीत आलेल्या निविदा उपस्थित निविदाधारक / प्रतिनिधी हयांच्या समक्ष दि. 26/07/2011 रोजी दुपारी 4.00 वाजता उप आयुक्त हयांच्या दालनात निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या. प्राप्त झालेल्या निविदा व त्यामधील दरांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी | | महारष्अ्र राज्य सरकारी कृषी व पशु वैद्यकिय तांत्रिक कुशल सेवा संस्था मर्या. पुणे | | पेठ केअर हॉस्पिटल वेल्फेअर सोसायटी, ठाणे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति नर श्वानांचा दर | प्रति मादी श्वानांचा दर | प्रति नर श्वानांचा दर | प्रति मादी श्वानांचा दर | प्रति नर श्वानांचा दर | प्रति मादी श्वानांचा दर |
| 1 | स्वत:चे प्रशिक्षित कर्मचारी, डॉग व्हॅन, वापरून हददीतील मोकाट श्वानांना पकडणे | रु. 990 | रु. 1160 | रु. 1020 | रु. 1240 | रु. 1100 | रु. 1250 |
| 2 | पकडलेलय श्वानांना नवघर पूर्व तसेच महापलिका सुचवेल त्या ठिकाणी | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शस्त्रक्रिया करण्यासाठी नेण | | | | | | |
| 3 | त्यंच्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे व श्वानदंश लस देणे. | | | | | | |
| 4 | शस्त्रक्रिया केलेल्या श्वानांवर बरे हाईपर्यंत औषध उपचार व खानपान व्यवस्था करणे | | | | | | |
| 5 | श्वानांच्या कानावर “V” आकाराचे निशान करणे.शस्त्रक्रिया झाल्यावर ज्या जागेवरून श्वान पकडले तेथे नेऊन सोडणे | | | | | | |

प्राप्त झालेल्या निविदा व त्यामधील दरांची पडताळणी केली असता मोकाट व जखमी श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे कामी ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी हयांची तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची निविदा आहे. सदर दर हे अवाजवी असल्याचे दिसून आले. त्याकरीता दि. 26/06/2011 रोजी ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी हयांना दर वाटाघाटी बाबत पत्र देऊन दि. 27/07/2011 रोजी सकाळी 11.30 वाजता हजर राहणेबाबत कळविण्यात आले होते. डॉ. निर्मल पाटील, सचिव ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी हे महापालिकेत चर्चेसाठी हजर राहीले. झालेल्या चर्चेप्रमाणे नर श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे कामी रु. 900/- व मादी श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे कामी रु. 1100/- प्रति श्वान दर राहील असे पत्र दिलेले आहे.

दि. 21/4/2011 च्या जाहिरातीनुसार प्रथम निविदा द रॉयल व्हेटरनरी सोसायटी ऑफ इंडिया, मुलुंड हयांची निविदा कमी दराची असल्याने मंजूर करण्यात आली. तथापी, त्यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने त्यानंतरची कमी दराची निविदा मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी यांची असताना त्यांना वाटाघाटीस बोलावून काम करण्यांस तयार असल्याबाबत विचारणा करण्यात आलेली नाही.

मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी हयांनी दि. 21/4/2011 रोजीच्या प्रथम निविदेनुसार भरलेले दर व दि. 12/7/11 रोजीच्या फेर निविदेनुसार भरलेले दर हे दुप्पटी पेक्षा जास्त आहेत हयाबाबत निविदा समितीने बाजार भावाप्रमाणे पडताळणी केल्याचे दिसून येत नाही. निविदा दर हे 90 दिवसांकरीता ग्राहय असताना दरातील तफावती बाबत तपासणी न केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असून करण्यात आलेला खर्च नर श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे कामी रु. 400/- व मादी वर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे कामी रु. 515/- हयाप्रमाणे एकूण रु. 7,38,095/- झालेला खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत

आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 738095/-

मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी हयांना दि. 22/8/11 ते 31/8/12 हया कालावधी करीता प्रथम आदेश देण्यात आलेले असून महासभा ठराव दि.13/8/2012 नुसार पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण हाईपर्यंत मुदत वाढ देण्यांत आली आहे. मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंधेरी हयांना ठेका देताना पूर्वीच्या दि. 4/5/2011 निविदेपेक्षा जादा दराने मंजूर केलेली असताना वेळीच निविदा प्रक्रिया सुरु करणे अपेक्षित असताना तसे न करता त्यांना मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग निर्णय क्र. भांखस/1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/01/1992 मधील परिच्छेद 8-3. परिशिष्ठ "सात नुसार" पुर्नप्रत्यायी आदेश देताना ते मुळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या अवधीत किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण हाईपर्यंत जो कालावधी कमी असेल त्याकरीता देण्यात यावेत. तथापी, सदर निविदाधारकास दि. 13/8/12 पासुन आदेश निर्गमित केले असून आजतागायत त्यांचे काम सुरु आहे. या अनियमिततेमुळे सदर कालावधीत झालेला खर्च नियमबाहय असून तो आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATASDM5602 (Ref No : 44)

## *45 जंतू नाशके, किटक नाशके खरेदी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :जंतुनाशके खरेदी , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 394260.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 41600.00/-

***जंतु नाशके नस्ती तपासली असता निविदे मध्ये प्राप्त दर, दरात झालेली वाढ व नंतर वाटाघाटीमध्ये अंतिम केलेले दर हे बाजार भावाशी सुसंगत असल्याचे खरेदी समितीने प्रमाणित केलेले नाहीत.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | जंतू नाशके, किटक नाशके खरेदी बाबत. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | रमेश ॲग्रो कॉ., दक्षता ट्रेडिंग डहाणू ॲग्रो हार्बोटिन रिसर्च |
| तांत्रिक मंजुरी | ---- |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 3 दि. 22/12/10 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ---- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 4.50 कोटी |
| बजेट तरतुद | 46.10 कोटी |

| | |
|---|---|
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 12/3/11 ते 23/3/11 दैनिक लोकमत |
| इसारा रक्कम | 2.13 लाख |
| निविदा रक्कम | 4.50 कोटी |
| सुरक्षा अनामत | 4.50 लाख |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 2500 |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | |
| काम सुरु दिनांक: | काम पुर्ण दिनांक: ----- |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. |

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत आरोग्य विभागासाठी लागणारी जंतुनाशके व किटक नाशके सन 2011-12 करीता आवश्यक असल्याने वार्षिक निविदा दर मागविण्यात आलेले आहेत. सदर निविदा नस्ती तपासली असता लेखा परिक्षक खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सन 2011-12 मध्ये लागणारी जंतुनाशके व किटक नाशके यांची अंदाजित किंमत 4.5 कोटी आहे व त्यानुसार 4.5 कोटी रकमेकरीता ठेकेदार यांचे कडून रु. 44,100 एवढा मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे क्रमप्राप्त होते. नस्ती तपासली असता फक्त रु. 2,500 मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला आहे. तरी मे. डहाणू ॲग्रो, मे. हार्बोमिन रिसर्च लॅब, लक्षता ट्रेडिंग कं., मे. रमेश ॲग्रो कॉर्पो. यांचे कडून रु. 41,600 मुद्रांक शुल्क वसूल करुन शासन दप्तरी जमा करावेत व तसे अनुपालन लेखा परिक्षणास अवगत करावे. तो पर्यंत रक्क्म रु. 41,600 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 कलम 63 ची दुरुस्ती/ सुधारणा क्र. 12 दि. 01/05/2006.

वसुलपात्र रक्कम रु. 41,600/-

जंतु नाशके नस्ती तपासली असता निविदे मध्ये प्राप्त दर व नंतर वाटाघाटी अंतिम केलेले दर हे बाजार भावाशी सुसंगत असल्याचे खरेदी समितीने प्रमाणित केलेले नाहीत.

मे. एस.आर.बी. इंडस्ट्रीज सोलापूर यांचे पत्र क्र. 811 दिनांक 14/01/2011 नुसार मे. परफेक्ट लॅबोरेटी मे. हर्बोमिन रिसर्च लॅबोरटीज, मे. डिन फार्मास्टिक, मे. निओ लॅब हेच अधिकृत पुरवठादार असल्याचे पत्रात नमूद केले आहे. परंतू पत्रावर संबंधीत कंपनीचे अधिकृत अधिकारी यानी स्वाक्षरी केलेली नाही. पत्रावर स्वाक्षरी नसताना सदरचे पत्र ग्राहय धरण्यात आले आहे.

खालील नमूद केलेली जंतूनाशके यांचा सन 2010-11 व 2011-12 चे दर दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र | किटक नाशकाचे नाव | 2010-11 दर | 2011-12 दर | फरक |
|---|---|---|---|---|
| 1. | पायरोसीन ऑईल ISI | 2980 | 3380 | 400 वाढ |
| 2. | मास्कुटो लावासाईट 588/1978 | 15000 | 16500 | 1500 वाढ |
| 3. | टेमीरॉक्स 50% ई.सी. | 4800 | 6500 | 1700 वाढ |
| 4. | पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट | 6945 | 7430 | 485 वाढ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 2% ई.सी. | | | |

वरील चारही किटक नाशके यांच्या दरात 10 ते 35% वाढ झाल्याचे दिसते. निविदा प्रक्रिया राबविताना बाजारभावाशी सुसंगत दर प्राप्त होतील याची निविदा समितीने दक्षता घेणे व तसे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

प्रभाग समिती 'ई' मधील आरोग्य विभागाची किटक नाशके सन 2011-12 विनियोग नोंदवही तपासली असता पायरेथ्रम 150 लि व वेस्ट स्ट्रीट 82 लि दिनांक 01/04/11 रोजी शिल्लक असल्याचे लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आले आहे. सदर किटक नाशके दिनांक 31/03/12 पर्यंत वापरलेली नाहीत. दिनांक 01/04/11 ते दिनांक 31/03/12 हया एक वर्षामध्ये उपरोक्त किटक नाशके न वापरण्याबाबत खुलासा करावा. पायरेथम 1 लिटर चा रु. 1389/- आहे म्हणजे 15 x 1389 = 2,08,350/- तसेच वेस्ट स्ट्रीट चा 1 लि. दर रु. 85/- आहे म्हणजेच 82 x 85 = 6970 एकुण रुपये 2,15,320 एवढया किंमतीची किटक नाशके सन 2011-12 मध्ये न वापरल्याने महानगरपालिकेचा निधी अनावश्यकरित्या अडकुन पडला तसेच सदरची किटक नाशके इतर प्रभाग समितीला वर्ग करुन वापरात आणणे शक्य होते. सदरची रक्कम रु. 2,15,320/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु**. 2,15,320/-**

प्रभाग समिती 'अ' आरोग्य विभागातील जंतूनाशक विनियोजन नोंदवही तपासली असता खाली नमूद केलेल्या त्रूटी निदर्शनास आलेल्या आहेत.

दिनांक 21/11/11 रोजी बायोटेक्स 1000, 358 लि . शिल्लक होते. कार्यालयीन आदेश क्र. वविशम/1018/11 दि. 19/11/11 नुसार पुनश्च 300 लि. बायोटेक्स 1000 मागविण्यात आले. विनियोग नोंदवही तपासली असता दरदिवशी फक्त 1 लि. एवढा वापर होतो. दि. 21/11/11 रोजी शिल्लक असलेले 358 लि. बायोटेक्स 1000 पुढील वर्षासाठी पुरेसे असताना संबंधीत विभागाने अनावश्यक मागणी केली आहे. बोयोटेक्स 1000 चा दर प्रति लि. 179.80 आहे. म्हणजेच 179.80 x 300 = 53,940/- सदर रु.53,940/- अनावश्यक गुंतविण्यात आलेले आहेत. म्हणून सदरची रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 53940/-

डांबर गोळी व मेलिथिन पावडर या दोन्ही औषधाचा विनियोग नोंदवही मध्ये दि. 01/04/11 ते दि. 12/09/11 पर्यंत वापर झाल्याचे निदर्शनास येत नाही.

मिलेथिन पावडर दि. 26/10/11 रोजी 3900 किलो शिल्लक होती कार्यालयीन आदेश क्र. वविशम/भां/787 दि. 13/10/11 नुसार पुनश्च: 5000 किलो पावडर मागविण्यात आली. शिल्लक मिलेथम पावडर 3900 किलो ही दि. 31/03/12 पर्यंतच्या वापरास पुरेशी असताना पुनश्च: 5000 किलो पावडरची मागणी संबंधीतानी केली. मिलेथिन पावडर प्रति किलो रु. 25/- चा दर म्हणून 5000 किलो x 25 = 1,25,000/- ची मिलेथिन पावडरवर अनावश्यक गुंतविण्यात आले. म्हणून सदरची रक्कम रु.1,25,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 125000/-

गोकिलॅथ दिनांक 25/10/11 ते दिनांक 31/12/11 पर्यंत विनियोग नोंदवही मध्ये नोंद केली आहे परंतू स्विकारणाऱ्याच्या व देणाऱ्याच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तसेच दिनांक 01/01/12 पासुन विनियोग नोंदवही मध्ये नोंद घेतलेली नाही.

8) फॉगिंग मशिन साठी लागणारे पेट्रोल व डिझेल पावती पुस्तके तपासली असता सदर पावती

पुस्तके महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियमक 9 (1 ते 8) नुसार भांडारपाल यांचे कडून प्रमाणित करुन देणे क्रमप्राप्त असताना पावती पुस्तक क्र. 12,23,43,66 भांडारपाल यांचे कडून प्रमाणित करुन घेतलेले नाही. सदर पावती ही पेट्रोल व डिझेल पंपावरुन घेण्यासाठी वापरण्यात येते, सदर पावतीवर स्वाक्षरी ठेका कर्मचारी करतो. व सदर पुस्तक हे ठेका कर्मचारी यांचे ताब्यात असते. पेट्रोल डिझेलसाठी वापरण्यात येणारे पावती पुस्तक ठेका कर्मचाऱ्याकडे ठेवणे नियमानूसार नाही. सदर पावती पुस्तकाचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 153 नुसार पेट्रोल डिझेलचा लेखा ठेवलेला नाही.

9) निविदेसोबत घ्यावयाची इसारा रक्कम मुळ अंदाजाच्या 1% एवढी घेणे क्रम प्राप्त होते. जंतूनाशके खरेदी अंदाजित रक्कम 4.50 कोटी आहे. म्हणजेच रु. 4.50 लाख एवढी इसारा रक्कम निविदेसोबत घेणे आवश्यक होते परंतू ठेकेदार यांचे कडून रु. 2.13 लाख एवढीच घेण्यांत आली आहे.

10) जंतुनाशके अंतर्गत रक्कम रु. 4.50 कोटी एवढी आहे. ठेकेदार यांचे कडून सुरक्षा अंदाजित रकमेच्या 5% म्हणजे 22,50,000 एवढी घेणे आवश्यक होते प्रत्यक्ष ठेकेदार यांचे कडून रु. 4.50 लाख एवढीच सुरक्षा अनामत घेतली आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 57)

## *46 नवघर-माणिकपुर, प्रभाग 'ड' यांचे वाहन दुरुस्तीवरील खर्च.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :वाहन दुरुस्ती निगा , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 823950.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 64500.00/-

***स्थायी समितीची वित्तिय मंजुरी नसताना वाहन दुरुस्तीवर खर्च करण्यात आला आहे.***

| कामाचे नाव | वाहन दुरुस्ती |
|---|---|
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. युनिव्हर्सल ऑटोमोबाईल |
| तांत्रिक मंजुरी | - |
| प्रशासकीय मंजुरी | प्र. ठराव क्र. 307, दि. 22/3/2010 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | - |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 21.50 लाख |
| बजेट तरतुद | 71.50 लाख |

| | |
|---|---|
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 8 दिवस, दै.सामना, दि.2/2/2009.<br>दि. 2/2/2009 ते 10/2/2009 |
| इसारा रक्कम | रु. 20,000/- |
| निविदा रक्कम | - |
| सुरक्षा अनामत | - |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 500/- |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | वविशम/3611/2010-11, दि. 31/3/2010 |
| काम सुरु दिनांक: | - |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | - |
| प्रमाणक क्र. | - |

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत नवघर-माणिकपूर प्रभाग समिती यांनी सन 2009-10 करीता वाहन दुरुस्ती करीता दै. सामना वृत्तपत्रामध्ये जाहीर निविदा प्रसिध्दी देऊन न्यूनतम दर असलेले मे. युनिव्हर्सल ऑटोमोबाईल यांना वाहन दुरुस्ती ठेका दिलेला आहे. वाहन दुरुस्ती ठेका नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

शा.नि.2 जाने 1992 व नप्रस/नि/05/प्र.क्र.151/05/9, दि. 29/12/2005 नुसार मे. युनिव्हर्सल ऑटोमोबाईल यांचेकडून कमीत कमी 3% अनामत रक्कम वसूल करणे क्रमप्राप्त होते. कामाची अंदाजित रक्कम 21.50 लाख एवढी असून सदर रक्कमेवर रु. 64,500/- सुरक्षा अनामत ठेकेदार यांचे कडून वसूल करण्यांत यावी.

वसूलपात्र रक्कम रु. **64,500/-.**

वाहन दुरुस्ती ठेका सन 2009-10 साठी मे. युनिव्हर्सल ऑटोमोबाईल यांना देण्यात आला आहे. प्रशासकीय ठराव क्र. 307, दि. 22/3/2010 नुसार पुनश्च् सन 2010 - 11 साठी सदर ठेकेदार यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. शा.नि. 2 जाने 1992 नुसार फक्त सहा महिने ठकेदार यांना मुदतवाढ देय आहे. 1 वर्षासाठी संबंधीत ठेकेदार यांना कोणत्या नियमानुसार मुदतवाढ देण्यात आली याचा खुलासा लेखापरीक्षणास झाला नाही.

प्रभाग समिती नवघर-माणिकपूर यांची मोटर वाहन दुरुस्ती नस्ती तपासल्या असता सन 2011-12 मध्ये रु. 8,23,950/- एवढा वाहन दुरुस्तीवर खर्च केलेला आहे. सन 2011-12 नस्तीमध्ये उपरोक्त खर्चासाठी आयुक्तांची वित्तीय मंजूरी घेतलेली नाही. म्हणून सन 2011-12 मध्ये केलेला खर्च रु.8,23,950/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. **8,23,950/-**

## ***47 महापालिकेसाठी वाहन भाडेतत्वावर घेणे.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :भाडे तत्वावरील वाहन , महानगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 537900.00/-

***इसारा रक्कम, सुरक्षा अनमत व मुद्रांक शुल्क नियमानुसार स्विकारण्यात आलेले नाही. वाहन उपलब्ध करुन दिलेल्या अधिका-यांना वेतनामध्ये वाहतुक भत्ताही अदा करण्यात येत आहे.***

| कामाचे नाव | महापालिकेसाठी वाहन भाडेतत्वावर घेणे |
|---|---|
| स.सं./ठेकेदाराचे नाव | ओमकार टूर्स, विणा ट्रॅव्हल्स, एन.एम. ट्रान्सपोर्ट, शिवशंभू ट्रेडर्स, सदगुरु ट्रेडिंग व श्री. गणेश ट्रेडर्स. |
| तांत्रिक मंजुरी | - |
| प्रशासकीय मंजुरी | सर्वसाधारण सभा ठराव क्र. 8 दि. 3/3/2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | - |
| अंदाजपत्रकाची रक्कम | - |
| बजेट तरतुद | 71.50 लाख |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. सकाळ व महाराष्ट्र बुलंद टाईम्स<br>दि. 11/3/11 ते 21/3/11 |
| इसारा रक्कम | रु. 20,000/- |
| निविदा रक्कम | - |
| सुरक्षा अनामत | 1 लाख |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 700/- |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | वविशम/96ते102/2010-11, दि. 30/5/2011 |
| काम सुरु दिनांक: | - |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | - |
| प्रमाणक क्र. | - |

वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी सन 2011-12 मध्ये महापालिकेसाठी लागणारी वाहने

भाडेतत्वावर घेण्यासाठी दै. बुलंद टाईम्स व दै.सकाळ या स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रियेमध्ये एकूण सात निविदाकारांनी भाग घेतला असून सर्व निविदाकार यांना ठराविक घटक मंजूर झालेले आहेत. सदरची वाहन भाडेतत्वावरील नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

दै. सकाळ व बुलंद टाईम्स या वृत्तपत्रामध्ये जाहीर निविदा प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. निविदा प्रसिध्दीमध्ये अंदाजित रक्कम नमूद केलेली नाही. अंदाजित रक्कम नमूद न करता सुरक्षा अनामत रु. 1 लाख ठरविण्यात आली. तसेच शा.नि. 2 जाने 1992 नुसार इसारा रक्कम ही अंदाजित रक्कमेच्या 1% घेण्याबाबत सूचित केले असताना इसारा रक्कम रु. 20,000/- एवढी घेण्यात आली.

| | |
|---|---|
| इसारा रक्कम 71.50 लाखावर 1% प्रमाणे | = 71500/- |
| घेतलेली इसारा रक्कम | = 20000/- |
| कमी घेतलेली इसारा रक्कम | = 51500/- |

वसूलपात्र रक्कम रु. 51,500**/-**

सुरक्षा अनामत शा.नि. 2 जाने 1992 व नप्रसं/निविदा मागविणे/05 प्र.क्र. 151/05/09, दि. 29/12/2005 नुसार ठेकेदार यांचेकडून 10% सुरक्षा अनामत रु. 4,66,500/- सुरक्षा अनामत रक्कम घेणे क्रमप्राप्त होते. नस्तीमध्ये मंजूर ठेकेदार यांचेकडून सुरक्षा अनामत घेतल्याची पावती ही लेखा परिक्षणास उपलब्ध झालेली नाही. करीता सदर रक्कम रु. 4,66,500/- वसूलपात्र ठेवण्यांत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु**. 4,66,500/-**

वसई-विरार शहर महापालिका अंतर्गत कार्यरत प्र. सहाय्यक आयुक्त, शाखा अभियंता यांना महापालिकेच्या वतीने कार्यालयीन कामासाठी वाहन पुरवठा करण्यांत आलेला आहे. उपरोक्त अधिकारी वर्गाचे वेतन देयक तपासले असता संबंधीताना प्रवास भत्ता देण्यांत आला आहे. तरी. प्र. स. आयुक्त, शाखा अभियंता यांना ज्या दिनांकापासून कार्यालयीन कामासाठी वाहन देण्यांत आले आहे त्या दिनांकापसून ते आजपर्यंत त्यांना सन 2011-12 मध्ये दिलेला एकुण वाहतुक भत्ता रु. 16,800/- वसूल करण्यांत यावा व यापुढे ज्या अधिकाऱ्यांना वाहन देण्यांत आलेले आहे त्यांना वाहतुक भत्ता अदा करण्यात येऊ नये. प्रस्तुत प्रकरणीची नस्ती तपासत असताना संबंधित अधिक-यांना वाहन वाटप केल्याचे कार्यालयीन आदेशांची मागणी संबंधितांकडे करण्यात आली होती तथापि ती उपलब्ध झाली नसल्याने संबंधित अधिका-यांकडुन वसुल करावयाची रक्कम लेखापरीक्षणास परिगणित करता आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 16,800/-

सन 2011-12 मध्ये भाडेतत्वावर वाहनासाठी एकूण खर्च रु. 46.65 लाख एवढा झालेला आहे. ठेकेदार यांचेशी करारपत्र करते वेळी फक्त रु. 700/- मुद्रांक शुल्कावर करार पत्र केले आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरुस्ती /सुधारणा क्र. 12, दि. 1/5/2006 नुसार करारनामा करताना कराराच्या रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखकरीता रु.100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल रु. 5.00 लाखाच्या मर्यादेपर्यंत भरणे बंधनकारक आहे. त्यानुसार ठेकेदार यांचे कडून रु. 3800/- मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक होते. उर्वरीत मुद्रांक शुल्क रु. 3100/- त्यांचेकडून वसूल करून शासन खाती जमा करावेत.

वसूलपात्र रक्कम रु. **3100/-**

वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी भाडेतत्वावर वाहन घेण्यासंबंधी निविदा मागविताना प्रति 12 तास दराने वाहनाचा दर मागविण्यात आला आहे. शा.नि. नप्रस/वाहन धोरण/2005/प्र. क्र. 05/09, दि. 10/5/2005 अ.क्र. 20 प्रमाणे दर निश्चित केलेले नाहीत किंवा प्रति महीना दर मागविलेले नाहीत.

वाहने भाडेतत्वावरील नस्ती तपासली असता एकूण सात ठेकेदार यांनी निविदा भरलेल्या आहेत. सदरच्या निविदा उघडण्याचा शिक्का मारलेला असून सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली आहे. परंतू निविदा उघडण्याची तारीख व वेळ नमूद केलेली नाही.

याबाबत देण्यात आलेल्या अर्धसमास पत्र क्र. 130 दि. 18/6/2013 ला दि. 2/07/2013 रोजी अनुपालन प्राप्त झाले असुन त्यापैकी आक्षेप क्र. 5 व 6 चे अनुपालन मान्य करण्यात येत आहे. आक्षेप क्र. 3 बाबत कार्यवाही पुर्ण झालेली नसल्याने व क्र. 1,2 व 4 चे अनुपालन असमाधानकारक असल्याने सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत

DPSKGGM6001 (Ref No : 46)

## *48 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या भागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- वसई विभाग.*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 318329.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर अॅक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.13 दि. 7.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | उपलब्ध झाली नाही. |
| अर्थसंकल्प तरतुद | 47 लाख |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 13,50,480/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 8,10,288/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 7,200/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/547/2011दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः**03.10.2011** | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 10/2011 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 8882/5.3.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षातर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

वसई विभागातील 81,82,83,85,86,87,88,89 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्य होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 5 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली यांची दरमहा रु. 13,50,480/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये मंजुरी देण्यात आली. प्रस्तुत नस्ती तपासली असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात

येत आहेत.

वसई विभागातील 8 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

नस्तीमध्ये फक्त मंजुरीप्राप्त निविदाकार मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा. लि. यांचीच निविदा कागदपत्र उपलब्ध असल्याने संपुर्ण निविदा प्रक्रियेची तपासणी करता आली नाही. मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा. लि. त्यांच्या निविदा फॉर्म ब-1 मध्ये मागणी करण्यात आलेली माहिती जसे, या कामी वापरण्यात यावयाच्या कामग़ारांची व वाहनांची संख्या दर्शविलेली नाही. तरीही त्यांची निविदा स्विकारण्यात आलेली आहे. निविदा स्विकृतीनंतर ठेकेदाराने 107 मजुर, 6 डम्पर व 2 ट्रॅक्टर पुरविण्याचे दिनांक निरंकच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 8882 दि. 5.3.12 रु. 10,38,367/- अन्वये या महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा. लि. यांची दरमहा रु. 1350480/- म्हणजेच प्रतिदिन 1350480/31 दिवस = रु. 43564/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतीदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 107 कमगारांचे प्रतिदिन वेतन रु. 22791/- (+) 40% लेव्ही रु. 9116/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 31907/-. म्हणजेच प्रतिदिन 8 वाहनाचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 43564/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 31907/- = रु. 11657/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. माहे ऑक्टोबर 2011 मध्ये 29 दिवस 2634 कर्मचा-यांचा पुरवठा केला असल्याने (निविदा व करारनाम्यानुसार प्रतिदिन 107 प्रमाणे 29 दिवसाकरीता 3103 कामगारांचा पुरवठा करणे आवश्यक होते.) व प्रतिदिन किमान वेतन रु. 222/- पर्यंत वाढल्याने वेतनापोटी रु. 584748/- (+) 40% लेव्ही रु. 233899/- एकुण रु. 818647/- रक्कम देय होती तसेच वाहन खर्चापोटी रु. 10308/-(किमान वेतन दर प्रतिदिन रु. 222/- झाल्याने) (*) 29 दिवस म्हणजे रु. 298932/- असे एकुण

रु.1117579/- स्थुल रक्कम देय होते. या रकमेतुन घंटागाड्यांचे भाडे रु. 4200/-, नागरिकांच्या तक्रारीनुसार दंड रु. 10000/- व करारनाम्यातील अट क्र. 18 नुसार कमी पुरवठा केलेल्या 469 कर्मचा-यांकरीता किमान वेतनाच्या दुप्पट दराने दंड रु. 208236/- व 2% आयकर रु.18685/- असे एकुण रु. 241121/- वसुल करुन रु. 876458/- अदा करणे आवश्यक असताना रु.1038367/- इतक्या रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. ठेकेदारास रु. 161909/- अतिरिक्त प्रदान करण्यात आले आहे. सदर रक्कम रु. 161909/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

लेव्हीमध्ये अदा करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे ऑक्टोबर 2011 मध्ये सदर रक्कम रु. 48710/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 48710/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

करारनामा अट क्र. 15 नुसार कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा उतरविणे आवश्यक आहे, त्याकरीता ठेकेदारास 1.67% लेव्ही देण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराने कामगारांचा विमा उतरविल्याचे दिसुन येत नाही. करीता त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम रु. 9765/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वरील अभिप्राय क्र. 4 नुसार कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे. ही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. करीता या दोन बाबींकरीता अदा करण्यात आलेली लेव्ही रु. 97945/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

याच पध्दतीने माहे नोव्हेंबर 2011 ते मार्च 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करुन वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुल रकमेची माहिती लेखापरीक्षणास अवगत करावी.

अ.क्र. 5अ ते उ पर्यंत एकुण वसुलपात्र रक्कम रु. 3**18329/-**

DATSCDM6901 (Ref No : 47)

## *49 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नवघर- माणिकपुर (पुर्व)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1775620.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नवघर माणिकपुर (पुर्व) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. रिलायबल एजन्सी |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.14 दि. 27.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | उपलब्ध नाही. |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 4134072/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 12,40,222/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 24,000/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/538/2011दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः**03.10.2011** | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयकएकुण खर्च रक्कम | माहे 10/2011 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 8352/20.1.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षांतर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

नवघर-माणिकपुर (पुर्व) विभागातील 56,65,60,64,62,63,78,28,61 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 5 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन, भाईंदर यांची दरमहा रु. 41,34,072/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये मंजुरी देण्यात आली. मे.गुरुजी कन्स्ट्रक्शन यांना दि. 17.9.11 च्या पत्रान्वये निविदा स्विकृत झाल्याचे व अनामत रक्कम रु. 12,40,222/- जमा करुन करारनामा करण्याबाबत कळविण्यात आले. मे.गुरुजी कन्स्ट्रक्शन यांनी निविदा स्विकृतीचे पत्र प्राप्त झालेवर काम करण्यास असमर्थ असल्याबाबत कळविल्यावरुन क्र.2 चे न्युनतम निविदाकार मे. रिलायबल एजन्सीज (त्यांचे दरमहा दर रु.50,08,995/- असे होते) यांना मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या दराने काम करण्यास असल्याबाबत विचारणा केल्यावरुन त्यांनी 235 कामगार, 11 डम्पर,7 ट्रॅक्टरसह काम करण्यास तयारी दर्शविली. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नवघर-माणिकपुर विभागातील 9 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

ठेकेदाराकडुन निविदा रकमेच्या 5% रु. 12,40,222/- अनामत रक्कम जमा झाल्याचे नस्तीतील कागदपत्रावरुन निदर्शनास आले नाही. सदर रक्कम रु.1240222/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने

ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.
मे. रिलायबल एजन्सीज हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असुन त्यांचा परवाना माहे 12/2009 पर्यंत वैध होता तसेच त्यांना 50 कामगारांपर्यंतच कामगार नियुक्त करण्याचा परवाना देण्यात आला आहे. असे असतानाही त्यांना 235 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.
निविदा कागदपत्रांमध्ये बेसिन कॅथॉलिक बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु.50,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 2.50 कोटीचा ठेका देण्यात आला.
कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 8352 दि. 20.1.12 रु. 35,71,987/- अन्वये या महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.
मे. रिलायबल एजन्सीज यांची दरमहा रु. 41,34,072/- म्हणजेच प्रतिदिन 4134072/31 दिवस = रु. 133357/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतीदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 235 कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 50055/- (+) 40% लेव्ही रु. 20022/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 70077/-. म्हणजेच प्रतिदिन 18 वाहनांचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 133357/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 70077/- = रु. 63280/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. माहे ऑक्टोबर 2011 मध्ये 29 दिवस 6443 कर्मचा-यांचा पुरवठा केला असल्याने (निविदा व करारनाम्यानुसार प्रतिदिन 235 प्रमाणे 29 दिवसाकरीता 6815 कामगारांचा पुरवठा करणे आवश्यक होते.) व प्रथमच महिन्यात प्रतिदिन किमान वेतन रु. 222/- पर्यंत वाढल्याने वेतनापोटी रु. 1430346/- (+) 40% लेव्ही रु. 572138/- एकुण रु. 2002484/- रक्कम देय होती तसेच वाहन खर्चापोटी रु. 60319/-(किमान वेतन दर प्रतिदिन रु. 222/- झाल्याने) (*) 29 दिवस म्हणजे रु. 1749251/- असे एकुण रु.3751735/- स्थुल रक्कम देय होते. या रकमेतुन वाहने कमी पुरविण्याबद्दलचा आकार रु. 62000/-, नागरिकांच्या तक्रारीनुसार दंड रु. 13000/- व करारनाम्यातील अट क्र. 18 नुसार कमी पुरवठा केलेल्या 372 कर्मचा-यांकरीता किमान वेतनाच्या दुप्पट दराने दंड रु. 231235/- व 2% आयकर रु.68910/- असे एकुण रु. 375145/- वसुल करुन रु.3376590/- इतक्या रकमेचे निव्वळ प्रदान करणे आवश्यक असताना रु. 35,00,547/- निव्वळ प्रदान करण्यात आलेले असल्याने ठेकेदारास रु. 195397/- अतिरिक्त प्रदान करण्यात आले आहे. सदर रक्कम रु. 195397/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.
लेव्हीमध्ये अदा करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे ऑक्टोबर 2011 मध्ये सदर रक्कम रु. 119148/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 119148/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.
करारनामा अट क्र. 15 नुसार कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा उतरविणे आवश्यक आहे, त्याकरीता ठेकेदारास 1.67% लेव्ही देण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराने कामगारांचा विमा उतरविल्याचे दिसुन

येत नाही. करीता त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम रु. 23887/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.
कामगारांच्या सुरक्षा व सुविधेकरीता विविध 6 बाबींकरीता किमान वेतन कायद्यानुसार देय वेतनावर अधिकची 34.75% लेव्ही ठेकेदारास अदा करण्यात येते. हे लेव्हीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरीता ठेकेदारास प्रशासकीय खर्चाकरीता अतिरिक्त 5.25% लेव्ही अदा करण्यात येते. सदर 6 बाबींच्या रकमा संबंधित शासकीय आस्थापनांकडे जमा करण्यात आलेली नसल्याने प्रशासकीय खर्चाकरीता ठेकेदारास अदा करण्यात आलेली लेव्ही रु. 1,96,966/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.
याच पध्दतीने माहे नोव्हेंबर 2011 ते मार्च 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करुन वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास अवगत करावी.

अ.क्र. 2 व 5 अ ते उ पर्यंत एकुण वसुलपात्र रक्कम रु. **1775620/-**

DATSCDM6901 (Ref No : 48)

## *50 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार (पश्चिम) (अ)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2720575.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 487749.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | विरार (पश्विम) (अ) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. श्री. अनंत एण्टरप्राइजेस |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.13 दि. 7.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 14,18,00,000 |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 25,53,115/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 7,65,935/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 9,900/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/541/2011-12दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः03.10.2011 | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 3/2012 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. रु.27,20,575/- |
| प्रमाणक क्र. 1344/4.8.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षांतर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

विरार (पश्चिम)(अ) विभागातील 11,12,13,18,22,23 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 5 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. श्री. अनंत एण्टरप्राईजेस,विरार यांची दरमहा रु. 25,53,115/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि.

7.9.11 अन्वये  मंजुरी देण्यात आली. मे. श्री. अनंत एण्टरप्राईजेस,विरार यांनी निविदा सादर करताना 210 कामगार पुरविण्याबाबत फक्त उल्लेख केला असुन पुरविण्यात येणा-या वाहनांची संख्या नमुद केलेली नसताना त्यांना दि. 19.9.11 च्या पत्रान्वये निविदा स्विकृत झाल्याचे व अनामत रक्कम रु. 7,65,935/- जमा करुन करारनामा करण्याबाबत कळविण्यात आले. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

विरार (पश्चिम)(अ) विभागातील 6 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मे. श्री. अनंत एण्टरप्राईजेस,विरार हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोड्ण्यात  आलेले नसताना निविदा स्विकृत करण्यात आली आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये कॉर्पोरेशन  बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु.25,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 1.53 कोटीचा ठेका देण्यात आला.

दरमहा रु. 25,53115/- चा दर असल्याने निविदा रक्कम रु. 1,53,18,690/- या र्कमेकरीत रु. 14500/- मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असताना रु. 9900/- वसुल करण्यात आले आहेत. करीता रु. 4600/- मुद्रांक शुल्क वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत.

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 1344 दि. 4.8.12 रु. 27,20,575/- अन्वये या महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

वरील अभिप्राय क्र. 3 नुसार कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे. ही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. करीता प्रदान देयकाची संपुर्ण रक्कम रु.27,20,575/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेव्हीमध्ये अदा करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे मार्च 2012 मध्ये सदर रक्कम रु. 125770/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 125770/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

करारनामा अट क्र. 15 नुसार कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा उतरविणे आवश्यक आहे, त्याकरीता ठेकेदारास 1.67% लेव्ही देण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराने कामगारांचा विमा उतरविल्याचे दिसुन येत नाही. करीता त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम रु. 25214/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वरील अभिप्राय क्र. 4 नुसार कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे. ही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. करीता या दोन बाबींकरीता अदा करण्यात आलेली लेव्ही रु. 252898/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

कामगारांच्या सुरक्षा व सुविधेकरीता विविध 6 बाबींकरीता किमान वेतन कायद्यानुसार देय वेतनावर अधिकची 34.75% लेव्ही ठेकेदारास अदा करण्यात येते. हे लेव्हीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरीता ठेकेदारास प्रशासकीय खर्चाकरीता अतिरिक्त 5.25% लेव्ही अदा करण्यात येते. सदर 6 बाबींच्या रकमा संबंधित शासकीय आस्थापनांकडे जमा करण्यात आलेली नसल्याने प्रशासकीय खर्चाकरीता ठेकेदारास अदा करण्यात आलेली लेव्ही रु. 79267/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

याच पध्दतीने माहे नोव्हेंबर 2011 ते मार्च 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करुन वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

अ.क्र. अ ते उ पर्यंत एकुण आक्षेपाधिन रक्कम रु. 27,20,575/- व वसुलपात्र रक्कम रु. **487749/-.**

DATSCDM6901 (Ref No : 49)

## *51 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नवघर- माणिकपुर (पश्चिम)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1317644.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1193002.00/-

| |
|---|
| ***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे*** |

***मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर अॅक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नवघर माणिकपुर (पश्चिम) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. रिलायबल एजन्सी |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.14 दि. 27.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | उपलब्ध नाही. |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 62,53,390/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 1876017/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 24,000/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/538/2011दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः03.10.2011 | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 10/2011 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 7660, 7661 दि. 30.12.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षातर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

नवघर-माणिकपुर (पुर्व) विभागातील 56,65,60,64,62,63,78,28,61 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 5 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन, भाईंदर यांची दरमहा रु.62,53,390/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये मंजुरी देण्यात आली. मे.गुरुजी कन्स्ट्रक्शन यांना दि. 17.9.11 च्या पत्रान्वये निविदा स्विकृत झाल्याचे कळविण्यात आले. मे.गुरुजी कन्स्ट्रक्शन यांनी निविदा स्विकृतीचे पत्र प्राप्त झालेवर काम करण्यास असमर्थ असल्याबाबत कळविल्यावरुन क्र.2 चे न्युनतम निविदाकार मे. रिलायबल एजन्सीज (त्यांचे दरमहा दर रु.73,88,840/- असे होते) यांना मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या दराने काम करण्यास असल्याबाबत विचारणा केल्यावरुन त्यांनी 380 कामगार, 15 डम्पर, 8 ट्रॅक्टरसह काम करण्यास तयारी दर्शविली. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नवघर-माणिकपुर(पश्चिम) विभागातील 14 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि. 1.5.2006 नुसार निविदा रकमेच्या प्रथम रु. 10 लक्षापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक रु. 1 लक्षाकरीता रु. 100/-

प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणी ठेकेदाराकडुन रु. 36,700/- मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक असताना रु. 24,000/- वसुल करण्यात आले आहेत. करीता उर्वरीत रक्कम रु. 12,700/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत. अहवाल वाचन व अंतिमीकरणप्रसंगी भरणा चलन दर्शविण्यात आल्याने मुद्दा वगळण्यात आला.

मे. रिलायबल एजन्सीज हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असुन त्यांचा परवाना माहे 12/2009 पर्यंत वैध होता तसेच त्यांना 50 कामगारांपर्यंतच कामगार नियुक्त करण्याचा परवाना देण्यात आला आहे. असे असतानाही त्यांना 380 तसेच नवघर-माणिकपुर (पुर्व) करीता 235 एकुण 615 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये बेसिन कॅथॉलिक बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु.50,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 3.75 कोटी व नवघर माणिकपुर(पुर्व) करीता रु.. 2.50 कोटी असा एकुण कोटीचा ठेका देण्यात आला.

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 7660 व क्र. 7661 दि. 30.12.12 अनुक्रमे रु. 26,84,630/- व रु. 33,04,160/- अन्वये या महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

मे. रिलायबल एजन्सीज यांची दरमहा रु. 6253390/- म्हणजेच प्रतिदिन 6253390/31 दिवस = रु. 201722/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतीदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 380 कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 80940/- (+) 40% लेव्ही रु.32376/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 113316/-. म्हणजेच प्रतिदिन 23 वाहनांचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 201722/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 113316/- = रु. 88406/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. वस्तुतः कार्यादेश दि. 1.10.2011 रोजी निर्गमीत करताना व ऑक्टोबर महिन्याचे प्रथमच देयक अदा करताना कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि. 5.8.2011 च्या आदेशान्वये कामगारांचे प्रतिदिन किमान वेतन दर वाढुन रु.222/- झाल्याने वापरण्यात आलेल्या परिगणन सुत्रानुसार 23 वाहनांचा प्रतिदिन खर्च रु. 83618/- म्हणजेच प्रतिदिन प्रतिवाहन खर्च रु. 3635/- असणे आवशक होते. ऑक्टोबर महिन्याचे प्रदान करताना वाहन खर्च प्रतिदिन रु. 88406/- प्रमाणे परिगणित केल्याने रु. 1,38,852/- चे अतिप्रदान झाले आहे. त्यामुळे रु. 1,38,852/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

लेव्हीमध्ये अदा करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे ऑक्टोबर 2011 मध्ये सदर रक्कम रु. 285304/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 285304/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

तपासणीदरम्यान मे. रिलायबल एजन्सीने नवघर-माणिकपुर (पुर्व) व (पश्चिम) या दोन्ही विभागातील कामाकरीता वापरण्यात येणा-या वाहनांचा तपशील उपलब्ध झाला. त्या यादीनुसार एजन्सीने एकुण 25 डंम्पर व 13 ट्रॅक्टर पुरवठा केल्याचे निदर्शनास येते. निविदा करारानुसार एजन्सीने एकुण 26 डंम्पर व 15 ट्रॅक्टर पुरवठा करणे आवश्यक होते. म्हणजे 1 डंम्पर व 2 ट्रॅक्टरचा कमी पुरवठा केला आहे.

तसेच गोखीवरे येथील कचराक्षेपण केंद्राकडील अभिलेख तपासले असता, दिलेल्या वाहनांच्या यादीपैकी 4 डंम्पर व 3 ट्रॅक्टरने ऑक्टोबर 2011 मध्ये एकदाही कचरा वाहतुक केल्याचे निदर्शनास येत नाही. आरोग्य विभागाने सर्व 41 वाहने पुरवठा केल्याचे प्रमाणित केल्याने सदर एजन्सीस माहे 3.10.11 ते 31.10.11 या कालावधीचे पुर्ण प्रदान करण्यात आले आहे. वास्तविकतः वरील कमी पुरवठा केलेल्या 10 वाहनांकरीता प्रतिदिन प्रतिवाहन रु. 3635/- प्रमाणे रु. 10,54,150/- इतक्या रकमेची वसुली करणे क्रमप्राप्त होते. सदर रकमेची वसुली करण्यात यावी. तोपर्यंत रक्कम रु.10,54,150/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

उपलब्ध वाहने प्रत्येक दिवशी वापरल्याचे निदर्शनास येत नाही. गोखीवरे येथील कचराक्षेपण केंद्राकडील अभिलेख तपासले असता, वापरण्यात आलेल्या 31 वाहनांनी एकुण 615 फे-या केल्याचे दिसते. कचराक्षेपण केंद्राकडे प्रति वाहन प्रतिदिन कमीतकमी एक फेरी गृहित धरल्यास 31 वाहनांच्या 29 दिवसात एकुण 899 फे-या होणे आवश्यक होते म्हणजे एकुण 284 वाहने कमी वापरण्यात आली आहेत. याकरीता रु.10,32,340/- इतकी रक्कम आक्षेपाधिन ठरते.

याच पध्दतीने माहे नोव्हेंबर 2011 ते मार्च 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करुन वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

अ.क्र. 7 अ ते उ पर्यंत एकुण आक्षेपाधिन रक्कक्म रु. **13,17,644/-** व वसुलपात्र रक्कम रु. **11,93,002/-**

DATSCDM6901 (Ref No : 50)

## ***52 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा पुर्व (ब)***

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 268648.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 490297.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर अॅक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते***

***परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नालासोपारा पुर्व(ब) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. साई गणेश एण्टरप्राईजेस |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.13 दि. 07.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु.9,75,00,000/- |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 42,52,631/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 12,75,786/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 24,700/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/546/2011दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः03.10.2011 | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 10/2011 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 8777/24.2.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षांतर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

नालासोपारा पुर्व(ब) विभागातील 26,29,30,31,41,42,43 या प्रभागात दैनंदीन

साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 5 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. साई गणेश एण्टरप्राईजेस यांची दरमहा रु. 42,52,621/- दराची न्युनतम  निविदा स्विकारण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये  मंजुरी देण्यात आली. मे. साई गणेश एण्टरप्राईजेस यांनी निविदा सादर करताना 285 कामगार पुरविण्याबाबत फक्त उल्लेख केला असुन पुरविण्यात येणा-या वाहनांची संख्या नमुद केलेली नसताना त्यांना दि. 17.9.11 च्या पत्रान्वये निविदा स्विकृत झाल्याचे व अनामत रक्कम रु. 12,75,786/- जमा करुन कारारनामा करण्याबाबत कळविण्यात आले. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नालासोपारा पुर्व (ब) विभागातील 7 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मे. साई गणेश एण्टरप्राईजेस हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असुन त्यांचा परवाना माहे 12/2007 पर्यंत वैध होता तसेच त्यांना किती कामगार नियुक्त करण्याचा परवाना देण्यात आला आहे, याबाबतचे परवान्यासोबतचे सहपत्र निविदेसोबत जोडण्यात आलेले नाही. असे असतानाही त्यांना 285 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये बेसिन कॅथॉलिक बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु. 25,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 2.55 कोटीचा ठेका देण्यात आला.

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 8777 दि. 24.2.12    रु. 39,94,976/-  अन्वये या महिन्याचे प्रदान करण्यात आले

आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

मे. साई गणेश एण्टरप्राईजेस यांची दरमहा रु. 42,52,621/- म्हणजेच प्रतिदिन 4252621/31 दिवस = रु. 137181/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतीदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 285 कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 60705/- (+) 40% लेव्ही रु.24282/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 84987/-. म्हणजेच प्रतिदिन 12 वाहनांचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 137181/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 84987/- = रु. 52194/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. वस्तुतः कार्यादेश दि. 1.10.2011 रोजी निर्गमीत करताना व ऑक्टोबर महिन्याचे प्रथमच देयक अदा करताना कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि. 5.8.2011 च्या आदेशान्वये कामगारांचे प्रतिदिन किमान वेतन दर वाढुन रु.222/- झाल्याने वापरण्यात आलेल्या परिगणन सुत्रानुसार 12 वाहनांचा प्रतिदिन खर्च रु. 48603/- म्हणजेच प्रतिदिन प्रतिवाहन खर्च रु. 4050/- असणे आवश्यक होते. ऑक्टोबर महिन्याचे प्रदान करताना वाहन खर्च प्रतिदिन रु. 52194/- प्रमाणे परिगणित केल्याने रु. 1,04,139/-/- चे अतिप्रदान झाले आहे. त्यामुळे रु. 1,**04,139**/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वरील अभिप्राय क्र. 3 नुसार कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने लेव्हीची रक्कम रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे. ही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. करीता सदर रक्कम रु. 268648/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेव्हीमध्ये करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे ऑक्टोबर 2011 मध्ये सदर रक्कम रु. 135627/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 135627/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

करारनामा अट क्र. 15 नुसार कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा उतरविणे आवश्यक आहे, त्याकरीता ठेकेदारास 1.67% लेव्ही देण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराने कामगारांचा विमा उतरविल्याचे दिसुन येत नाही. करीता त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम रु. 27190/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

कामगारांच्या सुरक्षा व सुविधेकरीता विविध 6 बाबींकरीता किमान वेतन कायद्यानुसार देय वेतनावर अधिकची 34.75% लेव्ही ठेकेदारास अदा करण्यात येते. हे लेव्हीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरीता ठेकेदारास प्रशासकीय खर्चाकरीता अतिरिक्त 5.25% लेव्ही अदा करण्यात येते. सदर 6 बाबींच्या रकमा संबंधित शासकीय आस्थापनांकडे जमा करण्यात आलेली नसल्याने प्रशासकीय खर्चाकरीता ठेकेदारास अदा करण्यात आलेली लेव्ही रु. 85479/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

तपासणीदरम्यान मे.साई गणेश एण्टरप्राइजेस यांनी माहे ऑक्टोबर 2011 मध्ये 621 कामगारांचा कमी पुरवठा केला आहे. करारनाम्यातील अट क्र. 18 नुसार कमी पुरवठा केलेल्या कामगारांच्या प्रतिदिन वेतनाच्या दुप्पट दराने दंड आकारणी करण्याची तरतुद आहे. त्यानुसार रु. 275724/- दंड वसुल करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात देयकातुन रु. 137862/- दंड वसुल करण्यात आला आहे. करीता रक्कम रु. 137862/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

याच पध्दतीने माहे नोव्हेंबर 2011 ते मार्च 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करण्यात

यावी व वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु. 2,68,648/-

एकुण वसुलपात्र रक्कम रु. **4,90,297/-**

DATSCDM6901 (Ref No : 51)

## *53 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा (पश्चिम)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3514804.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 183632.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नालासोपारा (पश्चिम) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. लोकसेवा सर्व्हिसेस |

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.13 दि. 07.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 17,90,00,000/- |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 33,25,580/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 9,97,674/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 19,100/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/490/2011दि. 17.09.2011 |
| काम सुरु दिनांकः **03.10.2011** | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 03/2012 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 2757/12.11.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षातर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

नालासोपारा (पश्चिम) विभागातील 32,33,37,38,34,36,52 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 5 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. लोकसेवा सर्व्हिसेस यांची दरमहा रु. 41,92,095/- दराची न्युनतम निविदा होती. सदर निविदाकरासोबत दर कमी करण्याबाबत चर्चा करुन दरमहा रु.33,25,580/- ची दर निश्चिती करण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये मंजुरी देण्यात आली. मे. लोकसेवा सर्व्हिसेस यांनी निविदा सादर करताना 218 कामगार व 8 डंम्पर, 2 ट्रॅक्टर पुरविण्याबाबत उल्लेख केला आहे. त्यांना दि. 17.9.11 च्या पत्रान्वये

निविदा स्विकृत झाल्याचे व अनामत रक्कम रु. 9,97,674/- जमा करुन करारनामा करण्याबाबत कळविण्यात आले. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नालासोपारा (पश्चिम) विभागातील 7 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मे. लोकसेवा सर्व्हिसेस हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे अधिकृत परवानाधारक असल्याबाबतचे कागदपत्र निविदेसोबत जोडण्यात आलेले नाहीत. असे असतानाही त्यांना 218 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये बेसिन कॅथॉलिक बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु. 25,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 2 कोटीचा ठेका देण्यात आला.

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 2757 दि. 12.11.12 रु. 35,14,804/- अन्वये मार्च 2012 या महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

मे. लोकसेवा सर्व्हिसेस यांची दरमहा रु. 33,25,580/- म्हणजेच प्रतिदिन 3325580/31 दिवस = रु. 107277/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतीदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 218 कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 46434/- (+) 40% लेव्ही रु.18574/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 65008/-. म्हणजेच प्रतिदिन 10 वाहनांचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 107277/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 65008/- = रु. 42269/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. गोखिवरे कचरा क्षेपण केंद्रावर या वाहनांची प्रतिदिन एकच फेरी होत असल्याने या पद्धतीने परिगणना करुन निश्चित करण्यात आलेले वाहनांचे व इतर साहित्याचे दर अधिकचे आहेत. कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, वाहनचालकांची संख्या व त्यांचे देय वेतन,

साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा प्रक्रिया राबविल्याने महानगरपालिकेचे प्रतिदिन नुकसान होत आहे.

लेव्हीमध्ये करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे मार्च 2012 मध्ये सदर रक्कम रु. 183632/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 183632/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

या देयकासोबत, महिन्यातील पुरवठा केलेल्या कामगारांची व वाहनांची संख्या, प्राधिकृत आधिका-याने प्रमाणपत्र जोडलेले नसतानाही देयक पारीत करुन संबंधितास प्रदान करण्यात आले आहे. करीता देयकाची संपुर्ण रक्कम रु.35,14,804/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु. 35,14,804/-

एकुण वसुलपात्र रक्कम रु. **1,83,632**/-

DATSCDM6901 (Ref No : 52)

## *54 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका - नालासोपारा पुर्व (क)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2908718.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 176893.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर अॅक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे.***

| ***तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.*** |
|---|

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नालासोपारा पुर्व (क) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. बी. पी. तांडेल, नवी मुंबई |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती  ठराव क्र.13 दि. 07.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 17,90,00,000/- |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर,महाराष्ट्रटाईम्स,नरवीरचिमाजीदि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 27,26,438/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 8,17,931/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 15,500/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/546/2011दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः 03.10.2011 | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 03/2011 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 766/13.06.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षातर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

नालासोपारा पुर्व (क) विभागातील 47,48,49,50,51,58 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 5

निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन, भाईंदर यांची दरमहा रु. 27,26,438/- दराची न्युनतम  निविदा स्विकारण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये  मंजुरी देण्यात आली. मे.गुरुजी कन्स्ट्रक्शन यांना दि. 17.9.11 च्या पत्रान्वये निविदा स्विकृत झाल्याचे कळविण्यात आले. मे.गुरुजी कन्स्ट्रक्शन यांनी निविदा स्विकृतीचे पत्र प्राप्त झालेवर काम करण्यास असमर्थ असल्याबाबत कळविल्यावरुन क्र.2 चे न्युनतम निविदाकार मे. बी.पी. तांडेल (त्यांचे दरमहा दर रु. 35,53,325/- असे होते) यांना मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या दराने काम करण्यास तयार असल्याबाबत विचारणा केल्यावरुन त्यांनी 210 कामगार, 8 डम्पर, 2 ट्रॅक्टरसह काम करण्यास तयारी दर्शविली. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नालासोपारा पुर्व (क) विभागातील 6 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मे. बि. पी. तांडेल हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असुन त्यांचा परवाना सन 12/2001 पर्यंत वैध होता तसेच फक्त 29 कामगार नियुक्त करण्याचा परवाना देण्यात आला असल्याचे निविदेसोबतच्या उपलब्ध कगदपत्रांवरुन निदर्शनास येते. असे असतानाही त्यांना 210 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये बेसिन कॅथॉलिक बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु. 50,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 1.64 कोटीचा ठेका देण्यात आला.

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 766 दि. 13.6.12    रु. 29,08,718/-  अन्वये मार्च महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

मे. बी. पी. तांडेल यांची दरमहा रु. 27,26,438/- म्हणजेच प्रतिदिन 2726438/31 दिवस = रु. 87950/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतीदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 210 कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 44730/- (+) 40% लेव्ही रु.17892/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 62622/-. म्हणजेच प्रतिदिन 10 वाहनांचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 87950/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 62622/- = रु. 25328/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. नालासोपारा पुर्व (ब) विभागाकरीता 12 वाहनांकरीता प्रतिदिन वाहनखर्च रु.48603/- व नालासोपारा (पश्चिम) विभागाकरीता 10 वाहनांकरीता ही रक्कम रु. 42269/- निश्चित करण्यात आली आहे. प्रतिदिन वाहन खर्च परिगणीत करावयाच्या कार्यपद्धतीमुळे व निविदाप्रक्रिया राबविताना खर्चाचे अंदाजपत्रक तयार न केल्यामुळे ही तफावत आढळुन येते.

लेव्हीमध्ये करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे मार्च 2011 मध्ये सदर रक्कम रु. 176893/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 176893/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

सदर प्रमाणक तपासले असता देयकासोबत महिन्यात उपस्थित कामगार व वापरलेल्या वाहनांची संख्या संबंधित प्राधिका-याचे प्रमाणपत्र जोड्लेले नसताना देयक पारीत करुन प्रदान करण्यात आले आहे. करीता देयकाची संपुर्ण रक्कम रु. 29,08,718/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

याच पध्दतीने माहे ऑक्टोबर 2011 ते फेब्रुवारी 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करण्यात यावी व वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु. 29,08,718/-

एकुण वसुलपात्र रक्कम रु. **1,76,893/-**

DATSCDM6901 (Ref No : 53)

## *55 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार पुर्व (अ)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1451611.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | विरार पुर्व (अ) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. अनंत एण्टरप्राईजेस |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.13 दि. 07.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 14,18,00,000/- |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 30,53,115/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 9,15,935/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 12,900/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/539/2011-12 दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः 03.10.2011 | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक | माहे 10/2011 व मार्च 2012 चे देयक तपासणीस |

| | |
|---|---|
| एकुण खर्च रक्कम | उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 873/22.6.12 व 1348/4.8.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षातर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

नालासोपारा पुर्व(ब) विभागातील 4,5,14,15,16,17 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 3 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. अनंत एण्टरप्राईजेस यांची दरमहा रु. 35,53,115/- दराची न्युनतम निविदा प्राप्त झाली. संबंधित ठेकेदाराशी चर्चेअंती रु. 30,53,115/- दर निश्चित करण्यात येऊन स्विकारण्यात आले व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये मंजुरी देण्यात आली. मे. अनंत एण्टरप्राईजेस यांनी निविदा सादर करताना 210 कामगार पुरविण्याबाबत फक्त उल्लेख केला असुन पुरविण्यात येणा-या वाहनांची संख्या नमुद केलेली नसताना त्यांना दि. 17.9.11 च्या पत्रान्वये निविदा स्विकृत झाल्याचे व अनामत रक्कम रु. 9,15,935/- जमा करुन करारनामा करण्याबाबत कळविण्यात आले. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नालासोपारा पुर्व (अ) विभागातील 6 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी

असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणाऱ्या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मे. अनंत एण्टरप्राईजेस हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असुन त्यांचा परवाना माहे 12/2005 पर्यंत वैध होता तसेच त्यांना 150 कामगार नियुक्त करण्याचा परवाना देण्यात आला आहे, याबाबतचे परवान्यासोबतचे सहपत्र निविदेसोबत जोडण्यात आलेले नाही. असे असतानाही त्यांना 210 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये बेसिन कॅथॉलिक बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही. असे असताना निविदाकारास रु. 1.83 कोटीचा ठेका देण्यात आला.

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि. 1.5.2006 नुसार निविदा रकमेच्या प्रथम रु. 10 लक्षापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक रु. 1 लक्षाकरीता रु. 100/- प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणी ठेकेदाराकडुन रु. 17500/- मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक असताना रु. 12900/- वसुल करण्यात आले आहेत. करीता उर्वरीत रक्कम रु. 4600/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत.

वसुलपात्र रक्कम रु. 4600/-

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 873 दि. 22.6.12 व 1348 दि. 4.8.12 अनुक्रमे रु. 19,88,801/- व रु. 32,35,395/- ऑक्टोबर व मार्च महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

मे. अनंत एण्टरप्राईजेस यांची दरमहा रु. 30,53,115/- म्हणजेच प्रतिदिन 3053115/31 दिवस = रु. 98488/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतीदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 210 कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 44730/- (+) 40% लेव्ही रु.17892/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 62622/-. म्हणजेच प्रतिदिन 10 वाहनांचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 98488/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 62622/- = रु. 35866/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. वस्तुतः कार्यादेश दि. 1.10.2011 रोजी निर्गमीत करताना व ऑक्टोबर महिन्याचे प्रथमच देयक अदा करताना कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि. 5.8.2011 च्या आदेशान्वये कामगारांचे प्रतिदिन किमान वेतन दर वाढुन रु. 222/- झाल्याने वापरण्यात आलेल्या परिगणन सुत्रानुसार 10 वाहनांचा प्रतिदिन खर्च रु. 33220/- म्हणजेच प्रतिदिन प्रतिवाहन खर्च रु. 3322/- असणे आवश्यक होते. ऑक्टोबर महिन्याचे प्रदान करताना वाहन खर्च प्रतिदिन रु. 37886/- प्रमाणे परिगणित केल्याने रु. 1,35,315/- चे अतिप्रदान झाले आहे. त्यामुळे रु. 1,35,315/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

माहे ऑक्टोबर 2011 मध्ये दि. 3.10.13 ते 31.10.13 या कालावधीत प्रतिदिन 210 कामगार याप्रमाणे 29 दिवसाकरीता एकुण 6090 कामगार पुरविणे आवश्यक असताना ठेकेदाराने 3378 कामगारांचा पुरवठा केला आहे. करारनाम्यातील अट क्र. 18 नुसार कमी पुरवठा केलेल्या कामगारांच्या प्रतिदिन वेतनाच्या दुप्पट दराने दंड आकारणी करण्याची तरतुद आहे. देयक अदा करताना सदर तरतुदीनुसार कमी पुरवठा केलेल्या 2712 कामगारांचे दुप्पट दराने रु. 12,04,128/- एवढी दंड

आकारणी करणे आवश्यक असताना फक्त 183 कामगारांकरीता रु. 81,252/- एवढी दंड आकारणी करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम रु. 11,22,876/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

लेव्हीमध्ये करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे ऑक्टोबर 2011 व मार्च 2012 मध्ये सदर रक्कम अनुक्रमे रु.62,468/- व रु.1,26,352/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर एकुण रक्कम रु. 188820/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

याच पध्दतीने माहे नोव्हेंबर 2011 ते मार्च 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करण्यात यावी व वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

<u>एकुण वसुलपात्र रक्कम रु. **14,51,611/-**</u>

DATSCDM6901 (Ref No : 54)

## *56 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा पुर्व (अ)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 22547280.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2312535.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर अॅक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे.***

***तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नालासोपारा पुर्व(अ) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. दिनेश बी. संखे |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.13 दि. 07.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 17,90,00,000/- |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 31,95,000/- दरमहा |
| सुरक्षा अनामत | रु. 9,58,500/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 18,300/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/545/2011-12 दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः03.10.2011 | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 03/2012 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 1227/25.7.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षांतर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

नालासोपारा पुर्व(ब) विभागातील 39,40,44,45,46,59 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 3 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. दिनेश बी. संखे यांची दरमहा रु. 36,84,580/- दराची

न्युनतम  निविदा प्राप्त झाली. संबंधित ठेकेदाराशी चर्चेअंती रु. 31,95,000/- दर निश्चित करण्यात येऊन  स्विकारण्यात आले व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये  मंजुरी देण्यात आली. मे. दिनेश बी. संखे यांनी निविदा सादर करताना 210 कामगार, 9 डंपर व 1 ट्रॅक्टर पुरविण्याचे नमुद केले आहे. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नालासोपारा पुर्व (ब) विभागातील 7 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

नस्तीमध्ये इसारा रक्कम भरल्याची पावती उपलब्ध नाही. रु. 2,00,000/- इसारा रक्कम भरल्याची लेखापरीक्षणास खात्री करावी. तोपर्यंत ठेक्याची संपुर्ण रक्कम रु.1,91,70,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

निविदा स्विकृतीचे पत्र तसेच निविदाकारास देण्यात आलेले कार्यादेश नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत. ते लेखापरीक्षणास दर्शविण्यात यावेत.

निविदकाराने करारनामा करताना मंजुर दराच्या 5% सुरक्षा अनामत रु.9,58,500/- महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक असताना सदर रक्कम जमा केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन निदर्शनास येत नाही. करीता रक्कम रु.9,58,500/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मे. दिनेश बी. संखे हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असुन त्यांचा परवाना माहे 12/2009 पर्यंत वैध होता तसेच तो 100 कामगार नियुक्त करण्याच्या मर्यादेत होता असे असतानाही त्यांना 210 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये कॉर्पोरेशन बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु. 25,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 1.92 कोटीचा ठेका देण्यात आला.

संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 1227 दि. 25.7.12 रु. 33,77,280/- अन्वये मार्च 2012 या महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची

तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

निविदाकाराने प्रतिदिन 210 कामगार, 9 डंपर व 1 ट्रॅक्टर पुरविणे बंधनकारक आहे. निविदाकाराने पुरवठा केलेल्या कामगार व वाहनांच्या संख्येबाबत आरोग्य निरीक्षकांचे प्रमाणपत्र देयकासोबत सादर केलेले नसताना माहे मार्च 2012 च्या देयकाचे संपुर्ण प्रदान करण्यात आले आहे. करीता देयकाची रक्कम रु. 33,77,280/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वरील अभिप्राय क्र. 3 नुसार कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने लेव्हीची रक्कम रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे. ही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. माहे मार्च 2012 चे प्रदान करतानाही निविदाकाराने त्या महिन्याची रक्कम दि. 6 व 9.7.2012 रोजी संबंधित आस्थापनांकडे जमा केल्यावर दि. 27.7.2012 रोजी सदर देयक पारीत करण्यात आले आहे. ही बाब आक्षेपार्ह असुन सदर ठेकेदाराने माहे ऑक्टोबर 2011 ते फेब्रुवारी 2012 च्या देय रकमा संबंधित आस्थापनांकडे जमा केल्याचे लेखापरीक्षणास दर्शविण्यात यावे. तोपर्यंत भरणा करावयाची उपरोक्त कालावधीची रक्कम रु. 12,02,352/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

लेव्हीमध्ये करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती चालु देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे मार्च 2012 मध्ये सदर रक्कम रु. 126352/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 126352/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

करारनामा अट क्र. 15 नुसार कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा उतरविणे आवश्यक आहे, त्याकरीता ठेकेदारास 1.67% लेव्ही देण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराने कामगारांचा विमा उतरविल्याचे दिसुन येत नाही. करीता त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम रु. 25331/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

करारनाम्यातील अट क्र. 38 नुसार महानगरपालिकेकडुन खरेदी करण्यात आलेल्या कॉम्पॅक्टरद्वारे कचरा संकलन व वाहतुक करावयाची असुन पुरविण्यात आलेल्या कॉम्पॅक्टरचे महानगरपालिकेने ठरविलेले भाडे ठेकेदारच्या देयकातुन वसुल करावयाचे आहे. मे. दिनेश बी. संखे यांना दि. 1.1.2012 पासुन 1 कॉम्पॅक्टर व 2 टिपर वाहतुकीस देण्यात आलेले असतानाही त्यांचेकडुन भाडे वसुल केल्याचे प्रमाणक तपासणीत दिसुन आले नाही. त्यांचेकडुन दि. 1.1.12 पासुन अखेरच्या प्रदानित देयकाच्या महिन्यापर्यंतचे पुरवठा केलेल्या वाहनांचे भाडे वसुल करुन लेखापरीक्षणास दर्शवावे.

याच पध्दतीने माहे नोव्हेंबर 2011 ते मार्च 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करण्यात यावी व वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु. 2,25,47,280/-

एकुण वसुलपात्र रक्कम रु. 23,**12,535/-**

DATSCDM6901 (Ref No : 55)

## *57 वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार पुर्व (ब)*

**सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :घनकचरा व्यवस्थापनांत , केंद्र शासन, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1609056.00/-

***प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. कॉण्ट्रॅक्ट लेबर अॅक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे.कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने पुढील महिन्याचे प्रदान रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | विरार पुर्व(ब) विभागात दैनंदिन साफसफाई, गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे. |
| सु.बे./मकाससं./ठेकेदाराचे नाव | मे. उजाला लेबर कॉण्ट्रॅक्टर |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.13 दि. 07.9.2011 |
| तात्रिक मंजुरी | --- |
| जिल्हा दरसुची वर्ष | --- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 6,00,00,000/- |
| अर्थसंकल्प तरतुद | --- |
| निविदा कालावधी व दैनिक | दै.वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स,नरवीर चिमाजी दि.21.6.11 21 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 40,43,724/- दरमहा |

| | |
|---|---|
| सुरक्षा अनामत | रु. 12,13,117/- |
| कामाचा कालावधी | दि. 31.3.12 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 23400/- |
| दोषदायित्व कालावधी | --- |
| कार्यारंभ आदेश | क्र.वविशम/आस्था/543/2011दि. 1.10.2011 |
| काम सुरु दिनांकः03.10.2011 | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | माहे 03/2011 चे देयक तपासणीस उपलब्ध झाले. |
| प्रमाणक क्र. 1222/25.7.12 | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकरीता साफसफाई व सोयी या शिर्षाखालील उपशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई ठेका या शिर्षांतर्गत नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार या तीन मुळ विभागांचे आणखी अकरा विभाग व वसई असे एकुण बारा विभाग करुन स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

विरार पुर्व(ब) विभागातील 19,20,21,25 या प्रभागात दैनंदीन साफसफाईच्या ठेक्याकरीता दि. 21.6.11 रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि. 13.7.11 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या व त्याच दिवशी त्या उघडण्यात यावयाच्या होत्या. तथापि त्या दि. 19.7.2011 रोजी दु. 3.00 वा. उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेस 3 निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी

मे. उजाला लेबर कॉण्ट्रॅक्टर यांची दरमहा रु. 40,43,724/- दराची न्युनतम  निविदा स्विकारण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वये  मंजुरी देण्यात आली. मे. उजाला लेबर कॉण्ट्रॅक्टर यांनी निविदा सादर करताना 225 कामगार, 10 डंम्पर व 2 ट्रॅक्टर पुरविण्याचे नमुद केले आहे. त्यांना दि. 17.9.11 च्या पत्रान्वये निविदा स्विकृत झाल्याचे व अनामत रक्कम रु. 12,13,117/- जमा करुन करारनामा करण्याबाबत कळविण्यात आले. प्रस्तुत नस्ती व देयकाच्या छायाप्रती तपासल्या असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

विरार पुर्व (ब) विभागातील 4 प्रभागातील साफसफाईकरीता लागणा-या कामगारांची संख्या, किमान वेतन कायद्यानुसार देय होणारे मासिक वेतन, कचरा उचलण्यास लागणा-या वाहनांची संख्या, त्यासाठी लागणारे इंधन, साफसफाई साहित्य इत्यादींसाठी येणा-या अंदाजखर्चाची परिगणना न करताच निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आलेले दर योग्य व सुसंगत असल्याचे तपासता येत नाही.

सदर ठेका हा शहरातील स्वच्छतेचा व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने नियमीत दैनंदीन साफसफाई होणे आवश्यक असल्याने ठेकेदाराकडुन सुरक्षा अनामतीव्यतिरीक्त अधिकची निष्पादन सुरक्षा (Performance guarantee) घेणे आवश्यक होते. स्थायी समिती ठराव क्र. 13 दि. 7.9.11 अन्वयेही याच कारणास्तव संबंधितांकडुन “आवश्यक ती अनिश्चित सुरक्षा अनामत घेण्यात यावी” असे नमुद आहे. असे असतानाही ठेकेदाराकडुन सदर अनामत घेण्यात आलेली नाही.

कॉण्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉण्ट्रॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये कामगार आयुक्तांचे आवश्यक ते परवाने असणे, ठेकेदाराच्या नावे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना यांची नोंदणी असणे हे निविदा सादर करताना बंधनकारक आहे. असे असताना निविदा स्विकृतीनंतर तीन महिन्याचे आत सदर कागदपत्रे सादर करण्याची सुट देण्यात आली आहे. वस्तुतः या आस्थापनांना देय असणा-या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना या रकमा दरमहा कामगारांच्या वतीने ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे.

मे. उजाला लेबर कॉण्ट्रॅक्टर हे कामगार कंत्राटदार म्हणुन महाराष्ट्र शासनाचे परवानाधारक असुन त्यांचा परवाना माहे 12/2009 पर्यंत वैध होता तसेच त्यांना 100 कामगार नियुक्त करण्याचा परवाना देण्यात आला आहे. असे असतानाही त्यांना 225 कामगार पुरविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये कॉर्पोरेशन बँकेने दिलेले ठेकेदाराच्या सॉल्वन्सीबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. ते रु. 25,00,000/- इतके आहे. असे असताना निविदाकारास रु. 2.43 कोटीचा ठेका देण्यात आला.

कार्यादेश दि. 1-10-2011 अन्वये संबंधित ठेकेदाराने दि. 3-10-11 पासुन कामास सुरुवात केली. प्रमाणक क्र. 1222 दि. 25.7.12 रु. 42,39,024/- अन्वये मार्च 2012 या महिन्याचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळुन आल्या.

मे. उजाला लेबर कॉण्ट्रॅक्टर यांची दरमहा रु. 40,43,724/- म्हणजेच प्रतिदिन 4043724/31 दिवस = रु. 130443/- दराची न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 213/- निश्चित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त केलेल्या 225 कामगारांचे प्रतिदिन वेतन रु. 47925/- (+) 40% लेव्ही रु.19170/- = एकुण प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 67095/-. म्हणजेच प्रतिदिन 12 वाहनांचा खर्च-प्रतिदिन एकुण खर्च रु. 130443/- (-) प्रतिदिन कर्मचारी खर्च रु. 67095/- = रु. 63348/- याप्रमाणे प्रतिदिन देय रकमा निश्चित करण्यात आल्या होत्या. मार्च 2012 चे देयक अदा करताना प्रतिदिन वाहन खर्च दर रु. 63348/- प्रमाणे रु. 19,63,788/- अदा करणे आवश्यक असताना देयकसोबतच्या दि. 22.6.12 च्या टिप्पणीन्वये प्रतिदिन रु. 65512/- प्रमाणे रु.2030874/- अदा करण्यात आले आहेत. त्यामुळे रु. 67086/- चे अतिप्रदान झाले आहे. करीता रु.67086/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत.

मंजुर टिप्पणी दि. 22.6.12 अन्वये कार्यरत कामगारांचे किमान वेतन परिगणित करताना 6750 उपस्थित कामगारांचे वेतन परिगणित करण्यात आले आहे. परंतु किमान वेतन दरातील फरकाची रक्कम परिगणित करताना 6975 कामगारांचा फरक देण्यात आला आहे. या तफावतीबाबत टिप्पणीमध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही. यावरुन मार्च2012 मध्ये 225 कामगार कमी पुरवठा केल्याचे दिसते. करारनाम्यातील अट क्र. 18 अन्वये कमी पुरवठा केलेल्या कामगारांकरीत दुप्पट दराने दंड आकारणी करण्याची तरतुद आहे. प्रस्तुत प्रकरणी रु.1,04,850/- दंड आकारणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केल्याचे दिसत नाही. करीता रक्कम रु. 1,04,850/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वरील अभिप्राय क्र. 3 नुसार कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजना या रकमा ठेकेदाराने संबंधित आस्थापनांकडे जमा करणे आवश्यक आहे. तोपर्यंत महानगरपलिकेने लेव्हीची रक्कम रोखुन धरणे क्रमप्राप्त आहे. ही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. माहे मार्च 2012 चे प्रदान करतानाही निविदाकाराने त्या महिन्याची रक्कम दि. 6 व 9.7.2012 रोजी संबंधित आस्थापनांकडे जमा केल्यावर दि. 25.7.2012 रोजी सदर देयक पारीत करण्यात आले आहे. ही बाब

आक्षेपार्ह असुन सदर ठेकेदाराने माहे ऑक्टोबर 2011 ते फेब्रुवारी 2012 च्या देय रकमा संबंधित आस्थापनांकडे जमा केल्याचे लेखापरीक्षणास दर्शविण्यात यावे. तोपर्यंत भरणा करावयाची उपरोक्त कालावधीची रक्कम रु. 12,79,868/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

लेव्हीमध्ये करण्यात येणारी 8.33% बोनसची रक्कम देयकातुन कपात करुन अदाकर्त्याने राखुन ठेवावयाची असुन, अशी वर्षभरात राखुन ठेवलेली संपुर्ण रक्कम, सणाच्या कालावधीत ठेकेदाराच्या मागणीनुसार त्यास अदा करावयाची असताना ती प्रत्येक महिन्याच्या देयकात अदा करण्यात आलेली आहे. माहे मार्च 2012 मध्ये सदर रक्कम रु. 130912/- अदा करण्यात आली असुन ती कामगारास अदा केल्याचे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. सदर रक्कम रु. 130912/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

करारनामा अट क्र. 15 नुसार कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा उतरविणे आवश्यक आहे, त्याकरीता ठेकेदारास 1.67% लेव्ही देण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराने कामगारांचा विमा उतरविल्याचे दिसुन येत नाही. करीता त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम रु. 26340/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

करारनाम्यातील अट क्र. 38 नुसार महानगरपालिकेकडुन खरेदी करण्यात आलेल्या कॉम्पॅक्टरद्वारे कचरा संकलन व वाहतुक करावयाची असुन पुरविण्यात आलेल्या कॉम्पॅक्टरचे महानगरपालिकेने ठरविलेले भाडे ठेकेदारच्या देयकातुन वसुल करावयाचे आहे. मे. उजाला लेबर कॉण्ट्रॅक्टर यांना दि. 1.1.2012 पासुन 1 कॉम्पॅक्टर व 2 टिपर तसेच दि.1.3.2012 पासुन आणखी 1 कॉम्पॅक्टर वाहतुकीस देण्यात आलेले असतानाही त्यांचेकडुन भाडे वसुल केल्याचे प्रमाणक तपासणीत दिसुन आले नाही. त्यांचेकडुन दि. 1.1.12 पासुन अखेरच्या प्रदानित देयकाच्या महिन्यापर्यंतचे पुरवठा केलेल्या वाहनांचे भाडे वसुल करुन लेखापरीक्षणास दर्शवावे.

याच पध्दतीने माहे ऑक्टोबर 2011 ते फेब्रुवारी 2012 पर्यंतच्या प्रदानित देयकांची तपासणी करण्यात यावी व वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रकमांची परिगणना करुन वसुलपात्र रकमेची माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

एकुण वसुलपात्र रक्कम रु. **16,09,056/-**

DATSCDM6901 (Ref No : 56)

## *58 सन 2010-11 च्या दराने खेळणी खरेदी करावी लागल्याने झालेल्या जादा खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :विकास निधी अंतर्गत उ , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 705100.00/-

***निविदा प्रक्रिया विहित कालावधीत पुर्ण न केल्याने महानगरपालिकेस जादा दराने अधिकचा खर्च करावा लागला.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे सन 2011-12 या वित्तिय वर्षासाठी महानगरपालिकेच्या हददीतील विविध बालोद्यानात नविन खेळणी पुरवठा करुन बसवून देण्याचा अंदाजित रु. 1 कोटी खर्चाच्या निविदा दि. 07/05/11 च्या वर्तमान पत्रातील जाहिरातींनुसार मागविण्यांत आल्या होत्या. सदर निविदा दि. 18/05/11 रोजी उघडण्यांत येवून विविध 52 कामांसाठी 1) मे. अरिहंत इंडस्ट्रियल कार्पो. लि. 2) मे. डायमंड फायर अँड फेब्रीकेशन 3) मे. हनी फन एम थ्रिलिंग कंपनी 4) फन प्ले सिस्टिम 5) बाबा प्ले वर्ल्ड आणि 6) मे. प्ले मेट सिस्टिम्स या निविदाधारकांचा सदर कामावरील खर्चाच्या प्रती नग तुलनात्मक तक्ता दि. 20/05/11 रोजी तयार करण्यांत येवून ठराव क्र. 27, दि. 21/11/11 अन्वये त्यांच्या कामांस मान्यता दिल्याबाबत दि. 01/12/11 च्या पत्रान्वये कळविण्यांत आले.

उपरोक्त कामांची नस्ती तपासली असता निविदाधारकांनी माहे नोव्हें/डिसेंबर 11 मध्ये खेळणी पुरविल्याचे दिसून येते. परंतू सदर खेळण्यांचे देयक सादर करताना मंजुर निविदादरापेक्षा जास्तीच्या दराने आकारणी केली असल्याने महानगरपालिकेस रु. 7,05,100/- इतकी जादा रक्कम प्रदान करणे भाग पडल्याचे सोबत जोडलेल्या विवरण पत्रावरुन दिसून येते. निविदादर हे प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता ठरविले जात असल्याने प्रत्येक वर्षी डिसेंबर ते मार्च या कालावधीत निविदाप्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी निविदा प्रक्रिया माहे मे 2011 मध्ये सुरु करुन 21/11/2011 रोजी संपविण्यात आली त्यामुळे 1/4/2011 ते 21/11/2011 या कालावधीत सन 2010-2011 च्या मंजुर जादा दराने खरेदी करावी लागली.

सदर विवरण पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, निविदा धारकांची निविदा दि. 18/05/11 रोजी उघडण्यात येवून त्यांचा दि. 20/05/11 रोजी तुलनात्मक तक्ता मंजूर करुन मान्यता मात्र 6 महिन्यानंतर (दि. 1/12/11) घेण्यात आली आहे. त्यामुळे मागील वर्षीच्या दराने खरेदी करण्यात आली आहे. सदर मुदतवाढीबाबतचे आदेश नस्तीमध्ये सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून आले नाहीत. या संदर्भात शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट 3 अन्वये 6 महिन्यांच्या कालावधीकरीताच मुदतवाढ देणे बंधनकारक आहे व असे करताना ज्या वस्तूंची खरेदी प्रस्तावित आहे त्या वस्तूच्या बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी नसतील किंवा कमी होणार नसतील किंवा या किंमती स्थिर आहेत किंवा प्रमाणीकृत आहेत याची शहानिशा करुन खरेदीचे आदेश देणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी या निर्देशाचा भंग झाल्याचे दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेस रक्कम रु**. 7,05,100/-** जादा खर्च करावा लागला असून सदर रक्कम वसुलपात्र ठेवण्यांत येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 705100/-



## *59 दिवाबत्ती साहित्य खरेदीमधील त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :दिवे व इतर वस्तु यां , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***शासन परिपत्रक क्र. अ 413-2009/प्र.क्र.10/उर्जा-7 दि. 21/01/2010 अन्वये उर्जा बअचतीच्या दृष्टीने ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी, भारत सरकार याच्याकडुन स्टॅण्डर्ड्स व लेबलिंग कार्यक्रमांतर्गत 1 ते 5 स्टार मानांकने दिली जातात. त्यानुसार 4 स्टार वा 5 स्टार लेबल असलेली साहित्ये खरेदी करणे आवश्यक होते. निविदाप्रक्रिया राबविताना या बाबीचा विचार करण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही. आगामी वर्षामध्ये दिवाबत्ती साहित्याच्या लेखाशिर्षातंर्गत होणाऱ्या खर्चाची प्रत्येक घटकनिहाय प्रस्तावित वाढींसह अंदाजित रक्कम ठरवणे भांडार विभागास सहज शक्य आहे. त्यासाठी विविध विभागांची मागणी, मागील वर्षात वापरलेले परिमाण, मागील खरेदीतील शिल्लक परिमाण तसेच मागील वर्षापेक्षा जादा खरेदीची आवश्यक असल्यास वाढीची कारणे नमूद करुन खरेदीचा वस्तुनिष्ठ अंदाज तयार करणे क्रमप्राप्त आहे. असे केल्यास अनावश्यक खरेदी टाळता येऊ शकेल तसेच शासनाचे मुद्रांक शुल्काचे नुकसान होणार नाही. घटकांच्या साहित्याचे एकाच कंपनीच्या प्रति नगाच्या न्युनतम दरांमध्ये आणि उच्चतम दरांमध्ये फार मोठी तफावत आढळते. दरातील या तफावतीबाबतची कारणमिमांसा खरेदी समितीकडुन केली जात नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | दिवाबत्ती साहित्य खरेदी |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | 1) साई एंटरप्रायझेस 2) व्ही.एम.ट्रेडर्स 3) सोनल एंटरप्रायझेय 4) चामुंडा एंटरप्रायझेस 5) द.हिंद इले. अँड इंजि.कार्पो. 6) श्री. सदगुरं ट्रेडींग कं. |
| तांत्रिक मंजुरी | ----- |
| प्रशासकीय मंजुरी | स.सा.ठराव क्र. 12, दि. 09/03/2012 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2011-12 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 4 कोटी |

| | |
|---|---|
| बजेट तरतुद | 4 कोटी 69 लाख |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 20 दिवस दै. लोकमत व दै.नरविर चिमाजी |
| इसारा रक्कम | 2 लाख |
| निविदा रक्कम | ----- |
| सुरक्षा अनामत | 4 लाख |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 500/- प्रत्येकी एकुण 3000/- |
| दोषदायित्व कालावधी | ----- |
| कार्यारंभ आदेश | ----- |
| काम सुरु दिनांक: 16.05.2011 | ----- |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | ----- |
| प्रमाणक क्र. | ----- |

वसई - विरार शहर महानगरपालिकेतर्फे मध्यवर्ती भांडार विभागासाठी सन 2011-12 या वित्तिय वर्षात दिवे व दिवाबत्तीचे एकुण 660 प्रकारच्या साहित्य खरेदी करण्याच्या अंदाजित 4 कोटींच्या खर्चाच्या निविदा सूचना दि. 12/03/2011 रोजीच्या दै.लोकमत व दै.नरविर चिमाजी या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आल्या. त्यास 1) साई एंटरप्रायझेस 2) मे.व्ही.एम.ट्रेडर्स 3) मे. सोनल एंटरप्रायझेस 4) मे. चामुंडा एंटरप्रायझेस 5) द.हिंद इलेक्ट्रिक अँड इंजिनिअरिंग कार्पो. आणि 6) मे. श्री सदगुरु ट्रेडींग कं., या निविदाधारकांनी प्रतिसाद देवून आपआपल्या निविदा सादर केल्या. सदर निविदा दि. 25/03/11 रोजी उघडण्यांत येणार होत्या, परंतू मुख्य लेखापरिक्षक उपस्थित नसल्याने व दि. 28/03/11 रोजी उपायुक्त, भांडार विभाग हे उपस्थित नसल्याने दि. 31/03/2011 रोजी उघडण्यांत आल्या. निविदाधारकांनी सादर केलेल्या साहित्यांच्या दरानुसार निविदांच्या तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत आला व त्यानुसार प्रत्येक घटकाच्या प्रतिनगाच्या न्युनतम दराचा विचार करुन निविदाकारांची निविदा मंजूर करुन त्यांचे सोबत प्रत्येकी रु. 500/- मुल्यांकनाच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यांत आला. प्रस्तुत प्रकरणाच्या नस्तीची पडताळणी केली असता खालील बाबी/त्रुटी आढळल्या.

शासन परिपत्रक क्र. अ 413-2009/प्र.क्र.10/उर्जा-7 दि. 21/01/2010 अन्वये उर्जा बचतीच्या दृष्टीने ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी, भारत सरकार याच्याकडुन स्टॅण्डर्ड्स व लेबलिंग कार्यक्रमांतर्गत 1 ते 5 स्टार मानांकने दिली जातात. त्यानुसार 4 स्टार वा 5 स्टार लेबल असलेली साहित्ये खरेदी करणे आवश्यक होते. निविदाप्रक्रिया राबविताना या बाबीचा विचार करण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

सदर नस्ती मधील वरील 6 कंत्राटदारांनी केलेल्या विविध घटकांच्या प्रती नगाच्या दरांचा तुलनात्मक तक्त्याचे परिक्षण करताना असे आढळून आले की, घटकांच्या साहित्याचे एकाच कंपनीच्या प्रति नगाच्या न्युनतम दरांमध्ये आणि उच्चतम दरांमध्ये फार मोठी तफावत आढळते उदा., घटक क्र. 62,63,64, 74

यांचे न्युनतम दर अनुक्रमे रु. 3/-, रु. 3/-, रु. 9/- आणि रु. 108/- असे असून उच्चतम दर अनुक्रमे रु. 3,190/-, रु. 3180/-, रु. 6190/- आणि रु. 4,000/- असे दर्शविले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या साहित्याच्या दर्जाबददल प्रश्न निर्माण होतो. तसेच उच्च दर्जाचे साहित्य न्युनतम दरात प्राप्त होत असेल असे जर गृहीत धरल्यास, त्याच कंपनीच्या त्याच दर्जाच्या साहित्याचा उच्चतम दर सादर करण्याचे सदर कंत्राटदाराचे प्रयोजन लक्षात येत नाही. यावरुन सदर कंत्राटदार दराबाबत महानगरपालिकेची दिशाभुल करीत असल्याचे संभवते किंवा इतर कंत्राटदारांबरोबर संगनमत करीत असल्याचे संभवते. अशा दिशाभुल करणाऱ्या किंवा संगनमताने निविदा सादर करणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-05/06/प्र.क्र. 53/इमा-2, दि. 28/09/2006 अन्वये दंडात्मक कारवाई करणे आवश्यक ठरते.

DATRADM5901 (Ref No : 59)

## *60 सार्वजनिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम व महोत्सवासाठी चहापान, भोजन, खुर्च्या, मंडप यावरील खर्च*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :लोकशिक्षण व सामाजिक , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 418556.00/-

***आगामी वर्षामध्ये सार्वजनिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम व महोत्सवासाठी चहापान, भोजन, खुर्च्या, व मंडप यावरील खर्चाच्या लेखाशिर्षातंर्गत होणाऱ्या खर्चाची प्रत्येक घटकनिहाय प्रस्तावित वाढींसह अंदाजित रक्कम ठरवणे भांडार विभागास सहज शक्य आहे. त्यासाठी विविध विभागांची मागणी, मागील वर्षात वापरलेले परिमाण, मागील वर्षापेक्षा जादा खर्चाची आवश्यकता असल्यास वाढीची कारणे नमूद करुन खर्चाचा वस्तुनिष्ठ अंदाज तयार करणे क्रमप्राप्त आहे. असे केल्यास अनावश्यक खर्च टाळता येऊ शकेल तसेच शासनाचे मुद्रांक शुल्काचे नुकसान होणार नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | सार्वजनिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम व महोत्सवासाठी चहापान, भोजन, खुर्च्या, मंडप यावरील खर्च |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | 1) मे. आकाश एंटरप्रायजेस, 2) मे. शार्वी कॅटरर्स, 3) |

| | |
|---|---|
| | मे. विजय मंडप डेकोरेटर्स |
| तांत्रिक मंजुरी | - |
| प्रशासकीय मंजुरी | - |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | सन 2011-12 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 25 लक्ष |
| बजेट तरतुद | 75 लक्ष |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 12 दिवस. दि. 7/5/2009 दै.नरवीर चिमाजी, लोकमत |
| इसारा रक्कम | रु. 12,500/- |
| निविदा रक्कम | - |
| सुरक्षा अनामत | रु. 25,000/- |
| कामाचा कालावधी | - |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 500/- प्रत्येकी |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | - |
| काम सुरु दिनांक: 16.05.2011 | - |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | - |
| प्रमाणक क्र. | |

वसई-विरार शहर महानगरपालिके मार्फत सन 2011-12 या वित्तीय वर्षात सालाबादप्रमाणे सर्व राष्ट्रीय दिन, महापुरूषांच्या जयंत्या / पुण्यतिथ्या, वृक्षारोपण, शिक्षक दिन, गणेश विसर्जन, संत गाडगेबाबा अभियान, शालेय क्रिडा महोत्सव इ. शासकीय, सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमाचे तसेच महापालिकेच्या सभा, स्थायी समितीच्या सभा व इतर सभांचे आयोजन करण्यांत आले होते. त्यासाठी आवश्यकतेनुसार चहापान, पाणी, अल्पोपहार, भोजन, हार, पुष्पहार, फोटोग्राफी, व्हिडीयोग्राफी आणि इतर अनुषंगिक साहित्य पुरविणे बाबतची जाहिर निविदा दि. 7/5/2011 रोजीच्या दै. नरविर चिमाजी, दै. लोकमत आणि दै. मुंबई टाईम्स मध्ये प्रसिध्द करण्यांत आल्या. सदर जाहिरातीस 1) मे. आकाश एंटरप्रायजेस, 2) मे. शार्वी कॅटरर्स आणि 3) मे. विजय मंडप डेकोरेटर्स या निविदाकारांनी प्रतिसाद देऊन त्यांनी त्यांच्या घटक निहाय वार्षिक दराच्या सिलबंद निविदा सादर केल्या. सदर निविदा दि. 18/5/11 रोजी उघडण्यांत येऊन प्राप्त निविदांतील घटकांचा दरनिहाय तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत येऊन स्थायी समिती ठराव क्र. 9, दि. 08/8/11 अन्वये रु. 25 लाखाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या निविदा न्यूनतम दराने मंजूर करण्यांत आल्या. याबाबतच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील त्रुटी / बाबी आढळल्या.

प्रस्तुत प्रकरणी असे निदर्शनास येते की, उपरोक्त वार्षिक खरेदी ही दरवर्षी करण्यांत येत असल्याचे महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकावरून दिसून येते. याबाबत शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार

विभागाचा शासन निर्णय क्र. भाखस-1094/(2679)/उद्योग6, दि. 30/3/94 अन्वये आगामी वर्षामध्ये सदर साहित्याच्या लेखाशिर्षांतर्गत होणाऱ्या खर्चाची प्रत्येक घटकनिहाय प्रस्तावित वाढींसह अंदाजित रक्कम ठरविणे भांडार विभागास सहज शक्य आहे. त्यासाठी पालिकेच्या विविध विभागांकडून प्राप्त मागणी, मागील वर्षात वापरलेले परिमाण, मागील वर्षातील खरेदीतील शिल्लक परिमाण तसेच मागील वर्षापेक्षा जादा खरेदीची आवश्यक असल्यास वाढीची कारणे नमूद करून खरेदीचा वस्तुनिष्ठ अंदाज तयार केल्यास त्यानुसार अंदाजित देय मुद्रांक शुल्क ठरविणे शक्य होईल. परंतू याबाबत महानगरपालिकेतर्फे आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या प्रचलित पध्दतीमुळे शासनाचे दरवर्षी फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर नुकसान टाळण्याच्या दृष्टीने कंत्राटदारांबरोबर करारनामा करताना मुद्रांक शुल्काच्या रक्कमेचा स्पष्ट उल्लेख केल्यास शासनाचे होणारे आर्थिक नुकसान टळू शकेल.
वरील तीनही कंत्राटदारांनी त्यांच्या मंजूर निविदेनुसार चहा, कॉफी, पाणी, अल्पोपहार, भोजन, स्टेज/मंडप बांधणे, खुर्च्या व इतर सामानांची वाहतूक करणे, व्यवस्था करणे या कामी किती कामगार वापरले, त्यांची संख्या नमुद करणे आणि कामगार कायद्यानुसार त्यांच्या जिविताचा विमा उतरविणे निविदाकारास बंधनकारक आहे. याबाबतची कागदपत्रे/प्रमाणपत्रे नस्तीमध्ये आढळली नाहीत.
प्रमाणके तपासणीस उपलब्ध न झाल्याने आयकर वसुल झाला किंवा नाही याची खात्री करता आली नाही तथापि एकुण खर्च रकमेवर साधारण रु. 418556/- इतका आयकर कपात करणे आवश्यक होईल त्यामुळे रु. 418556/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

एकूण आक्षेपाधिन रक्कम : रु. **418556/-**

DATRADM5901 (Ref No : 60)

## *61 प्रशासकीय कामासाठी सन 2011-12 करीता आवश्यकतेनुसार किरकोळ स्टेशनरी व आवश्यक साहित्य पुरविणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :स्टेशनरी छपाई/ स्टेश , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***आगामी वर्षामध्ये प्रशासकीय कमासाठी आवश्यकतेनुसार किरकोळ स्टेशनरी व आवश्यक साहित्य यावरील खर्चाच्या लेखाशिर्षातंर्गत होणाऱ्या खर्चाची प्रत्येक घटकनिहाय प्रस्तावित वाढींसह अंदाजित रक्कम ठरवणे भांडार विभागास सहज शक्य आहे. त्यासाठी विविध विभागांची मागणी, मागील वर्षात वापरलेले परिमाण, मागील वर्षापेक्षा जादा खर्चाची आवश्यकता असल्यास वाढीची कारणे नमूद करुन खर्चाचा वस्तुनिष्ठ अंदाज तयार करणे क्रमप्राप्त आहे. असे केल्यास अनावश्यक खर्च टाळता येऊ शकेल तसेच शासनाचे मुद्रांक शुल्काचे नुकसान होणार नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | प्रशासकीय कामासाठी सन 2011-12 करीता आवश्यकतेनुसार किरकोळ स्टेशनरी व आवश्यक साहित्य पुरविणेबाबत. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | 1) आकाश एंटरप्रायजेस,2) व्हरायटी बुक सेंटर,3)एच.एम.पी. एंटरप्रायजेस,4) श्री अनिरुध्दाय इम्प्रेशन,5) महाराणी प्रिंटर्स, 6) सिलेक्ट एंटरप्रायजेस,7) मे. मुकुंद प्रिंटर्स |
| तांत्रिक मंजुरी | - |
| प्रशासकीय मंजुरी | दि. 16/8/2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2011-12 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 50 लक्ष |
| बजेट तरतुद | - |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 13 दिवस. दै. पुढारी, दै. महाराष्ट्र बुलंद टाईम्स |
| इसारा रक्कम | रु. 25,000/- |
| निविदा रक्कम | - |
| सुरक्षा अनामत | रु. 50,000/- |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 500/-, रु. 200/-, रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | - |
| काम सुरु दिनांक: | - |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | - |
| प्रमाणक क्र. | - |

वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे सन 2011-12 या वित्तीय वर्षात प्रशासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार किरकोळ स्टेशनरी साहित्य पुरवठाकामी दि. 7/5/11 रोजीच्या दै. पुढारी व दै. महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रांमध्ये जाहिर निविदा सूचना देऊन वार्षिक दराच्या सिलबंद निविदा मागविण्यांत आल्या. त्यास अनुसरुन अनुक्रमे 1) आकाश एंटरप्रायजेस, 2) व्हरायटी बुक सेंटर अँड स्टेशनरी, 3) एच.एम.पी. एंटरप्रायजेस,4) श्री अनिरुध्दाय इम्प्रेशन, 5) महाराणी प्रिंटर्स, 6) सिलेक्ट एंटरप्रायजेस आणि 7) मे. मुकुंद प्रिंटर्स या निविदाकारांनी त्यांच्या एकूण 392 घटकनिहाय वार्षिक दराच्या सिलबंद निविदा सादर केल्या. सदर निविदा दि. 19/5/2011 रोजी उघडण्यांत येऊन त्यांचा

घटकनिहाय तुलनात्मक तक्ता तयार करून न्युनतम दराच्या निविदाकारास स्थायी समितीचा ठराव क्र. 17 दि. 16/8/2011 अन्वये मान्यता देण्यांत आली. सदर प्रकरणाच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील त्रुटी/बाबी निदर्शनास आल्या.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971 नियम क्र. 171 (6) अन्वये निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आंत त्या निकाली काढण्यांत आल्या पाहिजेत आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक होता कामा नये. प्रस्तुत प्रकरणी दि. 19/5/2011 रोजी निविदा उघडल्यानंतर दि. 16/8/11 रोजी त्या स्थायी समितीने ठराव क्र. 17 अन्वये मंजूर केल्या, म्हणजेच एकूण निविदा मंजूरी प्रक्रियेस एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्याचे निदर्शनास येते.

प्रस्तुत प्रकरणी असे निदर्शनास येते की, उपरोक्त किरकोळ स्टेशनरी साहित्याची खरेदी ही दरवर्षी केली जात असल्याचे महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकावरून दिसून येते. त्यामुळे शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखरु.1094/(2679)/उद्योग-6, दि. 30/3/1994 अन्वये आगामी वर्षामध्ये सदर साहित्याच्या लेखाशिर्षांतर्गत होणाऱ्या खर्चाची प्रत्येक घटकनिहाय प्रस्तावित वाढींसह अंदाजित रक्कम ठरविणे भांडार विभागास सहज शक्य आहे. त्यासाठी विविध विभागांकडून प्राप्त मागणी, मागील वर्षात वापरलेले परिमाण, मागील वर्षातील खरेदीतील शिल्लक परिमाण तसेच मागील वर्षपेक्षा जादा खरेदीची आवश्यक असल्यास वाढीची कारणे नमूद करून खरेदीचा वस्तुनिष्ठ अंदाज तयार केल्यास त्यानुसार देय अंदाजित मुद्रांक शुल्क ठरविणे शक्य होईल. परंतू महानगरपालिकेतर्फे आकारण्यांत येणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या प्रचलित पध्दतीमुळे शासनाचे दरवर्षी फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर नुकसान टाळण्याच्या दृष्टीने कंत्राटदारांबरोबर करारनामा करताना मुद्रांक शुल्काच्या रक्कमेचा स्पष्ट उल्लेख केल्यास शासनाचे होणारे आर्थिक नुकसान टळू शकेल.

DATRADM5901 (Ref No : 61)

## *62 वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागास पाईप प्लंबिंग फिटिंग इत्यादी साहित्य पुरवठा करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :शहरांतर्गत वितरण व्य , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 41860898.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3773076.00/-

***इसारा रक्कम व मुद्रांक शुल्क कमी घेण्यात आले असुन सुरक्षा अनामत घेण्यात आलेली नाही. साहित्याचा पुरवठा करण्याबाबतची मागणी करण्यात आलेली नसल्याने अनावश्यक खरेदी झाल्याचे दिसुन येते. खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीत घेण्यात आलेली नसुन***

***विनियोग नोंदवहीही ठेवण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागास पाईप प्लंबिंग फिटिंग इत्यादी साहित्य पुरवठा करणे. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | एकूण सहा ठेकेदार |
| तांत्रिक मंजुरी | महासभा ठराव क्र. 3 |
| प्रशासकीय मंजुरी | मा. स्थायी समिती ठराव क्र. 28, दि. 6/4/2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | - |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 4,00,00,000/- |
| बजेट तरतुद | रु. 6,30,00,000/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. नरवीर चिमाजी व दै. लोकमत, ठाणे वैभव, आपला वार्ताहार. दि. 12/3/11 ते 23/3/11, 12 दिवस |
| इसारा रक्कम | रु. 2,00,000/- |
| निविदा रक्कम | रु. 1500/- |
| सुरक्षा अनामत | - |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | (रु. 500 x 60) = 3,000/- |
| दोषदायित्व कालावधी | - |
| कार्यारंभ आदेश | दि. 6/4/2011 |
| काम सुरु दिनांक: | दि. 6/04/2011 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | - |
| प्रमाणक क्र. | - |

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील कामकाजाकरीता सन 2011-12 या वित्तीय वर्षात आवश्यकतेप्रमाणे पाणीपुरवठा साहित्य पूरवठा कामी महानगरपालिकेच्या ठराव क्र. 3 अन्वये दि. 12/10/10 अन्वये प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार दि. 13/3/11 रोजीच्या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या असता आठ निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी तुलनात्मक न्यूनतम दरांच्या विविध घटकांसाठी 6 ठेकेदारांस महानगरपालिका ठराव क्र. 28, दि. 6/4/11 अन्वये वित्तीय मान्यता देण्यात आली असून त्यांचे सोबत दर करार करण्यात आलेला आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि. 2/1/92 अन्वये रु. 50 लक्ष खर्चाच्या निविदेचा कालावधी कमीत कमी 21 दिवसाचा असणे आवश्यक असताना सदर निविदेचा कालावधी 10 दिवस ठेवण्यात आल्याने अनियमितता झाल्याचे व त्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याचे निदर्शनास

येते.

शासन निर्णय 2 जानेवारी 1992 नुसार इसारा रक्कम निविदा रकमेच्या 1% एवढी घेणे क्रम प्राप्त आहे. निविदा नस्ती तपासली असता ठेकेदार यांचेकडून निविदेसोबत अर्धा टक्का दराने इसारा रक्कम घेण्यात आली आहे. अर्धा टक्का कमी इसारा रक्कम घेण्याचे प्रयोजन लेखापरीक्षणात निदर्शनास आले नाही. यापुढे निविदा रकमेच्या कमीत कमी 1 टक्का इसारा रक्कम निविदे सोबत घेण्यात यावी. रु. 12,00,000/- इसारा रक्कम कमी घेण्यात आल्याने त्यावरील व्याज महानगरपालिकेस कमी प्राप्त झाले आहे.

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि. 01/05/2006 नुसार निविदा रकमेच्या प्रथम 10 लक्षापर्यंत रु.100 व त्यापुढील प्रत्येक 1 लक्षा करीता किंवा त्याच्या प्रत्येक भागाकरीता रु. 100 प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. त्यानुसार निविदेची अंदाजित रक्कम रु. **4,00,00,000/-** असल्याने ठेकेदार यांनी रु. 39100/- चे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असताना त्यांनी रु. 3000/- चे मुद्रांक शुल्क भरलेले असल्याने त्यांचे कडून रु. 36100- मुद्रांक शुल्क वसूल करून शासनाच्या निधीत जमा करावेत.

वसूलपात्र रक्कम रु**. 36,100/-**

मंजूर निविदाकारांनी निविदेतील अट क्र. 16 अन्वये सुरक्षा अनामत रक्कम रु. 20.00 लक्ष भरणे आवश्यक असताना, तसे भरणा केल्याचे नस्ती तपासणीत आढळून आले नाही.

वसूलपात्र रक्कम रु**. 20,00,000/-**

भांडार विभागामार्फत पाणीपुरवठा विभागाकरिता आवश्यक असणाऱ्या साधन सामुग्रीची खरेदी करण्यात येते. सदरची खरेदी पाणीपुरवठा विभागामार्फत मागणी केल्यावर करण्यांत येते. पाणीपुरवठा विभागातील मागणीपत्रकात त्यांच्याकडे उपलब्ध असलेला साठा व खरेदी करणे आवश्यक असलेल्या साधन सामुग्री याबाबत ताळमेळ घेण्यात येऊन त्या नुसार मागणी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे मागणी पत्रकात उल्लेख असल्याचे तपासणीत आढळून आले नाही. व भांडार विभागामार्फत देखील उपलब्ध साठ्याचा ताळमेळ घेण्यात आल्याबाबतचा कार्यालयीन टिपणीत उल्लेख करणे आवश्यक असताना कार्यालयीन टिपणीत कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. यामुळे अनावश्यक खरेदी करण्यांत आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

भांडार विभागात जंगम मालमत्ता नोंदवही ठेवण्यात आलेली असून सदरची नोंदवही वार्षिक ठेवण्यात आलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 144 (1) (2) अन्वये नोंदवही अद्यावत करण्यात आलेले नसल्याने करण्यात आलेली खरेदी आवश्यक होती किंवा कसे याची सत्यता पडताळणी करता आली नाही. भांडार विभागातील पाणीपुरवठा साहित्य खरेदी साठा नोंदवही तपासली असता सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. 4 मध्ये नमूद करण्यांत आलेल्या साहित्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये करण्यांत आल्याचे तपासणीत आढळून आले नाही. तसेच सदर परिशिष्टामधे नमुद करण्यात आलेल्या विविध घटकांचे महाराष्ट्र जीवन प्रधिकरण सन 2010-11 च्या दरसुची अन्वये उदाहरणादाखल तपासणी केली असता खरेदी करण्यात आलेल्या घटकांमध्ये अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास येते. सदरची रक्कम र. 1736976/- वसुल करण्यात येऊन उर्वरीत घट्कांची महाराष्ट्र जीवन प्रधिकरण सन 2010-11 च्या दरसुची अन्वये तपासणी करुन अतिप्रदान झाले असल्यास त्याची वसुली करण्यात यावी. खरेदी केलेल्या पाणीपुरवठा साहित्याची हैड्रोलिक तपासणी करण्यात आली होती किंवा

कसे याची अभिलेखे उपलब्ध नसल्याने पडताळणी अरता आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु. **17,36,976/-**

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु. **4,18,60,898/-**

एकुण वसूलपात्र रक्कम रु. **37,73,076/-**

DATASDM5602 (Ref No : 62)

## *63 सुरक्षा रक्षक पुरविणेचा ठेका देण्याच्या प्रक्रियेत आढळुन आलेल्या त्रुटी.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :सुरक्षा रक्षक ठेका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5638680.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 555800.00/-

***वसई-विरार महानगरपालिका जुलै 2009 मध्ये अस्तित्वात आली तत्पुर्वी नवघर-माणिकपुर, वसई, विरार व नालसोपारा या 4 नगरपरिषदा अस्तित्वात होत्या. त्यांचे आता प्रभागात रुपांतर करण्यात आले आहे. नगरपरिषदा अस्तित्वात असताना देण्यात आलेले सुरक्षा रक्षक पुरवठ्याचे ठेके अद्यापही सुरु ठेवल्याने प्रत्येक प्रभागातील दरात तफावत आहे. त्यामुळे महानगरपालिकेस जदा खर्च करावा लागत आहे.***

वसई-विरार शहर महापालिकेच्या संपत्तीचे रक्षण करण्यासाठी ठेका पध्दतीने सुरक्षा रक्षक घेण्याबाबतची नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रथ्म सचिव, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळ यांचेकडे मागणी नोंदविणे अथवा त्यांचेकडे सुरक्षा रक्षक उपलब्ध नसल्यास तसे प्रमाणपत्र घेऊन निविदाप्रक्रिया राबविणे आवश्य्क होते. सदर प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

वसई-विरार शहर महापालिका अंतर्गत अ,ब,क,ड,ई प्रभाग कार्यरत आहेत पैकी अ,क,ड या प्रभागात सन 2009-10 करीता सुरक्षा रक्षक ठेके पध्दतीने घेण्याबाबत जाहीर निविदा प्रसिध्दी देऊन प्राप्त् निविदेतील न्युन्यतम दर असलेल्या ठेकेदारांनी ठेका मंजूर करण्यात आलेला आहे.

प्रभाग 'अ' साठी संखे सिक्युरीटी सर्विसेस प्रति सुरक्षा रक्षक दर रु. 6,583/-

प्रभाग 'क' शार्प एंन्टरप्रायझेस प्रति सुरक्षा रक्षक दर रु. 4,447/-

प्रभाग 'ड' रिलायबल एजन्सी प्रति सुरक्षा रक्षक दर रु. 5,000/-

सन 2011-12 करीता वरील तिन्ही ठेकेदार यांना महापालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. 12, दि. 03.03.11 नुसार मुदत वाढ देण्यात आलेली आहे. वसई-विरार शहर महापालिकेची स्थापना 3 जुलै 2009 रोजी झालेली आहे. महापालिकेने ठराव क्र. 12, दि. 03.03.11 नुसार संबंधित प्रभाग समिती मधील ठेकेदार यांना मुदत वाढ दिलेली आहे. शासन निर्णय 2 जाने.1992 नुसार फक्त सहा महिने पुनर्प्रत्ययी आदेश देण्याची तरतूद आहे. सतत तीन वर्ष मुदत वाढ देण्याचे प्रयोजन लेखा परिक्षणास अवगत झाले नाही. मुदत वाढ देते वेळी वरील तिन्ही मंजूर ठेकेदार यांच्या दराची तुलना करणे आवश्यक होते. वरील तिन्ही ठेकेदारांमधील न्युन्यतम दर असलेल्या ठेकेदार याना लेखी पत्र देऊन तिन्ही प्रभाग समिती मध्ये सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याविषयी कळविणे अथवा जादा दर प्राप्त निविदादारांना न्युनतम दराने सुरक्षा रक्षक पुरविणेबाबत विचारणा करणे आवश्यक होते. परंतू तसे न करता प्रत्येक प्रभागामधील न्युनतम दर असलेल्या ठेकेदार याना नियमबाह्य मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

प्रभाग समिती 'अ' यांनी सन 2011-12 मध्ये खाली नमूद केल्या प्रमाणे ठेकेदार याना कार्यादेश देऊन वेळोवेळी सुरक्षा रक्षक घेतलेले आहेत.

व.वि.श.म. आस्था 358/2011-12, दि. 30.07.11 नुसार 50 सुरक्षा रक्षक स्थानिक संस्था कर विभागासाठी दि. 01.08.11 पासून 8 महिने

व.वि.श.म./आस्था/1501/2011-12, दि. 20.09.11 आरोग्य विभाग नालासोपारा व सुरक्षा रक्षक - 6 महिने

व.वि.श.म./आस्था/518/2010, दि. 23.10.10 कर्मशियल कॉम्प्लेक्स वसई पूर्व येथे 10 सुरक्षा रक्षक 12 महिने

व.वि.श.म./आस्था/746/2011, दि. 28.03.11 वसई रुग्णालय 3 सुरक्षा रक्षक दि. 01.03.11 पासून 12 महिने

व.वि.श.म./आस्था/491/2010, दि. 25.01.10 अतिक्रमण विभागासाठी 6 सुरक्षा रक्षक 12 महिने

विनप/आस्था/939/08, दि. 10.01.08 नुसार विरार नगर परिषद विविध विभागानी 65 सुरक्षा रक्षक 12 महिने

एकुण सुरक्षा रक्षक प्रभाग 'अ' साठी 143

मे. संखे सिक्युरिटी

| कालावधी | एकुण रक्षक | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| 12 | 84 | 6583 | 66,35,664 |
| 8 | 50 | 6583 | 26,33,200 |
| 6 | 9 | 6583 | 3,553482 |
| | | | 96,24,346 |

प्रभाग समिती 'अ' ने सन 2011-12 मध्ये सुरक्षा रक्षकावर एकुण खर्च रु. 96,24,346/- एवढा केलेला आहे. जर महापालिकेने प्रभाग समिती 'क' यांचे मंजूर दराने सुरक्षा रक्षक घेतले असते तर खालील नमूद केल्या प्रमाणे खर्च झाला असता.

शार्प एन्टर प्रायझेस यांचे दरानुसार कार्यालयीन आदेश साबावि/1423/08-09, दिनांक 08/03/2009

| कालावधी | एकुण रक्षक | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| 12 | 84 | 4447 | 44,82,576 |
| 8 | 50 | 4447 | 17,78,800 |
| 6 | 9 | 4447 | 2,40,138 |
| | | | 65,01,514 |
| संखे सिक्सुरीटी यांना अदा केलेली रक्कम रु. | | | 96,24,334 |
| शार्प एन्टर प्रायझेस यांचे दरानुसार खर्च | | | 65,01,514 |
| जादा खर्च रक्कम रु. | | | 31,22,820 |

म्हणजेच महापालिकेचे रु. 31,22,820 रु. नुकसान झालेले आहे. सदरची रक्कम आक्षेपाधिन आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. **31,22,820/-**

प्रभाग समिती 'ड' यांनी सन 2011-12 मध्ये एकुण 135 सुरक्षा रक्षक घेतलेले आहेत. प्रत्येक सुरक्षा रक्षकाचा महिन्याचा दर रु. 5,000/- आहे.

| कालावधी | एकुण रक्षक | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| 12 | 135 | 5000 | 81,00,000 |

सदर सुरक्षा रक्षक प्रभाग समिती 'क' यांचे मंजूर दरानुसार घेतले असते तर खालील प्रमाणे खर्च आला असता

| कालावधी | एकुण रक्षक | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| 12 | 135 | 4447 | 72,04,140 |
| मे. रीलायबल एजन्सीमध्ये दर अदा केलेली रक्कम | | | 81,00,000 |
| मे. शार्प एन्टर प्रायझेस यांचे दरानुसार येणारा खर्च | | | 72,04,140 |
| एकुण जादा खर्च | | | 8,95,860 |

म्हणजेच महापालिकेचे रु. 8,95,860/- एवढया रकमेचे नुकसान झालेले आहे. सदर रक्कम आक्षेपाधिन आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु**. 8,95,860/-**

नवघर-माणिकपूर नगरपरिषद ठराव क्र. निरंक दि. 20.02.09 नुसार मे. रिलायबल एजन्सी यांची न्युन्यतम दराची निविदा मंजूर करण्यात आलेली आहे. सदर निविदेचा कालावधी ठरावा नुसार 2009-10 ते 2011-12 चा असा आहे. रिलायबल एजन्सी यांचा न्युन्यतम दर रु. 6,75,000/- प्रति महिना तीन वर्षासाठी आहे. नवघर-माणिकपूर नगरपरिषदेचे सुरक्षा रक्षक ठेका नस्तीचे लेखा परिक्षण केले असता मे. रिलायबल एजन्सी याना सन 2010-11 व सन 2011-12 मध्ये निविदा दराच्या 10% वाढीव दराने रक्कम अदा केलेली आहे. निविदेमध्ये प्राप्त दर हे तीन वर्षाकरीता असल्याने तदनंतर मुदतवाढ

दिल्यास मंजूर दरावर 10% वाढ देणे योग्य होते. त्यामुळे सन 2010-11 व 2011-12 करीता देण्यांत आलेली वाढ नियमबाहय ठरते. निविदा दर 135 रक्षकासाठी प्रतिमहा रु. 6,75,000/- च्या 10% 67,500 वाढीव दराने देयके अदा केलेली आहेत. म्हणजेच 6,75,000+67,500= 7,42,500 प्रतिमहा अदा केलेले आहेत.

| | |
|---|---|
| म्हणून सन 2010-11 व 11-12 मधील 6,75,000 प्रमाणे एकुण खर्च | 1,62,00,000 |
| 10% जादा दराने एकुण खर्च | 1,78,20,000 |
| जादाखर्च | 16,20,000 |

उपरोक्त रक्कम रु. 16,20,000/- मे. रिलायबल एजन्सी याना जादाची अदा झालेली आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु**. 16,20,000/-**

प्राप्त दरानुसार रु. 81 लक्ष रकमेकरीता वार्षिक करारनामा करण्यांत आला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 कलम 63 ची दुरुस्ती सुधारणा क्र. 12 दि. 01/05/2006 नुसार 10 लाखापर्यंत रु. 100 व पुढील प्रत्येक 1 लाखाकरीता रु. 100 प्रमाणे (जास्तीत जास्त 5 लाखाच्या मर्यादेपर्यंत) रु. 7,200/- मुद्रांक शुल्क ठेकेदार यांनी भरणे बंधनकारक आहे. निविदाकारांनी रु. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला असल्याने मे. रिलायबल एजन्सी यांचे कडून रु. 7,100/- वसुल करुन शासन खाती जमा करावेत तो पर्यंत सदरची रक्कम रु. 7,100/- वसुल पात्र ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 7,100/-

मे. संखे सिक्युरिटी सर्विस यांना सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यासाठी सन 2011-12 मध्ये रु. 96,24,346 एवढी रक्कम अदा केलेली आहे. म्हणजेच सदर रकमेनुसार मे. संखे सिक्युरिटी यांचे कडून मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 कलम 63 ची दुरुस्ती सुधारणा क्र. 12, दि. 01/05/2006 नुसार 10 लाखापर्यंत रु. 100 व पुढील प्रत्येक 1 लाखाकरीता रु. 100 प्रमाणे (जास्तीत जास्त 5 लाखाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क ठेकेदार यांनी भरणे बंधनकारक आहे. निविदेची अंदाजित रक्कम 96 लक्ष असल्याने ठेकेदार संखे सिक्युरिटी यांचे कडून रु. 8,700/- वसुल करुन शासन खाती जमा करावेत तो पर्यंत सदरची रक्कम रु. 8,700/- वसुल पात्र ठेवण्यात येत आहे.

वसुल पात्र रक्कम रु**. 8,700/-**

प्रभाग समिती 'अ' यांची निविदा प्रसिध्दी मध्ये अंदाजित किंमत नमूद केलेली नाही. सन 2011-12 मध्ये एकुण खर्च रु. 96 लक्ष एवढा झालेला आहे. शासन निर्णय 02 जाने. 1992 व सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका नियम क्र. 214 नुसार अंदाजित रकमेच्या कमीत कमी 3% सुरक्षा अनामत घेणे क्रम प्राप्त आहे. तरी मे. संखे सिक्युरिटी यांचेकडून 2,88,000/- एवढी सुरक्षा अनामत वसुल पात्र आहे. प्रभाग समिती 'ड' यांची अंदाजीत रक्कम 84 लक्ष आहे. उपरोक्त नियमानूसार त्यांचे सुरक्षा अनामत रक्कम रुपये 2,52,000/- वसुलपात्र आहे. एकुण रक्कम रु. 5,40,000/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 5,40,000/-

एकुण आक्षेपाधिन रक्कम रु**. 56,38,680/-**

एकुण वसुल पात्र रक्कम रु**. 555800/**

याबाबत देण्यात आलेल्या अर्धसमास ज्ञापन क्र. 89 दि. 16/5/2013 ला नवघर-माणिकपुर

प्रभाग यांनी दि. निरंक अन्वये अनुपालन सादर केले असुन ते असमर्थनिय असल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

DPSKGGM6001 (Ref No : 63)

## *64 प्रभाग समिती "अ" मधील दावे व खटले नस्तीचे लेखा परिक्षणात आढळुन आलेल्या त्रुटी.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :दावे व खटले खर्च , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1641335.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 148255.00/-

***महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणा-या दावे व खटल्यांच्या विविध प्रकारातील विशेषज्ञ वकीलांचे निविदेद्वारे दाव्यांच्या प्रकारानुसार दर निश्चिती करुन मंडळ (पॅनल) स्थापन करण्यात आलेले नाही. त्यामुळे या कामावर अवाजवी खर्च होत आहे. मुद्रांक, न्यायालयीन मुद्रांक तसेच इतर खर्चाची चलने व प्रमाणके ठेवण्यात येत नाहीत त्यामुळे केलेला खर्च ग्राह्य धरता येत नाही.***

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती "अ" यांचे दावे व खटले नस्ती तपासणी केली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

प्रभाग समिती "अ" अंतर्गत विविध न्यायालयामध्ये दावे व खटले चालू आहेत. सदर दावे व खटल्यांचे कामकाज पहाण्यासाठी महापालिकेने नऊ वकीलांची नेमणूक केली आहे. सदर वकीलांची नेमणूक करताना जाहिर निविदा न मागवता नेमणूक करण्यांत आलेली आहे. जर जाहीर निविदा प्रसिध्दी देऊन वकीलांच्या नुमणूका केल्या असत्या तर महापलिकेला स्पर्धात्मक दर प्राप्त होऊन महापालिकेचा फायदा झाला असता. असे न केल्यामुळे महापलिकेचे नुकसान झालेले आहे. प्रत्येक बाबींसाठी वेगवेगळे दर मागविणे क्रम प्राप्त होते. उदा. हिअरिंग, आर्ग्युमेंट, केवेट, प्रत्येक तारखेला कोर्ट मध्ये उपस्थित राहणे, नोटीस मसुदा, नोटीस उत्तर, अपिल, इत्यादी. मानधन ठरविते वेळी कोणत्याही प्रकारचा निकष लावलेला नाही त्यामुळे मुंबई वित्तीय नियम 1959 (BFR 1959) मधील नियम 58 मधील वित्तीय औचित्यांचा भंग झालेला आहे.

वसई कोर्ट व पालघर कोर्ट मधील प्रलंबित दाव्यांसाठी वरीलपैकी एकाची स्वतंत्र नेमणूक केली आहे व त्यांना विरार नगरपरिषद ठराव क्र. 45, दि. 5/11/2003 नुसार विविध बाबींसाठी त्यांची फी ठरवून त्यांना वेळोवेळी अदा करण्यांत आलेली आहे. सद्र विधिज्ञ हे एप्रिल 2011 ते मार्च 2012 या कालावधी

मध्ये एकूण 549 दाव्यांसाठी पालघर व वसई कार्ट येथे उपस्थित राहिलेले आहेत. सदर उपस्थितीचा एकूण खर्च रु. 3,86,000/- महापलिकेने त्यांना वेळोवेळी अदा केलेला आहे. सदर विधिज्ञ यानी प्रत्येक वेळा तीन महिन्याचे देयक सादर केले आहे व त्यांनी सादर केलेल्या देयकाप्रमाणे महापालिकेने त्यांना त्यांची देयके अदा केलेली आहेत. संबंधीत विधी विभागाने सदर दाव्यांसाठी सदर विधिज्ञ हे उपस्थित असल्याबाबतचे कोर्टाचे प्रमाणपत्र तपासून देयक पारीत करणे आवश्यक होते. सदर प्रमाणपत्र नस्ती मध्ये लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे त्यांना अदा केलेली फी रु. 3,86,080/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. दावे नोंद वही महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम क्र. 121 नुसार न ठेवता कोणत्या आधारे त्यांची देयके पारीत करण्यांत येतात.

सदर विधिज्ञांना माहे एप्रिल 2011 ते 31 मार्च 2011 पर्यंत कोर्ट फी स्टँप व इतर खर्चासाठी रु. 88,000/- महापालिकेमार्फत अदा करण्यांत आलेले आहेत. नस्ती तपासली असता किती कोर्ट फी स्टँप खरेदी केले त्याचे चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही. तसेच इतर बाबींवर किती खर्च केला याचा तपशिल लेखा परिक्षणास उपलब्ध झालेला नाही. संबंधीत विधी विभागाला याबाबत विचारणा केली असता कोर्ट फी स्टँप व इतर खर्चाचा हिशोब ठेवत नसल्याचे सांगितले. कोर्ट फी व इतर खर्चासाठी त्यांना अदा केलेले रु. 88,000/- चलन व इतर प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरची रक्कम वसूलपात्र आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग 'अ' अंतर्गत पालघर कोर्ट, वसई कोर्ट, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय येथे दावे चालविण्यांत येतात. परंतू प्रत्येक कोर्टामध्ये किती दावे आहेत, याबाबतची नोंद वही संबंधीत विधी विभागाने महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम क्र. 121 नुसार ठेवलेली नाही. सदर बाब गंभीर असून हयापुढे प्रत्येक कोर्टा मध्ये असलेल्या दाव्यांची नोंद वही ठेवण्यांत यावी.

अन्य एका विधिज्ञास अनुक्रमे रु. 3,97,080/- व 2,48,175/- दावा फी अदा करण्यांत आलेली आहे. त्यांनी दोन्ही देयकामध्ये सर्विस टॅक्स रु. 59,175/- ची मागणी केलेली आहे. तसेच शिक्षण कर 2% प्रमाणे 720 व उच्च शिक्षण कर 1% प्रमाणे 360 मागणी केलेली आहे. व त्याप्रमाणे देयक अदा केलेले आहे. सदर सेवा कर व इतर कर म्हणून रु. 60,255/- त्यांनी शासन जमा केल्याबाबतचे चलन लेखा परिक्षणाला उपलब्ध झालेले नाही म्हणून सदर रु. 60,255/- वसूलपात्र आहेत.

तसेच त्यांचे देयक क्र. 7766, दिनांक. 23/7/2011 रु. 3,97,080/- मध्ये सर्विस टॅक्स 10% लावलेला आहे व देयक क्र. 7766 दि. 23/6/2011 रु. 2,48,175/- मध्ये सर्विस टॅक्स 10.3% लावण्यात आलेला आहे. तसेच देयक क्र. 7339 मध्ये शिक्षण कर व उच्च शिक्षण कर अनुक्रमे 2% व 1% लावण्यात आलेला आहे. परंतू देयक क्र. 7339 मध्ये शिक्षण कर लावलेला नाही. वरील दोन्ही तफावती बाबत खुलासा सादर करावा. तसेच अदा केलेली रक्कम रु. 3,97,080/- व रु.2,48,175/- कोणत्या ठरावानुसार व ठरवून अदा केली तो ठराव लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यांत यावी. तोपर्यंत सदर रक्कम रु. 3,97,080/- व रु. 2,48,175/- एकूण रु. 6,45,255/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

दावा क्र. 44 सन 2011 हया दाव्यासाठी अन्य एका विधिज्ञास रु. 1,00,000/- एवढी फी अदा केलेली आहे. सदर फी कोणत्या नियमानुसार किंवा कोणत्या महापालिका ठरारवानुसार अदा केली तो ठराव नियम लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यांत यावा. तो पर्यंत सदरची रक्कम रु. 1,00,000/-

आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

दावा क्र. 6280, 4420, 4417, 419, 5065, 4365, 7963, 7966, 7969, 8028, 8030, 1,35,36 या दाव्यांचे कामकाज एक विधिज्ञांनी पाहिले आहे आणि म्हणून त्यांना त्यांचे देयकानुसार रु. 1,25,000/- 75,000/-,50,000/-, 35,000/-, 1,25,000/-, 50,000/- एकूण रु. 4,60,000/- अदा केलेले आहेत. नस्ती तपासली असता कोणत्या दाव्यासाठी किती रक्कम देण्याचे निश्चित केले आहे. या बाबतचा ठराव लेखा परिक्षणास उपलब्ध झालेला नाही. म्हणून सदरची रक्कम रु. 4,60,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

अन्य एक विधिज्ञ यांना दावा क्र. 6280 दि. 2012 चे कामकाज केल्या बाबत दि. 50,000/- अदा करण्यांत आले आहेत. सदर रक्कम कोणत्या ठरावानुसार निश्चित करण्योत येऊन अदा केली तो ठराव लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यांत यावा. तोपर्यंत सदरची रक्कम रु. 50,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिके मार्फत वसई कोर्ट, पालघर कोर्ट, जिल्हा न्यायालय, तसे उच्च न्यायालय येथे वेगवेगळया प्रकारचे दावे चालू आहेत. सदर दाव्यांच्या नस्ती विधी विभागाकडे उपलब्ध करून देण्या विषयी सूचित केले असता सदर नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

आक्षेपाधीन रक्कम अनुक्रम - **2 रु. 3,86,080/-**

**3 रु. 6,45,255/-**

**6 रु. 1,00,000/-**

**7 रु. 4,60,000/-**

**8 रु. 50,000/-**

एकूण आक्षेपाधीन रक्कम - **रु. 16,41,335/-**

वसूलपात्र रक्कम अनुक्रम **- 3 रु. 88,000/-**

**5 रु. 60,255/-**

एकूण वसूलपात्र रक्कम - **रु. 1,48,255/-**

DPSKGGM6001 (Ref No : 64)

## *65 प्रभाग समिती "ड" मधील दावे व खटले नस्तीचे लेखा परिक्षणात आढळुन आलेल्या त्रुटी.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :दावे व खटले खर्च , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2656800.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 168700.00/-

***महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणा-या दावे व खटल्यांच्या विविध प्रकारातील विशेषज्ञ वकीलांचे निविदेद्वारे दाव्यांच्या प्रकारानुसार दर निश्चिती करुन मंडळ (पॅनल) स्थापन करण्यात आलेले नाही. त्यामुळे या कामावर अवाजवी खर्च होत आहे. मुद्रांक, न्यायालयीन मुद्रांक तसेच इतर खर्चाची चलने व प्रमाणके ठेवण्यात येत नाहीत त्यामुळे केलेला खर्च ग्राह्य धरता येत नाही.***

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती “ड” यांचे दावे व खटले नस्ती तपासणी केली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

पाच वकील प्रभाग समिती ‘ड’ मधील सर्व दावे खटले यांचे कामकाज पहात आहेत. नवघर-माणिकपूर अस्तित्वात असताना सदर वकीलांची नेमणूक ठराव क्र. 833, दि. 11/12/2000 नुसार करण्यांत आलेली आहे व त्याच ठरावाला 2011-12 पर्यांत मुदत वाढ देण्यांत आलेली आहे. नगर परिषदेने वकीलांची नेमणूक करते वेळी जाहीर निविदा प्रसिध्दी देऊन निविदा न मागवता नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. जर जाहीर निविदा प्रसिध्दी देऊन वकीलांच्या नुमणूका केल्या असत्या तर नगर परिषदेला / महापलिकेला स्पर्धात्मक दर प्राप्त होऊन नगर परिषद / महापलिकेचा फायदा झाला असता. असे न केल्यामुळे महापलिकेचे नुकसान झालेले आहे. प्रत्येक बाबींसाठी किंवा प्रत्येक केस साठी वेगवेगळे दर मागविणे क्रम प्राप्त होते. उदा.1) हिअरिंग, आर्ग्युमेंट, केवेट, प्रत्येक तारखेला कोर्ट मध्ये उपस्थित राहणे, नोटीस मसुदा, नोटीस उत्तर, अपिल, इत्यादी.

दावा क्र. 54/2010 वरीलपैकी एक विधिज्ञ याना रु. 50,000/- सदर दाव्याच्या कामासाठी अदा केलेले आहेत. नस्ती तपासली असता कोणत्या दाव्या साठी किती रक्कम संबंधीत वकील यांना देण्याचे निश्चित केल्याचा ठराव लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरची रक्कम रु. 50,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

अन्य एक विधिज्ञ यांनी सन 2011-12 मध्ये 33 दाव्यांचे कामकाज पाहीले आहे व त्यासाठी त्यांना रु.3,85,000/- अदा करण्यांत आलेले आहेत. महापालिका प्रशासकीय ठराव क्र. 27 दि. 12/8/2009 नुसार फक्त येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याबाबत ठरावा मध्ये नमूद केले आहे. परंतू कोणकोणत्या कामासाठी किती रक्कम देण्यात यावी याचा स्पष्ट उल्लेख ठरावा मध्ये नसल्याने सदरची रक्कम रु.3,85,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

प्रशासकीय ठराव क्र. 27 दि. 12/8/2009 नुसार एक विधिज्ञांना दावा क्र. 3661, 51, 2614, 3925 चे कामकाजासाठी नेमणूक करण्यात आली आहे व त्यानुसार त्यांना रु. 85,000/- अदा करण्यात आलेले आहे. परंतू ठराव क्र. 27 मध्ये कोणत्या बाबींसाठी किती रक्कम हे नमूद नसल्याने सदरची रक्कम रु. 85,000/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

एका विधिज्ञांनी 27 दाव्यांचे कामकाज नगर पिरषद ठराव क्र. 1631 दि. 8/10/2003 पाहीले आहे व त्यासाठी त्यांना रु. 1,62,150/- फी अदा केलेली आहे. सदर ठरावामध्ये कोणत्या बाबीसाठी किती रक्कम हे स्पष्ट नमूद नसल्याने. सदरची रक्कम रु. 1,62,150/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. तसेच

त्यांना किरकोळ खर्चासाठी रु. 8,700/- अदा केलेले आहे. सदर रक्कम कोणत्या नियमानुसार अदा केली तो नियम लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात यावा. तोपार्यंत सदरची रक्कम रु. 8,700/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. तसेच त्यांनी उपआयुक्त यांचेशी मिटींगसाठी उपस्थित राहीले त्याबाबत त्यांना रु. 11,250/- अदा केलेले आहेत. नस्ती तपासली असता नाईक व उपआयुक्त यांची बैठक कधी झाली किती बैठका झाल्या याबाबतची नोंद नस्तीमध्ये उपलब्ध झालेली नाही. म्हणून सदरची रक्कम रु. 11,250/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

एक विधिज्ञ यांनी सन 2011-12 मध्ये एकूण 417 दाव्यांच्या तारखांना पालघर कोर्ट व वसई कोर्ट येथे उपस्थित राहीले आहेत. सदर उपस्थितीचा एकूण खर्च रु. 19,63,400/- महापालिकेने त्यांना अदा केलेला आहे. त्यांनी वेळोवेळी देयक सादर केलेले असून महापालिकेने त्यांना त्यांची देयके मंजूर केलेली आहेत. संबंधीत विधी विभागाने विधिज्ञ उपस्थित असल्या बाबतचे कोर्टाचे प्रमाणपत्र तपासून देयके पारीत करणे आवश्यक होते. सदर प्रमाणपत्र नस्ती मध्ये लेखा परिक्षणासाठी उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे त्यांना अदा केलेली फी रु.19,63,400/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

त्यांना सन 2011-12 मध्ये कार्ट फी स्टँप व इतर किरकोळ खर्च यासाठी एकूण रु.1,60,000/- महापलिकेमार्फत अदा करण्यांत आलेले आहेत. नस्ती तपासली असता किती कोर्ट फी स्टँप खरेदी केले त्याचे चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही. तसेच इतर किरकोळ खर्चावर किती खर्च करण्यात आला त्याचा तपशील किंवा विवरणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. संबंधीत विधी विभागाकडे याबाबत विचारणा केली असता, कोर्ट फी स्टँप व किरकोळ खर्चाचा हिशोब ठेवत नसल्याचे सांगितले. कोर्ट फी व इतर खर्चासाठी त्यांना अदा केलेले रु. 1,60,000/- चलन व प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदरची रक्कम वसूलपात्र ठरते.

अनुक्रमांक **5** - रु. **8,700/-**

अनुक्रमांक **7** - रु. **1,60,000/-**

वसूलपात्र रक्कम - रु. **1,68,700/-**

| | | | |
|---|---|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम अनुक्रम | - **2** | रु. | **50,000/-** |
| | **3** | रु. | **3,85,000/-** |
| | **4** | रु. | **85,000/-** |
| | **5** | रु. | **1,73,400/-** |
| | **6** | रु. | **19,63,400/-** |
| एकूण आक्षेपाधीन रक्कम | - | रु. | **26,56,800/-** |

DPSKGGM6001 (Ref No : 65)

## ***66 मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 नियम क्र. 260 व 267 नुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई न केल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5305127.00/-

***मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 कलम 260 (2), 267 (2), 478 (2) नुसार संबंधित मालकाकडून वसूल करणे क्रमप्राप्त असताना अनधिकृत बांधकाम धारकाकडुन वसुली करण्यात आलेली नाही.***

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग अ,क,ड,ई यांची अनधिकृत बांधकामांबाबतच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

सन 2011-12 मध्ये अस्तित्वात असलेली अनधिकृत बांधकामांचा तपशील खाली दर्शविलेल्या तक्त्या प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रभागाचे नांव | सन 2011-12 मध्ये अस्तीत्वात असलेली अनधिकृत बांधकामे | सन2011-12 मध्ये अनधिकृत कामावर केलेली कारवाई | कारवाई निहाय झालेला खर्च | मालमत्ता धारकांकडून वसूल केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विरार प्रभाग | 252 | 66 | - | - |
| 2 | नालासोपारा | 342 | 107 | 8,77,300 | - |
| 3 | नवघर माणिकपूर | 716 | 534 | 30,96,667 | - |
| 4 | वसई | 697 | 58 | 3,48,000 | - |
| 5 | पेल्हार | अप्राप्त | अप्राप्त | - | - |
| | | 2007 | 705 | 43,21,967 | |

उपरोक्त तक्ता पहाता सन 2011-12 मध्ये एकूण 2007 एवढी अनधिकृत बांधकामे वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत आहेत. पैकी फक्त 705 अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर 705 अनधिकृत बांधकामे नष्ट करण्यासाठी महापालिकेने रु. 43,21,967/- एवढा खर्च केलेला असून सदर खर्च मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 कलम 260 (2), 267 (2), 478 (2) नुसार संबंधित मालकाकडून वसूल करणे क्रमप्राप्त होते. परंतू सदरचा खर्च वसूल न केल्यामुळे अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी आलेला खर्च रु. 43,21,967/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. **43,21,967/-**

महानगरपालिका अधिनियम 1949 नियम क्र. 478 (2) नुसार तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व

नगररचना आधिनियम 1966 नियम क्र. 57 नुसार संबंधित मालकाकडून अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी येणारा खर्च वसूलीबाबत वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग अ,क,ड,ई यांनी नोटीस दिलेली नाही. सदर बाब नियमबाह्य आहे.

अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी अधिकारी, कर्मचारी व पोलीस यांचे भोजनासाठी प्रभाग समिती (अ) विरार यांनी रु. 5,22,060/-, प्रभाग समिती (क) नालासोपारा यांनी रु. 1,81,200 व प्रभाग समिती (ड) नवघर-माणिकपूर यांनी रु. 2,79,900/- एकूण खर्च रु. 9,83,160/- एवढा झालेला आहे. सदर खर्च कोणत्या नियमाने करण्यांत आला याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. करीता रु.9,83,160/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. **9,83,160/-**

अनधिकृत बांधकामाबाबतची माहिती लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्याविषयी अर्ध समास क्र. 133, दि. 18/6/13 नुसार प्रभाग समिती पेल्हार 'ब' यांना कळविले असता दप्तर उपलब्ध करून देण्यात आले नाही. सदर बाब मुंबई स्थानिक लेखा परिक्षा अधिनियम 1930 कलम 6 चा भंग करणारी आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 66)

## *67 महिला व बालकल्याण अंतर्गत अंगणवाडी व शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महिला बलकल्याण योजना , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 102000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2400.00/-

***महिला व बालकल्याण योजनेकरीता शासन निर्णय् क्रमांक 2005/ प्र.क्र.255/ 05/नवि-20, दिनांक 08.11.2010 नुसार महानगरपालिकेच्या खर्च अंदाजपत्राच्या 5% तरतुद करणे व शासन निर्णयात नमुद बाब क्र. 1 ते 15 नुसार विविध योजनावर खर्च करणे अपेक्षित आहे तथापि आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये या योजनेकरीता 0.71% तरतूद व 0.24% खर्च करणेत आला आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | महिला बालकल्याण अंतर्गत अंगणवाडी मुलांना व शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्य पुरविणे. |
| स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. हारजीत कलेक्शन व ऑक्सा बुक कं. |

| | |
|---|---|
| तांत्रिक मंजुरी | ------ |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 12, दि. 01.08.2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ------ |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 34 लक्ष |
| बजेट तरतुद | 7.50 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै. सकाळ 24.06.11 ते 04.07.11 |
| इसारा रक्कम | 17,500/- |
| निविदा रक्कम | 34 लक्ष |
| सुरक्षा अनामत | 34 हजार |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 600/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | वविशम/भां/427/11, दि. 03.08.11 |
| काम सुरु दिनांक: | काम पुर्ण दिनांक : |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | 1 कोटी |
| प्रमाणक क्र. 8754 | दि. 16.02.2012 |

महिला व बालकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना व अंगणवाडी विद्यार्थ्यांना साहित्य वाटप नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती सुधारणा क्र. 12 दि. 01.05.2006 नुसार निविधा रकमेच्या प्रथम 10 लक्षापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लक्ष करीता किंवा त्यांच्या प्रत्येक भागाकरीता 100 प्रमाणे जास्तीत जास्त 5 लक्षाच्या मर्यादेप्रमाणे मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. शालेय व अंगणवाडी विद्यार्थ्यांना साहित्य पुरविणेस निविदा रक्कम 34 लक्ष आहे. म्हणून मे. आक्सा बुक हरजीत कलेक्शन यांचे कडून मुद्रांक शुल्क रु. 2,400/- वसुल करुन शासन सदरी जमा करावे तो पर्यंत सदरची रक्कम रू. **2,400/-** वसुल पात्र आहे.

शासन निर्णय 2 जानेवारी 1992 नुसा इसारा रक्कम निविदा रकमेच्या 1% एवढी घेणे क्रम प्राप्त आहे. निविदा नस्ती तपासली असता ठेकेदार यांचेकडून निविदेसोबत अर्धा टक्के इसारा रक्कम घेण्यात आली आहे. अर्धा टक्के कमी इसारा रक्कम घेण्याचे प्रयोजन लेखा परीक्षणाच्या निदर्शनास आले नाही. यापुढे निविदा रकमेच्या कमीत कमी 1 टक्का इसारा रक्कम निविदे सोबत घेण्यात यावी.

शालेय व अंगणवाडी विद्यार्थ्यांना साहित्य पुरवठा नस्ती तपासली असता निविदा रक्कम 34 लक्ष एवढी आहे. निविदा रकमेच्या कमीत कमी 3 टक्के ते 10 टक्के पर्यंत सुरक्षा अनामत घेणे अशी शासनाचे निर्देश आहेत प्रत्यक्ष निविदा नस्ती तपासली असता ठेकेदार यांचे कडून फक्त 1 टक्का सुरक्षा अनामत घेतलेली आहे. कमीत कमी 3% सुरक्षा अनामत ठेकेदार यांचे कडून वसुल करण्यात यावी. 3 टक्के प्रमाणे 34 लक्ष रकमेवर रु.**1,02,000/-** एवढी सुरक्षा अनामत होत आहे. सदरची रक्कम न घेतल्यामुळे आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

निविदा अटी शर्ती अट क्र. 10 व शासन निर्णय् क्र. भाखस-1094/2679/उद्योग 6, दिनांक 30.03.1994 नुसार आयकर,विक्रीकर भरल्याबाबतचे अनुक्रमांक 1.4.1.3 अ/ब व 1.4.2.1., 1.4.2.3 नुसार कागदपत्र निविदेसोबत सादर केलेली नाहीत.

महिला व बालकल्याण योजनेकरीता शासन निर्णय् क्रमांक 2005/ प्र.क्र.255/ 05/नवि-20, दिनांक 08.11.2010 नुसार महानगरपालिकेच्या खर्च अंदाजपत्राच्या 5% तरतुद करणे व शासन निर्णयात नमुद बाब क्र. 1 ते 15 नुसार विविध योजनावर खर्च करणे अपेक्षित आहे. सन 2011-12 हया आर्थिक वर्षाची महानगरपालिकेची महसुली खर्च रु. 461.06 कोटी एवढी आहे. महिला बाल कल्याण समितीसाठी महसुली खर्चाच्या 5% रक्कम रु. 23.05 कोटी अंदाज पत्रकामध्ये तरतूद करणे क्रमप्राप्त आहे. प्रत्यक्ष अंदाज पत्रक तपासले असता सन 2011-12 ची मुळ तरतूद 3.27 कोटी एवढीच करण्यात आली आहे. व प्रत्यक्ष खर्च 1.12 कोटी एवढा करण्यात आलेला आहे. आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये या योजनेकरीता 0.71% तरतूद व 0.24% खर्च करणेत आला आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 67)

## *68 अग्निशमन विभागातील व्यवस्थापन ठेका (फायरमन) नवघर-माणिकपूर विभाग*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :अग्निशमन व्यवस्थापन , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1431360.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 45630.00/-

***नवघर-माणिकपुर विभागात अग्निशमन व्यवस्थापन ठेक्यात फायरमन नियुक्त करताना फायरमन प्रशिक्षण प्रमाणपत्र नसताना नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तपासणी करण्यात आलेल्या प्रमाणकात हजेरीपत्रकात असलेल्या 3 फायरमनची नावे प्रमाणकसोबतच्या यादीत नसतानाही सर्व 12 फायरमनचे प्रदान करण्यात आले आहे.***

वसई - विरार शहर महानगरपालिका विभागातील नवघर-माणिकपूर विभागाकरीता अग्निशमन कर्मचारी फायरमन व ड्रायव्हर निविदा मागवून ठेका पध्दतीने मे. जिवदानी फायर सर्व्हिस हयांना मंजुर करण्यात आलेले आहे. सदर निविदा प्रक्रिया तपासली असता सदरचे काम दि. 01.04.10 पासुन दि. 31.03.11 पर्यंत मंजूर करण्यात आलेले आहे. ठराव क्र. 12, दि. 31.03.11 अन्वये नविन अभिकर्त्याची नेमणूक होईपर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग निर्णय क्र. भांखस/1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/01/1992 मधील परिच्छेद 8-3. परिशिष्ठ “सात नुसार” पुर्नप्रत्यायी आदेश देताना ते मुळ आदेशाच्या

तारखेपासून सहा महिन्याच्या अवधीत किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण हाईपर्यंत जो कालावधी कमी असेल त्याकरीता देण्यात यावेत असे नमूद आहे. तथापी, सदर निविदाधारकास दि. 1/4/2011 पासुन आदेश निर्गमित केले असून आजतागायत त्यांचे काम सुरु आहे. सदर कालावधीत झालेला खर्च नियमबाहय असून तो आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

नवघर-माणिकपूर विभागाचे व्यवस्थापन ठेक्याची नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे उणीवा आढळुन आल्या.

माहे सप्टेंबर 11 चे प्रदान प्रमाणक क्र. 5450 दि. 20.10.11 अन्वये स्थुल रक्कम रु.1,19,280/- व मार्च 2012 चे प्रदान प्रमाणक क्र. 463 दि. 24.05.12 रु. 1,19,280/- अन्वये अदा केले. हजेरी पत्रक तपासले असता हजेरी पत्रकातील 3 कर्मचाऱ्यांची नावे प्रमाणाकांबरोबर जोडण्यात आलेल्या यादीमध्ये आढळून आली नाहीत. असे असताना मंजूर ठेक्याप्रमाणे सर्व 12 फायरमन्सचे देयक आकारणी करण्यात आले आहे. हजेरी पत्रकाव्यतिरिक्तच्या 3 कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यात आले आहे. प्रदान करण्यात आलेल्या तीन फायरमनचे वेतन (7605 x 3 = 22815) वसुल करण्यात यावे. (वसुलपात्र रक्कम प्रतिमाह रु. 22,815/-) हयाचप्रमाणे इतर महिन्याची प्रमाणके हजेरी पत्रकान्वये आपल्या स्तरावर तपासणी करुन हजेरी पत्रकाव्यतिरिक्त असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाची वसुली करण्यात यावी.

वसुलपात्र रक्कम रु. 45630/-

प्रमाणाकांमध्ये आयकर वजाती करण्यात आलेली आहे. व्यवसायकर वजा करण्यात आलेला नाही. ठेका देण्यात आलेला दिनांकापासून व्यवसाय कराची परीगणना करुन नियमानूसार वसुल करावा व शासन दप्तरी भरणा करण्यात यावा.

निविदेतील अट क्र. 14 अन्वये शासन मान्यता प्राप्त फायरमन प्रशिक्षण प्रमाणपत्र असलेल्या व्यक्ती नेमणे आवश्यक असताना तपासणीस उपलब्ध केलेल्या नस्ती नुसार-----

श्री. दिलीप शिरसाट, 2) श्री. जितेंद्र म्हात्रे, 3) श्री. भुपेश भाईर, 4) श्री. राहूल नगराळे हयांची प्रमाणपत्रे उपलब्ध झाली नाही.

श्री. गणेश पवार, 2) श्री. दिनानाथ म्हात्रे हयांनी सिव्हिल डिफेन्स चा 10 दिवसांचा कोर्स केल्याचे प्रमाणपत्र जोडण्यात आलेले आहे.

निविदेतील अट क्र. 14 चा भंग झालेला असल्याने कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेले वेतन नियमबाहय असून ते वसूल करण्यात यावे व ठेकेदारावर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

निविदेतील अट क्र. 32 अन्वये दरमहा कामाचे देयक अदा करताना कामाचे देयक विभाग प्रमुखांनी अथवा उपआयुक्तांनी निश्चित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी शिफारस करणे आवश्यक असताना तपासणी करण्यात आलेली देयके कोणत्याही अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आढळून आली नाही. सबब करण्यात आलेली प्रदाने आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

## *69 उद्यानातील खेळण्यांच्या दुरुस्तीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :उद्यानासाठी खेळणी खर , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 63900.00/-

***खेळणी नादुरुस्त झाल्याने त्यांच्या दुरुस्तीची मागणी संबंधित उद्यान निरिक्षकामार्फत करण्यांत आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मागणी नसताना खेळणी दुरुस्तीवर रु. 63,900/- इतका खर्च करण्यांत आला आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'सार्वजनिक उद्याने व क्रिडांगणे' या लेखाशिर्षांतर्गत प्रभाग समिती 'अ' च्या हद्दीतील विविध बालोद्यानातील सन 2010-11 या वित्तीय वर्षात खेळणी दुरुस्ती करण्यास, ठराव क्र. 246, दि.09/03/2010 अन्वये प्रशासकीय मान्यता देऊन व ठराव क्र.365, दि. 05/04/2010 रोजी वित्तीय मान्यता देण्यांत आली होती. त्यानुसार मंजूर निविदाकार मे. अरिहंत इंडस्ट्रियल कॉर्पो. लि. यांनी भांडार विभागाचे आदेश क्र. वविशम/भां/59/2011, दि. 22/04/2011 अन्वये सदर उद्यानांतील खेळण्यांची दुरुस्ती केली आहे. त्याबाबतचा खर्च रक्कम रु. 63,900/- चे प्रदान महानगरपालिकेने प्रमाणक. क्र. 9045, दि.13/03/2012 अन्वये केले आहे.

प्रस्तुत प्रकारणाच्या नस्तीची पडताळणी केली असता असे दिसून येते की, वरील खेळणी नादुरुस्त झाल्याने त्यांच्या दुरुस्तीची मागणी संबंधित उद्यान निरिक्षकामार्फत करण्यांत आल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रशासनिक अथवा वित्तिय मान्यता देताना मागणी वा तत्संबंधीचे निकष विचारात घेण्यात आल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे मागणी नसताना दुरुस्तीच्या निविदा मागवून त्यावर रु. 63,900/- इतका करण्यांत आलेला खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सदर खेळण्यांची दुरुस्ती ही 'अ' प्रभागातील नेमक्या कोणत्या उद्यानातील आहे तसेच खेळणी कोणत्या कालावधीत बसवली गेली आहेत, हे नस्ती वरून स्पष्ट होत नाही. खेळणी जर 1 वर्षाच्या आतील असतील तर त्यांच्या दुरुस्तीचा खर्च हा करारान्वये महानगरपालिकेने न करता संबंधित कंत्राटदाराने करणे आवयश्यक ठरते.

## *70 "ड" विभागातील कृष्णा टाऊनशिप येथील सुर्या उद्‌यान सुशोभिकरण करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :विकास कामांतर्गत उद् , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम रु. 1032814.00/-

***नमुना बी-1 मधील कलमांची पुर्तता न करताच कामाचा ठेका देण्यात आला आहे. काम पुर्ण करण्यास होणा-या विलंबाची कारणे संयुक्तिक आहेत अथवा नाहीत याचा विचार न करता अवास्तव मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच नियमानुसार कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | "ड" विभागातील कृष्णा टाऊनशिप येथील सुर्या उद्‌यान सुशोभिकरण |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे.मुंदरा एंटरप्रायजेस (0.09 कमीदराने) |
| तांत्रिक मंजुरी | 5/4/11 |
| प्रशासकीय मंजुरी | 11/5/11 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2011-12 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | रु. 28,57,280/- |
| बजेट तरतुद | 1 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 19/4/11 ते 30/4/11 = 12 दिवस, दै. नवाकाळ, |
| इसारा रक्कम | रु. 28,600/- |
| निविदा रक्कम | रु. 28,54,708/- |
| सुरक्षा अनामत | 4% DD ने. 1,14,291 + 5% बिलातून 1,42,864 = 2,57,155/- |
| कामाचा कालावधी | 120 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | -- |
| कार्यारंभ आदेश | 24/5/2011 |
| काम सुरु दिनांक: 24/05/11 | काम पूर्ण दिनांक: 23/09/2011 मुदत वाढीनंतर 30/03/12 |
| धावते देयक | देयकाची रक्कम रु. 11,47,571/- |

| | |
|---|---|
| एकुण खर्च रक्कम | निव्वळ देय रक्कम रु. 10,32,814/- |
| प्रमाणक क्र. 9204 दि. 31/3/12 | मोजमाप पुस्तक क्र. 183 |

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या "ड" विभागातील कृष्णा टाऊनशिप येथील सुर्या उद्यान सुशोभिकरणाच्या अंदाजित रक्कम रु. 28,57,280/- च्या कामासाठी दि. 19/4/11 रोजीच्या दै. नवाकाळ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली. त्याला 1) मे. आर.व्ही.कंस्ट्रक्शन्स, 6% जादा दराने, 2) मे. वराडे कंस्ट्रक्शन, 4.99% जादा दराने, 3) मे. मुंदरा एंटरप्रायजेस, 0.09% कमी दराने आणि 4) मे. बालाजी कंस्ट्रक्शन, 7% जादा दराने या निविदाकरानी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. मुंदरा एंटरप्रायजेस यांची कमी दराची निविदा त्यातील कागदपत्रांच्या छाननी अंती मंजूर करण्यांत आली. सदर कामास 5/4/11 रोजी तांत्रिक मंजूरी देऊन दि. 11/5/11 रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली आणि दि. 24/5/11 रोजीच्या कार्यादेशान्वये कामास सुरुवात झाली. प्रथमत: 120 दिवसांची कामाची मुदत देण्यांत आली, परंतू सदर मुदत दि. 23/9/11 रोजी संपल्यानंतर निविदाकार मे. मुंदरा एंटरप्रायजेस यांनी दि. 3/12/11 रोजी पावसाळयाच्या कारणास्तव कामाच्या मुदतवाढी संबंधी विनंती केल्याने महानगरपालिकेने त्यांना पत्र क्र. वविशम/कां.अं/बांध/22-12/20-12/दि. 18/2/2012 अन्वये दि. 31/3/12 पर्यंत मुदतवाढ मंजूर केली. सदर कामाच्या खर्चाचे 1 ल्या धावत्या देयकाचे प्रदान सर्व वजातीसह रु. 10,32,814/-, प्रमाणक क्र. 9204, दि. 31/3/12 रोजी कंत्राटदारास अदा करण्यांत आली. याची नोंद मोजमाप पुस्तिका क्र. 183 मधील पृष्ठ क्र. 52 वर घेण्यांत आली आहे.

सदर प्रकरणाची नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

सदर कामाचा कार्यादेश दि. 24/05/2011 रोजी निर्गमित केलेला असून कार्यादेशाच्या तारखेपासून 120 दिवासांची मुदत ठेकेदारास मंजूर करण्यांत आली. त्यानुसार सदर काम दि. 20/9/2011 रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतू ठेकेदाराने पत्र क्र. निरंक दि. 3/12/11 अन्वये सदर कामास मुदतवाढ मिळण्याची विनंती केल्याने महानगरपालिकेने पत्र क्र. वविशम/अ/बांध/2212/2012 दि. 28/2/2012 अन्वये ठेकेदाराची विनंती मान्य करून त्यास दि. 31/03/2012 पर्यंत मुदतवाढ मंजूर केली आणि यापुढे मुदतवाढ दिली जाणार नाही याची देखील सूचना ठेकेदारास देण्यांत आली.

प्रस्तुत प्रकरणी खालील मुद्दे उपस्थित होतात.

B-1 निविदा फॉर्म मधील कलम 6 अन्वये ठेकेदारास काम पूर्ण करणे कामी पुढे काही कारणास्तव जर मुदतवाढ हवी असेल तर त्याने निविदेतील कामाची मुदत संपण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांचेकडे लेखी अर्ज करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत प्रकरणी सदर ठेकेदाराने कामाची मुदत दि. 20/9/2011 रोजी संपल्यानंतर 74 दिवसांनी (दि. 3/12/11) कार्यकारी अभियंता यांना लेखी अर्जाने कळविले आहे. त्यामुळे ठेकेदाराने B-1 फॉर्म मधील करारपत्राच्या कलम 6 मधील अटीचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.

B-1 निविदा फॉर्म मधील पृष्ठ क्र. 28 वरील मुददा 7.1 "प्रोग्राम ऑफ वर्क" अन्वये, ठेकेदाराने पावसाळयाच्या कालावधीसह 120 दिवासांत काम पूर्ण करणे आवश्यक असल्याने संबंधित ठेकेदाराने पावसाळयाच्या कारणास्तव काम पूर्ण न झाल्याने मुदतवाढ मागितली आणि ती मंजूरही झाली.

सदरची कार्यवाही ही करारपत्रातील अटीचा भंग करणारी ठरते.

सदर कामाची मोजमाप पुस्तिका क्र. 183 ची पडताळणी केली असता केवळ 1 ले धावते देयक निव्वळ रक्कम रु. 10,32,814/- प्रमाणक क्र. 9204 दि. 31/3/2012 अन्वये ठेकेदारास अदा करण्यांत आल्याचे दिसून येते. सदर मोजमाप पुस्तिकेमध्ये शेडयुल बी अन्वये मंजूर केलेल्या कामाच्या सर्व बाबींचा अंतर्भाव दिसून येत नसल्यामुळे ते पूर्ण झाल्याच्या अंतिम प्रदानाची लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही. सदर प्रकरणी विहित मुदतीत काम ठेकेदाराकडून अद्‌याप पूर्ण झालेले नसल्याने मुदतवाढ संपल्याचा दि. 31/3/2012 पासून भविष्यात काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीपर्यंत करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार प्रतिदिन रु. 100/- एवढा दंड आकारून त्याची वजाती ठेकेदारास देय होणाऱ्या अंतिम देयकातून करणे अपेक्षित आहे. सदर ठेकेदाराने B-1 करारपत्रातील अटींनुसार विहीत मुदतीत अद्‌याप काम पूर्ण केल्याचे दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-05/06/प्र.क्र. 53/इमा-2, दि. 2/9/2006 अन्वये कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार कंत्राटदाराने निविदा करारातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास तसेच कामाचा गुणात्मक दर्जा न राखल्यास, कामामध्ये गैरप्रकार केल्यास कंत्राटदाराला प्रथम ताकीद देणे, पदावनत करणे, नोंदणी रदद करणे, दंड लावणे, काळया यादीत टाकणे आणि अंतिमतः त्याचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे नोंदणी प्राधिकाऱ्याला अधिकार देण्यांत आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणी अशा प्रकारची कारवाई झाल्याची नस्तीमधील कागदपत्रांवरून दिसून येत नाही. . वरील तिन्ही बाबींचा विचार करता निविदाकारास अदा केलेली रक्कम रु**. 10,32,814/-** आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे**.**

आक्षेपाधिन रक्कम रु**. 10,32,814/-**

B-1 निविदा फॉर्म मधील अट क्र. 3.7.1 (पृष्ठ क्र. 5) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मंजूर ठेकेदाराने त्याची निविदा मंजूर झाल्यावर <u>7 दिवसांच्या आंत</u> निविदा रक्कमेच्या 4% दराने सुरक्षित अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेने मे. मुंदरा एंटरप्रायजेस यांना त्यांचे पत्र क्र. वविशम/कांअं बांध/351/11/12, दि. 11/5/2011 अन्वये निविदा मंजूरीबाबत कळविले आहे. त्यानुसार निविदाकाराने 7 दिवसांत म्हणजे दि. 17/5/11 रोजी अनामत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक होते. परंतू त्यांनी तसे न करता अनामत रक्कम D.D. No. 447803 अन्वये रु. 1,14,300/- पावती क्र. 101033 <u>दि**. 23/5/11**</u> रोजी महानगरपालिकेकडे विलंबाने जमा केल्याचे दिसून येते..

दिनांक 24/5/2011 च्या कार्यादेशामध्ये करारनामा दि. 23/5/11 रोजी केल्याचे नमूद केलेले आहे. परंतू नस्तीमधील करारनाम्यावर कुठेही तारीख नमूद केल्याचे दिसून येत नाही. सबब सदर करारनामा कायदेशीर बाब उद्भवल्यास वैध ठरत नाही.

ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्यातील अट क्र. 3 अन्वये ठेकेदाराने कामाचा विमा उतरविले असल्याचे कागदपत्र नस्तीमध्ये आढळून आले नाहीत.

B-1 निविदा फॉर्म मधील 3.6.3 अन्वये ठेकेदाराने मजूरांच्या वेतनाच्या कायदा, 1996, किमान वेतन कायदा 1948, कामगारांच्या सुरक्षेचा कायदा 1938, कामगारांचा नुकसान भरपाई कायदा 1961, कंत्राटी कर्मचारी कायदा 1979, अन्वये आवश्यक असलेली प्रमाणपत्रे नस्तीमध्ये आढळली नाहीत.

B-1 निवदिा फॉर्म मधील पृष्ठ क्र. 4 वरील निविदा उघडण्याबाबतची अट क्र. 3.6.2 अन्वये सदर कामावर कार्यरत असणाऱ्या मजूरांस किमान वेतन कायदा 1948 अन्वये वेतन देण्याबाबत लेखी

हमीपत्र देणे आवश्यक आहे. तश्याप्रकारचे कागदपत्र नस्ती मध्ये आढळले नाही.

सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 28,57,280/- एवढी मोठया प्रमाणावर असल्याने त्याच्या कामाचा दर्जा उच्च् राखणे देखील आवश्यक आहे. त्यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. जाहिरात-2009/प्र.क्र.137/का-34, दि. 31/8/2009 अन्वये दर्जात्मक आणि जास्त खपाचे किमान एका (ब) वर्गाच्या दैनिकामध्ये आणि कमी खपाच्या एका दैनिकामध्ये कामाची जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. जेणेकरून कामास मोठया प्रमाणावर प्रसिध्दी मिळून त्याचा स्पर्धात्मक दर्जा राखणे सुलभ जाते. प्रस्तुत प्रकरणी वरील कामाची जाहिरात केवळ नवाकाळ या दैनिकात दिल्याने शासनाच्या जाहिरातीबाबतच्या धोरणाची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाकस/1094(2679)/उद्योग-6, दि. 30/3/94 अन्वये निविदा सुचना जाहिर करताना लिफाफा क्रमांक 1 मध्ये खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

इसारा रक्कम (धनादेश / धनाकर्ष वगैरे).

ठेकेदाराचा सदर कामाचा मागील अनुभव.

मागील 3 वर्षापैकी कुठल्याही 1 वर्षाचा वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र.

कामगार कायदा 1970 अंतर्गत नोंदणी केलेले प्रमाणपत्र.

मंजूर कामासाठी जर कामगारांचा पुरवठा करावयाचा असेल तर कामगार आयुक्तांचे प्रमाणपत्र (अनुज्ञप्ती).

भविष्य निर्वाह निधी कायदा 1950 अंतर्गत ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र.

E.S.I.S. ची नोंदणी प्रमाणपत्रे.

व्यवसाय कर (Profession Tax) कायदयाखालील नोंदणीचे प्रमाणपत्र

महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या निविदा सुचनेत लिफाफा क्र. 1 मध्ये निविदाकाराची परवाना नोंदणी व इसारा रक्कम भरल्याबाबतच्या कागदपत्रांव्यतिरिक्त इतर आवश्यक कागदपत्रे मागविलेली नाहीत.

आक्षेपाधिन रक्कम रु**. 10,32,814/-**

DATRADM5901 (Ref No : 70)

## *71 महानगरपालिकेने जतन केलेल्या भविष्य निर्वाह निधीमधील त्रुटी.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*महानगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***भविष्य निर्वाह निधीची गुंतवणुक वेळोवेळी करण्यात येत नाही. गुंतवणुकीतील प्रलंबीतता पाहता***

***जमेपेक्षा जास्त खर्च झालेल्या रु. 19,01,808.25 इतक्या रकमेची तरतुद महानगरपालिकेस स्वतःच्या निधीतुन करावी लागली.***

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत विरा, नालासोपारा, नवघर-माणिकपूर, वसई प्रभागामधील भविष्य निर्वाह निधी लेख्यांचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रभाग समिती 'अ' यांचे भ.नि.निधी नमुना 98 व 99 तपासले असता कर्मचाऱ्यांच्या वार्षिक लेखावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच सदरची खातेवही कोनी अद्यावत केली त्यांची स्वाक्षरी नाही.

सोबत जोडलेल्या परिशिष्टातील एकूण 37 कर्मचाऱ्यांना त्यांच्या खाती जमा असलेल्या रक्कमा आज पर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या नाहीत. तसेच सदर रक्कमा ज्या दिनांकापासून कर्मचाऱ्यांच्या खाती जमा आहेत त्या कर्मचाऱ्यांना भ.नि.निधी नियम क्र. 12 (1,2,3) नुसार व्याज दिलेले नाही. तरी कर्मचाऱ्यांच्या खाती ज्या दिनांकापासून रक्कमा शिल्लक आहेत त्या दिनांकापासून कर्मचाऱ्यांना व्याज देण्यांत यावे. तसेच उपरोक्त 37 कर्मचाऱ्यांच्या रक्कमा त्यांना अदा करण्यांत याव्यात.

प्रभाग समिती 'अ' मधील भ.नि.निधी लेखा नमुना 98 तपासला असता कर्मचाऱ्यांना सन 2011-2012 या आर्थिक वर्षामध्ये फक्त 11 महिन्यांच्या जमा रक्कमेवर व्याज देण्यांत आलेले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना अंदाजे रु.1500/- ते रु.2000/- व्याज कमी मिळालेले आहे. तरी कर्मचाऱ्यांना 12 महिन्यांच्या रक्कमेवर परिगणना करून व्याज देण्यांत यावे. तसेच महाराष्ट्र शासन अधिसूचना दि. 26/5/2012 नुसार डिसेंबर 11 पासून 8.6% व्याजाचा दर ठरविण्यात आला आहे. त्याप्रमाणे परिगणना करून कर्मचाऱ्यांच्या खाती व्याज जमा करावे.

प्रभाग समिती 'अ' मधील भ.नि.निधी नमूना 98 तपासला असता कर्मचाऱ्यांचे पद, कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन नमूद केलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांची कपात केलेली वर्गणी भ.नि.निधी नियम 10 (1) अ,ब नुसार 6% असल्याची लेखा परिक्षणाला खात्री करता आली नाही. ह्यापुढे प्रत्येक कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन लेख्यामध्ये नमुद करावे.

प्रभाग समिती 'अ' यांनी महाराष्ट्र नगरपारिषद लेखा संहिता 1971 नियम 134 (1,2) नुसार कर्मचाऱ्यांना त्यांच्या खाती जमा असलेल्या रक्कमेचे विवरणपत्र दिलेले नाही. तरी ह्यापुढे कर्मचाऱ्यांना त्यांनी वर्षभरामध्ये वर्गणी स्वरुपात जमा केलेली रक्कम व त्या रक्कमेवर प्राप्त व्याज व वर्षा अखेरची शिल्लक दर्शविणारे विवरणपत्र देण्यांत यावे.

प्रभाग समिती 'ड' यांचे भ.नि.निधी लेखा नमुना 98 तपासता कर्मचाऱ्यांना सन 2011-12 चे व्याज 8% प्रमाणे देण्यांत आलेले आहे. महाराष्ट्र शासन अधिसूचना 26 मे 2012 नुसार माहे डिसेंबर 11 पासून

8.6% प्रमाणे व्याजाची परिगणना केलेली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना खाती व्याज कमी जमा करण्यात आलेले आहे.

प्रभाग समिती 'ड' यांचा नमुना क्र. 98 चे लेखा परिक्षण केले असता सोबत जोडलेल्या परिशिष्टातील एकूण 54 कर्मचाऱ्यांच्या खाती रक्कमा शिल्लक आहेत. सदरच्या रक्कमा कर्मचाऱ्यांना आजपर्यंत अदा केलेल्या नाहीत. तरी सदरच्या रक्कमा कर्मचाऱ्यांना अदा करण्यात याव्यात.

प्रभाग समिती 'ड' मधील श्री. जनार्दन मानकर, प्रशासकीय अधिकारी हे सन 2010 ह्या वर्षी सेवा निवृत्त झालेले आहेत व त्याप्रमाणे त्यांना त्यांच्या खाती जमा असलेली भ.नि.निधीची रक्कम देण्यांत आलेली आहे. परंतू नमुना क्र. 98 व 99 तपासला असता श्री.जनार्दन मानकर यांची शिल्लक रक्कम रु. 3,41,272/- सन 2011-2012 ह्या आर्थिक वर्षामध्ये त्याच्या खाती दर्शविण्यात आलेली आहे.

प्रभाग समिती 'ड' नमुना क्र. 98 चे लेखा परिक्षण केले असता प्रभागामध्ये दुसऱ्या विभागाकडून स्वीयेतर सेवेमध्ये आलेल्या मुख्याधिकारी नगर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक यांचे भ.नि.निधी लेखा सन 2011-12 पर्यंत दर्शविण्यात आलेला आहे. स्वीयेतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांचा लेखा कोणत्या नियमानुसार ठेवण्यात आला तो नियम लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यांत यावा. तसेच स्वीयेतर सेवेतील कर्मचाऱ्यांचा लेखा नमुना 98 मधून वगळून नमुना 98 अद्यावत करावा.

प्रभाग समिती 'ड' मधील भ.नि.निधी नमूना 98 तपासला असता कर्मचाऱ्यांचे पद, कर्मचाऱ्यांचे वेतन नमूद केलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी कपात केलेली वर्गणी भ.नि.निधी नियम 10 (1) अ,ब नुसार 6% असल्याची लेखा परिक्षणाला खात्री करता आली नाही. ह्यापुढे प्रत्येक कर्मचाऱ्यांचे वेतन लेखा मध्ये नमुद करावे.

प्रभाग समिती 'ड' यांनी महाराष्ट्र लेखा सदिती 1901 नियम 134 (1,2) नुसार कर्मचाऱ्यांना त्यांच्या खाती जमा असलेल्या रक्कमेचे विवरणपत्र दिलेले नाही. तरी ह्यापुढे कर्मचाऱ्यांना त्यांनी वर्षभरामध्ये वर्गणी स्वरुपात जमा केलेली रक्कम व त्या रक्कमेवर प्राप्त व्याज व वर्षा अखेरची शिल्लक दर्शविणारे विवरणपत्र देण्यांत यावे.

नालासोपारा प्रभाग 'क' कर्मचाऱ्यांचा नमुना 98 चे लेखा परिक्षण केले असता सोबत जोडलेल्या परिशिष्ट मधील 27 कर्मचाऱ्यांना त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या रकमा अदा करण्यात आलेल्या नाहीत. सदर कर्मचारी हे निवृत्त झाले आहेत की मृत्यु पावले आहेत यांची नोंद दप्तरामध्ये घेतलेली नाही. सदर बाब नियमबाह्य असून याबाबत प्रशासकीय कार्यवाही होणे आवश्यक आहे.

प्रभाग समिती 'क' नालासोपारा यांनी सन 2011-12 चा नमुना 98 खातेवही आजपर्यंत अद्यावत केलेली नाही. तसेच अद्यावत केलेल्या रक्कमा ह्या पेन्सिलने केलेल्या आहेत. त्यामुळे सदर रक्कमा ग्राह्य धरता येत नाहीत.

प्रभाग समिती 'क' मधील भ.नि.निधी नमूना 98 तपासला असता कर्मचाऱ्यांचे पद, कर्मचाऱ्यांचे वेतन नमूद केलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी कपात केलेली वर्गणी भ.नि.निधी नियम 10 (1) अ,ब नुसार 6% असल्याची लेखा परिक्षणाला खात्री करता आली नाही. ह्यापुढे प्रत्येक कर्मचाऱ्यांचे वेतन लेखा

मध्ये नमुद करावे.

प्रभाग समिती 'क' यांनी महाराष्ट्र लेखा सदिती 1901 नियम 134 (1,2) नुसार कर्मचाऱ्यांना त्यांच्या खाती जमा असलेल्या रक्कमेचे विवरणपत्र दिलेले नाही. तरी ह्यापुढे कर्मचाऱ्यांना त्यांनी वर्षभरामध्ये वर्गणी स्वरुपात जमा केलेली रक्कम व त्या रक्कमेवर प्राप्त व्याज व वर्षा अखेरची शिल्लक दर्शविणारे विवरणपत्र देण्यांत यावे.

प्रभाग समिती 'क' यांचे नमुना 98 व 99 तपासले असता कर्मचाऱ्यांच्या वार्षिक लेखावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच सदरची खातेवही कोणी अद्यावत केली त्यांची स्वाक्षरी नाही.

अर्ध समास क्र. 114 दिनांक, 31/5/2013 नुसार सन 2011-12 मध्ये कर्मचाऱ्यांकडून किती वर्गणी जमा झाली व सन 2011-12 मध्ये कर्मचऱ्यांना किती व्याज देण्यात आले, तसेच जमा वर्गणी पैकी किती रक्कमेची गूंतवणूक करण्यांत आली याची माहिती प्रभाग समिती 'अ' यांनी सादर केलेली नाही. खालील दर्शविलेल्या तक्त्या मधील फक्त 3 प्रभाग समिती यांनी माहिती सादर केली आहे.

| अ.क्र. | प्रभाग | 2011-12 जमा वर्गणी | 2011-12 भ.नि.नि. देय व्याज | 2011-12 मधील गुंतवणूक | 2011-12 गुंतवणूकीचे व्याज |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नवघर-माणिकपूर | 3,65,30,171/- | 26,02,605/- | निरंक | निरंक |
| 2 | नालासोपारा | 1,60,67,272/- | 11,66,662/- | निरंक | निरंक |
| 3 | वसई | 1,56,36,615/- | 10,79,453/- | निरंक | निरंक |
| 4 | विरार | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| | | 6,82,34,013/- | 48,48,720/- | | |

उपरोक्त तीन प्रभागांची सन 2011-12 ची जमा रक्कम रु. 6,82,34,013/- एवढी असून सदर रक्कम गुंतवणुक न केल्यामुळे त्या त्या प्रभागाच्या बँकेच्या बचत खात्यामध्ये शिल्लक आहे. गुंतवणुक केली नसल्याने गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजाची रक्कमेचे नुकसान झालेले आहे. वसई-विरार शहर महापालिका सन 2011-12 चे अंदाज पत्रक तपासले असता कर्मचाऱ्यांना भ.नि.नि. वर देय असणाऱ्या व्याजाची तरतूद केलेली नाही. अंदाज पत्रकामध्ये व्याजाची तरतूद न करता कर्मचाऱ्यांच्या खाती व्याज कसे जमा केले याबाबत लेखा परिक्षणास खुलासा झाला नाही.

आर्थिक वर्ष 2011-12 च्या जमा-खर्चाच्या वार्षिक लेख्यानुसार जमेचे अंदाज रु. 85,00,000/- व प्रत्यक्ष जमा रु. 74,84,904.25 दर्शविण्यात आली आहे तसेच अंदाजित खर्च रु. 94,00,000/- व प्रत्यक्ष खर्च रु. 93,86,712.50 इतका झाला आहे. वरीलप्रमाणे गुंतवणुकीतील प्रलंबीततेमुळे जमेपेक्षा जास्त खर्च झालेल्या रु. 19,01,808.25 इतक्या रकमेची तरतुद महानगरपालिकेस स्वतःच्य निधीतुन करावी लागली.

DPSKGGM6001 (Ref No : 94)

# कलम ९ क खालील आक्षेप

--------------------- निरंक --------------------

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

## *72 क्रिडांगणे, वृक्षारोपण आणि उद्यानाच्या कामांसाठी मजूर पुरविणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8353989.00/-

***आर्थिक वर्ष 2007-08 ते 2009-10 या कालावधीकरीता मजुर पुरविणेचा ठेका मे.स्वागत लेबर कॉण्ट्रॅक्टर यांना देण्यात आला आहे. त्यापुढे 2011-12 पर्यंत निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. परन्तु सन 2011-12 मध्ये या लेखाशिर्षाखाली रु.83,53,989/- एवढी रक्कम खर्ची पडली असल्याने दस्तावेजाची मागणी केली असता ते उपलब्ध करुन देण्यात आले नाही. करीता सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवाण्यात येत आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन् 2011-12 या वित्तीय वर्षात उद्याने व क्रिडांगणे या मुख्यलेखाशिर्षांतर्गत क्रिडांगण मजूर / देखभाल तसेच वृक्षारोपण / उद्यान मजूर देखभाल या उपशिर्षाखाली एकूण महसूली जमा रक्कमेच्या 5% राखीव रक्कमेतून अनुक्रमे रु. 13,58,876/- आणि रु. 69,95,113/- अशी एकूण रक्कम रु. 83,53,989/- खर्ची पडल्याचे जमा खर्चाच्या वार्षिक लेख्यावरून दिसून येते.

वरील उपशिर्षांसाठी कार्यालयीन विविध मजूर पुरवठा विषयाची आस्थापना विभागाच्या नस्तीची पडताळणी केली असता सन् 2007-08 या वित्तीय वर्षात विशेष सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 72, दि. 29/3/2007 अन्वये वृक्षरोपणासाठीच्या मजूर ठेक्यासहीत एकूण विविध 9 विभागाच्या कामांसाठी,1) मे. स्वागत लेबर कॉन्ट्रॅक्टर, 2) मे. अनंत एंटरप्रायजेस, आणि 3) मे.नॅशनल एंटरप्रायजेस, या तीन निविदाकारांच्या निविदा प्राप्त होऊन त्यापैकी वृक्षरोपणाच्या कामाच्या मजूर पुरविण्यासाठी मे. स्वागत लेबर कॉन्ट्रॅक्टर यांची कमी दराची निविदा 3 वर्षांच्या मुदतीसाठी (सन् 2007-08 ते 2009-10 पर्यंत) मंजूर करण्यांत आल्याचे दिसून येते.

सन् 2011-12 च्या जमाखर्चाच्या वार्षिक लेख्यानुसार वर उल्लेखिल्याप्रमाणे क्रिडांगण मजूर व वृक्षारोपण / उद्यान मजूर पुरविण्याच्या लेखाशिर्षामध्ये एकूण रु. 83,53,989/- इतकी खर्ची पडल्याचे दिसत असल्याने सदर मजूर पुरविण्याचा ठेका अद्याप सुरु असल्याचे सिद्ध होते. परंतू सदर

ठेका सन् 2011-12 साठी मंजूर केल्याबाबतच्या ठरावाची प्रत तसेच निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक असणारी इतर अनुषंगिक कागदपत्रे / प्रमाणपत्रे नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत, ती लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 91 दि. 17/5/2013 अन्वये कळविण्यात आले होते तथापि दफ्तर उपलब्ध झाले नसल्याने खर्ची पडलेली संपुर्ण रक्कम रु. 83,53,989/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATRADM5901 (Ref No : 71)

## *73 श्रीमती रश्मी विजय घरत, लिपिक, यांचे सेवा पुस्तकातील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

***मा. विभागीय आयुक्त यांनी सदर प्रकरणी दि. 10/4/95 रोजी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 79 (6) व (7) अन्वये मुख्याधिकाऱ्यांना याबाबत नव्याने विभागीय चौकशी करण्याचे करण्याचे आदेश दिले असताना अद्याप विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली नाही.***

श्रीमती रश्मी विजय घरत, लिपिक, यांचे आस्थापना विभागाने सादर केलेल्या सेवा पुस्तक आणि वैयक्तिक नस्तीमधील अभिलेख तपासला असता असे आढळून येते की, त्या दि. 10/8/1990 ते 31/12/1991 या कालावधीत विरार नगरपारिषदेच्या आस्थापनेवरील ग्रंथपाल लिपिक या पदावर कार्यरत असतांना त्यांच्या हातून ग्रंथालयाच्या 17 पावती पुस्तकासंदर्भात शासकीय पैशांचा अपहार प्रकरणी प्रथम त्यांना विरार नगरपालिका परिषद स्थायी समिती ठराव क्र. 6 (1), दि. 23/4/92 अन्वये दि. 23/5/92 पासून निलंबित करून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करून त्यांना सेवेतून स्थायी समितीचा ठराव क्र. 7 (4), दि. 30/4/94 अन्वये दि. 13/7/94 पासून बडतर्फ करण्यांत आले. सदर बडतर्फी विरुध्द श्रीमती घरत यांनी त्यांच्या दि. 25/8/94 च्या अर्जान्वये आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे दाद मागितली असता मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणी दि. 10/4/95 रोजी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 79 (6) व (7) अन्वये

मुख्याधिकाऱ्यांना याबाबत नव्याने विभागीय चौकशी करण्याचे तसेच श्रीमती घरत यांना पुन्हा सेवेत घेण्याचे आदेश दिले. दरम्यान श्रीमती घरत यांनी अपहार केलेली रक्कम पा.क्र. 7042, दि. 21/6/2012 अन्वये रु. 310/- चा भरणा तत्कालीन नगरपरिषदेकडे केल्याने विभागीय चौकशी मागे घेण्याबाबतची टिपणी नस्तीमध्ये आढळते, परंतू सदर टिपणी स्वाक्षरीत नाही.

सद्य परिस्थितीमध्ये श्रीमती रश्मी घरत या दि. 31/5/2013 रोजी नियतकालावधीने सेवानिवृत्त होत असून (9 दिवसांनंतर) त्यांच्या विरुध्दचे नव्याने विभागीय चौकशी सुरु करण्याचे आदेश आस्थापना विभागाकडून अद्याप निर्गमित करण्यांत आलेले नाहीत.

DATRADM5901 (Ref No : 72)

### *74 'अ' प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

***शासनाचा सहावा वेतन आयोग लागु करण्याच्या ठरावास शासन मान्यता घेण्यात आलेली नाही.***

वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या 'अ' विभागातील स्थायी अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवापुस्तकांचे लेखा परिक्षण केले असता खालील त्रूटी निदर्शनास आल्या.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना 6 व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतन लागू करण्याच्या निर्णयास सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 8, दि. 7/6/2011 अन्वये दि. 1 जून 2011 पासून मंजूरी देण्यांत आली आहे. या ठरावास शासन मान्यता घेतली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते.

श्री रविकांत परशुराम घरत, शिपाई, त्यांना देय असलेल्या रु. 2550-60-3200 या वेतन श्रेणीतील अंतिम टप्प्यावर दि. 1/9/2005 रोजी पोहचले असल्याने त्यांना द्वैवार्षिक वेतनवाढ देणे आवश्यक ठरते. त्यामुळे यांना दि. 1/9/2006 रोजी वेतनाच्या अंतिम टप्प्यावरच वेतन देऊन दि. 1/9/2007 रोजी रु. 3260/- ची वेतनवाढ देय ठरते. परंतू दि. 1/9/2007 रोजी त्यांना रु. 3200/- एवढे वेतन दिल्याने रु. 60/- ची वेतनवाढ आणि त्यावरील भत्त्यांचे, त्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

श्री वसंत हरिश्चंद्र मुकणे, सफाई कामगार यांची चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून दि. 1/10/90 रोजी सफाई कामगार या पदावर नियुक्ती करण्यांत येऊन त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी न होताच त्यांना दि. 16/12/91 रोजी “मिटर रिडर” या पदावर तसेच दि.1/3/96 पासून “स्वच्छता निरीक्षक” या पदावर पदोन्नती देण्यांत आलेली आहे.

खालील कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकामध्ये जात पडताळणी दाखल्याची नोंद नाही तसेच मृत्यु.नि. सेवा उपदानाची नामनिर्देशन प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्याकडून स्वाक्षांकित केलेली नाहीत.

सुधाकर भास्कर संखे, प्रभारी सहाय्यक आयुक्त, 2) सौ. स्मिता दत्तात्रय भोईर, वरीष्ठ लिपिक, 3) श्री सुनिल शां. भानुशाली, लिपिक, 4) उमेश आयतुल धोडी, फायरमन, 5) सुभाष मधुसुदन महाले, शिपाई, 6) श्री. रमेश फुला सोलंकी, सफाई कामगार, 7) छोटू कालीदास सोलंकी, सफाई कामगार, 8) महेश किसन सोलंकी, सफाई कामगार

DATRADM5901 (Ref No : 73)

## *75 श्रीमती पद्मीनी मेहेर, लिपिक “क” प्रभाग यांच्या वेतन निश्चितीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

***श्रीमती पद्मिनी मेहेर, लिपिक यांना विभागीय चौकशी अधिका-यांनी त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी समजण्यात यावा अशी शास्ती दिली असताना निलंबन कालावधीची परिगणना करुन तो पुढील वेतनवाढ देताना वगळुन पुढील दिनांकास वेतनवाढ देण्यात आलेली नाही त्यामुळे अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या ‘क’ प्रभागातील कर्मचारी श्रीमती पद्मीनी जयप्रकाश मेहेर, लिपिक यांच्या सेवापुस्तकाचे लेखा परिक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

श्रीमती पद्मीनी मेहेर, लिपिक यांचे 5व्या वेतन आयोगानुसार दि. 1/2/1996 पासून रु. 3050-75-3950-80-4590 या वेतन श्रेणीत रु. 3125/- या टप्प्यावर वेतन निश्चित करण्यांत आलेले आहे. त्यानुसार रु. 75/- च्या वेतनवाढी अन्वये दि. 1/2/2001 रोजी रु. 3500/- वेतनवाढ मंजूर करण्या ऐवजी

रु. 3550/- अशी वेतनवाढ देण्यांत आली आहे आणि पुढे त्याच दराने दि. 1/2/2005 पर्यंत वेतनवाढ मंजूर करण्यांत आली आहे. त्यानंतर आदेश क्र. साप्रवि/1285/05.06, दि. 18/1/2006 अन्वये श्रीमती मेहेर यांचे विरुध्द प्रशासनाने शिस्तभंगाची कारवाई सुरु करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिक्षा व अपील) नियम 1979 च्या नियम 4 पोटनियम 1 अन्वये नगरपरिषदेच्या सेवेतून निलंबित केले. त्यानंतर श्रीमती पद्मीनी मेहेर यांची खातेनिहाय चौकशी होऊन आदेश क्र. सामान्य प्रशासन विभा /367/06.07, दि. 5/7/2006 अन्वये नगरपरिषदेच्या विशेष चौकशी अधिकारी यांनी न्यायालयाच्या निर्णयान्वये "दोन वेतनवाढी कायम स्वरुपी बंद करणे आणि निलंबन काळ, निलंबन काळ म्हणून धरणे" अशी शास्ती देण्यांत आली. त्यानुसार दि. 1/2/2006 आणि दि. 1/2/2007 रोजीच्या 2 वेतनवाढी रु. 3800/- वर रोखून पुढील वेतनवाढ रु. 3875/- दि. 1/2/2008 पासून पुढे दि. 18/1/2006 ते दि. 5/7/2006 असा एकूण (दोन्ही दिवस धरून) 169 दिवस निलंबन कालावधी परिगणीत करून नंतर येणाऱ्या दिवसापासून वेतनवाढ मुक्त करणे आवश्यक होते. त्यानुसार दि. 1/2/2008 च्या पुढे 169 दिवस म्हणजे दि. 19/7/2008 रोजी रु. 3875/- अशी वेतनवाढ देणे आवश्यक ठरते. परंतू प्रस्तुत प्रकरणी श्रीमती मेहेर यांना दि. 1/2/2006 रोजी रु. 3950/- अशी वेतनवाढ देऊन दि. 1/2/2007 आणि दि. 1/2/2008 रोजीच्या 2 वेतनवाढी रोखून पुढे निलंबन कालावधीचे 169 दिवस परिगणीत न करताच दि. 1/2/2009 रोजी पुढील वेतनवाढ मुक्त केली आहे. त्यामुळे वरील सर्व कालावधीमधील वाढीव वेतनवाढीची पुन:श्च् परिगणना करून अतिप्रदान झालेल्या रक्कमेची वसूली करण्यांत यावी.

वरील सुधारीत परिगणनेनुसार श्रीमती मेहेर यांची 6 व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चित करताना दि. 1/1/2006 रोजीचे वेतन रु. 3800/- निश्चित करून रु. 5200-20200 या वेतन श्रेणीत रु. 7070/- असे मूळ वेतन निश्चित करणे आवश्यक असताना ते रु. 7210/- असे निश्चित करून त्यानुसार पुढील वेतन व भत्ते श्रीमती मेहेर यांना अदा करण्यांत आल्याचे सेवा पुस्तकातील नोंदीवरून दिसून येते. सदर वेतन व भत्त्याचे झालेल्या वरील सर्व अतिप्रदानाची परिगणना करून त्याची एकत्रित वसूली करण्यांत यावी व त्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

श्रीमती मेहेर या इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असल्याने त्यांच्या जातीच्या दाखल्याची पडताळणी झालेली नसल्याचे तसेच त्यांच्या मृत्यु.नि.सेवा उपदानाकरीता आवश्यक असलेल्या नामनिर्देशन दाखल्याची नोंद आणि सन् 2012 मधील वेतनवाढीची नोंद सेवापुस्तकात घेतली नसल्याचे दिसून येते.

DATRADM5901 (Ref No : 74)

## *76 'क' प्रभागातील श्री. शशिकांत रत्नाकर गायकवाड, शिपाई यांचे वेतन निश्चितीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

***श्री. शशिकान्त र. गायकवाड, शिपाई यांना विभागीय चौकशी अधिका-यांनी त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी समजण्यात यावा अशी शास्ती दिली असताना निलंबन कालावधीची परिगणना करुन तो पुढील वेतनवाढ देताना वगळुन पुढील दिनांकास वेतनवाढ देण्यात आलेली नाही त्यामुळे अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'क' प्रभागातील कर्मचारी श्री. शशिकांत र. गायकवाड, शिपाई यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

श्री. गायकवाड यांचे विरुध्द आदेश क्र. साप्रवि/1288/05.06, दि. 18/1/2006 अन्वये शिस्तभंगाची कारवाई सुरु करून म.ना.से. (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 4 पोटनियम एक अन्वये नालासोपारा नगरपरिषदेने त्यांना निलंबित केले. त्यानंतर आदेश क्र. साप्रवि/223/2006-07, दि. 5/6/2006 अन्वये न्यायालयीन निर्णयानुसार "ठपका ठेवणे व निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी म्हणून गणला जाण्याची" शास्ती बजावली. त्यानुसार श्री. गायकवाड यांचा निलंबन कालावधी हा दि. 18/1/2006 ते 5/6/2006 या कालावधीसाठी एकूण 139 दिवस (दोन्ही दिवस धरून) होत असल्याने त्याची परिगणना दि. 1/12/2006 या वेतनवाढीच्या दिनांका पासून करणे आवश्यक आहे. त्यानुसार त्यांचा सुधारीत वेतनवाढीचा दिनांक 19/4/2007 रोजी येऊन त्यांना मिळणाऱ्या कालबध्द पदोन्न्ती नुसार त्यांचे वेतन रु. 3300/- निश्चित होणे आवश्यक आहे. परंतू सेवापुस्तकामध्ये दि. 1/12/2006 या वेतनवाढीच्या दिवसानंतर श्री. गायकवाड यांच्या 139 दिवसांचा निलंबन कालावधीची परिगणना केल्याचे दिसून येत नाही.

तरी प्रथम दि. 1/12/2006 पासून ते दि. 19/4/2007 या कालावधीत झालेल्या वेतन व भत्ते यांच्या अतिप्रदानाची वसूली तसेच पुढील वेतनवाढीच्या तारखा बदलत असल्यामुळे त्या अद्यावत करून 6 व्या वेतन आयोगानुसार प्रदान करण्यांत आलेल्या वेतन व भत्त्याच्या अतिप्रदानाची परिगणना करून त्यांची वसूली करून त्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेणे आवश्यक आहे.

मृत्यु.नि.सेवा उपदानाकरीता आवश्यक असलेले नामनिर्देशन सेवापुस्तकात अनुपलब्ध आहे.

श्री. गायकवाड यांची जात प्रमाणित केलेली नाही तसेच जात पडताळणी केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात अनुपलब्ध आहे.

5 व्या वेतन आयोगानुसार केलेली वेतन निश्चितीची नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित

करणे आवश्यक आहे.

सेवापुस्तकातील वार्षिक वेतनवाढीबाबत श्री. गायकवाड यांच्या स्वाक्षरी घेण्यांत आलेल्या नाहीत.

पृष्ठ क्र. 1 वरील सूचनेनुसार सेवापुस्तकातील सुधारीत नोंदी पृष्ठ क्र.3 वर दर 5 वर्षांनी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

DATRADM5901 (Ref No : 75)

## *77 'क' प्रभागातील सर्वश्री. अं.जि. सरवदे, लिपिक, दुष्यंत दा. ठाकुर, सहाय्यक फायरमन आणि ब.रा. फापे, वाहनचालक यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 27480.00/-

***सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करताना झालेल्या वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'क' प्रभागातील सर्वश्री. अंबादास जि. सरवदे, लिपिक, दुष्यंत दा. ठाकुर, स. फायरमन आणि ब.रा. फापे ,वाहनचालक यांची सेवापुस्तिका तपासली असता त्यांमध्ये खालीलप्रमाणे त्रूटी आढळल्या.

श्री. अंबादास जि. सरवदे : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्र. वेपुर1209/प्र.क्र.69/सेवा-9, दि. 5/5/2010 अधिक परिच्छेद क्र. 2.5 मध्ये खुलासा केल्यानुसार वेतनवाढीची परिगणना करताना 3% रक्कम 10 च्या पटीत घेताना एक रुपया व त्यापेक्षा अधिक रक्कम पुढील 10 च्या पटीत घेण्यांत यावी, मात्र 99 पैसे व त्यापेक्षा कमी पैसे दुर्लक्षित करण्यांत यावेत. त्यानुसार श्री. अंबादास सरवदे यांची 6 व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करतांना सेवापुस्तकात दर्शविल्याप्रमाणे दि. 1/7/2006 रोजी वेतनबँड रु. 8190 + रु.2150 (ग्रेड वेतन) x 3% वेतन वाढ = 310.2 अशी वेतनवाढीची रक्कम येते. त्यामुळे सदर रक्कम 310 अशी परिगणीत करणे आवश्यक असताना रु. 320/- अशी जादा परिगणीत केल्याने पुढील सर्व वेतनबँड मधील वेतन रु. 10/- आणि त्यावरील भत्ते यांचे जादा प्रदान

करण्यांत आले आहे. तरी सदर वेतनबँड /वेतन श्रेणी मधील वेतनाची पुन:श्च परिगणना करून जादा प्रदानित वेतन व भत्त्यांची वसूली करून त्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

दुष्यंत दामोदर ठाकुर, स.फायरमन, यांच्या सेवापुस्तकामध्ये सन् 2000 ते 2005 पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी नोंदविल्याचे दिसून येत नाही परंतू श्री. ठाकुर यांना रु. 2550-55-2660-3200 या वेतनश्रेणीनुसार वेतनवाढी मंजूर केल्या असून दि. 1/3/2005 रोजी रु. 3200/- या वेतन श्रेणीतील अंतिम टप्प्यावर वेतनवाढ येत असल्याने श्री. ठाकुर यांना द्वैवार्षिक वेतनवाढ देणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार पुढीलप्रमाणे वेतनवाढ देणे आवश्यक होते.

| वर्ष | देय वेतन | दिलेले वेतन |
|---|---|---|
| 1/3/2001 | 2960 | 2960 |
| 1/3/2002 | 3020 | नोंद नाही |
| 1/3/2003 | 3080 | नोंद नाही |
| 1/3/2004 | 3140 | नोंद नाही |
| 1/3/2005 | 3200 अंतिम टप्पा | नोंद नाही |
| 1/3/2006 | 3200 | 3285 |
| 1/3/2007 | 3260 द्वैवार्षिक वेतनवाढ | 3350 |
| 1/3/2008 | 3260 | 3415 |
| 1/3/2009 | 3320 | 3480 |

वरील वेतन निश्चितीनुसार 6 व्या वेतन आयोगान्वये दि. 1/1/2006 रोजी श्री. ठाकुर यांचे वेतन रु. 3200/- निश्चित करून त्यानुसार त्यांना रु. 5960/- वर मूळ वेतन निश्चित करणे आवश्यक होते. परंतू सेवापुस्तकात दि. 1/1/2006 रोजीचे वेतन रु. 5990/- असे जादा दर्शविण्यांत आले आहे. पाचव्या वेतन आयोगानुसार दि. 1/3/2006 ते दि. 1/3/2009 च्या वेतननिश्चितीपर्यंत चुकीची वेतन निश्चिती झाली असल्यामुळे झालेल्या वेतन रु.5880/- व त्यावरील भत्त्यांच्या अतिप्रदानाची वसूली करण्यात यावी तसेच सहाव्या वेतन आयोगाची दि. 1/1/2006 रोजी करण्यात आलेली वेतन निश्चिती रु. 30/- ने जादा दिली असल्याने माहे 7/ 2011 पर्यंत झालेले रु. 21600/- वेतन व त्यावरील अनुषंगिक भत्ते यांची अतिप्रदानित रक्कम वसुल करण्या यावी व त्याची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 27480/- (+) अनुषंगिक भत्ते.

श्री. बबन राम फापे, वाहनचालक, यांच्या सेवा पुस्तकामध्ये त्यांची शैक्षणिक अर्हता, जातीची नोंद तसेच पृष्ठ क्र. 3 वरील दर 5 वर्षांनी नोंदविणे आवश्यक असलेल्या सुधारीत नोंदी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत. श्री. फापे यांच्या मृत्यु.नि.सेवा उपदानासाठी आवश्यक असलेल्या नामनिर्देशित नावांचे प्रमाणपत्र सेवापुस्तकात उपलब्ध झाले नाही.

## ***78 'क' प्रभागातील श्री. सु.ओं.चव्हाण, स,फायरमन आणि श्रीमती. सावित्री गायकवाड, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 21600.00/-

***श्री. सुरेश चव्हाण यांच्या सेवापुस्तकात पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनवाढीच्य नोंदी घेण्यात आलेल्य नाहीत तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करताना चुकीचे वेतन निश्चित केल्याने अतिप्रदान झाले आहे. श्रीमती सावित्री गायकवाड, सफाई कामगार यांच्या नियुक्तीच्या दिनांकात तफावत आढळते तसेच इतर आवश्यक नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'क' प्रभागातील कर्मचारी 1) सुरेश ओमकार चव्हाण, स. फायरमन, 2) श्रीमती. सावित्री गायकवाड, सफाई कामगार यांची सेवापुस्तिका तपासली असता त्यांमध्ये खालीलप्रमाणे त्रूटी आढळल्या.

सुरेश ओमकार चव्हाण, स. फायरमन :

यांच्या सेवापुस्तकातील जातीची नोंद प्रमाणपत्रानुसार सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही.

पृष्ठ क्र. 1 वरील सूचनेनुसार पृष्ठ क्र. 3 वरील सुधारीत नोंदी प्रामणित नाही.

सन् 2000 ते 2005 पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी सेवापुस्तकात नोंदविल्याचे व त्या सक्षम प्राधिकाऱ्याने स्वाक्षांकित केल्याचे दिसून येत नाही. सदर वेतनवाढी 5 व्या वेतन आयोगानुसार खालीलप्रमाणे नोंदविणे आवश्यक होत्या.

वेतनश्रेणी रु. 2550-55-2660-60-3200.

| वेतनवाढीचा दिनांक | वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | वेतन |
|---|---|---|---|---|
| 1/1/96 (पदोन्नती) | 2605 | | 1/3/2001 | 2960 |
| 1/3/96 | 2660 | | 1/3/2002 | 3020 |
| 1/3/97 | 2720 | | 1/3/2003 | 3080 |
| 1/3/98 | 2780 | | 1/3/2004 | 3140 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1/3/99 | 2840 | | 1/3/2005 | 3200 (अंतिम टप्पा) |
| 1/3/2000 | 2900 | | 1/3/2006 | 3200 (द्वै.वे.वा) |

त्यानंतर 6 व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चित करताना दि. 1/1/2006 चे मूळ वेतन रु. 3200/- वर सुधारीत वेतन रु. 5960/- वर निश्चित करणे आवश्यक होते. परंतू प्रस्तुत प्रकरणी ते रु. 5990/- वर निश्चित केल्याने रु. 30/- व त्यावरील भत्त्यांचे अतिप्रदान झाले आहे. तरी वर दर्शविल्याप्रमाणे सन् 2000 ते 2005 पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी घेऊन वेतन व भत्त्यावरील झालेल्या अतिप्रदानाची वसूली करून त्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यांत यावी. तसेच सहाव्या वेतन आयोगनुसार झालेल्या माहे 7/2011 पर्यंत झालेल्या रु. 21600/- व त्यावरील अनुषंगिक भत्यांची परिगणना करुन वसुली करण्यात यावी.

श्रीमती सावित्री प्रकाश गायकवाड, सफाई कामगार :

यांच्या सेवासुप्ताकातील जातीची नोंद प्रमाणपत्रानुसार सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही.

जात पडताळणी केल्याचे प्रामणपत्र सेवापुस्तिकेत उपलब्ध नाही.

पृष्ठ क्र. 1 वरील सूचनेनुसार पृष्ठ क्र. 3 वरील सुधारीत नोंदी प्रामणीत नाहीत.

श्रीमती गायकवाड यांची नियुक्ती प्रशासन ठराव क्र. 234, दि. 30/11/93 अन्वये सफाई कामगार या पदावर केली असता सेवापुस्तकात मात्र सदर नियुक्ती दि. 10/12/1992 रोजी केल्याचे दिसते?

सन् 1998 ते 2001 या कालावधीतील वार्षिक वेतनवाढीच्या नोंदी सेवापुस्तकात आढळल्या नाहीत.

मृत्यु-नि-सेवा उपदानाकरीता आवश्यक असलेली विहीत नमुन्यातील नामनिर्देशनाची नोंद सेवापुस्तकात आढळली नाही.

DATRADM5901 (Ref No : 77)

## *79 ‘क’ प्रभागातील सर्वश्री. रमेश राऊत, प्रकाश गोवारी, शशिकांत पाटील, विनयसिंग दात्रे यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 8640.00/-

| ***श्री. रमेश अ. राऊत, शिपाई यांच्या वेतनवाढीतील तफावतीमुळे त्याना अतिप्रदान झाले आहे.*** |
|---|

वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या ‘क’ प्रभागातील कर्मचारी सर्वश्री. रमेश अनंत राऊत, शिपाई, प्रकाश लक्ष्मण गोवारी, शिपाई, शशिकांत दत्ताराम पाटील, मुकादम, आणि विनयसिंग भिमसिंग दात्रे, मेस्त्री यांच्या सेवापुस्तकांचे लेखा परिक्षण केले असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

श्री. रमेश अनंत राऊत, शिपाई हे दि. 1/1/2006 रोजीरु. 2550-55-2660-60-3200 या वेतनश्रेणी मध्ये रु. 3200/- या वेतनाच्या अंतिम टप्प्यावर वेतन घेत असताना त्यांना द्वैवार्षिक वेतनवाढी देणे आवश्यक होते. त्यानुसार त्यांचे वेतन दि. 1/1/2008 रोजी रु. 3260/- या वेतनावर वेतन निश्चित करणे आवश्यक होते. परंतू दि. 1/1/2008 रोजी त्यांचे वेतन रु. 3440/- वर निश्चित केल्याचे दिसून येते. त्यामुळे रु. 180/- (रु. 3440-3260) मूळ वेतनप्रमाणे महे 7/2011 पर्यंत रु. 8640/- व त्यावरील भत्त्यांचे अतिप्रदान झालेले आहे. तरी श्री. राऊत यांच्या उपरोक्त कालावधीच्या वेतन निश्चितीची परिगणना करून झालेल्या पुढील सर्व अतिप्रदानाची वसूली करण्यांत यावी.

उपरोल्लेखित सर्व कर्मचाऱ्यांची जात पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र तसेच मृत्यु.नि.सेवा. उपदानाकरीता आवश्यक असलेल्या नामनिर्देशन प्रमाणपत्रे आणि त्याच्या नोंदी सेवापुस्तकात आढळल्या नाहीत. तसेच श्री. प्रकाश गोवारी यांची जात आणि श्री. विनयसिंग दात्रे यांची जन्मतारीख सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही.

DATRADM5901 (Ref No : 78)

## *80 ‘ड’ प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांतील त्रूटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 600.00/-

***सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करताना परिगणनेत झालेल्या चुकीमुळे अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या ‘ड’ प्रभागातील कायम कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रूटी आढळून आल्या.

तुकाराम अप्पाजी गावडे, तारतंत्री :- यांच्या 6 व्या वेतन आयोगानुसार परिगाणित केलेल्या वेतननिश्चितीमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तफावत आढळते.

| दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन | दिलेले 3% वेतनवाढ | देय 3% वेतनवाढ | ग्रेडवेतन रु. 1900/- |
|---|---|---|---|---|---|
| 1/1/2006 | 7210/- | 7210/- | 280/- | 280/- | |
| 1/1/2006 | 7210/- | 7210/- | 290/- | 280/- | |
| 1/1/2007 | 7780/- | 7490/- | 290/- | 290/- | |
| 1/1/2008 | 8070/- | 7780/- | 300/- | 300/- | |
| 1/1/2009 | 8370/- | 8080/- | 310/- | 300/- | |
| 1/1/20010 | 8680/- | 8380/- | 320/- | 310/- | |
| 1/1/20011 | 9000/- | 8690/- | 330/- | 320/- | |

उपरोक्त तक्त्यावरून देय वेतनापेक्षा जास्त वेतन व भत्ते दिल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर वेतननिश्चितीची पुन:श्च् परिगणना करून अतिप्रदान रक्कम रु. 600/- व त्यावरील अनुषंगिक भत्त्यांची वसूली करण्यांत यावी व त्याची नोंद सेवापुस्तकांत घेण्यांत यावी.

श्री. मनोहर केदारे, आरोग्य निरिक्षक :- श्री. केदारे यांनी त्यांचा परिविक्षाधिन कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्याचे आदेश नस्तीमध्ये उपलब्ध झाले नाहीत, तरी देखील त्यांची सेवा नियमीत केल्याचे नस्तीमधील कागदपत्रांवरून दिसून येते. तसेच विशेष अधिकारी, विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचे आदेश क्र. विअविआ-99/स्वानि/निवड/का.3, दि. 30/10/99 अन्वये, श्री. केदारे यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करूनच नियुक्ती देण्यांत यावी, असे स्पष्ट आदेश असताना त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक होते.

श्री. ऑलेक्स डिसिल्व्हा, सफाई कामगार :- यांच्या 6 व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करतांना (पृष्ठ क्र.14) दि. 1/1/2006 रोजी मूळ सुधारीत वेतन रु. 5840/- असे परिगणित करण्या ऐवजी रु.5850/- असे मंजूर केल्याने त्यांना मूळ वेतन रु. 10/- व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. सबब, सदर अतिप्रदानीत वेतन व भत्त्याची वसूली करण्यांत यावी.

श्री. व्हिक्टर अंतोन डिसोझा, लिपिक आणि श्री. जोसेफ पिटर डिकोस्टा:- यांची 6 व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती केल्याचे सेवापुस्तकात नमुद नाही. त्यामुळे त्यांना देण्यांत येणारे वेतन व भत्ते योग्य आहेत किंवा नाही, त्यांना अतिप्रदान होत आहे किंवा कसे हे लेखा परिक्षण पथकास कळू शकले नाही.

DATRADM5901 (Ref No : 79)

## *81 श्री. अनिल दे. मोहिते, फायरमन यांचे वेतन निश्चिती बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 6681.00/-

***निलंबन व विनावेतन कालवधी विचारात न घेतल्याने वेतनवाढीचे दिनांक चुकीचे देण्यात आले आहेत त्यामूळे अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'इ' प्रभागातील कर्मचारी श्री. अनिल दे. मोहिते, फायरमन यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रूटी निदर्शनास आल्या.

आदेश क्र. वनपा/आरोग्य/271, दि. 26/6/87 अन्वये बेशिस्त व बेजबाबदार वागणूकीबद्दल दि. 27/6/87 पासून नगरपालिका सेवेतून निलंबित करण्यात आले असून स्थायी समिती ठराव क्र. 387, दि. 14/9/87 अन्वये रु. 10 दंड वसूल करून दि. 14/9/87 पासून कामावर हजर करून घेण्यात आलेले आहे. दि. 27/6/87 ते 14/9/87 एकूण 80 दिवस ह्या कालावधीबाबत सेवापुस्तकात नोंद नाही.

दि. 18/2/99 ते 7/10/99 गैरहजेरी कालावधी 232 दिवस. सदरच्या गैरहजेरी कालवधीबाबत विभागीय चौकशी करण्यात आल्याचे नस्ती वरून दिसून येते. तथापि, अंतिम निर्णयाची, आदेशाची प्रत तपासणी करीता उपलब्ध झाली नाही.

सेवापुस्तकातील नोंदीनुसार आदेश क्र. वनपा/आस्था/378/2000 अन्वये बेशिस्त व बेजबाबदार वर्तणूकीबाबत दि. 1/3/2000 पासूनची गैरहजेरी ही बिनपगारी करणेत येऊन श्री. मोहिते यांस अंतिम संधी देण्यात येऊन दि. 3/6/2000 पासून फायरमन म्हणून कामावर हजर करून घणेत आलेले आहे. गैरहजर कालावधी 1/3/2000 ते 2/6/2000 = 94 दिवस.

सेवापुस्तकातील नोंदीनुसार आदेश क्र. वनपा/आस्था/752, दि. 9/7/2001 अन्वये कर्तव्यावर असताना मद्यपान करून दवाखान्यात पडल्याचे आढळल्याने व याबाबत लेखी व तोंडी आदेश देऊनही वर्तणुकीत सुधारणा न झाल्याने दि. 9/7/2001 पासून निलंबित करण्यात आलेले असून स्थायी समिती ठराव क्र. 27, दि. 25/10/2001 अन्वये शेवटची सक्त ताकीद देऊन दि. 1/11/2001 पासून कामावर रुजू करून घेण्यात आले आहे. तथापि, दि. 9/7/2001 ते 31/10/2001 एकूण कालावधी 115 दिवसांबाबत काय निर्णय घेण्यात आला ह्याची नोंद सेवापुस्तकात करण्यांत आलेली नाही.

मुख्याधिकारी वसई नगरपरिषद यांचे आदेश क्र. जा.क्र/वनप/आस्था/944/2003, दि. 28/7/2003 अन्वये बेशिस्त व बेजबाबदार वर्तणूकीबाबत दि. 29/7/2003 पासून निलंबित करणेत आलेले असून स्थायी समिती ठराव क्र. 63, दि. 30/9/2003 अन्वये वार्षिक वेतनवाढ रोखणेत येत असून निलंबन काळातील वेतन देण्यात येणार नाही अशी शिक्षा देऊन दि. 1/10/2003 पासून कामावर हजर करून घेण्यात आले. निलंबन कालावधी 29/7/2003 ते 30/9/2003 एकूण 64 दिवस.

उपरोक्त निलंबन कालावधी वेळोवेळी देय असलेल्या वेतनवाढी देताना विचारात न घेतल्याने वेतनवाढीचा दिनांक चुकलेला आहे. वेतनवाढीचा दिनांक खालीलप्रमाणे परिगणित करण्यांत यावा.

| | |
|---|---|
| वेतनश्रेणी 200-3.230-5.255-671-5.283 | |
| 1/11/82 | 200 |
| 1/11/83 | 203 |
| 1/11/84 | 206 |
| 1/11/85 | 209 |
| 1/1/86 | 810 वेतननिश्चिती 750-12.870-EB-14.940 |
| 1/11/86 | 822 |
| परिच्छेद **-1** नुसार :- निलंबन कालावधी 27/6/87 ते 14/9/87 = 80 दिवस वेतनवाढ पुढे | |
| 20/1/88 | 834 |
| 1/1/89 | 846 |
| 1/1/90 | 858 |
| 1/1/91 | 885 वेतनश्रेणीत पदोन्नती 825-15.900-20-1200 |
| 1/1/92 | 900 |
| 1/1/93 | 920 |
| 1/1/94 | 940 |
| 1/1/95 | 960 |
| 1/1/96 | 3030 वेतननिश्चिती 2750-70-3800.75-4400 |
| 1/1/97 | 3100 |
| 1/1/98 | 3170 |
| 1/1/99 | 3240 |
| परिच्छेद**- 2** नुसार :- निलंबन कालावधी 18/2/99 ते 7/10/99 = 232 दिवस वेतनवाढ पुढे | |
| परिच्छेद**-3** नुसार:- विनावेतन कालावधी 1/3/2000 ते 2/6/2000 = 94 दिवस वेतनवाढ पुढे | |
| 22/11/2000 | 3310 |
| परिच्छेद**-4** नुसार:-निलंबन कालावधी 9/7/2001 ते 31/10/2001 =115 दिवस वेतनवाढ पुढे | |
| 24/2/2002 | 3380 |
| 1/2/2003 | 3450 |
| परिच्छेद**-5** नुसार:-निलंबन कालावधी 29/7/2003 ते 30/9/2003 = 64 दिवस वेतनवाढ पुढे | |
| 5/4/2004 | 3450 वेतन वाढ रोखण्यात आली |
| 1/4/2005 | 3520 |
| सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतननिश्चिती.<br>वेतन बँड 5200-20200, ग्रेड वेतन-1800/- | |
| 1/1/2006 | 6550/- |

| | |
|---|---|
| 1/7/2006 | पुढील वेतनवाढीचा दिनांक |

ह्याप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती आदेश निर्गमित करण्यात येऊन वेतननिश्चिती करण्यांत यावी व चुकीच्या वेतननिश्चितीमुळे दि. 1/11/1996 ते 30/06/2007 या कालावधीत करण्यात आलेल्या रु. 6681/- निव्वळ वेतन व त्यावरील अनुषंगिक भत्त्यांच्य अतिप्रदानाची वसूली करण्यात यावी. तसेच त्या अनुषंगाने पुढील कालावधीकरीता झालेल्या अतिप्रदानाची रक्कम परिगणित तीसुध्दा वसुल करण्यात यावी व सेवापुस्तक अद्यावत करण्यात यावे.

DATASDM5602 (Ref No : 80)

## *82 कै. श्री. मनोज रत्नाकर जाधव, क्लिनर यांचे सेवानिवृत्ती प्रकरण.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 4255.00/-

***कै. श्री. जाधव,क्लिनर यांचा 125 दिवस निलंबन कालावधी वेतनवाढ देताना विचारात न घेतल्याने अतिप्रदान झाले आहे. तसेच सदर कालावधी अर्हताकारी सेवा परिगणीत करतानाही विचारात न घेतल्याने मृत्यु-नि-सेवा उपदानाचे अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'ई' प्रभागातील बांधकाम विभागातून सेवानिवृत्त झालेले कै. श्री. मनोज रत्नाकर जाधव, क्लिनर यांचे सेवानिवृत्तीचे प्रकरण तपासले असता असे आढळून आले की कै. श्री.जाधव हे दि. 28/7/2011 रोजी सेवेत असताना मयत झाल्याने त्यांना सेवा निवृत्ती उपदान आणि इतर लाभ अदा करण्याकरीता त्यांची अर्हताकारी सेवा एकूण 24 वर्षे 07 महिने 30 दिवस अशी परिगणित करण्यांत आली आहे. परंतू प्रस्तुत प्रकरणी श्री. जाधव यांचे सेवापुस्तक आणि सेवेच्या कागदपत्रांची नस्ती तपासली असता त्यांना वसई नगरपालिकेचे जावक क्र. वनप / प्रशा / 1648 / 2000, दि.27/1/2000 अन्वये निलंबित करणे आणि जावक क्र. वनप/आस्था/315/2000, दि. 26/5/2000 आणि स्थायी समिती ठराव क्र. 33, दि. 20/5/2000 अन्वये 3 वेतनवाढी रोखणे व दि. 1/6/2000 रोजी पुन्हा सेवेत घेण्याचे आदेशित केले होते. अशा प्रकारे श्री. जाधव हे दि. 27/1/2000 ते 31/5/2000 असे एकूण 125 दिवस त्यांच्या सेवा कालावधीत निलंबित होते. त्यामुळे म.ना.से. (निवृत्तीवेतन) 1982 च्या

नियम क्र. 43 अन्वये, श्री. जाधव यांची वरील अर्हताकारी सेवा परिगणित करताना सदरचा निलंबनाचा कालावधी वगळणे आवश्यक होते. परंतू तसे केले नसल्याचे सेवानिवृत्तीच्या कागदपत्रांवरून दिसून येते. त्यामुळे कै. जाधव यांचा अर्हताकारी सेवेचा कालावधी कमी होत असल्याने त्यांना दिलेल्या उपदानाच्या अतिप्रदानीत रक्कम रु. 4255/- ची वसूली करण्यांत यावी.

दुसरी बाब ही की उपरोल्लेखित स्थायी समिती ठराव क्र. 33, दि. 20/5/2000 अन्वये कै. श्री. जाधव यांच्या 3 वेतनवाढी रोखल्याचे आणि त्यांना दि. 1/6/2000 रोजी पुन्हा सेवेत घेण्याचे आदेश निर्गमित करण्यांत आले होते. सदर आदेशान्वये दि. 1/6/2000 नंतर येणारी वेतनवाढ परिगणित करताना त्यांचा 125 दिवसांचा निलंबन कालावधी परिगणित करून त्यानंतर येणाऱ्या दिनांकाला वेतनवाढ लागू करणे आवश्यक होते.

DATRADM5901 (Ref No : 81)

## *83 'ड' प्रभागातील कर्मचारी श्री. संजय वसंत मोहिते, लिपिक यांच्या वेतननिश्चितीतील त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 4200.00/-

***श्री. संजय वसंत मोहिते, लिपिक यांचा 125 दिवस निलंबन कालावधी वेतनवाढ देताना विचारात न घेतल्याने अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'ड' प्रभागातील कर्मचारी श्री. संजय वसंत मोहिते, लिपिक यांना स्थायी समिती ठराव क्र. 1261, दि. 30/4/2002 नुसार लिपिक पदाच्या 3050-75-3950-80-4590 या वेतन श्रेणीमधील रु. 3050/- ह्या मुळ पगारावर आणणे तसेच पुढील 4 नियमित वेतनवाढी कायम स्वरुपी रद्द करण्याची शिक्षा देवून दि. 7/5/2002 रोजी पुन्हा सेवेत घेण्यांत आले आहे. त्यानुसार श्री. मोहिते यांना दि.7/5/2002 रोजी रु. 3050/- निश्चित करून दिनांक 7/5/2003, 7/5/2004, 7/5/2005 व 7/5/2006 अश्या 4 वेतनवाढी रोखणे आवश्यक होते. दरम्यान श्री. मोहिते यांना आदेश क्र. नमानप/6775/02205, दि. 16/3/2005 अन्वये दि. 16/3/2005 ते दि. 2/5/2005 अश्या एकूण 48

दिवसांसाठी पुन:श्च निलंबीत केल्याचे दिसून येते. त्यांमुळे दि. 7/5/2005 ची वेतनवाढ 48 दिवसांनी पुढे नेली असता दि. 27/6/2005 रोजी 3 री व दि. 1/6/2006 रोजी 4 था वेतनवाढ रोखून दि. 1/6/2006 रोजी पुढील वेतनवाढ रु. 3125/- निश्चित करणे आवश्यक होते. परंतू तसे न करता दि. 1/6/2007 रोजी रु. 3825/- एव्हढे वेतन निश्चित केल्याने त्यांना वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. त्यानुसार वेतन रु. 4200/- व त्यावरील भत्त्यांचे अतिप्रदन वसुली करावी.

वरीलप्रमाणे वेतननिश्चिती आणि निलंबन कालावधीची परिगणना करून सुधारीत वेतननिश्चितीच्या नोंदी सेवापुस्तकात घेऊन त्यानुसार झालेल्या वेतन व त्यावरील भत्त्यांच्या अतिप्रदानीत रक्कमेची परिगणना करून त्यांच्या देखील नोंदी सेवापुस्तकात घेण्यांत याव्यात. त्याचप्रमाणे दि. 1/1/2006 च्या सुधारीत वेतनदरानुसार श्री. मोहिते यांची 6 व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करावी व एकूण अतिप्रदानीत रक्कमेच्या वसूलीची नोंद सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

DATRADM5901 (Ref No : 82)

## *84 'ड' प्रभागातील कर्मचारी सौ. गीता राऊत, लिपिक यांच्या सेवा पुस्तकाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 11160.00/-

***सौ.गीता राऊत, लिपिक यांचा 149 दिवस निलंबन कालावधी वेतनवाढ देताना विचारात न घेतल्याने अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'ड' प्रभागातील कर्मचारी श्रीमती. गीता भरत राऊत, लिपिक यांचे सेवापुस्तक पडताळले असता असे दिसून येते की, श्रीमती राऊत यांना आदेश क्र. साप्रवि/1283/05-06, दि. 18/1/2006 अन्वये निलंबित करण्यांत आले असून आदेश क्र. साप्रवि/282/06-07, दि. 15/6/2006 आणि विशेष सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 13, दि. 16/5/2006 अन्वये "निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी म्हणून धरणे आणि दोन वेतनवाढी कायम स्वरुपी बंद करण्याची शास्ती" लावून त्यांना दि. 16/06/2006 पासून कामावर रुजू करून घेण्यांत आले.

वरील आदेशाची अंमलबजावणी करताना दि. 1/1/2007 आणि दि. 1/1/2008 रोजीच्या 2 वेतनवाढी बंद ठेवून दि. 1/1/2009 रोजीची वेतनवाढ देताना श्रीमती राऊत यांच्या दि. 18/1/2006 ते 15/6/2006

पर्यंतच्या एकूण 149 दिवसांच्या निलंबनाच्या कालावधीची परिगणना न केल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील वेतनवाढ दि. 1/1/2009 पासून पुढे 149 दिवस म्हणजे दि. 30/5/2009 रोजी देय ठरते. तसेच सदर दिवशी रु. 4110/-, (दि. 1/1/2006 रोजीची वेतनवाढी) चा पुढील टप्पा रु. 4190/- निश्चित करणे आवश्यक असताना रु. 4500/- निश्चित केल्याने वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. त्यानुसार माहे 7/2011 पर्यंतचे अतिप्रदानीत वेतन रु. 11160/- व त्यावरील भत्त्यांची वसूली करण्यांत यावी व त्याची नोंद सेवापुस्तकांत घ्यावी.

DATRADM5901 (Ref No : 83)

## *85 श्रीमती सुशिला सतिश तावडे (झाडू कामगार) यांच्या सेवापुस्तकाच्या तपासणीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*, महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 2406.00/-

***श्रीमती सुशिला तावडे, झाडु कामगार या सेवेत कायम नसताना पुर्ण वेतनी प्रसुती रजा मंजुर करण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (रजा) 1981 नियम क्र. 74 चा पोट नियम (2) (ब) नुसार श्रीमती सुशिला तावडे यांना अर्धवेतनी प्रसुती रजा मंजूर करणे आवश्यक असताना नियमबाहय पूर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात आल्याचे निदर्शनास येते.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'ई' प्रभागातील कर्मचारी श्रीमती सुशिला सतिश तावडे, झाडू कामगार यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रूटी निदर्शनास आल्या.

वसई नगरपालिका ठराव क्र. 96, दि. 26/8/1988 अन्वये श्रीमती सुशिला तावडे यांना 6 महिन्याच्या परिविक्षाधिन कालावधीवर झाडू कामगार पदावर नेमणूक करण्यात आली. दि. 1/4/1991 पासून झाडू कामगार पदावर कायम नियुक्ती करण्यात आली.

श्रीमती सुशिला तावडे ह्या सेवेत कायम होण्यापूर्वी त्यांना खालीलप्रमाणे रजा मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

दि. 08/11/89 ते 05/02/90 = 90 दिवस प्रसुती रजा

दि. 18/03/91 ते 25/03/91 = 8 दिवस अर्जित रजा

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (रजा) 1981 नियम क्र. 74 चा पोट नियम (2) (ब) नुसार श्रीमती

सुशिला तावडे यांना अर्धवेतनी प्रसुती रजा मंजूर करणे आवश्यक असताना नियमबाह्य पूर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात आल्याचे निदर्शनास येते. सदर कालावधी करीता करण्यांत आलेल्या अतिप्रदान रु. 2,406/- ची वसूली करण्यात येऊन व त्याची नोंद सेवापुस्तकात घेऊन सेवापुस्तक अद्यावत करण्यांत यावे.

DATASDM5602 (Ref No : 84)

## *86 'क' प्रभागातील श्रीमती संध्या व. पाटील व श्री. ल. पा. भोईर यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 24804.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8500.00/-

***वैद्यकीय प्रतिपुर्तीची देयके पारीत करताना नियमानुसार देयकाची छाननी करण्यात आलेली नाही.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'क' प्रभागात कार्यरत असलेल्या श्रीमती संध्या वसंत पाटील, लिपिक आणि लक्ष्मण पांडुरंग भोईर, अंतर्गत लेखा परिक्षक यांना सन 2011-12 मध्ये अदा करण्यांत आलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

अ) (1) श्रीमती संध्या वसंत पाटील, लिपिक यांनी त्यांच्यावर अवलंबून असलेला त्यांचा मुलगा कु. रोहन याला आजारामुळे आकस्मिक परिस्थितीत नालासोपारा येथील आशिर्वाद नर्सिंग होम या खाजगी रुग्णालयात दि. 12/12/2011 ते 14/12/11 या कालावधीत उपचारार्थ दाखल केले होते. त्यावेळी झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या कागदपत्रामधील परिशिष्ट पाच च्या नमुना 'ड' जोडपत्रावर रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक नमूद केलेला नाही. त्यामुळे सदर खाजगी रुग्णालय शासन नोंदणीकृत आहे अथवा नाही हे समजून येत नाही. सदर खाजगी रुग्णालय शासन नोंदणीकृत नसल्यास सदर प्रतिपूर्ती वैध ठरत नाही. त्यामुळे देयकाची संपूर्ण रक्कम रु. 24,804/- आक्षेपाधिन ठरते.

2) परिशिष्ट तीन च्या जोडपत्रा 'ब' मधील 'क' परिच्छेदामध्ये आजाराचे नांव नमूद करणे आवश्यक आहे. ते नमूद केलेले नाही.

3) परिशिष्ट पाच नमुना 'ड' अपूर्ण भरला असून त्यामधील नमूद प्रत्येक बाबी निहाय झालेला खर्च दर्शवून तो संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे.

4) सादर केलेल्या वास्तव प्रमाणपत्रामध्ये रुग्णालयाचे नांव नमुद केले नाही.

5) हॉस्पीटलच्या खर्चामध्ये नर्सिंग चार्जेस रु. 1000/- ची मागणी करण्यांत आली आहे. परंतू सदर खर्चाच्या आवश्यकतेबाबतचे संबंधित डॉक्टरांचे प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याने रु. 1000/- अनुज्ञेय नाहीत. सबब रु. 1000/- वसूलपात्र ठरतात.

6) कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाने स्वाक्षांकित करणे आवश्यक आहे, ते केलेले नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु. **24,804/-**

वसूलपात्र रक्कम रु. **1000/-**

**ब)** (1) श्री. लक्ष्मण पांडुरंग भोईर, अंतर्गत लेखा परिक्षक यांचे वडिलांचे आकस्मिक परिस्थितील आजारपणाचे प्रतिभा हॉस्पीटल या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील खर्चाच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांतील कुटुंब प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाने स्वाक्षांकित केलेले नाही.

2) श्री. भोईर यांचे वडील हे कुठेही नोकरी करीत नसून त्यांना कुठल्याही प्रकारचे निवृत्तीवेतन मिळत नाही व ते सर्वस्वी श्री. भोईर यांचेवर अवलंबून असल्याचे प्रमाणपत्र त्यांनी सादर केलेले दिसून येत नाही.

3) श्री. भोईर यांनी नर्सिंग चार्जेस रु. 4000/- ची मागणी केलेली आहे. परंतू त्यासाठी आवश्यक असलेले संबंधित डॉक्टरांचे प्रमाणपत्र श्री. भोईर यांनी सादर केलेली नसल्याने त्यांना सदरचा खर्च अनुज्ञेय ठरत नसल्याने तो वसूलपात्र ठरतो.

4) खाते प्रमुखाने सादर करावयाचे पडताळणी प्रपत्र 1 अपूर्ण असून ते नियंत्रण अधिकाऱ्याने स्वाक्षांकित केलेले नाही.

5) प्रतिभा हॉस्पीटल च्या Discharge Card वर रुग्णालयातील वास्तव्याचा कालावधी दि. 3/4/12 ते 11/4/12 असा दर्शविण्यांत आला आहे मात्र सदर वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रस्तावामध्ये दि. 7/3/12 ते 17/3/12 असा दर्शविण्यांत आला आहे. तसेच प्रतिपूर्तीची एकूण रक्कम रु. 54,280/- अशी असून आस्थापनाने सादर केलेल्या प्रस्तावात मात्र रु. 69400/- अशी दर्शविण्यात आली आहे.

6) श्री. लक्ष्मण भोईर यांच्या दुसऱ्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत. श्री. भोईर यांचे वडीलांचे दि. 7/3/12 ते 17/3/12 या कालावधीतील श्री हॉस्पीटल खाजगी रुग्णालयातील उपचाराबाबत सादर केलेल्या कागदपत्रांमधील पडताळणी प्रपत्र 2 वर खातेप्रमुखांची स्वाक्षरी नाही.

7) सदर कागदपत्रांसोबत सादर केलेल्या डॉ. स्मिता शहा यांची दि. 18/3/12 ची रु. 1500/- ची अनास्थासिया (भूल देणे) बाबतच्या पावती वरील तारखेमध्ये खाडाखोड केलेली असल्यामुळे तसेच सदरचा खर्च कालबाह्य असल्याने अनुज्ञेय नाही. सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

8) नर्सिंग चार्जेसबाबत संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले नसल्याने रु. 2000/- अनुज्ञेय नाहीत. सबब सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

9) सदर देयकाबाबत वरील आक्षेप क्र. 2 लागू आहे.

वसूलपात्र रक्कम रु. **7500/-**

## *87 निवृत्ती वेतन प्रकरणे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 136 (8) नुसार सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 4517460.00/-

***महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 136 (8) नुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याने निवृत्ती वेतन मंजूर करणे क्रमप्राप्त असताना उपआयुक्त यांनी मंजूर केलेली आहेत. शा.नि. वेपूर1213/प्र.क्र.19/सेवा-9, दि. 23/5/13 अन्वये सहाव्या वेतनाच्या फरकाचा 5 वा हफ्ता शासनाने मार्च 2014 मध्ये देण्याचे सूचित केलेले असताना कर्मचाऱ्यांना माहे जुन 2013 च्या वेतनात अदा करण्यात आला आहे.***

वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती 'अ' विरार या विभागातील निवृत्त कर्मचारी श्रीमती शारदा कालीदास सोलंकी,सफाई कामगार व श्रीमती धनु फुला सोलंकी, सफाई कामगार यांच्या निवृत्ती वेतन प्रकरणांचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

श्रीमती धनु सोलंकी व श्रीमती शारदा सोलंकी यांचे निवृत्ती वेतन निर्धारण नमूना 1 ते 5 मध्ये उमटविलेला हाताचा अंगठ्या खाली निवृत्ती वेतन धारकाचे पूर्ण नांव लिहीले नाही. नमूना 1 साक्षीदार तसेच कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी नाही.

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 136 (8) नुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याने निवृत्ती वेतन मंजूर करणे क्रमप्राप्त आहे. श्रीमती शारदा सोलंकी, धनु सोलंकी यांची निवृत्ती प्रकरणे उपआयुक्त यांनी मंजूर केलेली आहेत. सदर बाब नियमबाह्य आहे. तसेच आयुक्तांनी स्वत:चे अधिकार उपआयुक्त यांना बहाल केल्याचे कार्यालयीन आदेश लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

शा.नि.क्रमांक सेनिवे/1009/प्र.क्र.33/सेवा-4,दि. 30/10/2009 अनुक्रमांक 10 नुसार सहाव्या वेतनाप्रमाणे

येणारी निवृत्तीवेतनाची थकबाकी 5 हप्त्याने देणे क्रमप्राप्त होते. परंतू प्रभाग समिती 'अ' यांनी निवृत्ती वेतनाचा फरक 18/6/2013 रोजी कर्मचाऱ्यांना पूर्ण अदा केलेला आहे. प्रथम चार हप्त्यांची रक्कम प्रत्येक वर्षाला देय असताना ती विलंबाने एकत्रीतरित्या अदा करण्यात अली आहे

पाचवा हप्ता हा कार्यरत कर्मचाऱ्यांना शा.नि. वेपूर1213/प्र.क्र.19/सेवा-9, दि. 23/5/13 अ.नु. 3 नुसार शासनाने मार्च 2014 मध्ये देण्याचे सूचित केलेले असताना रु. 45,17,460/- संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात आला आहे. सदर बाब नियमबाह्य असल्याने सदर रक्कम वसुल करुन ती महानगरपलिका निधीमध्ये जमा करावी व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक कार्यवाही करावी.

DPSKGGM6001 (Ref No : 86)

## *88 श्री. प्रकाश बा. बाविस्कर, लिपिक (सेवानिवृत्त) यांचे सेवानिवृत्ती लाभ विषयक.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अर्हताकारी सेवेच्या चुकीच्या परिगणनेमुळे मृत्यु-नि-सेवा उपदानाची रक्कम कमी अदा करण्यात आली आहे.***

वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या 'अ' प्रभागातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी श्री. प्रकाश बाबुराव बाविस्कर, लिपिक यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता असे दिसून येते की, श्री. बाविस्कर यांची नियुक्ती दि. 1/6/1987 रोजी असून ते दि. 31/1/2012 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यामुळे त्यांची एकूण अर्हताकारी सेवा 24 वर्षे 7 महिने झालेली असल्याने सेवानिवृत्ती उपदानासाठी 49 सहामाही कालावधी व्यक्त करणे आवश्यक होते. त्यानुसार श्री. बाविस्कर यांच्या सेवानिवृत्ती उपदानाची परिगणना करताना, अखेरचे वेतन X अर्हताकारी सेवेचा सहामाही कालावधी ÷ 4 या सुत्रानुसार रु. 1,60,475/- त्यांना अदा करणे आवश्यक होते. परंतू उपदानाची परिगणना करताना 47 सहामाही कालावधी व्यक्त केला गेल्याने त्यांना रु. 1,53,925/- एवढी रक्कम अदा करण्यांत आल्याचे दिसते. त्यामुळे रु. 6550/- ने कमी अदा केले आहेत.

## *89 श्री. सुकदेव च. दरवेशी, स्वच्छता निरीक्षक यांचे सेवापुस्तकाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

***श्री. सुखदेव दरवेशी यांना परिविक्षाधिन कालावधी पुर्ण होण्यापुर्वीच निलंबीत केले असल्याने व परिविक्षाधिन कालावधी समाधानकारक पुर्ण केल्याचे वरीष्ठ प्राधिका-याने प्रमाणित केलेले नसताना कायम पदी नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांच्या संपुर्ण निलंबन कालावधीची परिगणना न करताच पुढील वेतनवाढी दिल्या असल्याने वेतन भत्यांचे अतिप्रदान झाले आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या 'क' प्रभागातंर्गत कार्यरत असलेल्या श्री. सुकदेव दरवेशी, स्वच्छता निरीक्षक यांचे सेवापुस्तक तपासले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

श्री. सुकदेव दरवेशी यांची स्वच्छता निरीक्षक या पदावर कोकण प्रादेशिक निवड मंडळामार्फत दि. 1/11/1992 पासून नालासोपारा नगरपालिकेमध्ये नियुक्ती झाली आहे. त्यामुळे त्यांच्या परिविक्षाधिन कालावधी संपल्यानंतर त्यांनी सदर कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. सदर प्रमाणपत्र नस्तीमध्ये उपलब्ध झाले नाही. त्यानंतर श्री. दरवेशी यांना आदेश क्र. 1881/93/94, दि. 5/5/93 अन्वये दि. 7/5/1993 पासून निलंबित करण्यांत आले. त्यानंतर आदेश क्र. 3294, दि. 7/7/94 अन्वये श्री. दरवेशी यांना दि. 11/8/94 पासून कामावर हजर करून घेऊन सर्वसाधारण सभा ठराव क्र. 275, दि. 16/7/96 नुसार त्यांना स्वच्छता निरीक्षक या पदावर कायम करण्यांत आले.

उपरोक्त नोंदीवरून असे दिसून येते की, श्री. दरवेशी यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण करण्यापूर्वीच त्यांना निलंबित करण्यांत आल्याने प्रशासनाने त्यांना पदावरून कमी करून कोकण प्रादेशिक निवड मंडळास त्याबाबत कळविणे आवश्यक होते. अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नसल्यामुळे श्री. दरवेशी यांना दि. 16/7/1996 रोजी स्वच्छता निरीक्षक पदी कायम करण्याची प्रशासनाची कृती ही नियमबाहय ठरते.

श्री. दरवेशी यांना दि. 7/5/1993 पासून सेवेतून निलंबित केलेले असताना, त्यांनी त्यांच्या निलंबन कालावधीत ते कुठेही उद्योग, धंदा अथवा नोकरी करीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र कार्यालयास दरमहा सादर करणे आवश्यक ठरते. त्याशिवाय त्यांना निलंबन भत्ता अदा करता येणार नाही. परंतू श्री. दरवेशी यांनी त्यांच्या निलंबन कालावधीत उपरोल्लेखित प्रमाणपत्र सादर न करताही त्यांना निलंबन भत्ता अदा करण्यांत आला आहे. आस्थापनाची सदर कृती ही नियमबाह्य असून श्री. दरवेशी यांना त्यांच्या निलंबन कालावधीत अदा केलेल्या संपूर्ण निलंबन भत्त्याची वसूली करणे आवश्यक ठरते.
श्री. दरवेशी यांच्या सेवापुस्तकात दि. 1/11/92 ते 1/11/95 पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी दिसून येतात, परंतू सदर वेतनवाढी देताना श्री. दरवेशी यांच्या निलंबन कालावधीची परिगणना करण्यांत आलेली दिसून येत नाही. त्यांमुळे त्यांना वेतन भत्त्याचे अतिप्रदान झाल्याचे संभवते. सदर निलंबन कालावधीची परिगणना करून वेतनवाढीच्या सुधारीत नोंदी घेऊन वेतन व भत्त्याच्या अतिप्रदनीत रक्कमेची वसूली करण्यांत यावी. तसेच श्री. दरवेशी यांना आदेश क्र. आस्था/5450/02, दि. 21/3/2002 अन्वये निलंबित केल्यापासून ते त्यांना आयुक्त यांचे आदेश क्र. वविशम/आस्था/ 4119/2010, दि. 25/3/2010 अन्वये तसेच मा. राज्यमंत्री, नगरविकास यांचेकडील केलेल्या अपिलान्वये त्यांनी दिलेल्या आदेशानुसार श्री. दरवेशी यांना स्वच्छता निरीक्षक या पदावर पुन: समाविष्ट केल्या पर्यंतचा (21/3/2001 ते 25/3/2010) एकूण 7 वर्षे 293 दिवसांचा कालावधी पुढे नेवून त्यानंतर येणाऱ्या दिवशी त्यांना वेतनवाढ देणे आवश्यक ठरते. अशा प्रकारची परिगणना केल्याचे सेवापुस्तकातील नोंदीवरून दिसून येत नाही. त्यामुळे वरील दोन्ही निलंबन कालावधीचा पुढील वेतनवाढ देताना परिगणना करून सुधारीत वेतनवाढीच्या दिनांकाच्या नोंदी घेऊन अतिप्रदानीत झालेल्या वेतन व भत्त्यांची संपूर्ण वसूली श्री. दरवेशी यांच्या वेतन व भत्त्यांमधून करणे आवश्यक आहे.

DATRADM5901 (Ref No : 88)

## *90 शहरांतर्गत वितरण व्यवस्था या शिर्षांतर्गत देण्यात आलेल्या मजुर ठेक्याच्या नस्ती व प्रमाणके लेखा परिक्षण पथकास उपलब्ध करून न देणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8775970.00/-

***शहरांतर्गत पाणीपुरवठा वितरण मजुर ठेका या लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेल्या खर्चाच्या नस्ती, प्रमाणके व नोंवह्या तपासणीस उपलब्ध न झाल्याने संपुर्ण खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

वसई- विरार शहर महानगरपालिके मार्फत शहरांतर्गत पाणीपुरवठा वितरण मजूर ठेका या लेखा शिर्षांतर्गत सन 2011-12 ह्या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या खर्चाचे अभिलेखे व खर्चाची प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 142 दि. 24/06/2013 अन्वये कळविण्यात आले होते तथापि ते तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर ठेक्यासंबंधी करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेची व खर्चाची तपासणी करता आली नाही. करीता आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये करण्यात आलेला संपुर्ण खर्च रु. 87,75,970/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन 2011-12 मूळअंदाज | सन 2011-12 प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | शहरांतर्गत वितरण मजूर ठेका | 1,09,50,000/- | 87,75,970/- |

DATASDM5602 (Ref No : 89)

## *91 पाणीपुरवठा/बांधकाम विभागाने लेखा परिक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध करून न देणेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 64616571.00/-

***शहरांतर्गत पाणीपुरवठा व्यवस्था व विकासनिधी अंतर्गत पाणीपुरवठा साहित्य व पंप खरेदी या लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेल्या खर्चाच्या नस्ती व नोंवहया उपलब्ध न झाल्याने संपुर्ण खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

वसई- विरार शहर महानगरपालिके मार्फत खालील लेखा शिर्षांतर्गत सन 2011-12 ह्या वित्तीय वर्षात शहरांतर्गत पाणीपुरवठा व्यवस्था व विकासनिधी अंतर्गत पाणीपुरवठा साहित्य व पंप खरेदी करण्यात आले आहेत. रकाना 4 मध्ये दर्शविलेल्या च्या रक्कमेच्या साहित्य खरेदीची नस्ती, वापर / विनियोग नोंदवही व त्या अनुषंगाने असलेले अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत

अर्धसमास पत्र क्र. 145, 146 दि. 24/06/2013 अन्वये कळविण्यात आले होते तसेच कार्यकारी अभियंता, प्रभाग क,ड,ई यांना प्रत्यक्ष भेटुन कळविण्यात आले होते तथापि ते तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे साहित्य खरेदीवरील खर्च व खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा विनियोग/वापर कोणत्या कामाकरीता करण्यात आला याची तपासणी करता आली नाही. करीता आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये करण्यात आलेला संपुर्ण खर्च रु. 6,46,16,571/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.64616571/-

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन 2011-12 मूळ अंदाज | सन 2011-12 प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | शहरांतर्गत वितरण व्यवस्था साहित्य खरेदी | 6,30,00,000/- | 3,36,29,836/- |
| 2 | विकास निधी अंतर्गत नविन जलवाहिनी, इतर भांडवली कामांसाठी पाणी पूरवठा साहित्य व पंप खरेदी | 7,70,00,000/- | 3,09,86,735/- |

DATASDM5602 (Ref No : 90)

## ***92 महानगरपालिका प्रभाग समिती 'ड' नवघर-माणिकपुर येथे उपविधी 2011 प्रमाणे पाणीपट्टी बिलाची सुधारीत दराने आकारणी न केल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

***पाणीपुरवठा विभागाने नळजोडणी आणि त्यावर आकारण्यात येणाऱ्या आकार व शुल्क संदर्भातील नोंदवहया महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 88 अन्वये नमुना क्र. 62 (अ) (ब) आणि 63 मधील विहित नमुन्यात ठेवण्यांत आलेल्या नाहीत. पाणी पुरवठा योजनेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणेसाठी उपविधी 2011 च्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 459 नुसार आयुक्त यांनी सादर केलेल्या मसुद्यावर सर्वसाधारण सभेने ठराव क्र. 9, दि. 7/6/2011 रोजी नळजोडणी आकाराच्या दरांमध्ये वाढ करून त्यास मंजूरी दिलेली असताना जुन्याच दराने वसुली करण्यात येत आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्य 'ड' प्रभागाच्या पाणीपुरवठा विभागाचे लेखा परिक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

पाणीपुरवठा विभागाने नळजोडणी आणि त्यावर आकारण्यात येणाऱ्या आकार व शुल्क संदर्भातील नोंदवहया महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 88 अन्वये नमुना क्र. 62 (अ) (ब) आणि 63 मधील विहित नमुन्यात ठेवण्यांत आलेल्या नाहीत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व प्रकारच्या मालमत्तांना पाणीपुरवठासाठी नविन नळ जोडणी आकाराचे दर माहे जुलै 99 मध्ये तत्कालीन प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन व आयुक्त, कोकण विभाग यांनी मंजूरी दिली होती. तेव्हापासून जून 2011 पर्यंत जुन्याच दराने नळ जोडणी आकार दर अमलात होते. लोकसंख्या वाढीचा दर विचारात घेता भविष्य काळात पाणपुरवठा करणे कामी नविन स्त्रोत उपलब्ध करणे आवश्यक ठरल्याने आणि पाणी पुरवठा योजनेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणेसाठी उपविधी 2011 च्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 459 नुसार आयुक्त यांनी सादर केलेल्या मसुद्यावर सर्वसाधारण सभेने ठराव क्र. 9, दि. 7/6/2011 रोजी नळजोडणी आकाराच्या दरांमध्ये वाढ करून त्यास मंजूरी दिलेली आहे.

'ड' प्रभागाचा प्रस्तुत प्रकरणांचा अभिलेखा तपासला असता वरील सर्वसाधारण सभेच्या ठरावाची अद्याप अंमलबजावणी केली जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे माहे जून 2011 पासून गेली 2 वर्षे महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडत असल्याचे दिसून येते.

DATRADM5901 (Ref No : 91)

## *93 निवृत्ती वेतन अंशदान दरमहा अंशदान निधीत जमा न करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***जानेवारी 2012 ते मार्च 2012 पर्यंतचे कर्मचा-यांचे निवृत्तीवेतन अंशदान अंशदान निधी मध्ये जमा करण्यात आलेले नाही.*** |

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग विरार, नालासोपारा, नवघर-माणिकपूर, वसई या प्रभागातील निवृत्ती वेतन अंशदान लेखाचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत. खालील तक्त्या मध्ये कर्मचाऱ्याचे मूळ वेतन ग्रेडपे एप्रिल 2011 ते डिसेंबर 2011 पर्यंतच्या कालावधीच्या रक्कमा दर्शविण्यात आलेल्या आहेत व त्या रक्कमेवर निवृत्ती वेतन अंशदान 1/9 प्रमाणे देय रक्कम दर्शविण्यात आली आहे.

| अ.क्र | प्रभागाचे नांव | मूळवेतन ग्रेडपे | देय अंशदान रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | विरार | 93,08,682/- | 10,34,298/- |
| 2 | नालासोपारा | 1,13,38,819/- | 12,59,868/- |
| 3 | नवघर-माणिकपूर | 2,15,36,325/- | 23,92,925/- |
| 4 | वसई | 1,39,62,762/- | 15,51,418/- |

वसई-विरार शहर महानगरपालिका निवृत्ती वेतन अंशदान निधीची रोकडवही एप्रिल 2011 ते डिसेंबर 2011 लेखा परिक्षण केले असता विरार विभागासाठी रु. 1,18,94,947/- एवढी रक्कम अंशदान निधी मध्ये जमा करण्यात आलेली आहे. वसई विभासाठी 15 लक्ष दिनांक. 2/1/12 रोजी अंशदान म्हणून जमा केलेले आहेत, तसेच नवघर-माणिकपूर विभागासाठी दिनांक. 2/1/12 रोजी 5 लक्ष एवढे अंशदान जमा केलेले आहे. महापालिका स्थापन होण्यापूर्वी चारही नगरपरिषदेमध्ये कर्मचारी निवृत्ती वेतन अंशदान खाते अस्तीत्वात होते. असे असताना त्या त्या प्रभागातील खात्यामध्ये वेळोवेळी अंशदान जमा करणे क्रमप्राप्त होते. परंतू तसे केलेले नाही. नालासोपारा प्रभागासाठी एप्रिल 11 ते डिसेंबर 11 पर्यंत निवृत्ती वेतन अंशदान जमा केलेले नाही. विरार विभागासाठी रु. 10,34,298/- एवढे अंशदान जमा करणे क्रमप्राप्त होते, परंतू प्रत्यक्ष रु. 1,18,94,947/- एवढे अंशदान जमा केलेले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 136 नुसार कर्मचाऱ्यांच्या वेतन, ग्रेडपे रक्कमेवर 1/9 प्रमाणे परिगणना करून निवृत्ती वेतन अंशदान खात्यामध्ये जमा करणे क्रमप्राप्त होते. प्रत्यक्ष रोकडवही तपासली असता परिरगणना न करता ठराविक रक्कम त्या त्या प्रभागामध्ये वर्ग करण्यात आलेली आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

दिनांक. 31/3/12 रोजी प्रत्येक प्रभागाकडे निवृत्ती वेतन अंशदान निधीच्या रक्कमा वर्ग करण्यांत आलेल्या आहेत. उदा. विरार विभागाकडे रु. 4,47,657/- एवढी रक्कम वर्ग केलेली आहे. विरार विभागाची निवृत्ती वेतन अंशदान रोकडवही प्रत्यक्ष तपासली असता सदरची रक्कम दि. 1/4/2012 रोजी आरंभीची शिल्लक म्हणुन दर्शविण्यांत आलेली नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत विरार प्रभाग समिती, नालासोपारा, नवघर-माणिकपूर, वसई प्रभागांचे कामकाज जानेवारी 12 पासून स्वतंत्र करण्यांत आले. खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधी प्रभागाचे निवृत्ती वेतन अंशदान प्रत्येक महिन्याला अंशदान निधीमध्ये जमा करणे क्रमप्राप्त आहे. प्रत्यक्ष अंशदान रोकडवही तपासली असता विरार विभाग वगळता कोणीही

अंशदान निधीमध्ये त्या त्या वेळीच्या रक्कमा जमा केलेल्या नाहीत.

| अ.क्र | विभाग | जानेवारी, फेब्रुवारी, मार्च मूळवेतन ग्रेडपे | देय अंशदान रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | विरार | 32,34,010/- | 3,59,334/- |
| 2 | नालासोपारा | 40,24,020/- | 4,47,113/- |
| 3 | नवघर-माणिकपूर | 83,31,708/- | 9,25,745/- |
| 4 | वसई | 53,04,570/- | 5,89,396/- |

तरी, वरील तक्त्यामध्ये दर्शविण्यांत आलेल्या देय अंशदानाच्या रक्कमा त्वरीत अंशदान निधीमध्ये जमा करण्यांत याव्या.

प्रभाग समिती 'ब' पेल्हार यांनी निवृत्ती वेतन अंशदान निधीचे त्वरीत बँकेमध्ये खाते उघडवून माहे जानेवारी 12 पासून कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन अंशदान जमा करण्यांत यावे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 135 (2) नमुना क्र. 101 नुसार निवृत्ती वेतन देयक नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तरी सदर नोंदवही यापुढे ठेवून अनुपालन पुढील लेखा परिक्षणास अवगत करावे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 136 (ड) नुसार जमा झालेल्या रक्कमा यांची गुंतवणुक प्रमाणपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

DPSKGGM6001 (Ref No : 92)

## *94 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*महानगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***विरार प्रभाग समिती 'अ' तेथे जुन 2008 ते 4/2011 या कालावधीमध्ये विविध पदांवर 22 कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचा-यांना शासन निर्णय दि. 31/10/2005 नुसार नियुक्तीच्या दिनांकापासुन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु करण्यात आलेली नाही. सदर योजन दि. 1/04/2012 पासुन लागु केली असल्याने नियुक्तीच्या दिनांकापासुन 31/03/2012 पर्यंत अंशदान वसुल करणे आवश्यक आहे.***

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत विरार, नालासोपारा, नवघर- माणिकपूर, वसई

प्रभाग समिती कर्मचाऱ्यांचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे  लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

शा.नि.क्र.अंनियो/1005/126/सेवा-दि. 31/10/2005 नुसार, 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्यांत आलेली आहे. विरार प्रभाग समिती 'अ' यांनी दि. 1/6/2008 रोजी 12, दि. 1/7/2009 रोजी 6, व दि. 1/4/2011 रोजी 4, सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. एकूण 22 कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यांत आलेली आहे. उपरोक्त  शासन निर्णयातील अ.क्र. 5 (ब) नुसार कर्मचारी सेवेत नियुक्त होताच त्यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणे क्रमप्राप्त होते. परंतू प्रभाग समिती 'अ' यांनी सदर कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल 2012 पासून परिभाषित योजना लागु केलेली आहे. तरी कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती पासून ते 31 मार्च 2012 या कालावधीची वसूली दरमहा करून अंशदान निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे. (सोबत परिशिष्ट)

विरार प्रभाग समिती 'अ' या आस्थापनेवर दि. 1/6/2008 रोजी नानजी का. सोलंकी, सफाई कामगार म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे. सदर कर्मचाऱ्याचे दिनांक 23/6/2010 रोजी निधन झालेले आहे. शासन निर्णय क्रमांक अंनियो/1009/प्र.क्र. 1/सेवा-4, दि. 12/11/2010 नुसार सदर कर्मचाऱ्याला परिभाषित योजनेचा लाभ मिळू शकला असता, परंतू प्रभाग समिती 'अ' यांनी त्या कर्मचाऱ्याला परिभाषित योजना सेवेत नियुक्ती झाल्या दिनांकापासून लागु न केल्याने सदर कर्मचाऱ्याचे नुकसान झालेले आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

प्रभाग समिती 'क' नालासोपारा एकूण 7 सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. परंतू शासन निर्णयानुसार आज पर्यंत सदर कर्मचाऱ्यांना परिभाषित योजना लागु कलेली नाही. तरी, सदर कर्मचाऱ्यांना त्वरीत परिभाषित योजना नियुक्तीच्या दिनांकापासून लागु करून, त्यांचे वेतनातुन मागील कालावधींची रक्कम वसूल करण्यांत यावी. (सोबत परिशिष्ट).

प्रभाग समिती 'ड' नवघर-माणिकपूर यांनी 4/7/2007 ते 1/9/2010 या कालावधी मध्ये एकूण 12 सफाई कर्मचारी व 1 सहाय्यक ग्रंथपाल यांची नेमणूक केलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांना परिभाषित योजना ही दिनांक. 4/12 पासून लागु केलेली आहे. तरी शासन निर्णयानुसार सदर कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या तारखेपासून परिभाषित योजना लागु करून नियुक्ती तारीख ते 31 मार्च 2012 पर्यंतचे अंशदान कर्मचाऱ्यांकडून वसूल करावे व तेवढे अंशदान महानगरपालिकेने निवृत्ती वेतन अंशदान फंडामध्ये जमा करावे. (सोबत परिशिष्ट)

प्रभाग समिती 'इ' वसई यांनी 1/9/2005 ते 1/9/2012 या कालावधीमध्ये 42 सफाई कर्मचारी व 1 स्वच्छता निरीक्षक व 1 लिपिक असे एकूण 44 कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यांत आलेली आहे. पैकी 18 कर्मचारी हे नोव्हेंबर 2005 पूर्वी नियुक्त झालेले आहे. शासन निर्णयनुसार 1/11/2005 पूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सदरची परिभाषित योजना लागु नाही. तरीही, वसई प्रभाग 'इ' यांनी परिभाषित योजना सदर 18 कर्मचाऱ्यांना लागु केलेली आहे. शा.नि.अंनियो/1008/93/सेवा-4, दि. 1/12/2008 अ.क्र.

'5' नुसार विकल्प दिला असल्यास तसे अनुपालन लेखा परिक्षणास उपलब्ध करून द्यावे. उर्वरीत 26 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापसून ते परिभाषित अंशदान लागू केलेल्या दिनांकापर्यंत यामधील फरकाची रक्कम परिभाषित निवृत्ती वेतन अंशदान निधीमध्ये जमा करावी. (सोबत परिशिष्ट)

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती अ,क,ड,इ यांची परिभाषित निवृत्ती वेतन अंशदान निधीचे लेखा परिक्षण केले असता असे निर्दशनास आले की, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अंशदान वसूल करतांना मूळ वेतन + ग्रेड वेतन यावर 10% प्रमाणे रक्कम परिगणना केली आहे. शा.नि.अंनियो/1005/126/सेवा-4, दि. 31/10/2005 अ.क्र. 3 (इ) नुसार मूळ वेतन + ग्रेड वेतन + महागाई भत्ता यावर 10% प्रमाणे अंशदानाची परिगणना केलेली नाही. तरी उपरोक्त शासन निर्णयानुसार निवृत्ती वेतन अंशदानाची परिगणना करून फरकाची रक्कम वसूल करावी.

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती अ,क,ड,इ यांनी कर्मचाऱ्यांची वर्षभरात जमा होणाऱ्या अंशदान रक्कमेवर शासन आदेशानुसार व्याजाची रक्कम त्या त्या वर्षी जमा करणे क्रमप्राप्त होते. परंतू उपरोक्त चारही प्रभाग समितीने कर्मचाऱ्यांच्या वार्षिक जमा होणाऱ्या अंशदानावर व्याज जमा केलेले नाही किंबहुना अंदाज पत्रकामध्येही तरतुद केलेली नाही, तरी संबंधित कर्मचाऱ्यांच्या खाती व्याज जमा करून अनुपालन पुढील लेखा परिक्षणास अवगत करावे. तसे परिभाषित कर्मचाऱ्यांचा लेखा स्वतंत्र ठेवण्यात यावा.

DPSKGGM6001 (Ref No : 93)

## *95 भोगवटा प्रमाणपत्राची प्रत अनुपलब्ध असणे आणि जुन्या मालमत्ता करात प्रत्येक पाच वर्षांनी दरवाढ करणेबाबत. ड प्रभाग नवघर-माणिकपूर क्षेत्र.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***नगररचना विभागामार्फत भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर त्वरीत बांधकामावर मालमत्ता कर आकारण्यात येत नाही. दर पाच वर्षांनी मालमत्ता कराच्या दरात सुधारणा करणे आवश्यक असताना महानगरपालिका स्थापन झाल्यानंतरही दरात सुधारणा करण्यात आलेली नाही.*** |

वसई-विरार शहर महानगरपालिका 'ड' प्रभागातील मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षणास केले असता खालील बाबी दिसून आाल्या.

'ड' प्रभागांतर्गत दिवाणमान, माणिकपूर, चुळणे, नवघर, बादामपूर आणि उमेळमान असे एकूण 6 वॉर्ड आणि 13 ग्रामपंचायतीच्या हद्दींमध्ये होणाऱ्या निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रकारची बांधकामे खाजगी व्यावसायिकांकडून होत आहेत. सदर बांधकामांना महानगरपालिकेच्या नगररचना विभागातर्फे भोगवटा प्रमाणपत्रे देण्यांत येतात. सदर बांधकामांवर मालमत्ता कराच्या निरनिराळ्या दरांनुसार परिगणना करून मालमत्ता विभाग कर आकारणी करतो. त्यासाठी नगररचना विभागामार्फत देण्यांत आलेल्या भोगवटा प्रमाणपत्राची प्रत मालमत्ता विभागास देणे क्रमप्राप्त आहे. परंतू प्रत्यक्ष नगररचना विभाग सदर महत्वाची प्रत मालमत्ता विभागास प्रभावीपणे सदर कर आकारणी करता येत नाही. परिणामी महानगरपालिकेस वर्षानुवर्षे फार मोठ्या महसुलास मुकावे लागते.

'ड' प्रभागाने सादर केलेल्या मालमत्ता कराच्या दर यादीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नवघर-माणिकपूर नगरपरिषदेने सन् 1965 पासून दर 5 वर्षांनी मालमत्ता करात 25 ते 30 पैसे प्रति चौरस फूट या दराने वाढ केलेली आहे. या पूर्वीचे सुधारित दर दि. 1/4/2006 पासून लागू केलेले आहेत. त्यानंतर 5 वर्षांनी म्हणजे माहे एप्रिल 2010 पासून जुन्या दरांमध्ये वाढ करणे अपेक्षित होते. दरम्यान जुलै 2009 मध्ये महानगरपालिका अस्तित्वात आल्यानक महानगरपालिकेने दरात सुधारणा करणे अपेक्षित होते. याबाबत महानगरपालिकेच्या अधिनियम128 अ (3) आणि 129 अन्वये तरतूद असताना देखील त्याची अंमलबजावणी करण्यांत आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे 'ड' प्रभागातील 6 वॉर्ड आणि 112 ग्रामपंचायतीमधून अद्यापही जुन्या दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यांत येत आहे.

सन् 2011-12 मध्ये 'ड' प्रभागामध्ये 10 निवासी, 12 निवासी आणि व्यापारी, 5 वाणिज्यिक आणि 29 औद्योगिक अशा एकूण 56 बांधकामांची भोगवटा प्रमाणपत्रे निर्गमित झालेली आहेत आणि त्यावर जुन्या दरने कर आकारणी होत आहे. माहे. एप्रिल 2010 पासून आजतागायत मालमत्ता करामध्ये दरवाढ न केल्याने महानगरपालिकेस फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक महसुलास मुकावे लागते.

DATRADM5901 (Ref No : 95)

## *96 वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग 'अ' मधील मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 401081.00/-

***वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग 'अ' विरार यांची मालमत्ता कर वसुलीची टक्केवारी अत्यंत कमी असुन सन 2011-12 मधील थकबाकी एकुण मागणीच्या 45% आहे. त्यामुळे महसुलात तुट येत असुन विकास कामांवर परिणाम होत आहे. बोळींज विभागामध्ये मालमत्ता कर आकारणी ही ग्रामपंचायत ठरावानुसार करण्यात येत आहे. वसई-विरार शहर महापालिका ही दि. 3/7/2009 रोजी स्थापना झालेली असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नियम क्र. 129 'अ' नुसार मालमत्ता कर आकारणी करणे आवश्यक आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग 'अ' विरार येथील मालमत्ता कर आकारणी नस्तींचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रभाग 'अ' विरार चा विभागाची सन 2011-12 मालमत्ता कराची एकूण मागणी रु.8,80,27,503/- एवढी असून मागील थकबाकी रु. 1,59,67,060/- एवढी आहे. मागील थकबाकीची वसुल रु.87,10,196/- एवढी झालेली असून थकबाकी पैकी रु. 72,56,864 एवढी थकबाकी शिल्लक आहे. मागील थकबाकी व सन 2011-12 ची थकबाकी मिळून एकूण थकबाकी रु. 2,25,14,478/- एवढी आहे. सदर वसूली बाबत काय कार्यवाही केली, किती थकबाकीदार यांना नोटीस देण्यात आल्या या बाबतचा अहवाल लेखा परिक्षणास उपलब्ध झालेला नाही. तसेच वसूलीची टक्केवारी 54.95 असल्याने थकबाकी वसूलीसाठी प्रशासकीय कार्यवाही करून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.

वसई-विरार शहर महापालिका नगर विकास विभाग यांनी सन 2011-12 मध्ये प्रभाग समिती 'अ' याना एकूण 45 इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. पैकी फक्त सात इमारतीना मालमत्ता कर आकारणी करण्यात आलेली आहे. म्हणजे अजून 38 इमारतीना मालमत्ता कर आकारणी झालेली नाही. सदर बाब गंभीर असून नियम बाह्य आहे. मोठ्या प्रमाणावर इमारतींना मालमत्ता कर आकारणी न झाल्याने महानगरपालिकेच्या महसूलामध्ये तुट येत असून त्यामुळे विकास कामांवर परिणाम होत आहे. या 38 इमारतींवर त्वरीत कर आकारणी करून मालमत्ता कर रु. 359113/- व त्यावरील शासन अधिभार रु. 41968/- ची वसूली करण्यांत यावी.

वसई-विरार शहर महानगरपालिका बोळींज विभागामध्ये मालमत्ता कर आकारणी ही ग्रामपंचायत ठरावानुसार करण्यात येत आहे. वसई-विरार शहर महापालिका ही दि. 3/7/2009 रोजी स्थापना झालेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नियम क्र. 129 'अ' नुसार मालमत्ता कर आकारणी केलेली नाही. उपरोक्त नियमानुसार मालमत्ता कर आकारणी न केल्यामुळे महापालिकेच्या महसूलात मोठ्या प्रमाणावर घट येत आहे. तरी बोळींज प्रभागामध्ये भोगवाटा प्रमाणपत्र मिळालेल्या इमारतींना उपरोक्त नियमानुसार मालमत्ता कर आकारणी करण्यात यावी.

## *97 रुग्णालयाकरीता दैनंदिन व किरकोळ कामकाज सेवा पुरविणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1300000.00 /-, आक्षेपाधीन रक्कम रु. 1056000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25280.00/-

***संपुर्ण निविदाप्रक्रिया आक्षेपार्ह आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | दैनंदिन व किरकोळ कामकाज सेवा पुरविणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | मे. चिराग लेबर कॉनक्ट्रर |
| तांत्रिक मंजुरी | 17 |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्र. 17 दि. 28/05/2009 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ---- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 13 लाख |
| बजेट तरतुद | ---- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै.नरविर चिमाजी दि. 08/04/2009 ते 15/04/2009, दि. 07/04/2009 |
| इसारा रक्कम | 20,000/- |
| निविदा रक्कम | 1,500/- |
| सुरक्षा अनामत | 6,400/- |
| कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | वमप/दवा/589, दि. 03/06/2009 |
| काम सुरु दिनांक | 03/06/2009 |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | ---- |

| | |
|---|---|
| प्रमाणक क्र. ---- | मोजमाप पुस्तक क्र. ----- |

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत रुग्णालय येथे दैनंदिन व किरकोळ कामकाज सेवा पुरविण्याबाबतची नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

निविदा प्रसिध्दी दिनांक 07/04/2009 मध्ये नगरपरिषद रुग्णालयातील दैनंदिन व किरकोळ कामे करण्यासाठी निविदा प्रसिध्दी देण्यात आली होती व सदर निविदा दिनांक 16/04/09 रोजी उघडण्यात येणार होत्या. प्रत्यक्ष नस्ती तपासली असता निविदा दि. 12/05/2009 रोजी उघडण्यात आल्या आहेत. या विलंबाबाबतची कारणे नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत.

मे. हनुमंत अज्ञान सुळे यांची निविदा तपासली असता त्यांनी भरलेले दर प्रथम रु. 70,000/- लिहीले होते परंतु त्यात रु.170000/- अशी दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यानुसार मे. चिराग लेबर कॉण्ट्रॅक्टर यांचे दर रु. 88,000/- हे न्युनतम म्हणुन स्विकारण्यात आलेले आहे. या दोन्ही निविदाकारांच्या दरामध्ये मोठी तफावत असल्याने ते स्पर्धात्मक नसल्याचे दिसते. त्यामुळे मे. हनुमंत सुळे याचे दरातील खाडाखोडीबाबत आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

मे. चिराग लेबर कॉण्ट्रॅक्टर यांचा लेबर पुरवठा परवाना नुतनीकरण डिसेंबर 2008 पर्यंतच आहे. असे असताना सदरची निविदा ग्राहय धरण्यात येऊन स्विकारण्यात आली आहे.

ठेक्याची वार्षिक रक्कम रु. 10,56,000/- असताना (रु.88,000/- x 12 म.) निविदा अटी व शर्ती ब (3) व करारनामा अट क्र. 17 नुसार रु. 31,680/- सुरक्षा अनामत ठेकेदाराकडून घेणे क्रमप्राप्त असताना रु. 6,400/- वसुल करण्यांत आली आहे.

सन 2011-12 प्रमाणके तपासली असता निविदा अटी शर्ती ब (3) व करारनामा अट क्र. 17 नुसार ठेकेदार याच्या देयकातून 7% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

करारपत्र अट क्र. 4 नुसार ठेकेदार चिराग लेबर कॉन्ट्रक्टर यानी कर्मचारी विमा उतरविलेला नाही. तसेच कर्मचाऱ्यांकडून वसुल केलेला व्यवसाय कर शासनास तिजोरीत जमा केल्या बाबतचे चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

करारपत्र अट क्र. 16 नुसार ठेकेदार चिराग लेबर कॉन्ट्रक्टर यानी रोज 15 कर्मचारी रुग्णालयाला पुरवठा करणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष प्रमाणके व देयके तपासली असता कधी 10 तर कधी 12 कर्मचारी पुरवठा केलेला आहे. ठेकेदार यानी कमी पुरवठा केला असल्याने त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असताना ती करण्यात आलेली नाही.

सन 2011-12 करीता रुग्णालयासाठी दैनंदिन कामकाज सेवा पुरविणेबाबत ठेकेदार चिराग लेबर कॉन्ट्रक्टर याना प्रशासकिय ठराव क्र. 338 दि. 31/03/2010 नुसार मुदत वाढ देण्यात आली आहे व त्या अनुषंगाने कार्यालयीन पत्र क्र. वविशम/दवा/78/2010, दि. 31/03/10 नुसार ठेकेदार याना नविन करारपत्र करण्यासाठी आदेशीत केले आहे. नस्ती तपासली असता ठेकेदार चिराग लेबर कॉन्ट्रक्टर यानी नविन करारपत्र केलेले नसुन त्यांचा ठेका अद्यापपर्यंत सुरु ठेवण्यात आला आहे. वस्तुतः शासन परिपत्रक दि. 10/10/2008 नुसार नव्याने निविदा प्रक्रिया न राबविता मंजुर निविदाकारास मुदतवाढ

देण्याची तरतुद काढुन टाकण्यात आली आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 97)

## *98 रुग्णालयासाठी ऑक्सिजन सिलिंडर रिफिलींग करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 1980.00/-

***रुग्णालयासाठी वार्षिक किती ऑक्सिजन सिलींडर रिफिंलींग करावी लागणार आहेत. याची मागणी रुग्णालयाने भांडार विभागाकडे केलेली नाही. मागणी नसताना निविदा मागविण्यात आल्या आहेत. करारनामा न करता मे. लिओ ऑक्सिजन याना कार्यादेश क्र. व.वि.श.म./भा/554/11 दि. 29/08/2011 देण्यात आला आहे. ऑक्सिजन सिलींडर रिफिंलींग साठा नोंदवहीमध्ये किमान 11 तारखाना प्रथम एक सिलिंडर वापरले असे नमूद करुन तद्नंतर खाडाखोडीद्वारे दोन सिलिंडर वापरल्याची नोंद केली आहे.***

वसई - विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेले वसई येथील रुग्णालयासाठी लागणारे ऑक्सिजन सिंलिंडर रिफिंलींग नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

रुग्णालयासाठी वार्षिक किती ऑक्सिजन सिंलींडर रिफिंलींग करावी लागणार आहेत. याची मागणी रुग्णालयाने भांडार विभागाकडे केलेली नाही. मागणी नसताना निविदा मागविण्यात आल्या आहेत.

निविदा प्रसिध्दी शा.नि. भाकस/1094/(2639) उद्योग-6, दि. 30/03/94 मधील अनुक्रमांक 1-4-1-3 अ ब/1.4.2.1/1.4.2.2/1.4.1.2 व 1.4.2.3 नुसार ठेकेदार यानी कागदपत्र तांत्रिक लिफाफा सोबत जोडणे क्रमप्राप्त होते. व त्याप्रमाणे निविदा प्रसिध्दी मध्ये नमूद करणे आवश्यक होते. उदा., अनामत रक्कम, आयकर प्रमाणपत्र, विक्रीकर प्रमाणपत्र इत्यादी.

निविदा प्रसिध्दी मध्ये निविदा उघडण्याची तारीख 06/06/11 अशी होती परंतू प्रत्यक्ष निविदा 01/07/11 रोजी उघडण्यात आल्या. एवढया उशिरा निविदा उघडण्याचे प्रयोजन नस्तीमध्ये नमुद नाही.

निविदा प्रकियेमध्ये तीन ठेकेदारानी भाग घेतला आहे. 1) लिऑ ऑक्सिजन 2) संत रामदास गॅसेस व 3) एस.के.एजन्सी. सदर ठेकेदार यांच्या निविदा आवक केलेल्या नाही त्यामुळे निविदा कोणत्या तारखेला प्राप्त झाल्या हे लेखा परिक्षणास समजू शकले नाही.

चलन क्र. 4224 दिनांक 06/12/11, रेग्युलेटर रिपेंरिंग 450 चलन क्र. 4369 दि. 07/10/12 बी पी सी प्लो मिटरसेटल रिलेटींग व्हॉल, हयू मिटर व्हॉल, रॅक्स रेगुलेटर चलन क्र. 4376 दि. 18/02/12 सेल्फ सेरींग व्हॉल चलन क्र. 4418 दि. 06/03/12 Favalve with hamidifire Bottle वरील चलनांची साठा रजिस्टर मध्ये नोंद घेतलेली नाही.

सन 2011-12 मध्ये ऑक्सिजन सिलींडर रिफिंलींग करुन मे. लिओ ऑक्सिजन यानी वेळोवेळी रुग्णालयाला पुरवठा केलेली आहेत. सिलींडर प्राप्त झाल्यांनतर संबंधित ठेकेदार यांना माल मिळाल्याची पोच देताना स्वाक्षरी करुन रुग्णालयाचा शिक्का मारणे क्रमप्राप्त आहे. परंतू सन 2011-12 मध्ये चलनावर रुग्णालयाचा शिक्का नाही.

ऑक्सिजन सिलींडर रिफिंलींग साठा नोंदवही तपासले असता कंसात नमूद केलेल्या तारखाना प्रथम एक सिलिंडर वापरले असे नमूद केले आहे व खाडाखोड करुन त्याचे दोन सिलींडर वापरले असे नमूद केले आहे. (दिनांक 3-11-11, 5-11-11, 19-11-11, 20-11-11, 22-11-11, 23-11-11, 26-11-11, 16-12-11, 2-1-12, 27-2-12, 29-2-12 ) तसेच साठा रजिस्टर मध्ये वस्तू घेणारा व वस्तू देणारा यांपैकी एकाही कर्मचाऱ्याची स्वाक्षरी नाही. तसेच वैद्यकिय अधिकारी यानी साठा रजिस्टर वर्षामध्ये तपासून एकही स्वाक्षरी केलेली नाही. वर नमुद केल्याप्रमाणे एकुण 11 सिलेंडरचे रु. 180/- प्रमाणे

रु. 1980/- जादा प्रदान झाल्याचे दिसते त्याची संबंधितांकडुन वसुली करण्यात यावी.

वसुलपात्र रक्कम रु. 1980/-

सन 2011-12 मध्ये ठेकेदार याना ऑक्सिजन सिलेंडर रिफिंलींग करण्यासाठी वेळोवेळी देण्यात आलेले कार्यादेश लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

दिनांक 1-4-2011 ते 27-6-11 या कालावधी मध्ये ठेकेदार यानी केलेल्या ऑक्सिजन रिफिंलींग सिलेंडर पुरवठ्याच्या नोंदी साठा नोंदवही मध्ये घेण्यात आलेल्या नाहीत.

भांडारात प्राप्त सिलेंडर, त्याचा प्रत्यक्ष वापर त्यानुसार नोंदवहीतील नोंदी याबाबत वरीष्ठांकडुन ताळमेळ घेऊन नोंदवहीतील नोंदी स्वाक्षरीत करण्यात येत नाहीत.

DPSKGGM6001 (Ref No : 98)

## *99 वसई-विरार शहर महानगरपालिका LPT-909-EX वाहनावर हायड्रोलिक लॅडर बसविणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 3365248.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 168260.00/-

***इसारा रक्कम 0.5% स्विकारण्यात आली असुन सुरक्षा अनामत स्विकारण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई-विरार शहर महानगरपालिका LPT- 909-EX वाहानावर हायड्रोलिक लॅडर बसविणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | शालीमार इंजिनिअरिंग |
| तांत्रिक मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र. 5 दि.13/10/10 |
| प्रशासकीय मंजुरी | --- |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | बाजारभाव |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 3365248 |
| बजेट तरतुद | ---- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दि. 27/05/2011 ते दि. 4/06/2011 दै.वृत्त्मानस, उपनगर |
| इसारा रक्कम | रु.20,000/- |
| निविदा रक्कम | रु.1500/- |
| सुरक्षा अनामत | रु.40,000/- |
| कामाचा कालावधी | 2 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु.3800/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | वविशम/आस्था/25/2010, दि. 01/10/2011 |
| काम सुरु दिनांक: | काम पुर्ण दिनांक: ----- |
| धावते/अंतिम देयक<br>एकुण खर्च रक्कम | |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. |

वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत LPT- 909-EX हया दोन वाहनावर हायड्रोलिक लॅडर बसविणे करीता दिनांक 24/5/2011 रोजी दैनिक वृत्त्पत्रात व उपनगर हया वृत्त्पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या निविदा कालावधी 27/5/2011 ते 4/6/11 9 दिवस होता जाहिरातीनुसार 3 निविदा प्राप्त झाल्या सदरच्या निविदा दिनांक 9/6/2011 रोजी उघडण्यात आल्या त्यापैकी शालीमार इंजिनिअरिंग हयांच्या निविदा ठराव क्र. 9 दि. 25/07/11 अन्वये कमी दराचे असल्याने मंजूर करण्यात आल्या.

त्यांच्या कडून बॅंक गॅरेटीं घेण्यात आल्याबाबतची कागदपत्रे नस्ती तपासली असता आढळुन आली नाही.

इसारा रक्कम निविदा कामाच्या 1% घेणे अपेक्षित आसताना इसारा रक्कम 0.5% घेण्यात

आल्याचे दिसुन येते. सुरक्षा अनामत रक्कम 5% प्रमाणे रु. 1,68,260/- संबंधितांकडुन घेण्यात आल्याचे नस्ती तपासली असता आढळुन आले नाही. सदरची रक्कम संबंधितांकडून निविदा कामाच्या 5%प्रमाणे वसुल न केल्याने अनियमितता झाल्याचे निदर्शनास येते. करीता रक्कम रु. 1,68,260/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

टाटा मोटर्स यांच्याकडून प्राप्त झालेल्या चेसीस शालीमार इंजिनियरींग यांना लॅडर बसविण्याकरीता कधी हस्तांतरीत करण्यात आल्या व त्यांनी लॅडर बसवून महापालिकेस कधी परत केल्या याबाबतच्या नोंदी लेखा परिक्षणास तपासणी करीता नस्तीमध्ये उपलब्ध झाल्या नाहीत.

DATASDM5602 (Ref No : 99)

## *100 निविदेमधील न्यूनतम व उच्चतम दर यामधील अवास्तव तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मंजूर निविदाकाराने भरलेला दर व पुरविण्यात येणा-या मालाचा उत्कृष्ट दर्जा या दोन्ही बाबी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत त्यामुळे निविदाकारांकडुन एकाच बाबीसाठी प्राप्त झालेले न्युनतम व उच्चतम दर यामधील तफावतीबाबत आक्षेप नोंदविण्यात येत आहे.***

वसई-विरार शहर महानगरपालिकेने सन 2011-12 या वित्तीय वर्षात हददीतील विविध बालोद्यानात नविन खेळण्यांचा पुरवठा करून व बसवून देण्याच्या एकूण 52 विविध कामांची व त्यांच्या अंदाजित खर्च रु. 1 कोटीची जाहिरात दि. 7/5/2011 रोजी वर्तमान पत्रात देऊन सदर निविदा दि. 20/05/2011 रोजी उघडण्यात आल्या. व सदर जाहिरातीस, 1)मे. अरिहंत इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लि, 2) मे. डायमंड फायर अँड फेब्रिकेशन, 3) मे. हनी फन एन थ्रिलिंग कंपनी, 4) मे. फन प्ले सिस्टीम, 5) मे. बाबा प्ले वर्ल्ड आणि, 6) मे. प्ले मेट सिस्टीम या निविदाधारकांनी प्रतिसाद देवून आपल्या निविदा सादर केल्या. त्यानुसार निविदा धारकांनी दर्शविलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यास महानगरपालिकेने 6 महीन्यांनतर म्हणजे दि. 21/11/2011 रोजी ठराव क्र. 27 अन्वये मंजूरी दिली.

या कामांची नस्ती पडताळली असता असे निदर्शनास येते की, तुलनात्मक तक्त्यामधील घटक क्र. 6, 11, 14, जी 24 आणि 25 यांच्या न्युनतम दर आणि उच्चतम दरामध्ये अवास्तव तफावत

दिसून येते. उदा. घटक क्र.6 मधील मिनिट्युब स्लाईड या खेळण्यासाठी न्यूनतम 1 चे दर रु. 28,800/- एवढे दर्शविण्यात आले असून त्याच कामासाठी उच्चतम निविदेचा दर रु. 1,12,000/- दर्शविण्यात आला आहे. या दोन्ही दरातील अवास्तव तफावतीमुळे न्युनतम 1 निविदाकाराने भरलेल्या दराबाबत आणि प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्न निर्माण होतो. तसेच मंजूर निविदाकाराने भरलेला दर व पुरविण्यात येणा-या मालाचा उत्कृष्ट दर्जा या दोन्ही बाबी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याचे नस्तीमधील कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

DATRADM5901 (Ref No : 100)

## *101 प्रभाग समिती "ब","क" व "इ" मधील दावे व खटले नस्ती लेखा परिक्षणास सादर न करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4018985.00/-

| |
|---|
| ***प्रभाग समिती 'ब', 'क' व 'इ' यांचेकडुन दावे व खटले या लेखा शिर्षांतर्गत खर्च करण्यात आलेले रु.40,18,985/- इतक्या रकमेचे दफ्तर लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.*** |

वसई-विरार शहर महापालिका अंतर्गत सन 2011-12 मध्ये एकूण दावे व खटले यावर खर्च रु. 86,33,995/- एवढा करण्यात आलेला आहे. प्रभाग समिती 'ब', 'क', 'ई' यांना अर्ध समास क्र. 71 दि. 29/4/13 नुसार दप्तर लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत कळविले असूनही आजपर्यंत दप्तर उपलब्ध करून देण्यांत आलेले नाही. म्हणून प्रभाग समिती 'ब', 'क', 'ई' यांनी दावे व खटले यावर केलेला खर्च रु. 40,18,985/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 101)

## *102 राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेकरीता प्राप्त अनुदान व खर्चाच्या नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :महानगरपालिका , राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1117605.00/-

| |
|---|
| ***राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेकरीता प्राप्त अनुदानाचा विनियोग व उपयोगिता प्रमाणपत्राची तपासणी अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने करता आली नाही.*** |

आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये सुवर्ण जयंती रोजगार योजना या लेखा शिर्षाखाली शासनाकडून रु.4,84,000/- अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी रु. 6,33,605/- एवढे अनुदान सुवर्ण जयंती रोजगार योजनेसाठी वर्ग केलेले आहे. एकूण खर्ची पडलेले अनुदान रु. 11,17,605/-

उपरोक्त अनुदानाचे लेखा परिक्षण करावयाचे असल्याने खर्चाच्या नस्ती, शासन निर्णय, रोख वही, बँक पासबुक लेखा परिक्षणास उपलब्ध करून देणेबाबत उपआयुक्त मुख्यालय यांना अर्धसमास पत्र क्र. 144 दि.24/06/2013 अन्वये कळविण्यात आले होते तथापि ते तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्राप्त अनुदानाचा विनियोग/वापर कसा करण्यात आला तसेच उपयोगिता प्रमाणपत्र याची तपासणी करता आली नाही. करीता आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये करण्यात आलेला संपुर्ण खर्च रु. 11,17,605/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 102)

### *103 "आग सुरक्षा निधी" तील प्रत्यक्ष जमा रक्कमांच्या तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 38000000.00/-

| |
|---|
| ***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 कलम (25) नुसार विशेष निधी स्थापन करण्यात आलेला असताना हया निधीत जमा होणाऱ्या रक्कमांचा स्वतंत्र लेखा ठेवणे*** |

***आवश्यक आहे. त्याप्रमाणे स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही. जमा खर्चाच्या वार्षिक लेख्यात दर्शविण्यात आलेली जमा रक्कम व वार्षिक जमा विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली जमा रक्कम यात रु. 3.80 कोटींची तफावत आहे.***

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 129 (सी), 127 (1), 63(5) नुसार अग्निशमन कर मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यांच्या जास्तीत जास्त 2% आकारण्याची तरतुद आहे. महासभा ठराव क्र. 8 दि. 15/2/11 रोजीच्या प्रस्तावनेमध्ये नमुद करण्यात आलेले मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम व ठरावामध्ये नमुद करण्यात आलेले मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम यात विसंगती दिसून येते.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006, कलम 25 नुसार "आग सुरक्षा निधी" स्थापन करून या अधिनियमातील कलम 11,12,13,14 नुसार फी बसवणे व गोळा करण्याची तरतुद असून त्यानुसार जमा होणारा निधी "आग सुरक्षा निधी" या खात्यात जमा करून त्याचा उपयोग अग्निशमन सेवा पथक चालविणेसाठी करता येईल या अनुषंगाने अग्निशमन कर व विविध अग्निशमन सेवा कर आकारणी करणेबाबत महासभा ठराव क्र. 6 दि. 15/02/2011 अन्वये मान्यता देण्यात आलेली असून प्रत्यक्ष अंमलबजावणी 1/3/2011 पासून करण्यास मान्यता देण्यात आली.

सन 2011-12 करीता फायर प्रोटेक्शन व विशेष फायर प्राटेक्शन फी वसुलीचा अंदाज 12.45 कोटी असताना जमा खर्चाच्या वार्षिक लेख्यानुसार रु. 14.30 कोटी प्रत्यक्ष जमा झाल्याचे दिसते. सदरची वसुली नगररचना विभागामार्फत करण्यात येत असून प्रत्यक्षात वसुल करण्यात आलेल्या रक्कमांच्या पावत्या तपासणी करीता उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत. जमा रक्कमांचे विवरणपत्र तपासले असता प्रत्यक्षात रक्कम रु.10.50 कोटी जमा झाल्याचे आढळून येते. वार्षिक लेख्यातील तफावत रु. 3.80 कोटीबाबत अर्धसमास पत्र क्र. 61 दि. 23-4-2013 विचारणा करण्यात आली होती तथापि अद्याप खुलासा प्राप्त झालेला नाही.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 कलम (25) नुसार विशेष निधी स्थापन करण्यात आलेला असताना हया निधीत जमा होणाऱ्या रक्कमांचा स्वतंत्र लेखा ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही. तसेच त्याच स्वतंत्र ताळमेळ घेणे आवश्यक आहे. ताळमेळ घेण्यात न आल्याने त्रुटी निदर्शनास येत आहे.

DATASDM5602 (Ref No : 103)

## ***104 अग्निशमन विभागाकडुन मागविण्यात आलेले व उपलब्ध न झालेले दस्तावेज***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :अग्निशमन कर्मचारी/ अ , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2784600.00/-

| |
|---|
| ***अग्निशमन विभागात ठेका पध्दतीने नेमलेल्या फायरमन व ड्रायव्हर यांना अदा करण्यात आलेल्या देयकांची प्रमाणके व हजेरीपत्रके तपासणीस उपलब्ध न झाल्याने संपुर्ण खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.*** |

अग्निशमन विभागात ठेका पध्दतीने फायरमन व ड्रायव्हर हयांची विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपूर विभागात निविदा मागावून नेमणूक केलेली आहे. त्यांना अदा करण्यात आलेल्या देयकांची तपासणी करणे करीता माहे ऑक्टोबर 2011 व मार्च 2012 हया महिन्याची प्रमाणके व हजेरीपत्रके लेखा परिक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत अर्ध समास ज्ञापन क्र. 60 व 62 अन्वये कळविण्यात आलेले असून देखील आजतागायत दप्तर तपासणी करता उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. त्यामुळे विरार विभागामार्फत करण्यात आलेला खर्च रु. 10,59,600/- व नालासोपारा विभागामार्फत करण्यात आलेला खर्च रु. 17,25,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATASDM5602 (Ref No : 104)

## *105 उद्यान/वृक्षप्राधिकरण विभागाकडुन अभिलेखे उपलब्ध न होणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :उद्याने व क्रिडांगणे , महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 11075792.00/-

| |
|---|
| ***'उदयान व क्रिडांगणे', या लेखा शिर्षा अंतर्गत क्रिडांगण मजूर/देखभाल व्यवस्था (5% क्रिडा राखीव तरतूद) तसेच वृक्षारोपण/उदयान मजूर/देखभाल करण्यात आलेल्या खर्चाच्या नस्ती, प्रमाणके व नोंदवहया तपासणीस उपलब्ध न झाल्याने संपुर्ण खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.*** |

सन 2011-12 या आर्थिक वर्षाच्या वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या जमा व खर्चाच्या वार्षिक लेख्यात दर्शविलेल्या 'उदयान व क्रिडांगणे' या लेखा शिर्षा अंतर्गत क्रिडांगण मजूर/देखभाल व्यवस्था (5% क्रिडा राखीव तरतूद) तसेच वृक्षारोपण/उदयान मजूर/देखभाल या बाबींवर झालेल्या एकुण खर्चाच्या सर्व नस्त्या तसेच जमेच्या रक्कमेच्या नोंदवहया, पावत्या, चलने तसेच 5% क्रिडा राखीव तरतूदीबाबतच्या शासन निर्णयाची प्रत इत्यादी अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत उद्यान/वृक्षप्राधिकरण विभागास अर्धसमास पत्र क्र.30 दि. 18/03/2013 व स्मरणपत्र क्र. 43 दि. 3/04/2013 अन्वये कळविण्यात आले होते. तथापि त्यांचेकडुन अभिलेखे उपलब्ध न झाल्याने खालील तक्त्यात दर्शविलेला संपुर्ण खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

महसुली खर्च

| अ.क्र. | लेखाशिर्ष | खर्च रक्कम |
|---|---|---|
| 1 | वृक्षारोपण | 69,95,113 |
| 2 | बियाणे व रोपे | 6,07,105 |
| | एकुण | 76,02,218 |

भांडवली खर्च

| अ.क्र. | लेखाशिर्ष | खर्च रक्कम |
|---|---|---|
| 1 | बियाणे व रोपे खरेदी | 5,91,000 |
| 2 | वृक्षनिधी अंतर्गत भांडवली कामे | 27,09,555 |
| 3 | वृक्षनिधी अंतर्गत इतर असाधारण खर्च | 1,73,019 |
| | एकुण | 34,73,574 |

DATRADM5901 (Ref No : 105)

1. ***आक्षेप विवरणपत्राबाबत*** :- लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट सर्व परिच्छेदांबाबत लेखापरीक्षण चालु असताना अर्धसमास पत्रे निर्गमीत करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेले अभिलेख व अनुपालने तपासुन सर्वसामान्य स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता करुन घेण्यात आली आहे.स्वतंत्र आक्षेप विवरण पत्रक निर्गमित केले नाही.

2. ***विवरणपत्रके*** :- आवश्यक ती विवरणपत्रके या लेखापरीक्षण अहवालासोबत जोडण्यात आली आहेत.

3. ***अनुपालन*** :- या लेखपरीक्षण अहवालाचा परिपुर्ण अनुपालन अहवाल महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011 चे कलम 10 (1) मधील तरतुदीनुसार मान्यतेच्या ठरावाच्या प्रतीसह 2 प्रतींमध्ये स्वाक्षरीसह या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

4. ***पोहोच*** :- हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याची तारीख कळवुन तात्काळ पोहोच देण्यात यावी.

उप संचालक, (म.न.पा.लेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.४००६१४

क्रमांक :-

प्रत सादर -

मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- 32
मा. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा) एक,महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
सह संचालक(मनपालेप),पुनर्विलोकन अहवाल शाखा, रायगड भवन, नवी मुंबई.

उप संचालक, (म.न.पा.लेप)
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.४००६१४

## परिशिष्ट क्र. 1

### परिच्छेद क्र. 21 - नवघर-माणिकपूर विभागातील वसई रोड येथील रस्ता डांबरीकरण दुरुस्ती करणे.

| अ.क्र. | बांधकामासाठीची बाब | सन 10-11 सुचीनुसार प्रत्यक्ष अदा केलेला दर | दरपृथ: करणानुसार अदा करावयाचा दर | दोन दरांमधील फरक | | बांधकामासाठी वापरलेले साहित्य / एकूण साहित्य | एकूण जादा झालेले प्रदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 80 मी.मी. खडी पुरवठा | 595 | 542.80 | 52.20 | x | 415 घनमीटर | 21,912/- |
| 2 | कठिण मुरूम | 282.30 | 233.10 | 49.20 | x | 103 घनमीटर | 5,068/- |
| 3 | 80 मी.मी. खडी पसरविणे | 35.70 | 32.55 | 3.15 | x | 415 घनमीटर | 1,307/- |
| 4 | कठिण मुरूम पसरविणे | 21.00 | 18.90 | 2.10 | x | 103 घनमीटर | 216/- |
| 5 | खडी दबाई | 10.50 | 9.45 | 1.05 | x | 2768 चौरस मीटर | 2,906/- |
| 6 | 40 मी.मी. खडी पुरवठा | 670 | 618.40 | 51.60 | x | 415 घनमीटर | 21,414/- |
| 7 | 6 मी.मी क्रश खडी पुरवठा | 608.90 | 559.60 | 49.30 | x | 103 घनमीटर | 5,078/- |
| 8 | 40 मी.मी खडी पसरविणे | 35.70 | 32.55 | 3.15 | x | 415 घनमीटर | 1,307/- |
| 9 | 6 मी.मी क्रश खडी पसरविणे | 21.00 | 18.90 | 2.10 | x | 103 घनमीटर | 216/- |
| 10 | साईझ खडी दबाई | 10.50 | 9.45 | 1.05 | x | 2768 चौरस मीटर | 2,906/- |
| 11 | हॉट मिक्स हॉट लेड बिटूमिनियस मॅकडम | 4371.40 | 4146.50 | 224.90 | x | 373.42 घनमीटर | 83,982/- |
| | | | | | | **एकूण वसूलपात्र रक्कम** | **1,46,312/-** |

## परिशिष्ट क्र. 2

**परिच्छेद क्र. 37 - प्रभाग क,ड,ई, बांधकाम विभागातील रस्ते बांधकामाच्या विशिष्ट बाबींच्या चुकीच्या दरपृथ:करणामुळे (रेट ॲनॅलिसिस) ठेकेदारास झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

| अ.क्र. | कामाचे नांव | मोजमाप नोंदवही क्र. व पान क्र. व प्रभागाचे नांव | दरपृथ: करणानुसार अनुज्ञेय दर | दिलेला दर | दरांमधील फरक | | एकूण साहित्य वापरलेले साहित्य घन.मी / चौ.मी. | एकूण जादा प्रदान रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | | 7 | 8 |
| 1 | नालासोपारा (पूर्व) साईधाम हॉटेल ते सेंट जोसेफ मेरी स्कूल | 4/20 ते 26 नालासोपारा प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 2761 चौरस मीटर | 37687.65/- |
| 2 | नालासोपारा (प) येथे लक्ष्मीबेन छेडा मुख्य रस्ता डांबरीकरण करणे | 132/ 19 ते 21 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 7697.62 चौरस मीटर | 105072.51/- |
| 3 | नालासोपारा पूर्व येथील राजीव गांधी शाळा ते ठाकुर विद्यामंदीर पर्यंत रस्ता खडीकरण व डांबारकरण करणे | 17 / 34 ते 42 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 3587.70 चौरस मीटर | 48972.10/- |
| 4 | नालासोपारा (प) पाटणकर पार्क येथील उर्वी अपार्टमेंट व राहूल इंटरनॅशनल स्कूल पर्यंत रस्ता | 44/ 96 ते 101 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 2648.39 चौरस मीटर | 36150.52/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | डांबरीकरण करणे. | | | | | | | |
| 5 | नालासोपारा पूर्व येथील कैलाश दर्शन ते चंद्रेश प्लाझा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 18/14 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 2906.50 चौरस मीटर | 39673.72/- |
| 6 | नालासोपारा चंद्रेश कॉर्नर ते वास्तुओम अपार्टमेंट व दारूलमामूल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 17/ 15 ते 18 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 2833.75 चौरस मीटर | 38680.68/- |
| 7 | सोपारा मुख्य रस्ता ते वाघेश्वरी अर्पाटमेंट आणि रोशनी अपार्टमेंट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 17/ 5 ते 8 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 1835.80 चौरस मीटर | 25058.67/- |
| 8 | नालासोपारा विभागीय कार्यालय हद्दीतील रस्ते खड्डे बुजविणे | 42/ 94 ते 97 | 125.07/- | 131.80/- | 6.73 | x | 5757.55 चौरस मीटर | 38746.31/- |
| 9 | नालासोपारा पूर्व लक्ष्मीनगर येथील विरार मुख्य रस्ता ते शांती रेसीडेंन्सी पर्यंत के.जी.एन. कॉलनी पर्यंत रस्ता खडीकरण करणे | 73/ 71 ते 77 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 1913.10 चौरस मीटर | 26113.81/- |
| 10 | वैभवी अपार्टमेंट ते सोपारा मुख्य रस्ता खडीकरण करणे | 17/ 1 ते 4 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 1117.90 चौरस मीटर | 15259.33/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | नालासोपारा (प) येथील शक्तीभद्र बिल्डिंग ते राहूल ॲकॉर्ड अपार्टमेंट रस्ता डांबरीकरण करणे | 133/ 10 ते 13 प्रभाग (क) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 633.30 चौरस मीटर | 8644.54/- |
| 12 | प्रभाग समिती (ई) क्षेत्रातील सातमा देवी मंदीर ते पापडी नायगाव रस्ता डांबरीकरण करणे | 29/ 35 ते 41 प्रभाग (ई) | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 3211.50 चौरस मीटर | 43836.97/- |
| 13 | तामतलाव येथील शेट्टी जनरल स्टोर फलका व क्रॉस रस्ता सातमा देवी मंदीर पर्यंत रस्ता डांबरीकरण | 15/ 51 ते 54 | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 2634.91 चौरस मीटर | 35966.21/- |
| 14 | नवघर (ड) प्रभाग एव्हयशाईन सिटी स्काय हाईट्स पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण | 190/ 21 ते 33 | 125.07/- | 138.70/- | 13.65 | x | 2542.06 चौरस मीटर | 34699.11/- |
| | | | | | | | **एकूण वसूलपात्र रक्कम रु.** | **534567.13/-** |

## <u>परिशिष्ट क्र. 3</u>

**<u>परिच्छेद क्र. 60 - जुन्या दराने खेळणी पुरविल्याबाबत झालेल्या जादा खर्चाबाबत.</u>**

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदारांचे नाव | कामाचे स्थळ | घटक क्र. | प्रती नग दर | सन 2010-11 चा दर | सन 2011-12 चा दर | प्रदान रक्कम (6*7) | प्रत्यक्ष देय रक्कम (6*8) | जा प्रदा रक्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **11** | **1** |
